

साप्ता
वऱ्हाडवृत्त
दीपोत्सव
२०२२
संपादक : सागर बाबाराव लोडम
सहसंपादक : सौ.प्रियंका सागर लोडम
मुख्यपृष्ठ छायाचित्र : सौ.स्वप्नाली पिंपळकर

अमरावती विभागातील समस्त नागरिकांना तसेच पदवीधर मतदारांना

# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ विभागातील पदवीधर मतदारांना विनंती, शासनाने जुनी पदवीधर मतदार यादी रद्द केल्याने आपल्याला नव्याने नोंदणी करणे आवश्यक आहे, त्याकरिता दि. ७ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत आपल्या जवळच्या मतदार नोंदणी केंद्रावर किंवा मदत केंद्रावर आपली मतदार नोंदणी करून आपला घटनादत्त अधिकार अबाधित ठेवावा!



**डॉ.रणजीत पाटील** (माजी राज्यमंत्री)

आमदार, अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ

RNI Regd. No.
MAHMAR/2016/71990

साप्ता.

# वऱ्हाडवृत्त दीपोत्सव

## २०२२ वर्ष - ७



संपादक : **सागर बाबाराव लोडम**
सहसंपादक : **सौ.प्रियंका सागर लोडम**
प्रकाशक **: मुक्ता पब्लिकेशन**
मुद्रक : **मुक्ता ग्राफिक्स**
**अँड ऑफसेट प्रिंटर्स,**
पाटणे मार्केट, रणपिसे नगर, अकोला
मो. : ९८५०४७१५२०
**मूल्य :** रू.२५०/-

**www.varhadvrutt.com**

# अंतरंग



१) गुरूकुंज व ग्रामगीता — आबासाहेब कडू /६
२) ज्याचं जगणं मातीचं... — पद्मश्री गिरीश प्रभुणे /९
३) हासरी संध्याकाळ — सौ.भारती सावंत /११
४) सायकलींचे आगळे वेगळे 'विश्व' — प्रभाकर नानावटी /१३
५) वऱ्हाड ............. :'फर्दळ' — प्रा महादेव लुले / २१
६) येक अस्ते सळ्ळया — डॉ० रावसाहेब काळे /२४
७) शिवारलळा - — बबलू कराळे /२६
८) चला जाऊया कोडिंग'च्या दुनियेत! — राकेश ग.खेडेकर / २८
१०) नांदा सौख्य भरे ... — चंद्रशेखर पंडित /३०
११) व्रतस्थ पत्रकारितेच्या दीपस्तंभ...... — डॉ.रवींद्र बेम्बरे/३३
१२) समतावादी शिवराय — श्रीमंत कोकाटे/३५
१४) लोकचळवळीतून ........: — महेश वाघ/३८
१५) लोकसंकेत आणि परंपरा — डॉ. संजय बोरूडे/४०
१६) शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन .... — नाना हालंगडे / ४२
१७) कोरोनावरील संजीवनी ... — डॉ. ज्योती धर्माधिकारी / ४४
१८) संत तुकारामांच्या ........ — डॉ.राजेश मिरगे/४७
१९) शिवसेनेची घसरण कशामुळे? — सुरेश कोडीतकर/५०
२०) कथा पहिल्या पत्रकाराची... — प्रतिनिधी/ ५४
२१) प्रेम होईना तुझ्याने.......... — डॉ. नीरज देव / ५५
२२) अविवाहित तरुणाईचे वास्तव — डॉ.ऋतू सारस्वत / ५९
२३) पुतळी — डॉ. रमेश राठोड / ६२
२४) आधुनिकतेची कास धरलेलं ....... — संभाजी पाटील / ६७
२५) कर्तव्यपथावरील प्रधान सेवक! — गणेश हाके / ७२
२६) 'मोळी' — अमोल गोंडचवर / ७४
२७) मनातील संभ्रमी कोलाहल.. — रवींद्र जवादे / ७७
२८) खोके आणि डोक्यांच्या .......... — संजय देशमुख /८५
२९) अनाथाश्रम की वृद्धाश्रम — सौ. अर्पिता शिंदे / ८९
३०) साहित्यातील साहित्य बाह्यता — विनय मिरासे 'अशांत' /९२
३१) इयत्ता १ ते ५ वर्ग .... — निलेश रमेश पिंपळकर / ९५
३१) साहित्यातील अवलिया.......... — शिवाजी भोसले / ९८
३२) सावध ....... लव्ह जिहाद ...... — प्रतिनिधी / १००

# काव्य


| | |
|---|---|
| १) एक क्षण | प्रा.भास्कर एस. भटकर/१९ |
| २) बाभूळ | प्रा. मोहन ज्ञानदेवराव काळे /२० |
| ३) सूर्य | शीलवंत भारत सिरसाट / २० |
| ४) गझल | प्रवीण बाबूलाल हटकर /२३ |
| ५) हा यही प्यार है...... | सौ.स्नेहा कडू / ४९ |
| ६) माय | प्रसेनजित गायकवाड/ ५२ |
| ७) तरी सुध्दा... | नंदु वि. चक्रनारायण / ५२ |
| ८) बंधन | प्रा. सौ. श्रद्धा समीर देशपांडे / ५२ |
| ९) विखारी विचार | डॉ.प्रतिभा जाधव / ७६ |
| १०) निरंतर.... | किशोर बुजाडे / ७९ |
| ११) भाकर | सु.पुं.अढाऊकर/७९ |
| १२) आग्रह | सिद्धार्थ तायडे/८० |
| १३) चल माणूस होऊ... | गौतमकुमार निकम / ८० |
| १४) मनोरमा | अनिता देशमुख सरदार / ८० |
| १५) लोकशाही | रमेश बुरबुर/ ८१ |
| १६) माणुस दूर पळतो.... | दिनेश मोहरील/८१ |
| १७) नवंक्षितीज | राजू चिमणकर / ८१ |
| १८) भ्रम | निर्मला सोनी / ८२ |
| १९) ज्ञान | वैशाली राजीव खंडारे / ८२ |
| २०) माणसाचा भाव राजा | विशाल कन्हेरकर / ८२ |
| २१) जरा समजून..... | विशाल मोहोड / ८३ |
| २२) गझल... | मंगेश गजभिये / ८४ |
| २३) मिळत नाही | हेमलता शरद पाटील / ८४ |
| २४) दान | मिलिंद देविदास हिवराळे/८४ |
| २५) म्हातारपण | रामकृष्ण आसरे/८७ |
| २६) तुम्हीच सांगा पोरांनो | डॉ.लता थोरात/८७ |
| २७) समांतर | निलेश कवडे / ८७ |
| २८) पावसा... | आशिष निनगुरकर / ९६ |
| २९) वस्तुस्थिती | अशोक आगरकर / ९६ |
| ३०) गुण गातो आवडीने | नारायण अंधारे / ९९ |



**सागर बाबाराव लोडम**
संपादक,
साप्ता. वऱ्हाडवृत्त
'दीपोत्सव'—२०२२



# संपादकीय

प्रसारमाध्यम क्षेत्रात माहिती संपादनाची साधने विस्तारली असल्याने, तसेच व्यावसायिक गणिते सांभाळताना वृत्तपत्रांची कसरत होत असल्याने 'वऱ्हाडवृत्त' चे इंटरनेटच्या जगात ऑनलाईन न्युज पोर्टलद्वारे डिजीटल स्वरुपातील वाटचाल दमदारपणे सुरू आहे. जगभरातील घडामोडींची आणि समाजस्पंदनांची जाणीव करून देण्याचे आम्ही ऑनलाइन पोर्टल माध्यमातूनही पत्रकारितचे व्रत जोपासणार आहोत! 'दीपोत्सव' वऱ्हाडवृत्त वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहे.

या अंकांचा मूळ गाभा असलेलं साहित्य, कसदार लिखाण करणाऱ्या लेखकांची मांदियाळी आपल्या भेटीला 'दीपोत्सव'च्या माध्यमातून येणार आहे. वाचकांना सकस बौद्धिक खुराक मिळेल!.

माणसाचे मन, बुद्धी आणि आत्मा आनंददायी करण्याचे काम पुस्तक करीत असते. दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी वऱ्हाडवृत्तचा 'दीपोत्सव' वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. दिवाळीसारखे सण हे मनाला दिलासा देणारे आहेत. महागाई, अतिवृष्टी आदी सर्व विषय ऐरणीवर असले अन् रोजच्या जगण्याबाबतची काळजी, भ्रांत असली तरी सणासुदीच्या निमित्ताने आनंद मिळवण्याचा प्रयत्न, प्रवृत्ती माणसाजवळ असतेच.

दिवाळी अंक म्हणजे उत्तम साहित्याचं भांडार, हे समीकरण कायम ठेवत, या दिवाळी अंकात आबासाहेब कडू यांच्या लेखणीतून साकारलेले 'गुरूकुंज व ग्रामगीता' या लेखातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे वैश्विक कार्य शब्दबध्द केले आहे. अवघ्या महाराष्ट्राला वऱ्हाडी बोलीचे वेड लावणाऱ्या लोककवी डॉ.विठ्ठल वाघ यांच्या कवितेचे भावस्पर्शी चित्रण पद्मश्री गिरीश प्रभूणे यांनी केलं आहे. 'हसरी संध्याकाळ' या कथेत वृध्द आई—वडिलांची आपल्या सून व मुलासाठी असलेली जीवाची घालमेले अतिशय साजेश्या शब्दात भारती सावंत यांनी चित्रीत केले आहे. उध्दव गावंडे यांच्या 'फर्दळ'





या कवितासंग्राहावर प्रा.महादेव लुले यांचे समीक्षण दर्जेदार झाले आहे. वऱ्हाडी बोलीभाषेचे अभ्यासक डॉ.रावसाहेब काळे यांची 'एक असते सळ्या' ही लोककथा वाचकांच्या मनात उत्सुकता निर्माण करते. विनय मिरासे 'अशांत' यांचा 'साहित्यातील साहित्य बाह्यता' या लेखात लेखकाचे जीवन उच्च आदर्शांनी परिपूर्ण असले पाहिजे; कारण त्यांनी रचलेले साहित्य मानवी जीवनात उत्साह प्रदान करते! रवींद्र जवादे, बबुल कराळे, अमोल गोंडचवर, अर्पिता शिंदे यांचे ललित/लेख/कथा आलंकारिक शब्दरचनेतून रसात्मक अनुभव वाचकांना करून दिले आहे. आधुनिक काळात घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढत आहेत, ते प्रमाण कमी कसे होईल यांचे मार्गदर्शनपर लेखन 'नांदा सौख्य भरे' या चंद्रशेखर पंडित यांच्या वैचारिक लेखात केले आहे. श्रीमंत कोकाटे यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांवर लिहिलेले अभ्यासपूर्ण लेखन, संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाने जीवन लोककल्याणार्थ झिजवण्याची नवप्रेरणा, आत्मचैतन्य जागविण्याचा कशी मिळते त्याचे डॉ.प्रा.राजेश मिरगे यांनी केलेले वर्णन मंत्रमुग्ध करणारे आहे. 'पुतळी' या प्रा.डॉ.रमेश राठोड वंधत्व असलेल्या स्त्रीचे संघर्षमय जीवन रेखाटले आहे. संजय एम. देशमुख यांच्या वैचारिक लेखात आपल्या विचारांची सुसूत्र, तर्कशुद्ध मांडणी केली आहे. गांभीर्यपूर्वक लिहलेला तसेच समाजाला उपयुक्त असे विचार, दृष्टिकोन देशमुख यांनी मांडले आहे.

गझल/कवितेची सुंदर बाग या दिवाळी अंकात फुलली आहे. करंज्या, लाडू, शेव, चकली, शंकरपाळी असा उत्तम साहित्यलेखन फराळ आम्ही वाचकांना देण्याचा प्रयत्न केला आहे. 'शब्दची आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका।। असा निर्धार करून वऱ्हाडवृत्त चमूने अतिशय सुबक मांडणीसह वाचकांच्या भेटीला आला आहे. संग्रही ठेवावा असाच हा अंक झाला आहे.

**— सागर बाबाराव लोडम**
संपादक, साप्ता. वऱ्हाडवृत्त

हे पत्र प्रकाशक, मालक, संपादक श्री सागर बाबाराव लोडम यांनी मुद्रक मनोहर प्रभुदास मोहोड, श्री महाविर प्रिंटर्स, जुने अकोट स्टँड, अकोला येथे छापून मुक्ता मल्टीव्हिजन ग्राफिक्स, पाटणे मार्केट, रणपिसे नगर, अकोला, महाराष्ट्र - ४४४००१ येथून प्रकाशित केले. (संपादकीय लेखाव्यतिरिक्त इतर मजकूरातील मतांशी सहमत आहे असे नाही.) संपादक : सागर बाबाराव लोडम

# गुरूकुंज व ग्रामगीता



सबके लिये खुला है, मंदीर यह हमारा' व 'विश्व स्नेहका ध्यान धरे, सबका सब सम्मान करे', गुरूकुंजाच्या महाद्वारावरील हे बोधवाक्य सर्वांचे लक्ष वेधून घेते. गुरूकुंज आश्रमाची निर्मितीच मूळात अशा बोधभावनेतून जगाच्या उद्धाराकरिता वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी करून ठेवलेली आहे. तिथे आलेल्या प्रत्येकालाच काही ना काही स्फूर्ती आश्रमातल्या आतील प्रत्येक द्वारावर लिहिलेल्या बोधवाक्यातून मिळत असते.

१९३५ साली एका झोपडीतून निर्माण झालेल्या या आश्रमाचे आता वटवृक्षात रूपांतर झालेले आहे.गुरूकुंज हा नुसता आश्रम नसून ते 'मानवतेचे विद्यापीठ' ठरावे.तेथील प्रार्थना मंदिरातील सिंहासनावर कोणत्याही देवी-देवतांची मूर्ती विराजमान नाही. सर्वधर्मसमभावाचे जगातील हे एकमेव मंदीर ठरावे. तेथील गाभाऱ्यात बसून कोणत्याही देशातील, धर्मातील मुमुक्षुला आपल्या अंतस्थ असलेल्या भावाने ध्यान, प्रार्थना करता येते.

गुरूकुंज हा नुसता आश्रम नाही. मानवसेवेचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून तिथे छात्रालय, वृद्धाश्रम, अनाथालय, गोशाळा, रूग्णालय व औषधालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच अध्यात्माच्या अभ्यासकाकरिता दासटेकडीवर वं.महाराजांच्या संकल्पनेतून 'राम-कृष्ण-हरि' मंदीर उभारण्यात आलेले आहे.भारतासह जगातल्या अनेक संत महात्म्यांच्या मूर्ती तेथे विराजमान आहेत.आंतरराष्ट्रीय दर्जाचे वाचनालय तेथे निर्माणाधीन आहे, जगातल्या कोणासही इथे येऊन अध्यात्माचा अभ्यास करता यावा हा त्यामागे उद्देश आहे.

गुरूकुंजात आले असता वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अलौकिक कार्याचे दर्शन घडते. विविधांगी केलेल्या प्रयोगातून ते आपल्याला अनुभवता येते. वं. महाराजांनी हिंदी व मराठीतून केलेली विपुल साहित्य संपदा आपणास ईथे अभ्यासता येथे.

सकाळचे ध्यान व संध्याकाळची सामुदायिक प्रार्थना हा गुरूकुंज आश्रमाचा आत्मा आहे, ह्या दोन्ही प्रार्थना देशाचा सुद्धा आत्मा व्हावा. १९३५ सालापासून हा ज्ञान-यज्ञ अविरत सुरु असून यात कधीही खंड पडलेला नाही. श्रीगुरूदेवांच्या पाईकांनीच तो अविरत तेवत ठेवला आहे.

पंढरपूरच्या वाळवंटात जो ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ती व प्रेरणा पांडूरंगाकडून वं.महाराजांना मिळाली, नव्या युगाचा ग्रंथ 'ग्रामगीता'

लिहिण्याची सुरुवातही याच गुरुकुंजातून झालेली आहे व पूर्णत्वही ईथेच झालेले आहे.अध्यात्म व विज्ञान याचा सुरेख संगम आपणास ग्रामगीतेतील ४१ अध्यायात पहावयास मिळतो.

आजची भयानकता पाहिल्यास वं.राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत सांगितलेले विचार तेव्हाच्या आणि आताच्याही काळाला किती अनुरूप व प्रबोधनकारी होते याची प्रचिती येते. ग्रामगीतेत एकूण ४१ अध्याय लिहिले असून ऐकेक अध्याय मानवजातीचे हिताकरिताच लिहलेला आहे. हे सर्व अध्याय लिहिण्याची स्फूर्ती त्यांना भगवंतानेच दिली असल्यामुळे भगवंताचीही असाच समाज निर्माण होवो ही अभिलाषा आपोआपच प्रकट होते.

**पूण्यक्षेत्र पंढरपुरी । बैसलो असता चंद्रभागेतिरी।**
**स्फुरू लागली ऐसी अंतरी । विश्वाकार वृत्ति।।**
**तेथे दृष्टांत होई अदभूत ।**
**कासया करावी विश्वाची मात ?।**
**प्रथम ग्रामगीताच हातात । घ्यावी म्हणे।।**


भगवंताची स्फूर्ती व गुरूकृपा हे जरी निमीत्त असले तरी तल्लख बुद्धीमत्ता, प्रचंड आकलनशक्ती व गहन चिंतनातून त्यांनी ग्रामगीतेतला एकेक अध्याय जन्माला घातला. ग्रामगीतेत नुसता अध्यात्म प्रपंच नाही तर त्यात मानवतावादी विचारातून प्रबोधन व उपाययोजनांचा समावेश आहे.

भारताला स्वातंत्र झाल्यानंतर लगेचच्याच काळात म्हणजे १९५५ साली हा युगग्रंथ लिहून प्रकाशित करण्यात आला. खरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात ह्या युगग्रंथानुसार भारत निर्माण करण्याची पर्वणी आपल्याला चालून आलेली व्होती. भारतीय राज्यकर्त्यांनी संतांचा वापर फक्त राजकारण साधण्यापुरताच करून घेतला हे खेदाने म्हणावे लागते. भारतवर्षात अनेक अवतारी व युगद्रष्टे पुरुष होऊन गेले. त्या अवतारी व युगदष्ट्या पुरुषांपैकी श्री तुकडोजी महाराज हे शेवटचे पुरुष होत. कोणी ऐकतच नाही तर मग भगवंताने अवतार घेणे बंद केले असावे ?


ग्रामगीता हा नव्या युगाचा ग्रंथ आहे, त्यानुसार भारत देशाची वाटचाल अपेक्षित होती. वं.तुकडोजी महाराजांनी त्याकरिता सारा भारत देश पालथा घातला, कीर्तन, प्रवचने व खंजेरीच्या माध्यमातून पोटतिडकीने प्रबोधन केले. अगदी राष्ट्रपती भवनापर्यंत खंजेरीचा निनाद करून प्रबोधन केले. वयाच्या एकोणसाठ वर्षापर्यंतच्या प्रबोधनाचे सार पांडूरंगाच्या साक्षीने या ग्रामगीतेत आपल्या अंतस्थ हृदयातून लिहिले.

**ग्रामगीता माझे हृदय। त्यात बसले सदगुरूराय ।**
**बोध त्याचा प्रकाशमय। दिपवोनि सोडील ग्रामासि।।**

ग्रामगीतेच्या आतापर्यंत अनेक आवृत्या निघाल्या, अगदी शासनानेही आवृत्ती काढली. कर्मयोगी गाडगेबाबा, अनेक थोर विचारवंत, साहित्यिक, धुरंधर राजकारणी ह्यांनी ग्रामगीतेची महती कथन केली आहे. ग्रामगीता ग्रंथातील प्रस्तावना व अभिप्राय पाहिले की मन भरून येते. परंतु ह्या ग्रामगीतेत वर्णन केल्याप्रमाणे आधुनिक भारताची रचना करण्यात सारेच कमी पडले. मनुष्याचा जीवनातले जीवन जगण्याचे जे सुखालंकार आहे ते सर्व या ग्रामगीतेत आलेले आहे, देशभक्ती आहे, देशसेवा आहे, मानवसेवा आहे, मानवोध्दाराची सर्व अंगे अंतर्भूत आहे. मानवी जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात कशी करावयाची याचे योग्य ते विश्लेषण त्या त्या अध्यायात करण्यात आलेले आहे. ते सर्व ग्रामगीता वाचल्यावर कळते, म्हणून ग्रामगीता देव्हाऱ्या पुरती व घरापुरतीच मर्यादित न राहता संसदेत गेली पाहिजे, संसदेतून त्यातील बोधानुसार



सर्व देशात आचरली जाईल असे कायदे झाले पाहिजेत. त्याने देश समृद्ध होईलच हे मात्र निश्चित कारण वं.तुकडोजी महाराजानंतर या कलियुगात युगद्रष्टा संत झाला नाही, होणे नाही. भारताला ललामभूत असलेल्या संस्काराचा, अध्यात्म व विज्ञानाचा अदभूत संयोग ग्रामगीतेत आहे. आपल्या राज्यकर्त्यांनी संत गाडगे बाबा व संत तुकडोजी महाराज हे फक्त स्वच्छता अभियान व उत्कृष्ट ग्राम पारितोषकापुरतेच मर्यादित ठेवले. चीन- भारत युद्धाच्या वेळी ह्याच संताने सीमेवर जाऊन भारतीय जवानांचा जोश वाढविला होता.




अध्यात्मात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तेव्हाच या संताची दखल भारत घडविण्यासाठी घेतली असती तर भारत केव्हाच महासत्ता झाला झाला असता व जागतिक शांतता नांदण्यास मदत झाली असती.

शहरांचा विकास करण्यातच आपल्या राज्यकर्त्यांनी धन्यता मानली. मागचा-पुढचा काहीच विचार न करता शहरे वाढू दिली.

**गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची**
**परीक्षा गावची भंगता अवदशा। येईल देशा।**

आता हरेक शहराची लोकसंख्या प्रचंड वाढली.आतापावेतो लहानमोठे व्हायरस आले, ते विज्ञानानं निभावून नेलं. परंतु आता जो व्हायरस आला आहे तो ह्या मोठमोठ्या शहरीकरणामुळे व शहरातल्या अनियंत्रित असलेल्या गर्दीमुळे आटोक्यात आणता आणता नाकी दम येत आहे. वं.तुकडोजी महारांजाची त्यावेळची हाक कोणी ऐकली नाही. ग्रामगीतेचीही कोणी दखल घेतली नाही. दखल घेतली असती तर आताचा हा व्हायरस चुटकीसरशी आटोक्यात आणता आला असता व भारत देश हा एक आगळाच देश म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर हिऱ्यासारखा प्रकाशमान झालेला दिसला असता. अजूनही वेळ गेलेली नाही. ग्रामगीता हा ग्रंथ त्यांनी ग्रामनाथालाच का अर्पण केला त्याची प्रचिती आपणा सर्व देशवासियांना आता येतच आहे. आपण आपली खेडी स्वयंपूर्ण केली तरच भारताचा विकास हा खऱ्या अर्थाने विकास होईल हे



त्यांनी जाणले होते, माझा जन्मदिवस माझ्या नावाने साजरा न करता ग्रामजयंती म्हणून साजरा करा असेही वं. तुकडोजी महाराजांनी सुचविले होते. स्वातंत्र्योत्तर काळात गावाकडे विशेष लक्ष देऊन गावे स्वयंपूर्ण केली असती तर अनेक अडचणीवर मात करित आपला समृद्ध वारसा चांगल्या रितीने सांभाळता आला असता.

-आबासाहेब कडू, अमरावती
(९५११८४५८३७)

# ज्याचं जगणं मातीचं...! विठ्ठल वाघ



का ळ्या मायचं सौंदर्य घेऊन येणारी विठ्ठल वाघांची कविता. सारं मराठीचं शिवार सुगंधित करते.

निःशब्द झालेली शिवारं शतकानुशतकांची तहानलेली. उन्हाच्या झळांनी रापलेली काळी माय. हिरव्या ज्वारीच्या कोंबाच्या पोटरीतून तरारून येणारं ज्वारीचं रसरशीत भरलेल्या दाण्याचं कणीस पावसाच्या कोसळणाऱ्या सरीवर सरीसारखीच राशींवर राशी भरभरून देणारी विठ्ठल वाघांची कविता :

**झोळी झाडाला टांगून राबराबते माउली**
**तिथं झोळीतल्या जीवा व्हते पारखी साउली**
**अभिषेकात घामाच्या आसं देवाचं पूजन**
**पिकं हालती डोलती जनू करती भजन**
**गव्हा जोंधळयात तवा सोनं चांदी लकाकते**
**जशी चांदी लकाकते कपाशी फुलते**

मातीत राबराबून जगणाऱ्या बळीराजाचं जीवन शिवारातून दिसणारं चित्र झाडाला झोळीच्या खोलीत झोपलेले लेकरू. मायच्या सावलीला कसं पारखं व्हतं, पण पारखेपणातली माया उरी भरून वहाताना दिसते. याच्या निसर्ग देवाचं पूजनही ऐन उन्हाच्या झळाळीत घामाच्या धारांच्या अभिषेकांत होतं. अशा घामाच्या धारांच्या शिंपण्याने पिकही डोलतात, भजन करतात. शेतक?्याचं काळ्या मातीतलं हे जीवन शेतातली-शिवारीतली दैनंदिन वारी करता करता पिकातून जोंधळ्यातून डोलणारा विठ्ठल... भजन करणारा विठ्ठल... कष्टातूनही राबवणुकीतही एक समाधानाचं, समृद्धीचं जीवन कसा जगतो. वाघांची ही तिफण सत्यम्-शिवम्-सुंदरम्चं काळ्या मातीतून बहरून येणारं वास्तवातल्या काट्याकुट्यातूनही जीवनाचं रसभरी दर्शन घडवतं.

**चालं ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ**
**लोनी पायाला चाटती मऊ भिजली ढेकळं**
**काळ्या ढेकळात डोळा हिरवं सपान पाहतो**
**डोळा सपान पाहतो काट पायांत रूततो**
**काटा पायात रूतता लाल रगात सांडतं**
**लाल रगात सांडतं हिरवं सपान फुलतं...**

ज्वारीच्या दाण्याला वाफाळलेली वाफसा आलेली जमीन अलगद लोण्यासारखा मऊ गर्भात धारण करते आणि ज्या मूकपणे, निःशब्दपणे कोंब उगवतो. मुळं रूततात तशी वाघांची शब्दकळा सहज मनात रूजत जाते... उगवत जाते. या रूजव्यातून 'हिरवं सपान... मनात डोलू लागतं. काळ्या मायला नुसता घामाचाच अभिषेक नाही घडतं तर रक्ताचीही शिंपण घडते. ऊन-पावसाच्या जीवनाच्या पाठशिवणीत उन्हाचे चटके आणि रक्तबंबाळ करणारे काटे शेतकऱ्याचं जीवन प्रतीत करतात.

**काळ्या मातीत मातीत**
**तिफन चालते, तिफन चालते**
**ईज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो**
**सदाशिव हाकारतो नंदीबैलाच्या जोडीला**

**संग पारवती चाले ओटी बांधून पोटाला**

'तिफन' कवितेने मराठी-ग्रामीण शेतकरी कष्टकरी समाजाचं खरंखुरं अस्तित्व दाखवलं. मराठी सारस्वताची मातीशी नाळ जोडणारी ही कविता वाघांना जसा सूर जुळवून देते, तशीच महाराष्ट्राला स्वतःची खरी ओळखही करून देते. वाघांची कविता गायनाची शैली पण आगळी-वेगळी आहे. खोल रुतत जाणारा नांगराचा फाळ जसा जसा काळी माय नांगरत जातो तशी कविता. आतन आलेल्या दीर्घ हुंकाररूपी आरोळीनं वाघांच्या शब्दांचा फाळ भसाभसा घुसत जातो आणि मन आसूसून साद देऊ लागतं... मोहरून जातं. तिफन-वृषभसूक्त पन्हाटी यांनी मराठी सारस्वताचा चेहरामोहराच बदलन टाकला. आधीचीच समद्ध असलेली ग्रामीण मराठी जोंधळयाच्या पिकाप्रमाणे बहरू लागली. त्यात व-हाडी बोलीनं सा?्या महाराष्ट्राला वेड लावलं.

**विळा घेऊन राबावा माझ्यामधील सावत्या**
**विठू रुखमाने शोधावा उभ्या पिकात डोलत्या**
**चंद्रभागेच्या पाण्याचा दांड शेतातून जावा**
**अन् बुक्क्याचा सुवास काळया मातीत भिनावा**
**पिवळया धानात फुलावे पंढरीचे अष्टगंध**

आपल्या शिवारातच पांडुरंगाचे दर्शन पाहणारी ही कविता महाराष्ट्रीय माणसाचं अंतरंगच दर्शविते.

**अशी घामाची पुण्याई मोक्ष अवतरे शेता**
**पिकातून डोलणारा स्वर्ग खुणावतो हाता**
**सोहळा हा पंढरीचा जणू पिकांचा उत्सव**
**नवा अध्याय लिहून सुखावतो ज्ञानदेव**
**भुईवर साकारते माझ्या तुक्याचे वैकुंठ**

दिव्य दैवताच्या पायी काळ्या ढेकराची वीट असा रोमारोमात भिनणारा हा विठू. व-हाडी दिंड्या पताकांनी काळ्या मातीशी इतका एकरूप झालाय. सारं वैकुंठच शिवारात साकारते आणि सावळ्या विठ्ठलाला काळ्या ढेकळांच्या वीटेवर उभं करते. ज्ञानदेवापासून तुकोबापर्यंत चालत आलेल्या पंढरीच्या मराठीचा हा अखंड प्रवाह मनाला मोहित करतो. विठ्ठल वाघांनी मराठी सारस्वतांची भिंत चालवून आधुनिक शिक्षणाने कोरडी पडत चाललेली इंद्रायणी-चंद्रभागा गावागावांतील शिवारातून दुथडी भरून वाहू लागली. विठ्ठल वाघांची हा विठ्ठल काळ्या ढेकळातून गोन्या कुंभारासारखा, सावता माळ्यासारखा दंग होऊन नाचू लागला. अभंग ओवीचं वाघांचं नातं 'वृषभसुक्ता'च्या रूपानं उपनिषदांच्या चिरंतन शाश्वत अनादी शब्दरूपांशी एकरूप होऊन शिवारातल्या विश्वदर्शनानं आपल्याला स्तिमित करतं !

**ज्याचे जगणे मातीचे/त्याने आभाळ झेलावे**
**रंग मेघातील सारे / शिवारात फुलवावे**
**भोवतीच्या काळोखाला / आत सामावून घ्यावे**
**सूर्यफुलांचे आभाळी / द्यावे भिरकावून थवे...**

व्वा. असं मातीचं जगणं की सारं आभाळ तोलणारं, सारा समाज जागवणारं, सारं विश्व फुलविणारं, समाजातलं द्वैत भिरभिरणारं...! विठ्ठल वाघांची कविता मनाला भुरळ घालणारी. अज्ञाताचा शोध घेत वास्तवाची वाट चालणारी. बहिणाबाईची सहजता, ज्ञानोबाची तरलता आणि तुकोबांच्या वास्तवतेचं अनोखं दर्शन घडविता घडविता स्वतःची स्वतंत्र वाट शोधणारी माणसातील माणूसपण शोधताना मातीचा रस गंध घेऊन मातीशीच नाळ जोडणारी विठ्ठल वाघांची कविता.

मातीशी नातं जोडताना वृक्ष आणि मातीच नातं एक अतूट असं नातं. काळी माय आपल्या उदरात बीज धारण करते. फळ येईपर्यंत त्याची जोपासना करते. पुढच्या सर्व पिढ्यांना आपली कूस देते. अशी अरण्य संस्कृती रण नसणारी. समतेची बज राखणारी, समरसतेची छाया धरणारी, मातीशी रक्ताची शिंपण करून बहरणारी कविता.

**नोका म्हणू पन्हाटीले होते बोंड्याईंचा भार**
**लेकुरवाईच्या त्या लेकी खेती अंगाखांद्यावर**

विदर्भातली कापसाची शेती... कापसाच्या बोंडाचा भार कसा होईल पहाटीला. जसा आईला लेकींचा भार नाही होत. जाता जाता कवी जीवनाचं सारंही सांगून जातात. तर हा कापूस चंद्रालाही आपल्या धवलतेने लाजवितो आणि कापूस पिकविणारी काळ्या मायची लेक मात्र उघडीच आहे. 'तरी मायमाउलीची मांडी उधळीच आहे...' ही व्यथा त्यांचं मातीशी असलेलं जिव्हाळ्याचं नातं वेदनेची आभाळभर छाया धरून राहतं.

आज साहित्याचं रान माजलंय. फेसबक-व्हॉटस्अॅपच्या युगात जिकडे तिकडे चिखल चिखल दिसत असताना शांत समईसारखा अंधार उजळत कवी स्वतः मात्र...

**घेते आरती समई / त्यात पेटवते वातं**
**मूक मूक जळायचे / असं दोघीतलं नातं.**

अशी मराठी माती फुलविणारी कविता. नाती जपणारी कविता. मूक... निःशब्द अंधार उजळणारी कविता...

**-पद्मश्री गिरीश प्रभुणे**

मो.९७६६३२५०८२

# हासरी संध्याकाळ



आज एक वर्ष पूर्ण झाले दीपक आणि आरती अमेरिकेला जाऊन!' गोविंदराव पत्नी रत्नाबाईंजवळ आपली खंत व्यक्त करत होते. चार वर्षांपूर्वी गोविंदराव सरकारी खात्यातून निवृत्त झाले होते. दिवसभर इवलीशी नातवंडे जय आणि राज सोबत खेळताना ते आपले वयही विसरून जात. आरती आणि दीपक आय.टी. कंपनीत मोठ्या हुद्द्यावर कार्यरत होते. त्यामुळे सकाळीच दोघे कामावर जात. जय नि राज ही जुळी भावंडे अवघ्या तीन वर्षाची. रत्नाबाई आणि गोविंदराव त्यांना फुलांसारखे जपत. त्यांची सर्व कामे दोघे आनंदाने करत. परंतु आताशा रत्नाबाईंचे गुडघे कुरकुर करू लागले होते. म्हणून आरतीने घरातील कामासाठी गंगुबाईंना ठेवले होते. आता घरचे काम नसल्याने रत्नाबाई रिकाम्या असत. त्यामुळे नातवंडांशी गुजगोष्टी करत बसत. कधी हरिपाठाचे अभंग म्हणुन दाखवत. मुलांना रामरक्षा, आरती शिकवत. त्या दिवसभर नातवंडांसोबतच आपला वेळ घालवत असत. संध्याकाळी आरती घरी आल्यावर गोविंदराव नि रत्नाबाई नातवंडांना घेऊन शेजारच्या बागेत जात. मुलांसोबत घसरगुंडी, पळापळी करत मौजमस्ती चाले. घरी आले की हात-पाय धुऊन मुले देवापुढे शुभंकरोती म्हणत आणि आजीकडे गोष्टीसाठी हट्ट करीत. त्यादेखील नातवंडांना गोष्टी सांगत दीपकच्या बालपणात रमून जायच्या, मनाशीच बोलायच्या, 'एवढासा होता जन्मला तेव्हा. कापसाच्या पेटीत ठेवलेले डॉक्टरांनी. रोज देवाकडे त्याच्या जीवाची भीक मागायचे. मोठा झाल्यावर आत्तापर्यंत आपण तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलेय दीपकला!' अशा भूतकाळात रमून गेल्या की नातवंडे कोलाहल करत, 'आजी गोष्ट सांग ना? बाबांच्या बालपणीची नको हं ! ती आता आम्हाला ती पाठ झालीय. नवीन काहीतरी सांग ना?' मग रत्नाबाई गोविंदरावांना आग्रह करीत,'अहो, तुम्ही सांगा आजची गोष्ट. मी माझा पुराणातील अध्याय वाचून परत येते'. मग मुले गोविंदरावांच्या शेजारी कडीपाटावर फतकल मारून

बसत. गोविंदरावांना राजकारणात रस. त्यांना गोष्टी सांगणे इतके जमायचे नाही. मग ओढून-ताणून रामायणातील एखादी कथा सांगायचे. आरती स्वयंपाक आटोपून मुलांना आवाज द्यायची, 'चला जय आणि राज. सारखा आजी आजोबांना त्रास देऊ नका. ते थकलेत आता'. अशा खेळीमेळीच्या कुटुंबात भाग्याचे दिवस नुसते पळत होते.

एके दिवशी दीपक ऑफिसमधून आला ते तोंड पाडूनच. क्षणभर रत्नाबाई चमकल्या. त्यांनी विचारले, 'दीपक आज नाराज का आहेस? काही बिघडलेय का?' तसे दीपक म्हणाला, 'आई, माझ्या कंपनीने मला प्रमोशन दिले आहे'.रत्नाबाई मनोमन खूप हरखल्या आणि त्या उद्गारल्या, 'अरे ही तर आनंदाची गोष्ट आहे, त्यासाठी तोंड कशाला पाडायला हवे? देवा पुढे साखर ठेवा आणि मोठी मेजवानी हवी आम्हाला हं' तसे दीपक म्हणाला, 'आई, कंपनीने प्रमोशन सोबत एक अट घातली आहे. एक वर्षासाठी अमेरिकेला जाण्याची ऑफर दिलीय, पण तुम्हाला या वयात एकटे सोडून जायचे जीवावर येतेय. प्रमोशनही सोडवत नाही आणि तुमचीही काळजी वाटतेय'. तसे गोविंदराव हसत म्हणाले, 'दीपक बिनधास्त जा तू. एक वर्षाचाच प्रश्न आहे ना? आम्ही बघू आमचे. पण तुमचे करिअरचे वय! त्यात आडकाठी नको'. आता दीपकचा चेहरा जरा खुलला. रात्री झोपताना त्याने आरतीला ती बातमी सांगितली. आरतीलाही आनंद झाला. पण तिने विचारले, 'दीपक आपण जाऊ पण आई बाबांचे काय! आताच त्यांना आपल्या आधाराची खरी गरज आहे. हल्ली आईंनाही कामे होत नाहीत'. तसे दिपक म्हणाला, 'अगं गंगु मावशींना सांगू, सकाळी येऊन रात्रीपर्यंत त्यांची काळजी घ्यायला. फक्त झोपायला जातील त्या आपल्या घरी'. आरतीलाही ते पटले. अमेरिकेची स्वप्ने पहात ते दोघे शांत झोपले. नंतर बरेच दिवस दीपक अमेरिकेला जाण्यासाठी लागणारी कागदपत्रे बनविण्यात गुंग होता. असे करता जाण्याचा दिवस जवळ येऊन ठेपला. रत्नाबाई नि गोविंदरावांनी जरी त्यांना जाण्याची परवानगी दिली होती तरी नातवंडांशिवाय राहायचे कसे याची रुखरुख लागून राहिली होती. नातवंडांनाही त्यांचा फार लळा लागला होता. परंतु दोघेही मनाची समजूत घालत. एका वर्षाचाच प्रश्न आहे. अस्से दिवस निघून जातील आणि आपली मुले आपल्याजवळच राहतील.

कालपासूनच रत्नाबाईंच्या पापण्या ओलावत होत्या.त्या आडबाजूला जाऊन डोळे टिपत होत्या. रात्री एक वाजताचे फ्लाईट होते. मुले रात्री दहा वाजता घर सोडणार होती. शेवटी दहा वाजता बाळांचे पापे घेऊन दीपक व आरतीला 'लवकर परत या' असे सांगून त्यांनी निरोप दिला. आणि रिकामे घर खायला उठले. मनसोक्त रडून झाल्यावर दोघांनी एकमेकांना धीर दिला. आता दोघांचा एकमेकांना एकमेकांचा आधार! आज दीपक आणि आरतीला जाऊन वर्ष झाले, याची आठवण गोविंदरावांना झाली. एक वर्ष एका युगाप्रमाणे भासले होते त्यांना! आता चार आठ दिवसात ते परततील, या आशेने हे वृद्ध जीव दिवस मोजत होते. तसे मोबाईलवर व्हिडीओ कॉलिंगने रोज गप्पा होत असत परंतु सहवासाचे सुख हजारो किलोमीटरवरून काय मिळणार! इतक्यात फोन वाजला. कधी निघतात ते सांगायला फोन केला असेल म्हणून गोविंदरावांनी झटक्यात फोन उचलला. तिकडून दीपक बोलत होता, 'बाबा कंपनीने येथे राहण्याची मुदत वाढवली आहे. अजून दोन वर्षे इथेच राहा म्हणून निक्षून सांगितले आहे. बाबा ऐकताय ना?' गोविंदरावांच्या हातून फोन गळून पडल्याचेही ध्यानात आले नाही. इतक्यात रत्नाबाईंनी येऊन फोन हातात घेतला. दीपक घाबरला होता. तो बोलला, 'काय झाले आई? बाबा बरे आहेत ना? आज रात्रीची फ्लाईट आहे परत येण्याची. सहज गंमत म्हणून मी बाबांना दोन वर्षे इथे राहणार असे बोललो' असे ऐकताच रत्नाबाई आनंदाने नाचू लागल्या. गोविंदराव आ वासून त्यांच्याकडे पाहातच राहिले. तशी त्या म्हणाल्या,'अहो उठा, मुले पोहोचतील एवढ्यात. त्यांच्यासाठी मिठाई, खाऊ घेऊन या. गंगुबाईंना पुरणपोळीचा घाट घालायला सांगते' असे बडबडतच त्या तुळशीवृंदावनाशी दिवा ठेवायला गेल्या.

एक हासरी संध्याकाळ फक्त घरातच नव्हे तर त्या सुरकुतल्या मनामनात आणि अंगणातही जाणवत राहिली. त्या आनंदाचे पडसाद म्हणूनच की काय, अंगणातील पाखरांनी मंजुळ किलबिलाट केला. थंड वाऱ्याची एक सुंदर, आल्हाददायक, मनाला तजेला देणारी लहर वातावरणाला भारून गेली.......

- सौ.भारती सावंत
मुंबई, ९६५३४४५८३५

# सायकलींचे आगळे वेगळे 'विश्व'



आपल्यातील बहुतेकांना सायकल चालवायला शिकताना दोन चाकीच्या या वाहनावर पेडलिंग करत करत कसे बसायचे, बसून बॅलन्स कसे साधायचे, कुणीही मागून न ढकलता पेड्लिंग करत हवेत तरंगल्यासारखे कसे जायचे, मित्र- मैत्रीणी- भाऊ- बहिर्णींना डबल सीट घेऊन या रोमांचकारी अनुभवात कसे सामील करून घ्यायचे, न धडपडता कसे उतरायचे इ.इ गोष्टींची नक्कीच मजा आली असेल. हा रोमांचकारी अनुभव फक्त तुम्हालाच नव्हे तर जगभरातील बहुतेकांना गेली शंभरेक वर्षे तरी आला असेल. मुलांच्यापेक्षा मुलींचा अनुभव नक्कीच वेगळा असेल. घरात हे करू नको, ते करू नको, मान वर करून बोलू नको, सातच्या आत घरात, अशा चित्र-विचित्र अटी-नियमांच्या जोखडातून मुक्त होत आपण सायकल चालवू शकतो, सायकलीवर बसून मुक्त स्वातंत्र्य भोगू शकतो; हा अंगावर काटे आणणारा अनुभ्व घेतलेल्या मुलींना सायकल ही एक त्यांच्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठीचे फक्त एक साधन न राहता वेगळेच काही तरी आहे याची जाणीव झाली असेल.

गरीबातील गरीब देशापासून अती श्रीमंत देशापर्यंत सायकली वापरल्या जातात. बहुतेक शहरात व निमशहरात सायकल विक्रीची दुकानं असायची. गल्ली-बोळात सायकलींची दुरूस्ती करणारे सायकलचे 'दवाखाने' असायचे. त्यासमोर सायकल आडवे टाकून पंक्चर काढण्याचे दृश्य शहरातील मुलं- मुलींच्या कुतूहलाचा व टाइमपासचा विषय होता. स्वतःची सायकल नसणाऱ्यांना दर ताशी / दिवशी नाममात्र भाड्याने सायकली घेण्याची सोय असायची. कदाचित बहुतेक जणांनी भाड्याच्या सायकली घेऊनच सायकल चालविणे शिकले असेल. पोहणे व सायकल चालविणे या गोष्टी शिकल्याच पाहिजेत असा दंडक असल्यासारखे बालपणी

या गोष्टी शिकविल्या जात होत्या. सगळ्यांच्या आवडत्या या वाहनाला कधीच ओहोटी लागणार नाही असेच त्याकाळी वाटत होते.

**सायकलचा शोध**

आता आपण वापरत असलेल्या सायकलीचा इतिहाससुद्धा मजेशीर आहे. हाडं खिळखिळे करणारे बोनशेकर्स व एक लहान व दुसरे मोठे चाक असलेले पेनी - फार्दिंग सायकली एके काळी प्रसिद्धीच्या शिखरावर होत्या. सायकलींना केव्हाही आडवे पाडून हाडं खिळखिळे करणारे वाहन (बोनशेकर्स) असे म्हटले तरी त्याकाळीसुद्धा सायकली भविष्यासाठीचे वाहन म्हणून मिरवत होत्या.

१८१०च्या सुमारास इंडोनेशियातील माउंट तंबोरा येथील ज्वालामुखी गंधकाची धूर ओकत होती. कदाचित त्याचाच परिणाम म्हणून की काय, युरोप खंडातील पिकं जळून खाक झाले. दुष्काळी परिस्थितीत अन्न- पाणीविना घोडे मरू लागल्या. सर्व जनजीवन ठप्प झाले. कारण त्या काळी घोडेच वाहतुकीचे प्रमुख साधन होत्या. जर्मनी येथील कार्ल फॉन ड्राइसला घोड्याऐवजी दुसरे कुठले तरी घास- पाणी यांची अपेक्षा न करणाऱ्या साधनाचे स्वप्न दिसू लागले. त्याच्याच या कल्पनाविलासातून सायकलचा जन्म झाला. १८१७च्या सुमारास कार्ल फॉन ड्राइसने तयार केलेला घोड्याच्या आकारात असलेला हा ओबड- धोबड स्वरूपातील सायकलीच्या (dandy horse) प्रारूपात आताच्या सायकलीत असल्याप्रमाणे पेडल्स, चेन- स्प्रॉकेट, ब्रेक यासारख्या गोष्टी नव्हत्या. या दोन-चाकी डँडी हॉर्सच्या सांगाड्याला पायाने सरकवत सरकवत पुढे नेले जात होते. जरी हे अल्पजीवी ठरले तरी त्या काळच्या युरोपमधील संशोधक- उद्योजकांना मोठ्या प्रमाणात त्यातून प्रेरणा मिळाली. अनेक नवे उद्योजक त्या डँडी हॉर्समध्येच सुधारणा करत त्याला आधुनिकतेचे साज चढवू लागले. १८६०च्या सुमारास या डँडी हॉर्सला बॉलबेरिंग्स, स्पोक्स असलेली रिम व रिमभोवती पोकळ नसलेले भरीव रबराचे चाक, तरफाचा वापर करून गीअर बदलण्याची यंत्रणा अशा अनेक सुधारणा करण्यात आल्या.

''प्रत्येक वेळी जेव्हा मी एखाद्या प्रौढ व्यक्तीला सायकलवर पाहतो तेव्हा मला मानवजातीच्या भविष्याबद्दल निराश होत नाही'', असे पिटर गोलकीन यांनी म्हटले आहे. आधुनिक काळात हृदरोगतज्ञ रुग्णाने सायकल चालवावी असा सल्ला देतात. बैठी कामे करणाऱ्यांच्या पायांच्या स्नायूंना सायकलमुळे व्यायाम मिळून जादा चरबी कमी होते. उघड्यावर सायकल चालविण्याने मोकळी हवा मिळते, तसेच शरीराला ऑक्सिजनाचा जास्त पुरवठा होऊन दीर्घश्वसनही होते.

**— ज्ञानेश्वर साकरकार, सायकलिस्ट, अकोला**



एशिया व आफ्रिका खंडातील देशांच्या सायकलींना मागच्या बाजूला सामान ठेवण्यासाठी कॅरियरची सुविधा देण्यात आली. भारतीय महिलांच्यासाठी खास 'लेडीज' सायकली बनविण्यात आल्या. काही काळानंतर खेळाडूंसाठी स्पोर्टस् सायकलींची भर पडली.

**सायकलचे डिझाइन**

मुळात सायकलचे डिझाइन फारच सोपे व सुटसुटीत आहे व त्याची जोडणीसुद्धा तितकीशी किचकट नाही. सायकलीत काही मोजकेच सुटे भाग असल्यामुळे त्याची जोडणी एखादा अर्धप्रशिक्षित कामगारही सहजपणे करू

शकतो. सर्व सुटे भाग एकाच शेडमध्ये बनवून जोडणी करण्याचे कारण नाही. त्यामुळे सायकलीचे महत्वाचे सुटे भागच मोठ-मोठ्या कारखान्यात तयार केले जातात व जोडणी नंतर केली जाते. कमीत कमी मजूरीवर काम करणारे कामगार ज्या देशात मिळतात तेथेच ८०-९० टक्के सुटे भाग तयार होतात.

सायकलीचे पार्टस् बनविण्यासाठी स्टील, अल्युमिनम व अलीकडे कार्बन फायबर अशा गोष्टी वापरून भरपूर दणकट, वजनात कमी व भरपूर दिवस टिकणाऱ्या सायकलींचे उत्पादन करण्याकडे कल वाढू लागला. स्टील, अल्युमिनम वा कार्बन फायबरपासून स्पेर पार्ट बनविणे युरोप-अमेरिकासारख्या श्रीमंत राष्ट्रांना अती खर्चिक (वा तंत्रज्ञानाच्या खालच्या पायरीवरचे) वाटत असल्यामुळे सायकलीच्या सुट्या भागांचे उत्पादन करणारे तेथील कारखाने केव्हाच बंद पडले आहेत. आता सायकलींचे बहुतेक पार्ट तैवान, चीन, भारत या देशात तयार होतात, व हे सुटे भाग युरोप, दक्षिण आफ्रिका, ब्रझिल व अमेरिकासारख्या श्रीमंत देशांना पाठवून त्या त्या देशात जोडणी करून विकले जातात. खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाचे प्रारूप सायकलीत मिळू शकते. रिम तैवान/भारतातून, स्टील अलॉय/अल्युमिनम/कार्बन फायबर चीन-जपानमधून, हबगीअर अमेरिकेतून, टयूब-टायर आणखी एखाद्या देशातून असे करत करत सायकलीचे विक्री व्यवस्थापन होत आहे. अशा प्रकारे उत्पादनाच्या व्यवस्थापनामुळे कळत न कळत सायकलींच्या पार्टचे प्रमाणीकरण होत असून ग्राहकाला याचा फार मोठा फायदा होत आहे. मोठ-मोठ्या कार्पोरेट्सची मक्तेदारी मोडून स्थानिक उत्पादकांचा सहभाग वाढविणे यातून शक्य होत आहे.

**आधुनिक सायकली**

परंतु अलीकडील काही वर्षात सायकलींचा वापर पूर्वीसारखे न राहता श्रीमंतांच्या व्यायामाचे व/वा छंदपूर्तीचे साधन म्हणून होत आहे. त्याचप्रमाणे सायकलीच्या वेगावर जास्त लक्ष दिले जात आहे. कमी वजन हे महत्वाचे घटक असून सायकलीच्या वायुगतिकीला जास्त महत्व प्राप्त होत आहे. जागतिक स्तरावर सायकलींचे मानक ठरविणाऱ्या संस्थेने सायकलीचे वजन ६.८ किलो असे ठरविल्यामुळे बहुतेक उत्पादक हे उद्दिष्ट गाठण्याच्या प्रयत्नात आहेत. या कमी वजनामुळे जास्तीत जास्त वेग मिळू शकेल याची खात्री वाटू लागली आहे. त्याचबरोबर खडकाळ व कच्च्या रस्त्यावरून वेगाने धावू शकणाऱ्या ट्युब-टायरसाठीसुद्धा शोध चालू आहे. नवीन प्रकारच्या आताच्या या दणकट सायकली जगभरातील कुठल्याही प्रदेशात हजारो किलोमीटर्सचे अंतर एकही पार्ट न बदलता सहजपणे पार करू शकतील असे उत्पादकांचा दावा आहे.

**सायक्लिंगची आवड**

पर्यावरण रक्षण व आधुनिक समाजाच्या गरजा यात मोठी दरी आहे. या गरजा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षरित्या प्रदूषणात भर घालत आहेत. त्यामुळे पर्यावरण संतुलन बिघडत आहे व त्यातून होत असलेले हवामान बदल मानवी जनजीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम करत आहे. ही दरी मिटविण्याचा एक मार्ग सायकलींच्या पुनरूज्जीवनात आहे. समाजात सायक्लिंगची आवड निर्माण झाल्यास काही प्रमाणात प्रदूषण कमी करण्यास शक्य होईल असे तज्ज्ञांना वाटत आहे. प्रत्येक लहान-सहान गोष्टीसाठी ५-१० अश्वशक्तीच्या गाड्या वापरून वायू व ध्वनी प्रदूषणात भर घालण्यापेक्षा सायकलींचा वापर करणे इष्ट ठरेल. सायकलींच्या वापरासाठी पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनाची गरज नाही. त्यामंळे प्रदूषण शून्य, परंतं जनसामान्यात पर्यावरण रक्षणाची मानसिकता विकसित न झाल्यामुळे गेल्या ३०-४० वर्षापासून सायकली हद्दपार होत आहेत. एके काळचा घर-घरातील हा सोबती आता सायक्लिंगचे छंद जपणारा म्हणून वा वजन कमी-जास्त करण्याचे व्यायामाचे साधन एवढ्यापुरतेच राहिला आहे.

सायकलींचे उत्पादन वा त्याची उपलब्धता या गोष्टी फार महत्वाच्या नसून जनसामान्यात पुन्हा एकदा सायकलींची आवड निर्माण करण्याची गरज आहे. सायकल संस्कृती रूजविण्याची गरज आहे. शहरवस्तीतील जनसामान्यांच्यामध्ये पर्यावरण रक्षणासाठी सायक्लिंगबद्दल जागृती निर्माण करण्याची गरज आहे व त्यासाठी अनुकूलता उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. व हे काम फक्त जागृत नागरिकच करू शकतील.

काही तज्ज्ञांच्या मते आताच्या सायकलीच्या डिझाइनमध्ये बदल केल्यास शहरातल्या शहरात सायकलींचा वापर वाढविणे शक्य होईल. सायकलीचे डिझाइन शंभर वर्षापूर्वीचे असून काही क्षुल्लक अपवाद वगळता त्यात फार मोठा बदल झालेला नाही. तरूणाईला आकर्षित करण्यासाठी लुकमध्ये फार वेगळे दिसत असले तरी मूळ

ढाचा तसाच आहे. काही सायकलींची सीट जास्त उंचावलेली असेल, काहीतील हब-गीअर उच्च प्रतीचे असू शकेल, काहींच्यात ट्युबलेस टायर्स असतील. परंतु डिझाइनमध्ये फार बदल नाहीत.

**लोकप्रतिनिधीकडून उत्तेजन**

जगभरातील काही शहरात यासंबंधीचे वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. यात त्या त्या शहरातील लोक प्रतिनिधींचा वाटा जास्त आहे. सायक्लिंगची आवड असणारे लोकप्रतिनिधी जिवाचे रान करून सायकल संस्कृतीला जिवंत ठेवण्याचे प्रयत्नही करत आहेत. जगभरातील सायकलींचे छंदिष्ट यासाठी पुढाकार घेत आहेत. काही नगरपालिका सायकलीसाठी स्वतंत्र ट्रॅकची सोय करत आहेत. काही शहरात नगरपालिका नागरिकांना सायकल वापरण्यास उत्तेजन देण्यासाठी एखाद्या कंत्राटदाराला नेमून शहरभर सायकलींची सेवा देत आहेत. सायक्लिंगची आवड निर्माण करण्यासाठी सायकल विकत घेणे, पार्किंगसाठी जागा शोधणे, त्याची देखभाल करणे वा चोरीस जाऊ नये यासाठी उपाय शोधणे या गोष्टींना फाटा देत मोबाइलवर पैसे भरून व क्यूआर कोडच्या सहायाने लॉक-अनलॉकची सुविधा व कुठेही सायकली सोडून आपापल्या कामासाठी जाण्यास योग्य अशी यंत्रणा काही नगरपालिका राबवित आहेत.

लोकांचा सायकलीचा वापर शासनांच्या ध्येय-धोरणावर पूर्णपणे अवलंबून आहे असे म्हणता येईल. सायकलींचा वापर सार्वजनिक रस्ते व इतर भागात होत असल्यामुळे लोकप्रतिनिधींच्या सकारात्मक निर्णयावर विसंबून रहावे लागते. लोकांच्या दबावाविना सायकलींचा रस्त्यावरील वावरावर मर्यादा येऊ शकतात. सायकली चालविण्यासाठी सुरक्षित रस्ते हवेत. जेथे कार्स/बसेससारखी वेगवान वाहने धावत असतात, त्या रस्त्यांच्या कडेकडेनीसुद्धा सायकली चालविणे असुरक्षित ठरते. कुठल्याही क्षणी अपघात होऊन सायकलस्वार मरण्याची शक्यता असते. खड्डे, खाच खळगे असलेल्या वा निसरड्याड्या रस्यावर सायकल चालविणे कसरतीच्या खेळासारखे वाटेल व छोट्यातला छोटा अपघातसुद्धा सायकलीच्या वापराला परावृत्त करू शकेल. कार्स व मोटाराइज्ड बाइकच्या गर्दीत सायकल चालविणे जिवावर बेतू शकेल. २१व्या शतकातील रस्ते व रस्त्यांची देखभाल सायकल-फ्रेंडली नाहीत असे म्हणावेसे वाटते. त्यामुळे सायकलींना उत्तेजन देण्यासाठी नगरपालिका व नगरपरिषदांचे सकारात्मक दृष्टिकोनच हवे. लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतल्यास स्थानिक प्रशासन सायकली वापरण्यास अनुकूल नीती-नियम करू शकेल. खरे पाहता सार्वजनिक वाहन व्यवस्थेच्या ठिकाणापासून घरापर्यंत सायकली वापरण्यास अनुकूल वातावरण निर्माण करणे सहज शक्य आहे. तसे केल्यास जनसामान्यसुद्धा काही प्रमाणात सायकली वापरतील.

**बायसिकल मेयर**

नेदरलँड्स येथील बीवायसीएस (BYCS) ही स्वयंसेवी संस्था निरनिराळ्या शहरातील सायक्लिंगचा छंद असलेल्या गटांशी संपर्क साधून सायकलींचा प्रचार व प्रसार करण्याचा विडा उचलत आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक शहरातील या सायक्लिस्ट्सच्या म्होरक्यांना बायसिकल मेयर म्हणून निवडले जात आहे. त्यांचा उद्देश '५०/३०'. म्हणजे २०३० पर्यंत त्या त्या शहरातील लोकांनी किमान ५० टक्के तरी त्यांच्या मोटराईजड वाहनांचा वापर कमी करणे. मुंबईकरांसाठी फिरोजा सुरेश यांची पहिले बायसिकल मेयर म्हणून निवड झाली आहे.

**फोल्डेबल सायकल**

तरुणाईत सायक्लिंगचा आवड निर्माण करण्यासाठी अनेक प्रकारच्या कल्पना लढविल्या जात आहेत. १५-२० किलोमीटर्सची सायकल सहल, शहरातील रस्त्यावरील स्वयंचलित वाहनांची गर्दी कमी असलेल्या वेळी सायकलींच्या मॅराथॉन/ट्रायथ्लॉन अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. शहराबाहेरच्या महामार्गावर सायकल शर्यतींचे आयोजन केले जात आहे. तरीसुद्धा हे सर्व प्रयत्न अपुरे पडत आहेत. त्यामुळे सायक्लिंगला आपल्या जीवनशैलीचा महत्वाचा भाग बनविण्यासाठी काय करता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे.

एके काळी शहरामध्ये सायकल पार्किंगसाठी भरपूर जागा होती. परंतु गेल्या ५०-६० वर्षात जमीनीच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्यामुळे गोर-गरीबांच्या या वाहनाच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध नाही. काही उद्योजकानी त्यासाठी फोल्डेबल सायकलीचे उत्पादन करून पार्किंगचा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न करत आहेत. युरोपमधील ब्रॅम्पटन ही कंपनी स्विस नाइफप्रमाणे फोल्डेबल सायकलींचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करत आहे. २०-२५ सेकंदात घडी उघडून सायकल वापरता येते. अर्ध्या मिनिटात पार्किंग स्पॉटमध्ये सायकल लावता येते. कारमध्ये, घराच्या कोपऱ्यात वा

ऑफिसच्या टेबलाखाली ठेवता येण्याजोग्य या पोर्टेबल सायकली असून त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे.

**सायक्लिंगचा धोका**

आजच्या प्रदूषणदूषित जगात मानवी स्नायु बलावर धावणाऱ्या सायकलींसारखा दुसरा योग्य पर्याय सापडणार नाही. तरीसुद्धा पर्यावरण स्नेही असलेल्या या वाहनाचा वापर फार कमी देशात होत आहे. अती असुरक्षित व धोकादायक वाहन म्हणून सायकलीवर न पुसणारा शिक्का बसलेला आहे. थंडी-ऊन-पावसाच्या काळात त्याला घरात ठेऊन दुसरा पर्याय शोधावा लागतो. ब्रिटन, अमेरिका व आस्ट्रेलिया या देशात फक्त १ टक्के लोकच याचा नियमितपणे वापर करतात. यालाही अपवाद आहेतच. नेदरलँड्स येथे २७ टक्के वापर होतो. कोपनहेगन या डेन्मार्कच्या राजधानीच्या शहरात ५० टक्के लोक नियमितपणे सायकलींचा वापर करतात. सायकलींचा वापर कमी होतो म्हणून मृत्यूदर काही कमी होत नाही. अमेरिकेत दर १०० मिलियन किलोमीटर सायक्लिंगमागे ५.८ मृत्यु दर आहे. ब्रिटनमध्ये ३.६. परंतु सायकलीचा छंद जोपासणाऱ्या जर्मनीत हाच मृत्युदर फक्त १.७ आहे व डेन्मार्कमध्ये १.५ आहे. या आकडेवारीवरून जास्त प्रमाणात सायकलींचा वापर होत असल्यास मृत्युदर कमी होऊ शकतो व सायक्लिंग जास्त सुरक्षित असू शकते असा निष्कर्ष काढता येईल.

**वेगमर्यादा**

मुळात वेगाच्या बाबतीत सायक्लिंग मोटरिंगशी स्पर्धा करू शकत नाही, हे लक्षात ठेवावे लागेल. शिवाय गेल्या शंभर वर्षात शहर नियोजन व/वा शहर सुधारणा मोटराइज्ड वाहनांना डोळ्यापुढे ठेऊन केली आहे. शहरातील रस्ते, पार्किंग व्यवस्था, गल्ली-बोळातील घरापर्यंत जाणारे रस्ते, पदपथ, चौकांची रचना इत्यादीत कार्सच्या अनुकूलतेकडे लक्ष दिले आहे. त्यामुळे पायी चालणाऱ्यांनासुद्धा घाबरत, अडखळत चालावे लागते, रस्ते क्रॉस करावे लागते. कित्येक शहरात सायकलींसाठी स्वतंत्र रस्ते नाहीत, जेथे आहेत येथे बिनधास्तपणे दुचाकी पार्किंगसाठी वापरले जात आहेत. पदपथावर चालायचे असल्यास झाडं, विद्युत वितरण यंत्रणा (व पथारीवाले) हे अडथळे पार करत जावे लागते.

सायक्लिंग करत असताना वेगाने जाणाऱ्या कार्स/मोबाइककडे संपूर्ण लक्ष ठेऊनच पुढे जावे लागते. चुकून जरी थोडेसे दुर्लक्ष झाल्यास अपघाताला निमंत्रणच. कार्सचे तंत्रज्ञान कितीही प्रगत असली तरी कार चालविणारी माणसच असल्यामुळे थोडीशी चूक झाली तरी जीवावर बेतू शकते. बाइकस्वारं तर कुठल्या तरी युद्धाला तातडीने पोचावे यासाठी वाटेतील सर्व अडथळ्यांच्यावर हल्ला चढवत, वाकडे-तिकडे मिळेल त्या जागेत बाइक घुसवत जात असतात. त्यामुळे सायकलस्वारांना यांच्यापासून चार हात दूर असावे असे वाटत असेल. कार्समधील व्यक्ती मोबाइलवर किंवा कारमधील इतर प्रवाश्याशी बोलत असल्यास शेजारून धावत असलेल्या सायकलीला धक्का लागण्याची शक्यता जास्त. लंडनसारख्या शहराप्रमाणे सायकलीसाठीचे स्वतंत्र रस्ते अरुंद असल्यामुळे अपघात होण्याचा संभव जास्त.

या सर्व अपघाती अवस्थेतून जात असलेल्या सायकलींना पुनरुज्जीवित करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणातील वाढ व हवामान बदल यांच्यात अन्योन्य संबंध आहे, हे कुणीही नाकारू शकत नाही. शहरांतर्गत प्रदूषण पातळी सर्व दैनंदिन जनजीवनावर विपरीत परिणाम करत आहे. हे सर्व टाळण्यासाठी सायकलींचा वाहन म्हणून उपयोगात आणल्याशिवाय गत्यंतर नाही. हे एकदा लक्षात घेतल्यास तातडीचे काही उपाय नक्कीच सुचतील. उदाहरणार्थ शहर वस्तीतील कुठल्याही खासगी वाहनाची वेगमर्यादा कमाल ताशी २५-३० किमी इतके नियंत्रित केल्यास प्रदूषण कमी होईल, वाहतुकीची कोंडी टाळता येईल व सायक्लिंग सुरक्षित होईल. एकदा हे वास्तव समजून घेतल्यास काही अपवाद वगळता सायकलीचे फायदे लोकांच्या अंगवळणी पडतील व पुन्हा एकदा सायकलींना चांगले दिवस येतील.

**सायकलीसाठी प्रगत तंत्रज्ञान**

डच वा डेनिश नागरिकांच्या मनातील कल्पनाविश्वाचे प्रारूप सगळीकडे राबविणे शक्य आहे का? प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या, घातक धूर ओकणाऱ्या चार चाकी वाहनाऐवजी सर्व देशात सायकली वापरल्या जातील का? विशेषकरून पावसाळ्यातील निसरड्या रस्त्यावरून सायकल प्रवास सूरक्षित राहील का?

**प्रगत तंत्रज्ञान सायक्लिंगला स्मार्ट करू शकेल का?**

तीन-चार-पाच रस्ते मिळत असलेल्या चौकातून सायकलीवरून जाताना सायकलस्वारांची भरपूर तारांबळ उडते. हे चौकच सायक्लिंगला सर्वात मोठे अडथळे ठरतात. कार्सचालकांना चौक ओलांडण्याची घाई. मोबाइकस्वारांना

आपल्या बाइकच्या इंजिनाच्या प्रचंड क्षमतेचे/त्यांच्या ड्रायव्हिंग कौशल्याचे प्रदर्शन करण्याची घाई. त्यामूळे सायकलस्वार मेटाकुटीला येतो. व भांबावलेल्या अवस्थेत सायकल चालविण्याचा प्रयत्न करतो. यातून मार्ग काढण्याचे ठरविल्यास चौकातील सिग्नल यंत्रणेत सुधारणा करावी लागेल. पादचारी व सायकलींना चौक ओलांडताना गाड्यांचा अडथळा येऊ नये यासाठी हिरव्या दिव्यातील काही वेळ फक्त यांच्यासाठी ठेवणे वा सायकलींच्यासाठी राखीव ठेवलेल्या रस्त्यावर वेगळे हिरवे सिग्नल ठेवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे लाल सिग्नलच्या वेळी सायकलस्वारांना पाय टेकण्यासाठी व्यवस्था करावी लागेल. त्यामुळे हिरवा सिग्नल लागल्यानंतर तत्परतेने ते पुढे जाऊ शकतील. जास्त चढ असलेल्या रस्त्यावरून जाताना सायकलस्वारांसाठी मदत करणारी Trampe Bicycle Liftसारखी यंत्रणा असल्यास सायकलस्वाराचे श्रम वाचतील. ही यंत्रणा असल्यास सायकलस्वार संतुलन संभाळत एकच पेडल वापरत पुढे पुढे जाऊ शकतो.

सर्वात महत्वाचे म्हणजे सायकलस्वारांना कारचालकांनी प्रयत्नपूर्वकपणे अवकाश देण्याची आवश्यकता आहे. पार्किंगस्पेस वा रस्त्यावर सायकलींना योग्य प्रमाणात स्पेस दिल्यास सायक्लिंग करण्यास उत्तेजन मिळेल. 'सायकल प्रथम' हे धोरण राबविल्यास सायकल चालविण्यात आत्मविश्वास वाढेल. पालकांना सायकलीवरून जाणाऱ्या आपली मुलं-मुलीं धडधाकट परत येतील, याची खात्री वाटेल. पार्किंग स्पेसमध्ये 'सायकल प्रथम' हे धोरण राबविताना कार पार्किंगसाठी कारचालकांना नक्कीच भुर्दंड बसेल. त्यापायी तरी कार्सच्या बेधुंद वापरण्याला आळा बसू शकेल.

आधुनिक तंत्रज्ञानाचे फायदे सायक्लिंगला पोचविणे सहज शक्य आहे. मोबाइल ॲप्सद्वारे सायक्लिंगच्या वेळी एकमेकाच्या संपर्कात राहून सायक्लिंग करता येईल. जवळचा रस्ता शोधण्यास मदत होईल. गर्दीचे रस्ते टाळता येईल. अडचणीच्या प्रसंगी एकमेकांना मदत करता येईल. सायकलची चोरी होऊ नये यासाठी पूर्व सूचना देता येईल. रस्त्यावरील खड्ड्याबद्दलच्या माहितीचे देवाण घेवाण होईल.

सायक्लिंगसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा केवळ मोबाइलपुरते सीमित न ठेवता इतर ठिकाणीसुद्धा पोचवता येणे शक्य आहे. कार्समधील एअरबॅगचे तंत्रज्ञान वापरून सायकलस्वारांच्या हेल्मेटची रचना करणे शक्य आहे. कार्समध्ये कार्सच्या अगदी जवळून जाणाऱ्या सायकलींचा वेध घेणारे



सेन्सार्स कारमध्ये बसविल्यास संभाव्य अपघात टाळता येईल.

चीन येथील एका विश्वविद्यालयाने कारमधील डॅशबोर्डसारखी सायकलीसाठीच्या डॅशबोर्डबद्दल संशोधन करत आहे. सायकलीवर विविध प्रकारचे सेन्सार्स बसवून, पेडल्सचा वेग, त्याची वारंवारता, सायकलस्वाराच्या हृदयाचे ठोके इत्यादीबद्दलची माहिती प्रदर्शित करण्याची सुविधा हँडलच्या जवळपास बसविलेल्या डॅशबोर्डवर असेल. GPS जोडलेले असल्यामुळे कार्समधील डॅशबोर्डप्रमाणे सायकलीच्या मार्गक्रमणाची माहिती त्यात असेल. स्मार्टफोनशी जोडल्यास आणखी अनेक प्रकारची माहिती त्यात प्रदर्शित करता येईल. अल्ट्रासॉनिक सेन्सार्स बसविलेले असल्यामुळे वाटेवरील खड्यांची माहिती मिळेल व त्याप्रमाणे सायकलीची गती व दिशा बदलता येतील. अशा प्रकारच्या स्मार्ट सायकली एके दिवशी जवळपासच्या कार्स/मोबाइकशी परस्पर संवाद साधून अपघाताचे प्रमाण शून्यावर आणू शकतील. ही स्मार्ट सायकल अत्यंत सुरक्षित व सायक्लिंगचे आनंद देणारी असेल.

पुढील काळात अशा प्रकारे सर्व सोईनीयुक्त स्मार्ट इ-बाइक रस्त्यावर आणणे सहज शक्य आहे. हे सर्व करूनसुद्धा कार्स/मोबाइकवाहक सायकलीवर स्वार करण्यास तयार होतील का हा प्रश्न अनुत्तरितच राहील. काही तज्ज्ञांच्या मते सुरक्षिततेची हमी असल्यास १०-६० वयोगटातील शहरवासीय शहरांतर्गत १०-१५ किमीच्या प्रवासासाठी नक्कीच सायकली वापरतील, मात्र यासाठी त्यांच्या सायकलविषयीच्या व पर्यावरण रक्षणाविषयीच्या मानसिकतेत फार मोठा बदल झाल्यास हे शक्य होईल.

- प्रभाकर नानावटी

# एक क्षण

एका क्षणाचा खेळ आहे
जीवनात त्याचे मोल आहे.
ह्यासाठी धावपळ आहे
बाकी सारा गोंधळ आहे!

क्षण मीलनाचा.... क्षण विरहाचा
क्षण भोगाचा....... क्षण त्यागाचा
क्षण शौर्याचा....... क्षण क्रौर्याचा
क्षण धैर्याचा....... क्षण मोक्षाचा!

तो तुला पुसून येत नाही
तो तुला पुसून जात नाही
त्यावर कुणाची मात नाही
त्याला कुणाची साथ नाही!

असं कधी झालं......तो परत आला
असं कधी झालं..... तो आधी आला
असं कधी झालं ..... त्याचा मेळ झाला
असं कधी झालं.....त्याला वेळ झाला!



तो एकदाच येतो
तो एकदाच जातो
तो एकदाच देतो
तो एकदाच नेतो!

तो आता येणार आहे
तो तुला नेणार आहे
तुला हे माहीत आहे
एक क्षणाचा खेळ आहे.

**-प्रा.भास्कर एस. भटकर**
'श्रीराम', ३० चंद्रावती कॉलनी,
साईनगर, अमरावती
मो. : ९८८१३३०५३५

प्रोप्रा.मनोज पांडे
श्रीकमल
कॉम्प्युटर
सेल्स् अ‍ॅण्ड सर्व्हिसेस्
● सी.सी.सी.टि.व्ही. कॅमेरा
● कॉम्प्युटर पार्टस्
● प्रिंटर, लॅपटॉप रिपेअरिंग
● व्हायरस रिमुव्हल
● हार्ड डिस्क रिकव्हरी
EPSON LG intel DELL SONY SAMSUNG
पाटणे मार्केट, रणपिसे नगर,
हॉटेल सुरभिसमोर, अकोला
मो. : 9822365950

श्री त्र्यंबकराव डवले बहुउद्‌देशिय शिक्षण प्रसारक संस्था, अकोला द्वारा संचालित
महाराष्ट्र शासन द्वारा मान्यताप्राप्त उपलब्ध अभ्यासक्रम
डवले ग्रुप ऑफ स्कुल अ‍ॅण्ड कॉलेज, अकोला

| मोठी उमरी, अकोला | जवाहर नगर, अकोला |
|---|---|
| Principal<br>**PROF. PRAKASH DAWALE**<br>M.Com., M.A. Eco., B.Ed. | Principal<br>**MRUNALI P. DAWALE**<br>M.A. , B.Ed., |
| 11th, 12th, Science,<br>Commerce, Fishery,<br>Electronics,<br>Computer Science, IT | Nursary, KG-1, KG-2,<br>1st Std. to 10 Std.,<br>CBSE & State Pattern English<br>& Semi English Medium |

11th, 12th
B.Com.
Part I, II, III
युनिव्हर्सल
कॉमर्स अ‍ॅकेडमी
सिव्हील लाईन रोड,
अकोला,
मो. 7038781721

# बाभूळ

माझ्या बांधावर आहे
एक बाभूळ ती खास
ऊन वारा थंडी सोसे
साहे एकांताचा त्रास

कोणी ढुंकून ना पाहे
राहे सदा दुखी खूप
असे असूनही तिला
मिळे भारी पैकी रूप

पीत डूल तिच्या कानी
तिचा हिरवा तो पाला
शेंगा फुले डांगोडांगी
जसा ज्वानी भर आला

राहे आपल्या तोऱ्यात
ना दे कोणालाही थारा
वारा भलताच खेटे
तिच्या शिनगारा सारा

नसे कोणाची फिकीर
खूश एकांतात राहे
डोळे भरून प्रवासी
टकामका तिला पाहे

जाये लाजून बाभूळ
पडे शेंगातून दाणे
उसवली तिची कूस
गाई धुऱ्याचेच गाणे

घट्ट रोवून एकटी
जशी राणी लक्ष्मीबाई
ठोकी सलाम साजरा
तिच्या धीटपणापाई

गाभुयली चिंच तिला
राहे चिडवत सदा
मीच सवाशीन खरी
तुझी रंडकीची अदा

अशा का बरे बोलता
असा गर्व नाही खरा
नाही मनावर पाडू
कोणाच्याही असा चरा

गाय बकरी जिराफ
पाला खाते तो कोवळा
मन हरखे पाहून
पंगतीचा तो सोहळा

उपयोगी माझी पाने
माझ्या भरलेल्या शेंगा
माझी सालही कामाची
साऱ्या बिमारीला ठेंगा

माझ्या नावाचे मंजन
माझ्या नावाचाच धुरा
वावराच्या डोक्यावर
मीच एकमेव तुरा

**प्रा. मोहन ज्ञानदेवराव काळे**
३०१, माया एनक्लेव्ह,
दुर्गा लॉन्सच्या बाजूला,
कौलखेड रोड, अकोला
मोबाईल - ७०३०२७६५५८



# सूर्य

भावनांना, वेदनांना, वासनांना;
ठेवले काबूत साऱ्या वादळांना.

पोचले चंद्रापुढेही लोक आता;
राहिले आकाश कोठे पाखरांना.

बैलजोडीची दशा वाईट आहे;
अन् सुगीचे दिवस आले माकडांना.

कागदी झाले अता व्यवहार सारे;
भाव आला केवढा ह्या कागदांना.

जर मला आहेस तू विसरून गेली;
पापण्या झरतात का मग हासताना?

दूर नाही या युगाचा सूर्य काळा;
माणसे खातील जेव्हा माणसांना...!

- **शीलवंत भारत सिरसाट**
मु.पो. वाघजाळी, ता. बार्शिटाकळी,
जि. अकोला
मो. ८६६९३२००४५

# वऱ्हाड संस्कृतीचा भारदस्त डोलारा : 'फर्दळ'

गाव म्हनलं कि तथी कौलारू घरं आले, मोठ-मोठाले वाडे आले, गल्या-आल्या, आल्लग- अल्लग समाजाचे येटाय आले, पारं, देवळं, वटे, गोठान हे बी गावातचं. घरा-घरात मातीच्या चुली, जाते, जात्यावरल्या ओव्या म्हननाऱ्या बायका, भुलाबाईचे गाने, देवळातला हरिपाठ हे सारं गावतच पायाले भेटते. गावाचं सबन अर्थकारन चालते ते शेतीच्या भरोशावर. वावरात काम करनं. पिक काहाळनं. अन् त्या पिकाच्यामाथं आपलं घर चालोनं. हे जिनगानी ज्यानं अनुभवली, तो साहित्यीक मातीच्या येदना आपल्या लेखनीत प्रसवल्या शिवाय रायत नाई.

बहिरखेडसारख्या लाहान गावात कास्तकाराच्या खटल्यात जलम घेतलेले हळव्या मनाचे कवी उध्दव गावंडे याईनं आपल्या लेखनीत वावर मांडलं. असं म्हनतात कि ज्याची नाळ गावासंग जुळेल हाये. त्याच्या लेखनीत वावर पायाले भेटते. उध्दवदादाच्या लेखनीतही हिरवगार वावर कसं फुललं. ते त्याईच्या कविता सांगतात. ईशेस म्हनजे गावाकडच्या बोलीभाषेत म्हनजेच वऱ्हाडी बोलीत त्याईच्या कविता असल्यानं शेती, गाव, अन् गावची संस्कृती हे सबन चित्र जीत्तं-जागतं आपल्या डोयापुळे ऊभ रायते. उध्दवदादाचा 'फर्दळ' हा काव्यसंग्रह म्हनजे बहार ओसरल्यावर नव्यानं अंकुरलेलं पीक अर्थातच 'फर्दळ'. दादानं आंदी 'फुल्लोर' काव्यसंग्रह लेयला. मंधात कामाच्या तितंब्यानं लेखनी मांग पळली खरी. पन कवीमनात कवितेचा उमाया दाटुन आल्याबीगर राह्यत नाई. डबल येकदम कसदार ईचाराच्या मातीतून कवितेची फर्दळ फुटली.

कवी म्हतात...!

**आला बर्सत मिरूगं / वासं मातीचा सुटला**
**पानी पिऊन मिर्गाचं / पान्हा गाईले फुटला**

वरच्या कडव्यातले शब्द साधे हायेत. मांडनी सरकी सोपी हाये. पन कवी गावंडे यायईनं प्रतिके अन् उपमा यायचा वापर करून रचनेत गहनता आनली. मिर्गाचं पानी बरसल्यावर साऱ्याईले हरीक होते. मातीचे ढेकलं वले झाल्यावर त्यातून येनारा कस्तुरीसारखा वास. मनाले मोहुन टाकते. मन हर्कीजुन जसा काई गाईले पान्हाचं फुटावं असच वाटते. पयला पाऊस आल्यावरच्या परीस्थीतीचं सुरेख वर्नन करासाठी कवीनं गाय अन् तिचा दाटून आलेला पान्हा हे प्रतिक वापरलं. या उदाहरनावरूनच कवीच्या ईचाराची उच्ची किती मोठी हाये याची परचिती येते.

**उभी आंगनात मायं / हाती डाबलं कुकाचं**
**टाके खुरावर पानी / डोयातल्या आसवाचं**

लेकिचे हात पिव्वे करनं हे मायबापाचं कर्तव्य हाये. ते कर्तव्य पार पाळतांनी आंगाखांद्यावर खेयत लहानाची मोठी झालेली लेक जव्हा सासरी निंगते. तव्हाचा टाईम म्हनजे मायसाठी जनू आभाय फाकल्याचं दुकं. ते दुकं लपवून माय लेकिले सासरी वाटी लावते. परिस्थीतीचे चटके सईन करत.

तयहातावरल्या फोळासारखा जपलेला, हाळा मासाचा गोया. वाटी लावतानी डोयातुन आसवाच्या धारा बसू लागतात. जुन्या काळी नवरी दमनीत बसून जायाची. तव्हा दमनीले जुतलेल्या बैलाची पुजा करासाठी माय हातात कुकाचं डाबलं घीवून खुरावर पानी टाकून बैलाची पुजा करे. असा सांस्कृतिक रिवाज जुन्या काळी होता. हे या कवितेच्या माध्यामातून कविनं अधोरेखीत केलं. पन अलीकळे या रिवाजात बदल झाला. बैलबंडी अन् दमनीची जागा एसस्टीनं घेतली. म्हनुन बाया बैलाचं खुरं समजुन रस्त्यावरल्या येखांद्या गोट्यावर पानी टाकून त्यावर हयद कुकू टाकतात. आधुनिक काळात हा रिवाज खतम झाल्यासारखा हाये.

**ठुलं बांधुनं गाठोळं / तुह्या येचल्या बोंडाचं**
**सांगं कुठीसा ठेवलं / बोंड माया हृदयात**

वावरात पऱ्हाटीचं पिक बहरलं. त्या बहरल्या पिकात कापसाचे पांढरे टप्पोरे बोंड येचतानी घरदनीन कशी हर्पवून जाते. याचं गोंडस वर्नन कवीनं 'हरनी' या कवितेत केलं. कवी गावंडे व लोककवी विठ्ठल वाघ यायच्या कवितेचा आशय जवळपास सारखा वाटते. 'हरनी' या कवितेत गावंडे आपल्या प्रेयसीच्या सुंदर रूपाचं वर्नन करतानी म्हनतात कि…

**बोंडा बोंडाच्या मंधात / गोलं मुखळा खुलला**
**आजुबाजूनं चांदन्या / मंदी चंद्र उजीळला**

त् दुसरीकळे कवी विठ्ठल वाघ म्हनतात…

**कापसाच्या बोंडाले / चंद्र लवू लवू पाह्ये**
**माय माऊची मांडी / तरी उघळीचं राह्ये**

दोघाच्याई कवितेत आशय जरी सारखा असला. तरी ईशय अलग अलग हाये. येकाच्या कवितेत प्रेयसी, प्रेम अन् सुंदरता हाये. त् दुसऱ्याच्या कवितेत वावरात काम करनारी माय अन् तिचं अठाविश्व दारीद्र्य पाह्याले भेटते.

वऱ्हाडी बोलीचं साहित्यीक दालन समृध्द करनारे साहित्यीक डॉ विठ्ठल वाघ, डॉ. प्रतिमा इंगोले, उध्दव शेळके, बाजीराव पाटील, देविदास सोटे इ. यायीनं जगनतानी घेतलेल्या अनुभवातून निर्मान झालेलं साहित्य समाजापुळे ठ्यलं. त्याईच्यासारखंच कवी गावंडे यायनं बी अनुभवातून कविता प्रसवली.

**असं कितीकं भरलं / बाई पानी ढगाईत**
**गेलं पान्याखाली सारं / हिर्वगारं अगाईतं**

झळीच्या दिवसात सबनीकळे चिखोल चिखोल होते. घरदार गयते, दायदान सरते, तरी मयनाभरापासून लागलेली झळी थांबाचं नाव घेत नाई. अशातच वावरातलं हिर्वगार अगाईत पान्याखाली गेल्यावर कास्तकाराच्या डोयातली झप निंगुन जाते. हे कास्तकरीचं दुकंन मांडनारी कविता वाचकाले भावून जानारी हाये.

आपल्या लेखनीत श्रृंगार मांडन्यात कवी भलतेच तरबेज हायेत. ते येका कवितेत म्हनतात…

**ठस्सं भरली आंगान / जसं भरलं कनूस**
**तुले पाऊन जागीचं / थांबे चालता मानुस**

प्रेयसीच्या सुंदर रूपाच वर्नन करतांनी तिच्या रूपाले ठसं भरलेल्या कनुसाची उपमा कवीनं देली.. म्हनजेच कवी शेतीमाती संग किती येकरूप होयेल हाये हे आपल्याले दिसते. रूसवा, कनूस, पान्याले गेलती, रानी, बया ह्या कवितेत श्रृंगाराचा साज पायले भेटते. त् शेतमातीतलं जीवनगानं मिरूग, लानंपनं, खुळ्न, ते, दुकाय, दिवसभर, हरबरा, झळी, तन, पान्याचा ठोक, मातीचे अभंग, गाटा, पीकपानी, बेळ्ळी, मई, वावर, सुगी या कविताईत हिरवं रान दाटून भरलं हाये.

**हंगामात उफनला / सारा कुटारं न भुसा**
**कायं सांगवं आताचं / फर्दळचा भरंवसा**

कास्तकारले सदानकदा नशिबासंगच भांडा लागते. त्याले कई दुस्काळी मारते, कई अतिवृष्ठीनं पीक जाते, कई गारपीठ थंड करते त् उरलीसुरली मालाच्या भावात गपकनी बसते. मेयनत करतचं राहा. अन् येक येक पीक हातचं निंगुन जाते. तसचं कपाशीचं बी होते. पयला मालाचा बहार असतांनी पऱ्हाटीवर लाल्या येते, बोंडअई येते अन् मुख्या पीक चाल्ल जाते. तरी कास्तकार जीद् सोळ्त नाई. पऱ्हाटीले डबलून पानी देते. तव्हा डबलून फर्दळ फुटते. पन हे फर्दळचं बी पीक घरी येईलोक निसर्गाचा काई भरवसा नसते.

कवीनं सामाजितेचं भान जपत 'लानंपनं', 'माळी' 'पुनेव', 'गोठान', 'भुक्क्याईचा मार', 'हुंडाबळी' या कवितेतून मानवी मनाचे सतरंगी पैलू उलघळून दाखवले.

'फर्दळ' या काव्यसंग्रहाची ईशेसता म्हनजे कवितेत आलेले व'हाडी बोलीचा बाझ जपनारे पिव्वर व'हाडी शब्द. जसे की सिदादही, घळ्ळी, कुकाचं डाबलं, रूमनं, बेळ्ळी, दाट्ठा, हरीक, गुळं, चतकोर, शिसी, काताऊनं, खयवाळी, फर्दळ या शब्दाईच्यानं फर्दळ हिरवली. म्हनुनच 'बापू दसरी' याईनं कविची पाठराखन करताखेपी म्हटलं कि, गावंडे यायच्या

कवितेत प्रतिमा अन् प्रतिमान यातली विविधता मनोवेधक हाये.

कवी उध्दव गावंडे यायच्या ‘फर्दळ’ या काव्यसंग्रहात येकून ५६ कविताचा समावेश हाये. या काव्यसंग्रहाचे संपादक मुक्ता पब्लिकेशनचे सागर लोडम यायीनं प्रकाशनाची जबाबदारी लिलया पेलली. मुखपृष्ठ पायल्याबरोबर नजीत भरनारं ‘फर्दळ’ हे संग्रहाचं नाव वाचताखेपीचं डोयापुळे गाव अन् शेतीमाती तरळाले लागते. हे जादु या शिर्षकी नावात हाये. जनू ‘फर्दळ’ हे नाव या काव्यसंग्रहरूपी देवळाचा कयस हाये. ग्राम्या जीवनाचं मनोहरी दृष्य डोयापुळे उभं करनारं मनोहरी मुखपृष्ठ सौ. गंधाली घोंगडे यायीनं उत्तम साकारलं. माई अर्थातच देवका देशमुख व बापू दासरी याईच्या मार्गदर्शनात साकरल्या गेलेल्या या ‘फर्दळ’चं पीक शेतकरी मनाच्या कवी उध्दव गावंडे याईले साहीत्यीक जगतात मानाचं पान देनारं हाये. हा वाचकाची काव्य जिज्ञासा भागावाले हातभार लावनारा कसदार अन् रसदार संग्रह हाये. वऱ्हाडी बोलीचं वैभव जेच्यात ठासुन भरलं हाये असा ग्रामीन संस्कृतीचा भारदस्त डोलारा म्हनजे ‘फर्दळ’.

**समीक्षक - प्रा महादेव लुले (देवबाबू)**
तिवसा/बार्शिटाकळी, मो ९९२३०८५३११



**हात मोकळा सोडा. एक भारतीय जगातला दुसरा सर्वात श्रीमंत माणूस झाला आहे. त्याचा उत्सव करायचा आहे!**

# गझल

जरा जरा खुणावते मनातल्या मनात ती
मला खुशाल जाळते मनातल्या मनात ती

तशी समोर टाळते निहाळते लपून का
उगाच का सतावते मनातल्या मनात ती

कधी मधाळ रात्र ती, कधी अधीर सांज ती
कधी पहाट हासते मनातल्या मनात ती

जरा बटास सोडता, जगास वेड लावते
मला तशीच बांधते, मनातल्या मनात ती

कधी लकीर ओढते कधी लकीर खोडते
उगाच डाव मांडते मनातल्या मनात ती

कधी किशोर ऐकत रफी सुरात डोलते
खुशाल तार छेडते मनातल्या मनात ती

जशी नभात चांदणी  तशी मनात साजनी
किती समीप वाटते मनातल्या मनात ती

चराचरात तीच ती कणाकणात तीच ती
मला प्रवीण वाटते मनातल्या मनात ती

**-प्रवीण बाबूलाल हटकर**
लेखक/ गीतकार दिग्दर्शक

## लोककथा :

# येक अस्ते सळ्ळया

डॉ० रावसाहेब मुरलीधर काळे.

येक अस्ते सळ्ळया. तो जाते कुपाकाटी. तुरूतुरू निंगते. निंगते तं त्या सळ्ळयाच्या शेपटीत काटा रूतते. हा सळ्ळया जाते म्हाल्याजोळ.

'म्हाली बॉ म्हाली बॉ, माया शेपटीतला काटा काळून देता हो?'

म्हाली बॉ काय म्हनतात, 'नाई बॉ. तुई शेपटीगिपटी मुळ्ळी तं मी काय करू बॉ?'

'मुळ्ळी तं मुळ्ळी. पन तुमी माया काटा काळून द्या बॉ. मले चालताई नाई येऊन रायलं.'

'मुळ्ळी तं मले काई म्हनाचं नाई. शेपटी लय नाजूक अस्ते.'

'नाई म्हनत.'

मंग काय करते तो म्हाली, काटा काळाले लागते तं त्याची शेपटी तुटून जाते. मंग तो तडक तडक उळते, त्याची शेपटी उळते. तो म्हन्ते, 'माई शेपटी आता भरून द्या.'

म्हाली म्हन्ते, 'नाई बॉ, मी तं भरून नाई दीऊ शकत तं आता कसं?'

'नाई म्हन्ते बॉ काई करा माई शेपटी मले वापीस पायजे.'

'मुळेल शेपटी कशी देऊ सांग?'

'नरानी द्या नाई तं शेपटी द्या. नरानी द्या नाई तं शेपटी द्या.'

शेवटी म्हाली म्हन्ते, 'शेपटी तं मी काई जुळून नाई देऊ शकत. त्या बदल्यात हे नारानी घे बॉ.'

तो नारानी घेते. कुपाकाटीनं चाल्ला जाते. कुरूकुरू, कुरूकुरू निंगते तं पुळे जाते. पुळे जाते तं काय होते? तथी येक बुढी दिसते. येका झोपळीत ती बुढी सयपाक करत असते. हा पायते तं ती बुढी ताव्यावरची भाकर हातानंच उलटते. तिले चटके लागतात. हा जाते तथी, 'काहो आजी काय करून रायली?'

'भाकरी थापून रायली बाप्पा.'

'तू काहून भाकरी हातानं उलटतं? तुया घरी सराटागिराटा नाई काय?'

'नाई रे बाप्पा, माया घरी कायचा सराटागिराटा. मी गरिबीन हाव.'

'सराटा नाई तं तू असं कर माया जोळची नरानी घे भाकरी उलटाले.'

'नाई बाप्पा. तुई नरानी-गिरानी तुटली तं तू मांगशील तं मी कुठून देऊ. माया जोळ काय दुसरी नरानी हाय?'

'नाई आजी, मुळ्ळी तं मुळ्ळी जाऊ दे. हे घे नरानी. उलट तुया भाकरी. कुठी हाताले चटके लावतं.'

बुढी नरानी घेते. भाकरी करता करता त्याची नरानी खुळून जाते. तो सळ्ळया बुढीले म्हन्ते,

'कावं आजी तुया तं माई नारानी खराब केली. तोळ्ळी त्या तं.'

'आता रे बाप्पा?'

'आता तू असं कर माई नरानी भरून दे.'

मंग ती बुढी म्हन्ते, 'नाई बाप्पा तुई नरानी मी कुठून भरून देऊ. तुले तं पयलेच सांगतलं मी गरिबीन हाव.'

'नाई नाई, ते नाई जमत.'

'तुले नरानी कुठून देऊ आता?'

'नाई जमत असीन तं तू काय कर (म्हन्ते) तू भाकरीच दे म्हन्ते. भाकरी दे नाई तं नरानी दे. भाकरी दे नाई तं नरानी दे.'

बुढी म्हन्ते, 'बाप्पा, असं कर तुई नरानी तं देऊ शकत नाई ह्या भाकरीच तू घेऊन जाय.'

भाकरी घेते बॉ सळ्ळया. भाकरी घेऊन चाल्ला जाते कुपाकाटीनं. तुरूतुरू तुरूतुरू कुपाकाटीनं चाल्ला जाते पुळे. तं पुळे काय होते? बाजूनं येका खोपळीत कुंभार आवा काळत असते. त्याचे लेकरं ना फुटेल घागरीच्या खापरखुंड्याच खातात. खापरखुंड्याच खातात. मंग ते खापरखुंडया खात असतात ते पोरं. मंग हा सळ्ळया कसा म्हन्ते, 'कारे बाबू तुमच्या मायनं सयपाकगिपाक केला की नाई?'

'नाई बॉ आमी गरीब हाव. कुंभार हाव. आमच्या घरी काई खायाची सोय नाई तं आमी काय करतो, कच्चो घागरीचे खापरं रायले का तेच खातो. पोट भरतो.'

'अरे हट लेका, हे खापरखुंड्या खाल्ल्यापेक्शा हे घ्या माया जोळच्या भाकरी खायाले.'

'नाई बॉ, आमची माय आमाले रागईल. आमाले मारीन.'

'तुमच्या मायले इच्यारून घ्या. बापाले इच्यारून घ्या.'

तो कुंभार म्हन्ते, 'नाई बॉ. भाकरी खाल्ल्यावर तुमी मांगतल्या तं कुठून द्यावं. आमच्या घरी काई धान्य नसते.'

तो म्हन्ते, 'घ्या माया जोळच्या भाकरी खा.'

ते पोरं भाकरी खाऊन घेतात याच्याजोळच्या. भाकरी खाल्ल्यावर हा सळळ्या काय म्हन्ते,

'कारे सगळयाच्या सगळया खाल्ल्या काय? मले काईच नाई ठेवल्या काय?'

'नाई.'

'आता असं करा, भाकरी द्या कशातरी.'

'तुमाले तं पयले सांगलं. आमी कुठोलच्या भाकरी देऊ?'

'भाकरी नाई तं तुमच्या जोळची खोबरी द्या.'

'काई हायस गळ्या तुले तं पयलेच म्हटलं होतं.'

'नाई नाई, खोबरी द्या नाई तं माया भाकरी द्या. खोबरी द्या नाई तं भाकरी द्या.'

शेवटी कुंभार त्याले खोबरी देऊन देते. सळळ्या घेते अन् कुपाकाटीनं तुरूतुरू चाल्ला जाते. मंग पुळे जाते. कुपाकाटीनं गेल्यावर त्याले येक झन म्हैस तोंडात दोयताना दिस्ते. पोरगा आला तं त्याच्या तोंडात दोयते. पोरगी आली तं तिच्या तोंडात दोयते, बायको आली तं तिच्या तोंडात दोयते.

'काहो म्हन्ते काई खोबरी, काई अयंद काईच नाई काय तुमच्या घरी? म्हैस दोयाले काई नाई काय?'

'नाई बॉ.'

'हे घ्या माया जोळची खोबरी.'

'नाई बॉ. म्हशीनं लाथाफात मारली तं तुमी भरून मांगसाल.'

'हेट, काई भरून नाई मांगत. नाई नाई घ्या घ्या.'

ते देते खोबरी. दूध काळते. अर्धी खोबरी भरते राजा. ती म्हैस लाथ मारते. ती खोबरी फुटून जाते. फुटल्यावर काय म्हन्ते, 'माया खोबरीची कायजी नाई केली. माई खोबरी द्या म्हन्ते. खोबरी द्या नाई तं म्हैस द्या.'

'अरे नाई बॉ. म्हैस देल्ल्यावर मायं कसं होईल?'

'नाई नाई. खोबरी द्या नाई तं म्हैस द्या, खोबरी द्या नाई तं म्हैस द्या.'

खोबरी तं नाई हे म्हैस घेऊन जाय म्हन्ते बॉ. तो त्याले म्हैस देऊन टाकते. हा सळळ्या म्हैस घेते अन् कुपाकाटीनं निंगते कुरूकुरू. मंग पुळे जाते तं त्याले येक शेतकरी दिसते. त्या शेतकऱ्या जोळ येकच बईल अस्ते. येका धुरीकून त्याची बायको अन् येका धुरीकून तो बईल. असं आऊत हाकालते. हा सळळ्या जाते त्याच्या जोळ अन् म्हन्ते, 'काय राजा जमलं हे? काय राजा शोभते काय? बायको जुत्ता. तुमच्या जोळ बईल अशील तं बईल जुता, गोरा अशीन तं गोरा जुता, हेला अशीन तं हेला जुता, गधं अशीन तं गधं जुता. तेही नशीन तं म्हैस जुता. अशी बायको जुतनं बरोबर हाय काय?'

'तुमचं म्हन्न बरोबर हाय. बईल नसला तरी पन आमाले काम तं कराच लागते. शेतकरी हाव. काम नाई केलं तं पिकनार नाई तं मंग पोट नाई भरनार.'

'हे घे माया जोळची म्हैस. जुता. तुमचं काम भागू द्या. तुमचं काम झाल्यावर लागे वापीस द्या.'

'नाई बॉ. तुमच्या म्हशीले काई झालंगिलं तं तुमी मलेच म्हन्सान. त्यापेक्शा हेच बरं हाय. माई बायकोच जुततो.'

'नाई नाई, काई नाई होत. जुता म्हैस.'

मंग तो राजा म्हैस घेते. जुतते हो. काम करते. काम करता करता काय होते? बईल असा उफानते. बईल उफानल्यावर त्या वखराची पास त्या म्हशील लागते. मंग म्हैस होते लंगळी त्या पायाले लागते तं.

'काहो माई म्हैस लंगळी झाली. म्हशीचा पाय दुरूस्त करून द्या, नाई तं बायको द्या. म्हैस द्या नाई तं तुमची बायको द्या.'

'नाई नाई राजा. मी कसा देऊ म्हशीचा पाय दुरूस्त करून?'

'नाई नाई ते नाई जमत. म्हशीचा पाय दुरूस्त करून द्या, नाई तं बायको द्या. लगळी म्हैस घेऊन कुठी जाऊ आता. म्हैस द्या नाई तं बायको द्या.'

'पाय तं काई दुरूस्त होत नाई. तुमी असं करा बॉ बायको घेऊन जा.'

बायको घेते. असं करता तो सळळ्या चाल्ला जाते. तिकळे जाते. मस्त गेल्यावर लागे दूर येक जत्रा दिसते. त्या जत्रेतलं डमरू घेते. डमरू घेतल्यावर झाळावर चळते. त्या बायकोले चळोते. चांगला शेंड्यावर चळते. ते डमरू वाजोते. डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ शेपटीवर नरानी कमावली, डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ नरानीवर भाकरी कमावल्या, डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ भाकरीवर मळकं कमावलं, डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ मळक्यावर म्हैस कमावली, डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ म्हशीवर बायको कमावली. डुबूऽऽ डुबूऽऽ, डुबूऽऽ डुबूऽऽ...



# शिवारलळा

वा

रा थोडा मंद गतीने आज आपल्याच तालात वाहत झाडाच्या पारंब्याना सतत खुणावत चाललेला... सूर्य सुध्दा हळूहळू डोईवर आलेला... त्याचे सोनेरी किरणे आसमंतातून अलगतच जमीनीवर पडलेले, ते कोवळे किरण सुध्दा सोन्यासारखे चकाकून त्यांनी मनपटलावर राज्य केलेलं. वाऱ्याच्या त्या लहरीमध्ये गारवा अजिबात न जाणवलेला, त्यामुळेच शरिराला उष्णतेची चाहूल लागून शरीराची कांती कोमेजून गेलेली. शरीर घामाणे ओलेचिंब, अन् कासावीस झालेले, झाडांची पाने सुध्दा हलतांना पाहिजे तसे न दिसनारे... जणू वाऱ्याने मौन धारण केले की काय असा भास सर्वत्र जाणवलेला, जीव कासाविस होऊन अगदी आतूर झालेला... तहानेने संपूर्ण देहच हपापल्यागत अगदी व्याकूळ झाल्यागत बेचैन झालेला... पाण्यासाठी  जीव जीवंत असून सुध्दा करपलेला, अंगाची लाही लाही होत होती, कितीही अंगावरचा घाम पुसला तरी शरीर ओथंबल्यागत पुन्हा व्हायचे. एवढा ऊकाळा या सबंध वातावरणात जाणवत व्होता. एवढ्यात एक थंड वाऱ्याची झुळूक हळूच शरीराला सुखद गारवा देऊन गेली...  आसमंतात हळूहळू काळे-काळे ढग एकत्र यायला लागले... त्या ढगांनी आपले वर्चस्व सर्व आकाशामध्ये स्थापित केले. सूर्य सुध्दा त्या ढगांच्या आड जाऊन लपला आहे असे वाटत होते, आणि त्याचे वास्तवं अस्तित्व जणू थोड्या वेळासाठी नाहीसे झाल्यागत जाणवत होते. वातावरणामध्ये आता थोडा गारवा आल्यागत शरीराला भासत होते.  आकाशामध्ये एकवटलेले काळे ढग त्यांनी सोबत आणलेले पाणी केव्हाही या भूमिवर बरसणार व्होते. त्यांना थोडी टिचकी जरी मारली तरी धो-धो ते बरसणार होते, असे रुप घेऊन ते आता अवतरले होते... तसेच आसमंतात एक लख्ख प्रकाश चकाकत गडगळ असा आवाज कानाला बोचरा करुन सोडणारा एका एकी आला... आणि वाऱ्याने पिंगा खेळण्यास सुरवात केली तशा धो धो सरी आकाशातून पडू लागल्या शिवारातील शेतकरी राजाने नांगरलेली जमीन अगदी ओलीचिंब झाली होती त्याचा सुगंध सर्व आसमंतात बहरुन मनाला मोहून टाकत होता... तिच्या कुशीत पाणी मावेनासे झाले होते,  सर्वत्र पाणीच पाणी दिसत व्होते. आता त्या शिवारातील सुगंधीत मंतरलेल्या जमीनिची ओटी भरण्याची

वेळ समिप आली होती...

मग शेतकरी राजाने त्या जमीनीच्या कुशीत बिज पेरुन तिची ओटी मोठ्या मनोभावे भरली, कारण त्याला माहित होते की, या वरच त्याचे सर्व पुढील मनोमनी धरलेली स्वप्ने हीच जमीन आता साकार करणार आहे. त्यामुळे तिचा लळा या वेड्या शेतकरी राजाला लागला आहे... त्याने तिच्या कुशीत पेरलेले बिज आता रुजू लागले आहे त्याला आता कोंब फुटले आहे आणि त्याचे आता लहान लहान रोपामध्ये रुपांतर झाले आहे... त्यांना वाऱ्यासोबत डोलण्यांचे वेड लागले आहे... त्यांची काळजी घेण्यात शेतकरी राजा आपल्या जीवाचे रान करत आहे, त्याने आपले सर्व लक्ष आपल्या शिवारात एकवटलेले आहे... त्या रोपांचे आता परिपक्व अधिक भरुन आणण्यासाठी आता पावसाची नितांत आवश्यकता आहे... त्यामुळे त्याची सारखी नजर आकाशाकडे खेळली राहायची पण आकाशामध्ये एकही ढग त्याला दिसत नाही... पिकांना सुध्दा आता तहान लागली आहे ते आपली तहान भागवण्यांसाठी आसूसलेले आहे... त्यांची तगमग पाहून शेतकरी राजा मनाने खजिल होतो आणि या पिकांची तहान कशी भागवावी अशी त्याच्या समोर एक परिक्षाच ऊभी राहते... या करीता त्याची सतत चाललेली असते धडपड... पिकाचे परिपक्व रुप पाहण्यासाठी त्याचे डोळे आसूसलेले असते त्याची एक कल्पना त्याच्या मनाच्या गाभाऱ्यात त्याने पहिलेच ऊभी केली असते... पण ऐनवेळी या पावसाने दगा दिल्यामुळे त्याच्या सर्व स्वप्नावर पाणी फिरवल्या जाईल, याची भिती त्याच्या मनामध्ये दस्तक देऊन जाते...

वातावरणामध्ये आता ऊकाळा आला होता. पावसाची वाट पाहून सारी सृष्टीच थकली होती पण पावसाचा कोठे थांग पत्ता नव्हता... त्यामुळे या ऊकाळयामध्ये शिवारातील पिके दिवसा आपल्या माना टाकून अर्धे मेल्यागत व्होत होते... त्यांच्यामध्ये पाहिजे तसा ताजेपणा या पावसामुळे राहिला नव्हता... आणि त्याच्यामध्ये पाहिजे तसा भरीवपणा सुध्दा आलेला नव्हता. या काळामध्ये शिवारातील पिके आपल्या भारदस्त रुबाबाने वाऱ्यासंगे आपले मनसोक्त डोलत असायचे, पण या ऋतूमध्ये पाऊस कमी पडल्यामुळे त्यांचा रुबाब थोडा का होईना पण कोमेजूनच गेला होता... म्हणतात निसर्ग दगा देत नाही तो आता नाही तर केव्हा तरी यईलच तो आपला धर्म विसरणारच नाही तो येणार नक्की येणार याच आशेवर तो शेतकरी राजा ठाम होता... ही आशा त्याच्या मनामध्ये खोलवर रुजली होती, कारण त्याच्या आईवडिलाने त्याला हाच धडा दिला होता... माणस एकदाचा दगा देईल पण निसर्ग नाही याचा त्याला ठाम विश्वास होता. पण निसर्गावर मानवाणे आज कुरघोडी केली आहे, त्यामुळे आज ही परिस्थिती शेतकरी राजावर तर आली नसावी असा प्रश्न सतत ह्दयाच्या कप्यामध्ये वेदनेप्रमाणे निर्माण होते... पण याचा विचार त्या शेतकरी राजाच्या डोक्यामध्ये दस्तक देत असेल का, कारण त्याने आपल्या शिवाराशी लळा लावला होता जन्मोजन्मीचा... त्याने प्रत्येक वेळा सामना केला असंख्यं संकटाचा त्यामुळेच त्याच्या अंगवळनी पडले आहे संकटाला सामोरे जाण्याचे...

शिवारातील पिकाकडे पाहिल्यावर शेतकरी राज्याच्या विचाराचे थैमान त्याच्या डोक्यात घुमू लागते... निसर्गाने खरोखरच आपल्याला दगा दिला का, असा प्रश्न सतत शेतकरी राजाच्या डोक्यात तरंगत असतो... कारण पिकामध्ये पाहिजे तसे नवचैतन्य त्याला दिसत नाही, त्यामुळेच की काय त्याचे अवसान डगमगल्यासारखे व्हायला लागत आहे... पण तो आपल्या मनाशी बांधतो एक अतूट निश्चयाची गाठ, माझ्या हाडाची राख जरी झाली तरी सुध्दा मी या मातीशी बांधील राहिल... आणि या भूमिची ओटी सतत भरतच राहील, मग मला कितीही प्रकारच्या संकटाला सामोरे जावे लागले तरी... मी हरलो नाही आणि हरणार सुध्दा नाही... तर मी जिंकणारच, माझ्या शिवारात मी सृजनतेची प्रक्रिया नव्या ऊमेदीने घडवून आणिलच... त्याकरिता मला कितीही जन्म घ्यावे लागले तरी चालेल... मी शिवारामध्ये दाण्याची रास पेरेलच, मग निसर्ग आणि इतर संकटाला सामोर जावे लागले तरी चालेल...

नाही भरघोस उत्पन्न होईल पण माझे अंश तर जगतील, माझे गुरे ढोरे तर जगतील याचीच आशा मनाच्या कोपऱ्यात मी बंद करुन ठेवली आहे...

**- बबलू कराळे (स. शिक्षक )**
अवधूत नगर, 'जान्हवी निवास', दर्यापूर
जि.अमरावती, मो. ७२१८०२९८३८

# चला जाऊया कोडिंग'च्या दुनियेत!

स

ध्याच्या इंटरनेट युगात असंख्य गोष्टी वेगाने पुढे जात आहेत. त्यासाठी स्मार्टफोन व कॉम्प्युटरचे मोठे योगदान म्हणावे लागेल. आपल्यातील सर्वच जण कोणती ना कोणती वेबसाइट नित्यनेमाने वापरत असतो; पण आपणास ठाऊक आहे का? आपण जी वेबसाइट वा ॲपचा वापर करत आहोत, ती ज्याच्यामुळे सक्रिय आहे, त्यास एक गोष्ट कारणीभूत असते, ती म्हणजे 'कोडिंग'. त्यामुळे 'कोडिंग' विश्वाचे एक वेगळंच वलय आपल्या अवती-भोवती निर्माण झालं आहे. त्याच अनुषंगाने आपण या 'कोडिंग'च्या आगळ्या-वेगळ्या दुनियेची सफर करणार आहोत.

**कोडिंग म्हणजे काय?**

'कोडिंग' म्हणजे कॉम्प्युटरची एक स्वतंत्र भाषा, ज्यास मशीन कोड असे म्हणतात. ती कॉम्प्युटरला कमांड देते, म्हणजे कॉम्प्युटरला काय करायचे आहे, कसे करायचे इत्यादी गोष्टींवर तिचा वर्चस्व असतो. एकप्रकारे कॉम्प्युटरला जी भाषा कळते, त्यास 'कोडिंग' असे म्हणतात. मशीन कोड एक कॉम्प्युटर प्रोग्राम असतो, जो बाइनरी (द्विमान पद्धत जसे की.. ०, १) मध्ये लिहिला जातो. इतर प्रोग्रामिंग भाषांना मशीन कोडमध्ये ट्रान्सलेट केले जाते, जेणेकरून कॉम्प्युटर ते समजू शकेल. मशीन कोडच्या जागी प्रोग्रामिंग भाषा (एचटीएमएल, सीएसएस, जावा इत्यादी...)चा वापर केला जातो, जे समजणे देखील सोप्पे आहे. जगातील प्रत्येक वेबसाइट ही कोडिंगच्या मदतीनेच काम करते. त्यामुळे कोडिंगला एक महत्त्व असून, कोडिंग करणाऱ्याला 'कोडर' असे म्हटले जाते.

मुख्य कोडिंग लँग्वेज कोडिंग शिकण्यासह आपणास काही प्रमुख कोडिंग भाषांबाबत (लँग्वेज) जाणून घेणे महत्त्वाचे असते. त्या पुढीलप्रमाणे आहेत...

१) सी-लँग्वेज : सी लँग्वेजला सुरुवातीला निर्माण करण्यात आले. डेनिस रिच्ची यांनी १९६९ ते १९७३ या काळात याची निर्मिती केली. जावा, पीएचपी, जावा स्क्रिप्ट व लँग्वेजचे सिंटेक्स (मांडणी) हे सर्व सी लँग्वेजवर आधारित आहेत.

२) सी ++ : हा अत्यंत पॉवरफुल प्रोग्रामिंग लँग्वेज आहे, याचा वापर गेम्स, ब्रेवेर आणि ऑपरेटिंग सिस्टमला विकसित करण्यासाठी केला जातो. सी+ + पॉवरफुल असण्यासह खूपच लवचिक आहे. हा वेगळ्या प्रकारे ऑफ प्रोग्रामिंगला सपोर्ट करतो.

३) जेएव्हीए (जावा) - जावा एक प्रोग्रामिंग लँग्वेज आहे, ज्याचा वापर ॲप बनवण्यासाठी केला जातो. जावाला 'सन मायक्रोसिस्टम्स'ने नव्वदच्या दशकात निर्माण केले. ॲपच्या निर्मितीसाठी जावा सर्वात सोप्पा पर्याय आहे. जावाला नेटवर्क ॲप्लिकेशन बनवण्यासाठीच डिझाइन करण्यात आला आहे. जर आपणास जावाचे प्राथमिक ज्ञान असेल, तर आपण एक छानसं ॲप डिझाइन करू शकता.

४) एचटीएमएल : एचटीएमएल एक कोडिंग लँग्वेज आहे, ज्याचा वापर वेबसाइट डेव्हलपमेंटमध्ये सर्वात जास्त केला जातो. एचटीएमएलचा अर्थ म्हणजे हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज होय. एचटीएमएलचा शोध टिम बर्नर्स ली यांनी १९८० साली लावला. एचटीएमएलमध्ये सर्वात जास्त महत्त्वाचे असते, ते म्हणजे टॅग.

जर आपण त्याला योग्यरित्या टॅग करू शकलो नाही, तर एचटीएमएल देखील काम करणार नाही. एचटीएमएलमध्ये असंख्य छोटे कोड असतात, जे एकत्रितपणे संपूर्ण सीरिज बनवतात. एचटीएमएलला आपण साधारण नोटपॅडवर ही लिहू शकतो. एचटीएमएलच्या मुलभूत गोष्टी शिकल्यानंतर आपण सहजपणे वेबसाइट निर्माण करू शकता.

५) सीएसएस : याचा वापर वेबपेजचे लेआऊट, रंगीत फोटोंचे डिझाइन व कस्टमाइज करण्यासाठी केला जातो. याला कोणत्याही एक्सएमएल (एक्स्टेंसिबल मार्कअप लँग्वेज) आधारित मार्कअप लँग्वेजसह वापरता येते. हा एक स्वतंत्र एचटीएमएल आहे.

६) आरयूबीवाय (रूबी) : याचा वापर वेब ॲप्लिकेशन

डिझाइन करण्यासाठी केला जातो. ही एक पायथनची सामान्य कोडिंग लँग्वेज आहे. यात डेटा विश्लेषण, प्रोटोटायपिंग व प्रूफ ऑफ कॉन्सेप्टसारखे ॲप्लिकेशन असतात. रुबीचा सर्वात जास्त वापर रेल वेबसाठी केला जातो. रेल वेब रुबीच्या माध्यमातूनच साकारण्यात आले आहे. त्यात आपणास वाटत असेल, तर कोणत्याही अडथळ्याशिवाय बदल करू शकता.

७) पायथन : एचटीएमएल, सीएसएस आणि जावा स्क्रिप्टपेक्षा पायथन सर्वात वेगळे आहे. याचा वापर डेटा सायन्समध्ये केला जातो. इतर प्रोग्रामिंग लँग्वेज पीएचपी एमवायएसक्यूएल जावा स्क्रिप्ट डॉट एनइटी

**कोडिंग कशी शिकावी ?**

जर कोडिंगला आपण आपलं करिअर म्हणून निवडता, तर आपण कॉम्प्युटर सायन्समधून इंजिनिअरिंग, बीसीए वा एमसीएची पदवी धारण करू शकता. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, कोडिंग शिकण्यासाठी पदवी असावी असे काही गरजेचे नाही. कोडिंगमध्ये प्रभुत्व स्थापन करण्यासाठी आपण इंस्टिट्यूट वा ऑनलाइन ट्युटोरिअलच्या माध्यमातून ही ती शिकू शकता. कोडिंगच्या दुनियेत सर्वातआधी आपणास एचटीएमएल आणि सीएसएस शिकावे लागते, ज्याच्या माध्यमातून आपण काही वेबसाइट विकसित करू शकता. तसेच, पेमेंट सिस्टम वा डेटाबेस, सुरक्षिततेबाबत अधिकाधिक वेबसाइटसाठी आपणास जावा स्क्रिप्ट, पीएसपी, एसक्यूएल, पायथन इत्यादींची ओळख असणे गरजेचे आहे. मोबाइल आयओएस आणि अँड्रॉइडसाठी जावा वा कोटलिन, फ्ल्युट्टर इत्यादी लँग्वेज शिकावी लागतात.

**ऑनलाइन आणि ऑफलाइन कोडिंग**

ऑनलाइन आणि ऑफलाइन कोडिंग यामधील एकाची निवड करण्याआधी, आपणास हे जाणून घेणे गरजेचे आहे की, आपणासाठी कोणते माध्यम सर्वात योग्य असेल. त्यामुळे दोघांमधील फरक जाणून घेणे गरजेचे आहे.

ऑफलाइन कोडिंग शिकण्यासाठी आपणास कोचिंग क्लासला जात प्रोग्रामिंग पुस्तकाच्या माध्यमातून कोडिंग शिकावी लागेल. तसेच, ऑनलाइन कोडिंग शिकण्यासाठी असंख्य वेबसाइट आहेत. ज्याच्या माध्यमातून आपण कोडिंग शिकू शकता. गुगलवर सर्च केल्यास आपणास असंख्य वेबसाइट दिसू शकतात. येथे काही वेबसाइट आपणास मोफत, तर काही वेबसाइटसाठी आपणास पैसे द्यावे लागतात. तसेच, नव्या शिक्षण नीतीनुसार आता इयत्ता सहावीपासूनचे विद्यार्थी कोडिंग शिकू शकतात.

कोडिंग शिकण्याचे फायदे जेव्हा आपण कोडिंग शिकण्याची कला अवगत करता, त्यानंतर आपणासाठी सर्व गोष्टी सोप्या होतात, तसेच कोडिंग शिकणे या काळातील सर्वात महत्त्वाची बाब आहे. कोडिंग एक असे कौशल्य आहे, ज्याला सध्याच्या काळात सर्वात जास्त डिमांड आहे. एक कोडर वा कॉम्प्युटर प्रोग्रामरकडे नोकरीच्या असंख्य संधी असतात, तसेच ते आपल्यातील कौशल्याच्या आधारे खूप चांगला पैसा कमावू शकतात. कोडिंगच्या मदतीने आपण वेबसाइट, ॲप आणि व्हिडीओ गेम बनवू शकता, तसेच आपण दुसऱ्यांसाठी काम करत पैसे कमावू शकता. कोडिंगसाठी तार्किक विचार करणे गरजेचे असते. आपणास कॉम्प्युटरमध्ये स्टेप बाय स्टेप कमांड फिड करावे लागतात. असे केल्याने आपण एक व्यक्ती वा एखाद्या समस्येला सोडवण्याची क्षमता निर्माण करू शकता.

**पात्रता** : कोडिंग शिकण्याच्या विविध पात्रता आहेत. बॅचलर्ससाठी बारावीनंतर चांगल्या गुणांनी आपण मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोडिंग शिकू शकता. जर आपणास मास्टर्स करायचे आहे, तर आवश्यक गुणांसह पदवीधर असणे गरजेचे आहे. असंख्य वेळा किमान जीपीएची आवश्यकता असते.

मित्रांनो, कोडिंग शिकल्यानंतर असंख्य करिअरची संधी या क्षेत्रात निर्माण होतात. कोडिंग शिकत आपण मोठ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये सॉफ्टवेअर ॲप डेव्हलपर, वेब डेव्हलपर, कॉम्प्युटर सिस्टम इंजीनिअर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, बिझनेस इंटेलिजेंस ॲनालिस्ट, कॉम्प्युटर प्रोग्रामर, सॉफ्टवेअर क्वालिटी ॲनालिस्ट इत्यादी क्षेत्रात नोकरी करू शकता. येणाऱ्या काळात जगभरात इंटरनेटचं युग जोमानं सक्रिय होणार आहे. ज्यात कोडर (कोडिंग करणारे)ची गरज नितांत भासेल. हे क्षेत्र काही छोटे क्षेत्र नाही. या क्षेत्राची व्याप्ती अफाट आहे. सध्या आपण टीव्हीवरील असंख्य लहान मुलांना कोडिंग शिकवणाऱ्या जाहिरात पाहत असतो. नव्या युगाला लहानपणापासूनच कोडिंगचे ज्ञान प्राप्त व्हावे, म्हणून त्या दिशेने उचललेले ते पाऊल आहे, तसेच असंख्य (सीबीएससी) शाळांमध्ये देखील कोडिंगचे ज्ञान इयत्ता पहिलीपासून देखील सुरू झाले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात कोडिंगचे महत्त्व वाढणार असून, त्याचा फायदा चांगलं करिअर करण्यासाठी तरुणांना होणार आहे.

**-राकेश ग.खेडेकर**

# का नांदा सौख्य भरे ...

ही जोडप्यांच्या विवाहाची गुणवत्ता व आरोग्य यांचा संबंध अमेरिकेच्या ब्रिगहॅम यंग विद्यापीठातील कुटुंबसंशोधक रिक मिलर यांनी तपासला असता त्यांना असे दिसून आले की, जसा विवाहाचा दर्जा वर्षागणिक वाढत जातो तसे शारीरिक प्रकृतीही सुधारत जाते. विवाहानंतर जर नवरा-बायकोचे वारंवार खटके उडत असतील तर त्या विवाहाची गुणवत्ता फारशी नसते व अशा स्थितीत दोघांचीही शरीरप्रकृती फार चांगली राहत नाही. असे यापूर्वीच्या संशोधनातही दिसून आले आहे. आताच्या संशोधनात असे दिसून आले आहे की, तुमचा विवाहाचा दर्जा जर चांगला असेल म्हणजे स्वभाव, एकमेकांना समजून घेणे हे सगळे पूरक असेल तर नवरा-बायको दोघांचीही प्रकृती चांगली राहते व वर्षागणित ती सुधारत जाते. आताचे हे संशोधन जर्नल ऑफ मॅरेज ॲन्ड फॅमिली या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. सकारात्मक वैवाहिक संबंध हे दीर्घकाळ तुमची प्रकृती निरोगी ठेवतात. असे १६८१ जोडप्यांच्या अभ्यासात दिसून आले आहे. ज्यांच्यात वैवाहिक संघर्ष होते त्यांची शारीरिक प्रकृती वाईट होती. वैवाहिक संघर्षाचा परिणाम हा दोघांच्याही प्रकृतीवर होत असतो. जी जोडपी कडाडून भांडतात, तावातावाने सतत युक्तिवाद करतात त्यांच्या शरीरप्रकृतीवर वाईट परिणाम होतो. जर तुमचा विवाह चांगल्या दर्जाचा असेल तर जरी जोडीदाराचा एखादा दिवस वाईट गेला तरी त्याला समजून घेतले जाते. एकमेकांना अशी सहानुभूती दाखविल्याने दोघांच्याही मनावरील ताण कमी होतो व परिणामी शरीरप्रकृती चांगली राहते. (संदर्भ : दै.लोकसत्ता दि.६ जुलै २०१३)

महादेवाला, शिव याला अर्धनारीनटेश्वर असे म्हटले गेले आहे. कारण त्यांनी अर्धांगिनीला = पत्नीला = पार्वतीला खरोखरच आपल्या अंगाचे अर्धे अंग बनविले आहे. शिव या शब्दाची फोड श + ई = व अशी करता येते. ई = ईश्वरीय तत्त्व = शिवतत्त्व = स्त्रीतत्त्व. यामधून 'ई' हे तत्त्व काढून घेतले, 'ई' या तत्त्वापासून आपण घटस्फोट घेतला तर फक्त 'शव' बाकी राहील. आपल्यातून जीवन निघून जाईल. म्हणून No Life without Wife या वाक्प्रचाराप्रमाणे आपल्यातून लाईफ निघून जाईल. अर्धांगिनीला वेगळे केल्यास अर्धांगवायू होण्याची, तब्येत खराब होण्याची दाट शक्यता असते. कारण आपण स्वतः स्वतःची ज्या प्रमाणात देखरेख करू शकतो त्याहून कितीतरी जास्त प्रमाणात अर्धांगिनी आपली देखरेख ठेवत असते. त्यामुळे ती सोबत असताना अर्धांगवायू होण्याची शक्यता नगण्य असते. म्हणून झालेले लग्न टिकवून ठेवणे हे आपल्याच फायद्याचे आहे. घटस्फोटानंतरच्या दुसऱ्या लग्नाला अनुभवावर आशेचा



विजय असे विनोदाने म्हटले जाते. पहिल्या लग्नामुळे होत असलेल्या त्रासातून मुक्त होण्याकरिता आपण घटस्फोट घेऊन दुसरे लग्न करतो. यामध्ये दुसऱ्या जोडीदारामध्ये पहिल्या जोडीदाराचे अवगुण नसतील अशी आशा असल्यामुळे आपला दुसरा संसार हा सुखाचा होईल असे वाटते. पण No body is perfect . प्रत्येक व्यक्तीमध्ये काही दोष हे असतातच. दुसऱ्या जोडीदारामध्ये पहिल्या जोडीदारात असलेले दोष नसतील पण दुसरे दोष असतील. म्हणून Remarriage is exchanging one set of problem with another set of problem असे म्हटले जाते. एका अवगणाच्या गटाला दुसऱ्या अवगणाच्या गटाशी बदलणे यालाच घटस्फोटानंतरचा पुनर्विवाह म्हणतात. आपल्यातसुद्धा अनेक दोष आहेत, असतात. अशावेळी आपल्याकडील दोषांकडे डोळेझाक करून दुसऱ्यांच्या दोषांवर लक्ष केंद्रित करणे हे व्यवहारिकदृष्टया योग्य नाही. आपण जसे आपल्या चुकीबद्दल देवाकडे माफी मागतो, केलेल्या चुकीबद्दल शिक्षा होऊ नये असे आपल्याला वाटते हीच वृत्ती जोडीदाराबद्दल ठेवल्यास घटस्फोटाची वेळ येणार नाही. जोडीदार हा आपल्याशी लग्नामुळे फेव्हिकॉलने जोडला गेल्याने हा जोड तोडताना आपल्यालासुद्धा खूप त्रास हा होणारच आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून पदरी पडले अन् पवित्र झाले असा विचार करून असलेल्या परिस्थितीशी तडजोड करणे



कधीही पूर्ण फायद्याचे आहे. मिळालेल्या छोट्याशा आयुष्यात सुखाच्या शोधात किती लग्न करणार? हॉलिवूडमधील एका अभिनेत्रीने याच सुखाच्या शोधात नऊ लग्ने केली. असे झाल्यास आयुष्य हे लग्न करण्यात आणि घटस्फोट घेण्यातच निघून जाईल पण सुख मिळणार नाही.

A marriage is like a Wine, the older it gets the more pleasure it gives. दारू जितकी जुनी असते तितकी ती पिणाऱ्याला जास्त आनंद देते असे म्हणतात. लग्नाचेसुद्धा असेच आहे. आपण जर लग्न झालेले जुने जोडपे जवळून बघितले तर या वाक्याची सत्यता लगेच पटेल. 'तद् इदम् विपर्यासेन् संबंध नयनम् इति विवाहम्' अशी संस्कृतमध्ये विवाह या शब्दाची व्याख्या केली आहे. परस्परविरूद्ध स्वभावाच्या दोन शक्तींना विश्वकल्याणाच्या उद्देशाने जवळ आणणे, त्यांच्यात अनन्यसंबंध स्थापित करणे याला विवाह म्हणतात. स्त्री-पुरुषांचे स्वभाव हे भिन्न असतात तर कधी कधी परस्परविरूद्ध असतात. त्यांच्या विचार करण्याची पद्धतसुद्धा वेगवेगळी असते. उर्दूमधील 'औरत' हा शब्द और = वेगळा, वेगळी या शब्दापासून बनला आहे. जी आदमीसारखी नाही, कोणी और आहे ती औरत. Men are from Mars, Women are from Venus या जगप्रसिद्ध कादंबरीतसुद्धा लेखकाने मानसशास्त्राप्रमाणे ही गोष्ट सिद्ध केली आहे. असे भिन्न विचार करणाऱ्या दोन व्यक्ती एकत्र आल्यावर त्यांच्यात मतभेद असणे, होणे हे नैसर्गिक आहे. पण हे मतभेद वाढू न देता त्यांचा सहर्ष स्वीकार करावा, त्यांना कमी कमी करत जाणे हेच लग्न टिकविण्याचे रहस्य आहे. यामध्ये संबंधित दोन्ही व्यक्तींकडून जाणीवपूर्वक प्रयत्न होणे अपेक्षित आहे. तडजोड करण्याची वृत्ती ही लग्न टिकविण्यासाठी फार गरजेची आहे. जिथे जिथे तडा जाईल तिथे तिथे लगेच जोडण्याचे काम करणे यालाच तडजोड म्हणतात. ही वृत्ती असल्यास लग्न आयुष्यभर टिकून राहील. ही तडजोड करायला Agreeculture चे संस्कार दोघांमध्ये किंवा दोघांपैकी एकामध्ये असणे गरजेचे आहे किंवा नसले तर प्रसंगाची निकड, गरज म्हणून ते रूजवावे. इथे Agreeculture चा अर्थ शेतीविषयक असा समजू नये. हा शब्द Agree + culture असा बनला आहे. Agree= सहमत होणे. culture = संस्कृती, संस्कार. म्हणून Agreeculture = सहमत होण्याचे संस्कार असलेला. ज्याच्यात सहमत होण्याचे

संस्कार जास्त असतात त्याचे इतरांशी भांडण, मतभेद कमी होतात किंवा होत नाहीत. पती-पत्नी हे दिवसातील बराच काळ सोबत राहत असल्यामुळे या संस्काराच्या उपयोगाने भांडण होण्याची शक्यता नगण्य होते व लग्न टिकण्याची शक्यता १०० टक्केच्या जवळ पोहचते. 'शाद' या उर्दू शब्दाचा
अर्थ सुखी राहणे असा आहे. शादी = सुखी राहण्यासाठी केलेली क्रिया. तडजोडीमुळेच केलेली शादी ही खरी शादी बनते, त्यातून खरे सुख मिळते.

लग्नानंतरच्या सुरू असलेल्या वैवाहिक जीवनात काही सुधार करण्याची गरज आहे का याच्या चिंतनासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या रविवारी जागतिक विवाह दिवस साजरा करण्यात येतो. यादिवशी पती-पत्नी एकत्र येऊन आपला विवाह हा अधिक आनंददायी होण्यासाठी काय करणे गरजेचे आहे यावर चिंतन करतात. स्वतःला जोडीदाराकडून होत असलेला त्रास कसा कमी करता येईल यावर दोघेही चर्चा करतात. विवाहाबाबत अशी चर्चा नियमितपणे होत राहिल्यास त्यामधील ताणतणाव कमी होतात, घटस्फोटाच्या मार्गाला अवरोध मिळतो. लग्न टिकण्यास मदत मिळते. त्याचप्रमाणे भारतातसुद्धा दरवर्षी साजरा केल्या जाणारा वटपौर्णिमेचा सणसुद्धा चिंतन करून साजरा केला जाऊ शकतो. आ'वड'लेल्याची नि'वड' करून संसार केल्यावर काही दिवसांनी पर'वड' होऊ नये म्हणून स'वड' काढून प्रेमाची पुन्हा लाग'वड' करण्याचा दिवस म्हणून वटपौर्णिमा साजरी करावी. फक्त वडाची एक दिवस पूजा करून पतीचे आयुष्य वाढत नसते. पण दोघांनी एकमेकांवर प्रेम करत राहिल्यास दोघांनाही दीर्घायुष्य प्राप्त होईल. एकाच व्रताने दुप्पट फायदा मिळेल.

'घर पाहावे बांधून, लग्न पाहावे करून ....' अशी म्हण आपल्याकडे खूप प्रचलित आहे. (ही म्हण अनुभव घेण्यासाठी म्हटली जाते) लग्नासाठी लागणाऱ्या खर्चाचा आधी अंदाज केला तरीही अंदाजापेक्षा जास्त प्रमाणात खर्च होतो व गोंधळ, कष्टही जास्त पडतात. घर बांधताना सुद्धा असेच होते. या म्हणीपुढे लग्न पाहावे टिकवून हे वाक्य जर जोडले तर निश्चितच लग्न टिकविण्याचा अनुभव घेण्यासाठी हे एकप्रकारचे आवाहन म्हणून पती-पत्नी स्वीकारतील आणि ते यशस्वीसुद्धा करून दाखवतील.

लग्नाच्या वेळी नांदा सौख्य भरे हा आप्तेष्टांकडून घेतलेला आशीर्वाद पूर्ण करण्याचे प्रयत्न करत राहणे हेच आनंदी जीवन नेहमी जगत राहण्याचे रहस्य आहे.

**- चंद्रशेखर पंडित**
शेगांव, मो. ७८७५१७४००२

ज्ञान–नीति–सौंदर्य

**साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प** या कलांच्या सर्जनशीलतेच्या आविष्कारातून निर्माण होणाऱ्या सामाजिक मूल्यांची रूजवातसाठी डिजिटल व्यासपीठ....

**वऱ्हाडवृत्त**

**पहा आमची वेबसाईट**


**www.varhadvrutt.com**

**महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग)**

(जि.प./न.पा./म.न.पा.) संघटना (रजि.नं.डिएनई ९५८/२०१८/श्र.सं.मुंबई)

**जिल्हा शाखा - अकोला**

| | | | |
|---|---|---|---|
| **नितीन बंडावार** | **श्याम कुलट** | **सचिन काठोळे** | **प्रकाश चतरकर** |
| **कोषाध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** | **कार्यवाह** | **अध्यक्ष** |
| ९४२०४४४८९४ | ९७६४३४१४९२ | ९८५०१४७५२४ | ९४०४९०८९४४ |



# व्रतस्थ पत्रकारितेच्या दीपस्तंभ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

-डॉ.रवींद्र बेम्बरे

मराठी भाषेचे भूषण ठरावी इतकी मौल्यवान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय लेखनसंपदा आहे. त्यांच्या अग्रलेख व स्फुट लेखातील प्रत्येक वाक्यावाक्यात, शब्दाशब्दांत अजोड लेखन सामर्थ्याचा प्रत्यय येतो. हजारो वर्षांपासून सर्वार्थाने उपेक्षित राहिलेल्या वंचितांच्या वेदनांना वाचा फोडून त्यांचा उद्धार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्रतस्थपणे पत्रकारिता केली. वंचितांप्रति असणाऱ्या कळवळ्यातून 'मूकनायक'पासून ते 'प्रबुद्धभारत'पर्यंत त्यांच्या पत्रकारितेचा प्रवास झाला. एक नवी भूमिका आणि नवा आशय घेऊन बाबासाहेबांनी पत्रकारितेच्या प्रांतात प्रवेश केला. समाज प्रबोधनाचे एक विधायक आणि रचनात्मक साधन म्हणून पत्रकारितेकडे गांभीर्याने पाहण्याची दृष्टी त्यांनी दिली. मानवतावादी राजकारणासाठी शुद्ध व दर्जेदार पत्रकारितेचा 'साधन' म्हणून उपयोग करण्याचा एक आदर्श त्यांनी जगासमोर प्रस्थापित केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वर्तमानपत्रातील वैचारिक लेख म्हणजे श्रेष्ठ वाङ्मयीन निबंधच ठरतात. चिंतनप्रधानता, विवेकशीलता, तर्कशुद्धता ही वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात पदोपदी आढळतात. त्यांच्या आवेगी, प्रखर, प्रांजळ, सत्यान्वेषी व्यक्तीवैशिष्ट्यांचा प्रत्यय पदोपदी येतो. एका सुशील, बुद्धिवादी, व्यासंगी, प्रामाणिक माणसांचे अंतरंग या लेखनातून अगदी सहजपणे प्रकटले आहे. एका झुंजार नेत्याचा लढावू बाणा, डावपेच ओळखण्याची व आखण्याची कुशलता, प्रतिपक्षाचे खंडण व स्वमताचे मंडन करण्याचे कौशल्य पाहायला मिळते.

सत्याचा अभिमान व असत्याची चीड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीचा अंगभूत गुण आहे. सत्य प्रतिपादन, सत्यपूजा व सत्याची प्रतिष्ठापना यासाठी

त्यांची पत्रकारिता समर्पित आहे. आपल्या वृत्तपत्रांतून बाबासाहेबांनी केवळ एक स्वप्नाळू जग उभे केले नाही; तर वास्तवातील कुरूपतेचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, सत्य आणि सामाजिक न्याय या नव्या मानवी मूल्यांचे दर्शन घडवले. वंचितांच्या कुरुप जीवन वास्तवामागच्या सत्याचा शोध त्यांनी घेतला. तत्त्वचिंतकाच्या लेखनात बोजडपणा, निरसता व शुष्कता येण्याची शक्यता अधिक असते.

पण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रतिपादनात मात्र अशी रूक्षता आढळत नाही. विषय प्रतिपादनाच्या ओघात येणारे दृष्टांत, दाखले आणि उदाहरणे ही एकसुरी नसून वैविध्यपूर्ण आहेत. संस्कृत महाकाव्य, पुराणकाव्य आणि संत साहित्यातील दृष्टांत व दाखले, आंतरराष्ट्रीय व्यवहार, जनरीतीतील गमती, लोकव्यवहार, शेती आदींच्या अवलोकनातून, अनुभवातून ते आलेले आहेत. लोकांना विचारप्रवण करण्याच्या भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लेखन झाल्यामुळे त्यांच्या विवेचनात येणारे दृष्टांत, कथा, दाखले हे सभोवतीच्या लोकजीवनातील अधिक आहेत.

जाणीवपूर्वक भाषेला सजविण्याचा खटाटोप डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कुठेच केला नाही; कारण तो त्यांचा हेतू नव्हता. विचारसौंदर्य हे त्यांच्या शैलीचे अंगभूत वैशिष्टय आहे. त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाचे स्वरूप फारसे काव्यात्मक नसले तरी प्रसंगोपात विविध काव्यपंक्तीचा समर्पक वापर केला आहे. त्यांनी वापरलेल्या काव्यपंक्ती विषय प्रतिपादनाचा एक भाग म्हणूनच येतात. लेखातील आशयाशी ते काव्य पूर्णतः एकरूप होऊन जाते. ते बाहेरून जोडलेले ठिगळ वाटत नाही. काही काव्यपंक्तीमध्ये स्वतःच्या आशयानुरोधाने नाट्ययपूर्ण बदल करून उपरोधाची सुंदर उधळण केल्याचे पाहायला मिळते.

आपल्या सभोवतीच्या लोकव्यवहारातील रूढ वाक्प्रचार आणि म्हणींचा प्रसंगानुरूप चपखलपणे वापर केल्यामुळे त्यांच्या लेखांची परिणामकारकता अधिक वाढली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपयोगात आणलेल्या म्हणींची विविधता अत्यंत रंजक आहे. त्यात बोली भाषेतील म्हणीची संख्या लक्षणीय आहे. सुभाषितांच्या वापरामुळे भाषेला एक भारदस्तपणा आलेला असून, विवेचनात एक प्रवाहीपणा आला आहे. ठिकठिकाणी आशयघन आणि अर्थबहुलतेने भारलेली वाक्यरचनाही विपुल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विवेचनात संदिग्धता आणि धूसरतेचा लवलेशही आढळत नाही. आपली भूमिका मांडताना किंवा टीकाकाराच्या टीकेला उत्तर देताना बाबासाहेब जो युक्तिवाद करतात त्यातून त्यांच्या अतुलनीय बौद्धिक सामर्थ्याचे दर्शन घडते. युक्तिवादातून वितंडवाद येत नाही.

उपरोध हा बाबासाहेबांच्या लेखनातील लक्षणीय विशेष आहे. अनीती आणि असत्याबद्दल बाबासाहेबांच्या मनात असणाऱ्या संतापातून ही उपहासात्मकता आली आहे. या उपहासात विकृत प्रवृत्तीवर कटाक्ष आहे. सामाजिक विसंगतीवर प्रहार करताना ते अत्यंत जळजळीत अशी भाषा वापरतात. प्रतिपक्षावर प्रहार करताना त्यांच्या भाषेला एक वेगळेच तेज चढते. त्यातील आवेश जबरदस्त असतो. दोष, व्यंग, विकृती आणि विसंगतीवर ते प्राण एकवटून हल्ला चढवतात. पण, यामागे त्यांची दृष्टी मात्र अगदी स्वच्छ असते. टीका करतानाही आपल्या लेखनाचा दर्जा बाबासाहेबांनी कधीच घसरू दिला नाही. त्यांच्या टीकेची पातळी ही नेहमी उच्च व भारदस्त राहिली.

वर्तमान पत्रकारितेत दिसणारे चारित्र्यहनन व वैयक्तिक उपहास अशा गोष्टींचा लवलेशही बाबासाहेबांच्या पत्रकारितेत आढळत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतून बुद्धिवादाची चमक, माणुसकीचा गहिवर, मानवी मूल्यावरील गाढश्रद्धा अगदी सहजपणे प्रकटली आहे. एकंदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्तमानपत्रीय लेखन आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने समृद्ध असून, पत्रकारितेच्या क्षेत्रात व्रतस्थपणे काम करणाऱ्या पुढील हजारो पिढ्यांसाठी दीपस्तंभाप्रमाणे ते दिशादर्शक ठरणार आहे.

## अलख

स्त्री फार चिवट असते
ती कधीच आत्महत्या करीत नाही
तिचा खून होत असतो व्यवस्थेकडून
हात फक्त तिचे असतात.

शीला घरडे पाटील. (अकोला)
९५११२७०७१८

# समतावादी शिवराय

छत्रपती शिवाजीमहाराजांचा इतिहास जसा शौर्याचा-औदार्याचा आहे, तसाच तो समतेचादेखील आहे. इतिहासावर नजर टाकल्यास शिवरायांचा समतावाद सुस्पष्टपणे अधोरेखित होतो. ‘भेदाभेद भ्रम अमंगळ’ हा संत तुकाराम महाराजांचा समतेचा संदेश शिवरायांनी शिरोधार्य मानला होता. शहाजीराजे-जिजाऊ यांचे समतावादी संस्कार स्वराज्यातल्या मावळ्यांना संघटित करण्यासाठी शिवरायांना प्रेरणादायक ठरले होते. आजच्या संशयग्रस्त, कलुषित काळात शिवरायांच्या समतेची महाराष्ट्राला, भारताला नितांत गरज आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जसा ढोल- तलवारींचा-लढायांचा-शौर्याचा आहे, तसाच तो औदार्याचा आणि समतेचादेखील आहे. त्यांनी आपल्या राज्यात सार्वजनिक आणि खासगी जीवनात कधीही भेदाभेद केला नाही. शिवरायांचं राज्य केवळ एका धर्माचं, एका जातीचं, एका पंथाचं किंवा एका घराण्याचं राज्य नव्हतं, तर त्यांचं राज्य हे ‘रयतेचं राज्य’ होतं. रयत याचा अर्थ आहे ‘प्रजा’. प्रजा म्हणजे तमाम जनता आणि अर्थात रयतेचं राज्य म्हणजे सर्व जाती-धर्मांतल्या जनतेचं राज्य होय.

त्यांच्या सैन्यात अक्षरशः सगळ्या जाती-धर्मांमधले मावळे होते. शिवरायांच्या स्वराज्यात अत्यंत महत्त्वाच्या पदांवरही सगळ्याच जाती- धर्मांमधले सहकारी होते. स्वराज्यात अत्यंत महत्त्वाचं पद म्हणजे ‘गुप्तहेर प्रमुख’. शिवरायांच्या गुप्तहेर प्रमुखपदी बहिर्जी नाईक होते. बहिर्जी नाईक हे रामोशी समाजातले होते. आजच्या शासनप्रणालीत ‘आयबी’, ‘रॉ’ आदी केंद्र सरकारी गुप्तचर संस्था आहेत. कोणत्याही राज्याच्या यशस्वी शासनप्रणालीसाठी गुप्तचर यंत्रणा अत्यंत महत्त्वाची असते. अशा महत्त्वाच्या संस्थेच्या प्रमुखपदी शिवरायांनी रामोशी समाजातल्या सहकाऱ्याची नियुक्ती केलेली होती.

मदारी मेहतर हा शिवरायांचा सहकारी होता. मेहतर या समाजाची अवस्था १७ व्या शतकात काय असेल? पण शिवरायांनी मदारी मेहतर यांना अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून निवडलं होतं. यावरून हे स्पष्ट होतं, की शिवरायांनी आपल्या जीवनात अस्पृश्यतेला थारा दिलेला नव्हता. शिवरायांच्या पायदळाचा




पहिला प्रमुख नूरखान बेग होता.

अफजलखान भेटीच्या प्रसंगी शिवरायांवर पडणारा सय्यद बंडाचा वार जिवाजी महाले यांनी वरच्या वर उडवला. क्षणाचाही विलंब झाला असता तर काय झालं असतं? जिवाजी महाले हे नाभिक समाजातले होते. त्यांच्यामुळं शिवरायांचे प्राण वाचले. त्यामुळंच इतिहासात म्हटलं जाई : 'होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी.' जिवाजींप्रमाणेच शिवाजी काशिद हेही नाभिक समाजातले होते. पन्हाळा वेढ्याच्या प्रसंगी ते प्रतिशिवाजी होऊन सिद्दीच्या भेटीला गेले. तिथं त्यांना ओळखलं गेलं. त्यातच त्यांचा अंत झाला. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, कान्होजी जेधे, बाजी पासलकर, हंबीरराव मोहिते, नेमाजी शिंदे, प्रतापराव गुजर इत्यादी शूरवीरांनी आनंदानं मृत्यूला मिठी मारली; पण त्यांची शिवरायांवरची आणि स्वराज्यावरची निष्ठा बदलली नाही. याचं कारण म्हणजे शिवरायांनी आपपरभाव कधीही बाळगला नाही.

शिवरायांनी मुरारबाजी आणि बाजीप्रभू देशपांडे यांची महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती केली होती. मुरारबाजी देशपांडे यांना पुरंदरचे किल्लेदार म्हणून नेमण्यात आलं होतं, तर बाजीप्रभू हे बांदलांच्या फौजेत महत्त्वाच्या पदावर होते. ते कायस्थ होते. त्यांनी स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण केलं.

शिवरायांच्या स्वराज्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या पदांवर सगळ्या जाती-धर्मातले मावळे होते. निंबाजी पाटोळे, शामाखान, तेलंगराव हे शिवरायांचे सरदार होते. रामाजी गडदरे, जानराव वाघमारे, अमरोजी पांढरे, बहिर्जी वडगरे, खंडोजी आटोळे, बळवंतराव देवकाते, देवाजी उघडे इत्यादी शिलेदार व सुभेदार होते. ही सगळी नावं पाहिली तरी स्पष्ट होतं, की शिवरायांनी महत्त्वाच्या पदांवर नेमणुका करताना जातिभेद पाळला नाही. दौलतखान हा अरमार दलाचा प्रमुख होता. इब्राहिम खान हा तोफखानाप्रमुख होता. शिवरायांच्या अनेक शरीररक्षकांपैकी एक होता सिद्दी इब्राहिम.



शिवरायांनी आपल्या राज्यात भेदाभेद केला नाही, हे वरच्या सगळ्या उदाहरणांवरून स्पष्ट व्हावं. शिवरायांनी खऱ्या अर्थानं समतेचं स्वराज्य निर्माण केलं. आज आपणही शिवरायांपासून प्रेरणा घेऊन समतावादी भूमिका घेणं हे खरं शिवप्रेम होय. आपल्या गावात, नगरात असणारी जनता ही स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण केलेल्या मावळ्यांची वारसदार आहे. शिवरायांनी विषमता बाळगली नाही, हा शिवरायांचा उदात्त गुण होता. शिवरायांच्या समतावादी भूमिकेचा गौरव करताना महात्मा फुले म्हणतात :

'लंगोट्यास देई जानवे
पोशिंदा कुणब्याचा।
काळ तो असे यवनाचा ।।
कुळवाडीभूषण पोवाडा गातो
भोसल्यांचा । छत्रपती शिवाजींचा।।'

लंगोट परिधान करणाऱ्या मावळ्यांना शिवरायांनी लढण्याचा अधिकार दिला, त्यांना शिलेदार-सुभेदार- बारगीर-गुप्तहेर-किल्लेदार इत्यादी पदांवर नेमले. जानवं दिलं म्हणजे

प्रतिष्ठा मिळवून दिली. कष्ट करणाऱ्या रयतेचं पालनपोषण केलं. कुळवाडीभूषण म्हणजे सगळ्यांचाच राजा. भोसलेकुळात जन्मलेले शिवाजीमहाराज हे कष्टकरी, श्रमकरी, उपेक्षित, वंचित, गोरगरीब, सर्वसामान्य रयतेचे राजे होते. अशा छत्रपती शिवाजीराजांचा पोवाडा महात्मा फुले मोठ्या अभिमानानं गातात.

शिवरायांचा कालखंड हा १७ व्या शतकातला आहे. १७ वं शतक म्हणजे मध्ययुगीन कालखंड होय. हा सरंजामी कालखंड होता. नंतरच्या काळात राष्ट्रवाद, देशभक्ती, धर्मनिरपेक्षता, स्त्री स्वातंत्र्य, स्वातंत्र्य, समता इत्यादी मूल्यांचा जयजयकार करणाऱ्या युरोपमध्ये १७ व्या शतकात अंधारयुगच होतं. अशा काळात शिवरायांनी जोपासलेला समतावाद आजही दीपस्तंभासारखा आहे. शिवरायांना विषमता, शोषण, गुलामगिरी मान्य नव्हती. त्यामुळंच ते व्यापारीकरार करण्यासाठी सहा ऑगस्ट १६७७ रोजी आलेल्या डच प्रतिनिधींना म्हणाले होते : “आदिलशाहीच्या कारकिर्दीत तुम्हाला स्त्री आणि पुरूष यांना गुलाम म्हणून विकत घेण्याची आणि विकण्याची अनिर्बंध परवानगी होती; पण माझ्या राज्यात स्त्री आणि पुरूष यांना गुलाम म्हणून विकण्याची आणि विकत घेण्याची परवानगी मिळणार नाही. असे काही करण्याचा तुम्ही प्रयत्न कराल, तर माझी माणसे (अधिकारी) तुम्हाला प्रतिबंध करतील. या कलमाचे काटेकोर पालन झालेच पाहिजे.” मध्ययुगीन सरंजामी काळात शिवरायांनी गुलामगिरीविरूद्ध घेतलेली ही कडक भूमिका केवळ भारतीयांसाठीच नव्हे, तर जगासाठी प्रेरणादायक आहे.



शिवरायांच्या समतावादी भूमिकेचा गौरव करताना इतिहास-धर्मशास्त्र- तत्त्वज्ञान- प्राच्यविद्या यांचे अभ्यासक शरद पाटील म्हणतात, ‘शिवाजीमहाराजांचं व संभाजीमहाराजांचं खरं माहात्म्य त्यांच्या जात्यंतक समतावादी शाक्त हौतात्म्यात आहे.’ शिवरायांना तुळजाभवानीबद्दल नितांत आदर होता. त्या आदरापोटी त्यांनी प्रतापगडावर तुळजाभवानीचं मंदिर बांधून घेतले. या पाठीमागे भाबडा भाव नव्हता, तर समतेचं तत्त्वज्ञान होतं. तुळजा ही समतावादी होती. तुळा (तुला) म्हणजे मोजणं-मापणं. आपल्या राज्यातल्या उत्पादनाचा भाग समान मोजून प्रजेला समान वाटप करणरी तेरणा-मांजरा खोऱ्यातली महामाता म्हणजे तुळजाभवानी होय. तुळजाभवानी हे समतेचं प्रतीक आहे.

शिवरायांचं घराणं हे वारकरी पंथ-सूफी पंथ यांना मानणारं होतं. ‘भेदाभेद भ्रम अमंगळ’ हा संत तुकाराममहाराजांचा समतेचा संदेश शिवरायांनी शिरोधार्य मानला. शहाजीराजे-जिजाऊ यांचे समतावादी संस्कार स्वराज्यातल्या मावळ्यांना संघटित करण्यासाठी शिवरायांना प्रेरणादायक ठरले.

शिवरायांचे हेच समतावादी संस्कार आत्मसात करून आपणही आपापसातले जातीय, धार्मिक विद्वेष दूर करून समतावादी समाज निर्माण करायला हवा. आज सभोवताली जातीय-धार्मिक-सांस्कृतिक-भाषिक-प्रांतीय विद्वेषानं समाज त्रस्त झालेला आहे. वातावरण अत्यंत कलुषित, संशयग्रस्त आणि कृत्रिम झालेलं आहे. अशा काळात शिवरायांच्या समतेची महाराष्ट्राला, भारताला नितांत गरज आहे.

समतेचं तत्त्वज्ञान घेऊन समतावादी लोककल्याणकारी स्वराज्य निर्माण करणारे युगपुरूष म्हणजे छत्रपती शिवाजीमहाराज होत.

**-श्रीमंत कोकाटे**

# लोकचळवळीतून लोकांपर्यंत पोहोचलेला माणूस : डॉ. सुधीर ढोणे



मैं

अकेला ही निकला था अपनी राह पर
लोग आते गए और कारवा बनता गया

असंच डॉ. सुधीर ढोणे यांचे विषयी म्हटलं तर वावगे ठरू नये कारण, इतर नेत्यांना आपल्या वडिलांची, आबांची अशी ओळख असते म्हणजे वडील आणि आजोबांनी जुळवलेला गोतावळा त्यांच्या दिमतीला असतोच पण डॉ. सुधीर ढोणे हे या बाबतीत अपवाद आहेत. कोणतीही कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नाही, 'स्वकर्तुत्वाने समाजात आपली ओळख निर्माण करणारा माणूस' अशी या माणसाची ओळख आहे. प्रचंड जिद्द, मेहनत, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर त्यांनी काँग्रेस पक्षात मोठमोठे पदे भूषविली आहेत.

बाळापुर तालुक्यातील मांडवा या छोट्याशा गावात त्यांचे वडील स्व. श्रीधरराव ढोणे हे स्वातंत्र्य सैनिक होते तर आई इंदिराबाई ढोणे ह्या शिक्षिका होत्या. त्यांना प्रवीण, सुधीर, किशोर, श्याम अशी चार मुले. त्याकाळी शिक्षणाची फारशी व्यवस्था नसायची त्याही परिस्थितीत इंदिराबाई यांनी आपल्या चारही मुलांना नोकरी आणि घर सांभाळून, शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे केले. मोठे भाऊ प्रवीण ढोणे हे आज प्राध्यापक आहेत. डॉ. सुधीर ढोणे हे स्वतः आयुर्वेद एम.डी. आहेत. दोन लहान भावांपैकी डॉ. किशोर ढोणे हे मूळव्याध तज्ज्ञ डॉक्टर आहेत तर दुसरे शिक्षक आहेत. प्रत्येक जण आपापल्या कामांमध्ये व्यस्त. परंतु डॉ. सुधीर ढोणे हे स्वतः कुटुंबापुरते मर्यादित राहिलेले नाहीत.

'हे विश्वची माझे घरं' या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे त्यांचा पिंड हा सामाजिक कार्याचा बनला. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' त्याप्रमाणे डॉ. ढोणे यांना लहानपणापासूनच सामाजिक कार्य खुणावत होते. मराठा सेवा संघाच्या कार्यापासून सुरु झालेल्या त्यांच्या सामाजिक प्रवासात अनेक कार्यकर्ते, नेते, विचारवंत, लेखक, पत्रकार त्यांना जुळत गेले. अनेक चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. शेतकरी, शेतमजुरांची बिकट परीस्थिती आणि लग्न सोहळ्यांवर होणारा खर्च पाहून डॉ. ढोणे यांनी अनेक सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन केले. स्वतः वधू -वर सूचक संस्था चालविली. स्थानिकांच्या

समस्या सोडवण्यासाठी अनेक आंदोलने केली किंवा अश्या आंदोलनात भाग घेतला. ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक नेत्यांच्या भेटी घेणे, त्यांना निवेदन देणे व त्याचा पाठपुरावा करणे आणि समस्या मार्गी लावणे हे डॉ. ढोणे यांचे सामाजिक कार्य. काम होईस्तोवर स्वस्त बसायचे नाही हा त्यांचा जन्मजात स्वभाव.

उपरोक्त उल्लेखित कार्यामुळे समाजातील अनेक व्यक्ती त्यांच्याशी जुळत गेल्या आणि त्यांचं सामाजिक वलय वाढत गेलं. डॉ. सुधीर ढोणे यांची कामाची पद्धत पाहता काहींनी निश्चितच म्हटले असेल कि,

**तुम्ही झेप घ्यावी अशी,**
**नाव ओठावरी यावं**
**तुमच्या विकासकार्याचं नावं**
**इतरांनी घ्याव!**

ज्यावेळी अनेक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी गोरगरीब विद्यार्थ्यांची तारांबळ होत होती, शिक्षणासाठी जिल्याबाहेर जावे लागत होते, स्वतःची जागा नसतांना आणि कोणतेही आर्थिक पाठबळ नसतांना त्यांनी आपल्यातील इच्छाशक्तीच्या बळावर एका छोट्याशा जागेत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यावेळी डॉ. ढोणे यांनी अशा विध्यार्थ्यांसाठी अनेक अभ्यासक्रम आणून शिक्षणाचे दालन उघडून दिले. त्यांनी कॉलेजमधून पॅरामेडिकल अभ्यासक्रम, नर्सिंग अभ्यासक्रम सुरु केल्यामुळे इथे आज अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांना सुविधा प्राप्त होत आहेत. त्यांच्या कॉलेजमधील अभ्यासक्रम पूर्ण करून गेलेले अनेक विध्यार्थी आज सरकारी किंवा खाजगी संस्थांमध्ये सेवा देत आहेत ही समाजासाठी अभिमानाची व समाधानाची बाब आहे.

निवडून गेल्यावर समाजासाठी काहीही न करणाऱ्या नेत्यांची डॉ. ढोणे यांना प्रचंड चीड. त्यातूनच त्यांचा राजकारणात सक्रिय सहभाग वाढत गेला.

डॉ. ढोणे यांच्यावर संत तुकाराम महाराज, शाहु महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पगडा आहे. त्यांच्या मित्रमंडळीतही सर्व समाजातील मित्रांचा वावर आहे.

**-महेश वाघ**
**९८२२५९३९७०**

मुद्रणासंबंधी उत्तम, काटेकोर व वेळेत काम करणारी पेढी!
मुक्ता ग्राफीक्स
डिजीटल ऑफसेट प्रिंटींग प्रेस
लग्न पत्रिका
डॉक्टर्स फाईल्स्
लाकडी सन्मानचिन्ह (मोमेन्टो)
पी.व्ही.सी.आय कार्ड
ISBN सह शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन
कॅलेंडर
१२x१८ कलर प्रिंट
साप्ताहिक वृत्तपत्रांची आकर्षक मांडणीसह छपाई!
शोधप्रबंध (थेसिस) डाटा प्रोसेसिंग
सोशल मिडीया जाहिरात डिझाईन
प्रोप्रा.सागर लोडम
पाटणे मार्केट, रणपिसे नगर, हॉटेल सुरभिसमोर, अकोला
मो. : 9850471520

# लोकसंकेत आणि परंपरा

शे

तीचा शोध लागल्यानंतर पशूपालक समाज स्थिर झाला. त्यानंतर वस्ती आकाराला आली, वस्तीची वाडी झाली, त्यातून गाव आकाराला आले. समूहाने राहण्यामुळे एकमेकांचा आधार वाटू लागला. जंगली प्राण्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण झाले. वृद्धांची सोय झाली. लहान मुलांना सांभाळण्याची जबाबदारी ते पार पाडू लागले. त्यातून ग्रामप्रमुख वगैरे पदे निर्माण झाली. त्यातून सामूहिक वर्तनासाठी नियमन तयार झाले, एक प्रकारची आचारसंहिता तयार झाली. या नियमनांतूनच हे लोकसंकेत तयार झाले. व्यक्तिगत पातळीवर पाळले जाणारे, समूहात पाळले जाणारे आणि समाजात पाळले जाणारे लोकसंकेत असे या संकेतांचे स्वरूप आहे.
व्यक्तिगत स्वच्छता, घराबाहेर पडण्याआधी स्वच्छ व सुंदर कपडे घालणे, बोलताना 'अहो-जाहो' करणे, समोरच्यांचा आदर ठेवणे, संभाषणात माधुर्य असणे वगैरे बाबी येतात. समाजामध्ये वावरताना अथवा सार्वजनिक जीवनात वावरताना सातत्याने 'लोक काय म्हणतील?' या प्रश्नाचा आपण सातत्याने विचार करत असतो. याचाच अर्थ सार्वजनिक जीवनात काही संकेत आपल्याला पाळावे लागतात. यालाच 'लोकसंकेत' असे म्हटले जाते. या लोकसंकेतांचे पालन करण्याची शिकवण आपल्याला कळत नकळत मिळत असते. हे लोकसंकेत पाळणाऱ्याला समाजात एक प्रकारची किंमत असते. ते न पाळणाऱ्याकडे समाज वेगळ्या नजरेने पाहतो. कधी कधी त्याला समजही देतो. म्हणूनच परंपरेने चालत आलेल्या लोकसकेतांचे महत्त्व वादातीत आहे.

नागरिक शास्त्रातील नियमाप्रमाणे व्यक्ती, कुटुंब, समाज हा विकसनाचा क्रम आहे. त्यामुळे व्यक्तिगत पातळीपासूनच या लोकसंकेतांचे पालन आवश्यक ठरते. अर्थात 'लोक' म्हणजे परंपरागत पद्धतीने जीवन जगणारे लोक असा आहे. हे लोक अर्थातच ग्रामीण भागात राहणारे आहेत. कारण या ग्रामीण भागातील लोकसंस्कृतीवर बाह्य संस्कारांचा पगडा सहजासहजी बसत नाही. ही ग्राम संस्कृती शहरी संस्कृतीपेक्षा आपले वेगळेपण टिकवण्याचा कायम प्रयत्न करते. राजेशाहीच्या काळात 'नागर' आणि 'लोक' हे भिन्न समाज मानले गेले. यात अभिजन हे नागर तर लोक हे बहुजन समजले गेले. या अर्थाने 'लोकसंस्कृती'ही 'बहुजन संस्कृती' आहे, हेही यानिमित्ताने लक्षात घेतले पाहिजे.

शेतीचा शोध लागल्यानंतर पशुपालक समाज स्थिर झाला. त्यानंतर वस्ती आकाराला आली, वस्तीची वाडी झाली, त्यातून गाव आकाराला आले. समूहाने राहण्यामुळे एकमेकांचा आधार वाटू लागला. जंगली प्राण्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण झाले. वृद्धांची सोय झाली. लहान मुलांना सांभाळण्याची जबाबदारी ते पार पाडू लागले. त्यातून ग्रामप्रमुख वगैरे पदे निर्माण झाली. त्याआधीही युवावस्थेच्या अर्थात टोळ्या करून राहतानाही टोळी नायक होतेच. त्यातून सामूहिक वर्तनासाठी नियमन तयार झाले, एक प्रकारची आचारसंहिता तयार झाली.

या नियमनांतूनच हे लोकसंकेत तयार झाले. व्यक्तिगत पातळीवर पाळले जाणारे, समूहात पाळले जाणारे आणि समाजात पाळले जाणारे लोकसंकेत असे या संकेतांचे स्वरूप आहे.

**व्यक्तिगत पातळीवर पाळले जाणारे लोकसंकेत**

यात व्यक्तिगत स्वच्छता, घराबाहेर पडण्याआधी स्वच्छ व सुंदर कपडे घालणे, बोलताना 'अहो-जाहो' करणे, समोरच्यांचा आदर ठेवणे, संभाषणात माधुर्य असणे वगैरे बाबी येतात.

**कुटुंबात पाळले जाणारे लोकसंकेत**

एकत्र कुटुंब असल्यास त्यात एकजण कारभारी

असतो. त्याच्या आदेश सर्वांनी मानणे हा एक प्रमुख लोकसंकेत आहे. विभक्त कुटुंब पद्धतीत कुटुंबप्रमुख अर्थात वडिलांचे ऐकणे बंधनकारक आहे, असा एक ढोबळ लोकसंकेत आहे. जबाबदाऱ्या वाटून घेणे व त्याप्रमाणे काम करणे, आजारी व्यक्तीची सेवाशुश्रूषा करणे, स्त्रियांनी पदर घेणे, विनाकारण न हसणे वगैरे लोकसंकेत समाजमान्य आहेत.

**समूहात पाळले जाणारे लोकसंकेत**


एकमेकांशी सौहार्दपूर्ण वागणूक ठेवणे, सामूहिक कार्य असल्यास उद्दिष्टांप्रत जाण्यासाठी संपूर्ण योगदान देणे, नेमून दिलेले काम करणे, न ओरडता, भांडता संवाद साधणे इ.

समाजात पाळले जाणारे लोकसंकेत विनाकारण कोठेही थुंकणे, शिवीगाळ करणे, शांतता भंग करणे, जातीयवादी बोलणे वगैरे गोष्टी निषिद्ध मानल्या गेल्या आहेत. वयस्कर मंडळींचा आदर ठेवणे, त्यांच्यापुढे तंबाखू वगैरे न खाणे, अधिकारी व पदाधिकारी यांना योग्य तो सन्मान देणे, तरूणांनी पारावर, वेशीत काम सोडून गप्पा न मारणे हे लोकसंकेत काही प्रमाणात कालबाह्य किंवा अप्रस्तुत असले तरी ते परंपरेने पुष्ट होत आलेले आहेत आणि त्या लोकमानसाचा भाग बनले आहेत हे नाकारून चालणार नाही.

**- डॉ. संजय बोरूड**


दीपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा





पुष्पराज गावंडे

सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई

निवास : 'अलकनंदा', गोकुळ कॉलनी,
अकोला, ८४५९५६११५४

# शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन काळाची गरज



भारतातील १३८ कोटी जनतेची भूक भागवण्याचे सामर्थ्य जगातील कोणत्याही प्रगत राष्ट्राला शक्य नाही. ते काम भारत भूमीचा भूमिपुत्र शेतकरीच करतो आहे. ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकणार नाही. शासकीय नोकरदारांच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या सेवासंपत्तीच्या मोबदल्यात त्यांना पेन्शन, ग्रॅज्युयटी, प्राव्हिडंट फंड शासनाकडून उपलब्ध करून दिला जात असेल तर जनतेची भूक भागविणारा शेतकरी हेच काम वेगळ्या पद्धतीने करत असताना त्याला भविष्य निर्वाह निधी मिळायला हवा. कारण अन्न,वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गरजांच्या बरोबरीने भविष्य निर्वाह निधी आणि निवृत्तीवेतन ही मानवी जीवनातील चौथी आवश्यक बाब ठरली आहे.

तारूण्याचा जोश वृद्धापकाळाचा विचार करत नाही आणि जेव्हा वृद्धापकाळ येतो तेव्हा तारूण्य रूसून गेलेले असते. डोक्यातील धग आणि मनगटातील रग शमलेली असते. अशी वेळ फक्त या देशातील शेतकऱ्यांच्यावर येताना आढळते. परिणामी शेतकरी कुटुंबातील वृद्ध वृद्धापकाळात असहाय्य अवस्थेत जीवन जगताना आढळतो. या देशातील नोकरदार आणि सर्वच वर्गातील बडे भांडवलदार यांना आर्थिक नियोजन करता येत असल्यामुळे त्यांच्यावर वृद्धापकाळात असहाय्य अवस्थेत जगण्याची वेळ येत नाही.

प्राप्तपरिस्थितीत १३८ कोटी जनतेची भूक भागविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत, अथक परिश्रम घेत, पिकविणारा शेतकरी जगायलाच हवा अर्थात त्यासाठी शासनाने त्यांनाही निवृत्ती वेतन उपलब्ध करून देणे हा त्यावरील एक उपाय ठरू शकतो.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतरच्या सहा दशकात सत्तेवर आलेल्या प्रत्येक सरकारने कमी अधिक फरकाने व्यापक सामाजिक कल्याणाच्या योजना कार्यान्वित केल्या. योजनांची

अंमलबजावणी करताना केवळ राजकीय हित डोळ्यासमोर ठेवल्यामुळे सामाजिक हिताला बगल मिळाला. महाराष्ट्रातील सामाजिक कल्याणाच्या योजनांची यादी खूपच मोठी आहे. सरकार बदलले की योजनेला दिलेले फक्त नाव बदलते. मालमसाला तोच असतो.

योजनांचा पैसा कररूपाने शासन गोळा करते शिलालेख मात्र लोकनेत्याचा नावाचा असतो. निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षा योजनेमध्ये इंदिरा गांधी विधवा निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग निवृत्ती वेतन योजना,श्रावणबाळ योजना,भूमिहीन शेतमजूर महिला योजना,अशा अनेक योजनांची शासन यंत्रणेने आखणी केलेली असली तरी पात्र असलेले आणि अपात्र ठरवलेले कितीतरी गोरगरीब कष्टकरी या योजनापासून आजही वंचित आढळतात.

शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, कष्टकऱ्यांना भविष्य निर्वाह निधी मिळावा.शासकीय नोकरदार आणि आमदार-खासदार यांना जसे निवृत्तवेतन मिळते तसे ते शेतकऱ्यांनाही मिळावे. ही वरवरची भावनिक दिलासा देणारी साद नाही. व्यापक समाजहित डोळ्यांसमोर ठेवून जर शासन यंत्रणेने पावले उचलली तर अशक्य काहीच नाही पण शासन सोईस्कररित्या त्याकडे दुर्लक्ष करताना आढळते.

२००५ नंतर सेवेत आलेल्या नोकरदारांची पेन्शन रद्द करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला जातो पण तो निर्णय आमदार-खासदारांच्या पेन्शनला लागू केला जात नाही.या देशातील गरीब बिचारे आमदार -खासदार पाच वर्षे सेवा करतात आणि आयुष्यभर त्या सेवेपोटी पेन्शनचा आणि शासकीय लाभांचा फायदा उठवताना आढळतात. या देशात शेतकऱ्याइतकी सेवासंपत्ती उपलब्ध करून देणारा दुसरा घटक नाही ही वस्तुस्थिती आहे. पण त्याच शेतकऱ्याला जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत निवृत्तीच नसते.

वयोमानानुसार औत धरणे त्याला शक्य नसले तरी जनावरांना फिरवून आणणे, गोठ्यात बांधलेल्या जनावरांना वैरण घालणे, घरातील छोट्या बालचमूना सांभाळणे ही कामे वृद्ध शेतकरीच करतात. मोठमोठ्या कंपन्यात काम करणाऱ्या नोकरदारांना बोनस, महागाई भत्ता मिळतो. त्याला वार्षिक वेतनवाढ दिली जाते.या उलट शेतकऱ्यांना महागाई निर्देशांक नाही, वेतनवाढ नाही.त्यामुळेच त्याचे जीवन अडगळीचे बनले आहे. उत्पादन वाढले तर नियोतीवर बंदी, कमी झाले तर आयातीचा पर्याय असतोच.

शेतकऱ्याचे एखादे जनावर दगावलं तर हृदय पिळवटून टाकणारा आक्रोश होतो. कारण ती जनावरे ही त्याच्या कुटुंबाची गुजराण करणारी साधने असतात, ती जनावरे त्याचा श्वास असतात. त्यामुळे शासनाने शेतकऱ्याला जगवण्यासाठी त्याला निवृत्ती वेतन देतानाच, त्याचा श्वास ठरणाऱ्या जनावरांचा, शासनाने दूध संस्था, दूध संघ यांच्या समवेत एकत्रितपणे विमा उतरविला पाहिजे.

शेतातील पिकांच्या बाबतीतही शासनाने विमा उतरविला पाहिजे. पीक कर्जावरील व्याज सवलत योजनेचा पुनर्विचार करून शासनाला त्यातील एक-दोन टक्के रक्कम विमा संरक्षणासाठी वापरता येऊ शकेल.

खते, बी-बियाणे, शेतीपूरक औजारे, यंत्रसामुग्री, ठिंबक यावरील कर रद्द करून त्यातून काही रक्कम शासनाला विमा संरक्षणासाठी वापरता येऊ शकेल. या देशातील १ टक्का लोक ७० टक्के संपत्तीचे वारसदार आहेत. तळातील ५ टक्के लोकांचे दरडोई रक्कम १० रूपयाच्या वर नाही. शेतकऱ्यांना भविष्य निर्वाह निधीसाठी या भांडवलदार जगाला काही वाटा उचलावा लागेल.कारण तो शेतकरी तुम्हाला जगवतोय याचे भान त्यांनाही ठेवावा लागेल.

प्रॉव्हिडंट फंड योजनेमध्ये मात्र शेतकऱ्यांच्या कमाईतून दर महिन्याला १०० रूपये प्रमाणे त्याच्या कमाईनुसार अधिकतम रक्कम जमा करून तेवढीच रक्कम नोकरदारांच्या निकषानुसार शासनाने घालावी, वयाच्या पंचविशीपासून ते साठोत्तरीपर्यंत जमा होणारी रक्कम व्याजासहित किमान अंशी शेतकऱ्याला दिलासा देणारी ठरू शकते.

खर तर आयुष्यभर शेतकरी हा मर मर कष्ट करीत असतो. पण पिकलेला माल विकणे त्याच्या हातात असले, तरी बाजारभाव कसा मिळेल है तो सांगू शकत नाही. सध्या शेती निसर्गाच्या लहरीपणामुळे अवसानघातकी झालेली आहे. अशातच वातावरणही कमालीचे बदलले आहे. त्यामुळे तर शेती व्यवसायही आतबट्ट्याचा झाला आहे. याचे देणेघेणे मात्र राज्यकर्त्यांना नाही.

**- नाना हालंगडे**


# कोरोनावरील संजीवनी लसची जनक : ओइलॅम टुरेसी



साथरोगाच्या जागतिक संकटांमध्ये अत्यंत झपाट्याने प्रसार होणारा कोरोना हा पहिलाच साथरोग ठरला. देशोदेशीचे शास्त्रज्ञ त्यावर उपाय शोधण्यासाठी दिवसरात्र एक करू लागले. मात्र, फायझर-बायोएनटेक कंपनीने कोरोनावर पहिली लस तयार केली, त्या लसचे जनक होते वैद्यकीय शास्त्रज्ञ दांपत्य ओझलॅम टुरेसी आणि ऊउर शाहीन. ओइलॅम या यशस्वी अब्जोपती उद्योजक आहेत, बायोएनटेक (बायोफार्मास्युटिकल न्यू टेक्नॉलॉजीज) कंपनीच्या सहसंस्थापक आहेत. मात्र, त्याचबरोबर त्या वैद्यकीय शास्त्रज्ञ, कर्करोगप्रतिबंधक औषधांच्या संशोधक आणि रोगप्रतिकारक चिकित्सक, प्राध्यापक आहेत. आजवर त्यांनी विविध रोगांवर लसी तयार केल्या आहेत. तथापि, तत्परतेने कोरोनाची पहिली लस तयार केल्यामुळे त्यांचे नाव मानवी वैद्यकीय रोगप्रतिबंधक इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी नोंदवले गेले.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण आढळून आला, ही बातमी वाऱ्यासारखी जगभर पसरली. जोपर्यंत बातमी जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचते, त्याच अत्यल्प अवधीत जगभर कोरोनाचा प्रसार झाला. साथरोगाच्या जागतिक संकटांमध्ये अत्यंत झपाट्याने प्रसार होणारा कोरोना हा पहिलाच साथरोग ठरला. या रोगाची तीव्रता इतकी अधिक होती की, युरोपियन देशांमध्ये, चीन, अमेरिकेमध्ये मृतांचे ढीग लागले. भारताची परिस्थितीही वेगळी नव्हती. देशोदेशीचे शास्त्रज्ञ त्यावर उपाय शोधण्यासाठी दिवसरात्र एक करू लागले. मात्र, फायझर-बायोएनटेक कंपनीने कोरोनावर पहिली लस तयार केली, त्या लसचे जनक होते वैद्यकीय शास्त्रज्ञ

कोरोनाचा रेणू काटेरी वर्तुळाकार आरएनए आहे हे समजल्यावर त्यावर एम-आरएनएचे त्यांचे संशोधन उपयोगी ठरू शकते हे त्यांच्या लक्षात आले, परंतु हे काम खर्चिक आणि जोखमीचे होते. त्यांनी फायझर कंपनीचा आणि अमेरिकेचा आर्थिक हातभार मिळवला. एकदा अर्थसहाय्य मिळाले की, दोघेही युद्धपातळीवर संशोधन कार्यात बुडाले. साधारण मार्चपर्यंत त्यांची लस दृष्टिक्षेपात आली, त्याबद्दलची माहिती त्यांनी वैद्यकीय मासिकांना दिली. डिसेंबर २०२० मध्ये अन्न आणि औषध प्राधिकरण यांनी कोरोना प्रतिबंधक 'कॅमिनटी' लसीला मान्यता दिली. वैद्यकीय आणि जैव तंत्रज्ञान शाखेमध्ये इतकी अतिजलद लस तयार झाल्याचा हा पहिलाच प्रयोग होता.



दांपत्य ओइलॅम टुरेसी आणि ऊउर शाहीन.

खरं तर वैयक्तिक, आर्थिक यशापेक्षा मानव कल्याणकारी कार्य करणाऱ्या महिला, अशा अफलातून प्रभावी स्त्रियांचे जीवनयुद्ध मांडण्याचा विमुक्ता सदराचा उद्देश असतो. ओइलॅम या यशस्वी अब्जोपती उद्योजक आहेत, बायोएनटेक (बायोफार्मास्युटिकल न्यू टेक्नॉलॉजीज) कंपनीच्या सहसंस्थापक आहेत. मात्र, त्याचबरोबर त्या वैद्यकीय शास्त्रज्ञ, कर्करोगप्रतिबंधक औषधांच्या संशोधक आणि रोगप्रतिकारक चिकित्सक, प्राध्यापक आहेत. आजवर त्यांनी विविध रोगांवर लसी तयार केल्या आहेत. तथापि, तत्परतेने कोरोनाची पहिली लस तयार केल्यामुळे त्यांचे नाव मानवी वैद्यकीय रोगप्रतिबंधक इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी नोंदवले गेले.

ओइलॅम (जन्म ६ मार्च, १९६७) तुर्की विस्थापित कुटुंबात जन्मल्या. त्या मूळच्या वेस्ट जर्मनीच्या, झिगन या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांची आई जीवशास्त्रज्ञ, तर वडील विख्यात शल्यचिकित्सक आहेत. त्यांनी सारलॅंड विद्यापीठ, होमबर्ग येथून १९९२ मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. २००२ मध्ये त्यांनी 'कॅन्सरसदृश गाठींचा शोध, लक्षणे आणि कर्करोग प्रतिबंधक चिकित्सेचा विकास' या विषयात डॉक्टरेट पदवी संपादित केली. जर्मनीमध्येच त्यांनी 'रेणीव औषधप्रणाली' (मॉलिक्यलर मेडिसीन) या विषयाच्या प्राध्यापक म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. पदवी शिक्षण घेत असताना त्यांची जन्माचा जोडीदार ऊउर शाहीन यांची भेट झाली. कर्करोगावरील प्रतिबंधक औषधी शोधणे हा दोघांच्या संशोधनाचा समान धागा होता. २००२ मध्ये हे दोघे शास्त्रज्ञ विवाहित झाले. मेरी आणि पिएरे क्युरी या दोन नोबेल विजेत्या शास्त्रज्ञांप्रमाणेच ओइलॅम आणि ऊउर दांपत्य तितक्याच समर्पणाने, विनम्रोने औषधी क्षेत्रात संशोधन करत आहेत. अब्जावधी श्रीमंत असूनही ते सायकलवरून प्रयोगशाळेत जातात. रोगप्रतिकारक संशोधन त्यांच्यासाठी करमणूक आणि जगण्याचे प्रयोजनदेखील आहे.

२००८ मध्ये त्यांनी बायोएनटेक ही औषध निर्माण कंपनी सुरू केली. अल्पावधीतच उद्योगातील यशामुळे शास्त्रज्ञ जोडपे अब्जोपती ठरले. कॅन्सर रोगावर रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी ही कंपनी औषधी तयार करते. त्यांनी जैव तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मेसेंजर - आरएनए हे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले.

साधारणपणे कोणतीही लस तयार करायला दहा ते पंधरा वर्षांचा कालखंड अत्यावश्यक समजला जातो. लस तयार केल्यानंतर त्याचे तात्कालिक, शारीरिक, मानसिक, दूरगामी आणि आनुवंशिक परिणाम तपासले जातात. प्रतिजैविकांच्या मानवी चाचण्या होतात. ही सगळी प्रक्रिया किचकट आणि वेळखाऊ ठरते. तोपर्यंत साथरोग्यापासून बचावात्मक सुरक्षित राहणे हाच उपाय ठरतो. तोही फारसा परिणामकारक ठरत नाही. प्रत्येक साथरोगामुळे आजवर लाखो जीवांची हानी झाली, मानव समूहच्या समूह नष्ट झाले तेव्हा लस सापडली हा इतिहास आहे. कॅमिनॅटी लस वर्षभरातच उपलब्ध झाली असली तरी तिच्या संशोधनामागे केवळ एक वर्षाची मेहनत नाही. एम-आरएनए या तंत्रज्ञानावर ओइलॅम आणि ऊउर यांनी १९९० मध्ये प्रत्यक्ष संशोधनाला सुरुवात केलेली होती. हे संशोधन २०१२ मध्ये पहिल्या रुग्णासाठी वापरले. एकूण बावीस वर्षांच्या संशोधनानंतर निर्माण झालेले जैव तंत्रज्ञान भविष्यात संपूर्ण मानवजातीला उपयुक्त ठरेल याची कल्पना ना या दोघा शास्त्रज्ञांना होती, ना सामान्य नागरिकांना.

जर्मनीच्या चॅन्सलर आणि मुळात रसायनशास्त्रज्ञ असलेल्या डॉ. एंजिला मर्केल म्हणतात, आपल्या देशात पहिली लस तयार झाली याचा आणि ओइलॅम आणि ऊउर यांचा अत्यंत अभिमान वाटतो. ओइलॅम यांच्यावर विविध पुरस्कारांचा अक्षरशः वर्षाव झाला. त्यांना अनेक विद्यापीठांनी सन्माननीय डॉक्टरेट पदवी बहाल केली. मेंझ देशाचे सन्माननीय नागरिकत्वही त्यांना मिळाले. जर्मन सार्वकालिक सन्माननीय व्यक्ती म्हणून ओइलॅम आणि ऊउर यांचा सन्मान झाला. गेल्या एक वर्षापासून ओइलॅम विविध विद्यापीठात 'प्रतिबंधात्मक चिकित्साशास्त्र' या विषयाची व्याख्याने देत आहेत.

कोरोना या जटील अतिदुर्धर आणि अतिवेगवान साथरोगामुळे संपूर्ण जगावर मोठे संकट ओढवले होते. संपूर्ण मानवजात नष्ट होणार अशा संभाव्य धोक्याच्या काळात ओइलॅम यांनी शोधलेली लस वरदान ठरली. आज वेगवेगळ्या कंपन्यांनी लसनिर्मिती केली आहे, तरी ओइलॅम यांचे संशोधन मूलगामी आणि महत्त्वपूर्ण आहे, हे निर्विवाद!

**- डॉ. ज्योती धर्माधिकारी**

(लेखिका राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे इंग्रजी विभागाच्या प्रमुख आहेत.)

।। अर्थः सर्वजगन्मूलम् ।।

विश्वासपात्र सेवेची १९ सोनेरी वर्षे

(रजि.नं. ३४८)

# श्री जिनेंद्र नागरी सहकारी पत संस्था मर्या.,अकोला

**कार्यालय : पाटणे मार्केट, रणपिसे नगर, अकोला - ४४४ ००१**

सन्माननिय संचालक मंडळ



सौ.अर्चना काटोले
उपाध्यक्षा



सतीष रत्नपारखी
सचिव



सागर लोडम
संचालक



प्रमोद बुटे
संचालक




शाम चोपडे
संचालक




राजेश इंचे
संचालक




विनोद अढाऊ
संचालक



संदिप पागृत
संचालक



मनोज पांडे
संचालक



ॲड.संतोष धायडे
संचालक



सौ.स्नेहा पळसपगार
संचालिका



सौ.कविता वि.बिजागरे
संचालिका



**रवि पाटणे**
**अध्यक्ष**

वैशिष्ट्ये : विद्युत वीज बील भरणा केंद्र
- सुवर्ण तारण कर्ज
- लवकरच १० शाखाद्वारे ग्राहक सेवा
- लघु व्यावसायिक कर्ज
- संस्थेची ठेव वाटचाल कोटींकडे
- विनम्र व तत्पर सेवा



# संत तुकारामांच्या अभंगवाणीतील शाश्वत जीवन मूल्ये!

**डॉ.राजेश मिरगे**
अमरावती
मो. : ९४२०८७५७२०

तुकोबांनी नवसाच्या देवांना नकार दिला असून मनुष्याच्या अंतरंगात वास करणाऱ्या शक्तीला देवत्व प्रदान केले. देव- भक्ताचे ऐक्य दृष्टांताद्वारे अभंगवाणीत आविष्कृत केले. त्यांची ही सर्व धडपड शुध्द बीजाच्या, समतावादी मानव निर्मितीसाठी होती. त्यांचे समाजचिंतन सखोल आणि व्यापक असून लोककल्याणार्थ देह झिजवावा, असा ते आग्रह धरतात.

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात वारकरी संप्रदायाचे स्थान अद्वितीय स्वरूपाचे आहे. भक्तीमार्गाची वाटचाल कर्मसंन्यासी न होता कर्मयोगाचे कृतीशील पालन करून देणारा वारकरी पंथ होय. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभवामध्ये वारकरी संप्रदायाचे फार मोठे योगदान आहे. वारकरी संप्रदाय समाजातील सर्व प्रवाहांना सामावून घेणारा आहे. स्वधर्माला सत्कर्माची जोड देऊन भक्ती सिध्द होते, या प्रगतीशील विचाराने प्रभावित होऊन लाखो लोक वारकरी संप्रदायाचे अनुयायी झाले. आणि महाराष्ट्रीयन समाजजीवनाची शक्ती म्हणून त्याची ओळख झाली. एक 'विश्वधर्मीय संकल्पना' अर्थात 'वसुधैव कुटुंबम' वारकरी पंथाने मांडली. त्यातूनच समताधिष्ठित समाजनिर्मितीचे बीज वारकरी संप्रदायाने ११ व्या शतकात मांडले. या चिरंतन ज्ञानपरंपरेचा प्रसार संतांनी जनमानसात घडवून आणला. ज्ञानाचा, कर्माचा व भक्तीचा विलोभनीय संगम वारकरी

संप्रदायाच्या वैचारिक मंथनातून घडतो. वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी तर कळस तुकोबांनी रचला. नामदेव-एकनाथांनी पंथाचा प्रचार-प्रसार केल्याने वारकरी आचारधर्म पंजाबपर्यंत पोहचला व त्यातून वारकरी संप्रदायाला वैश्विक रूप प्राप्त झाले. 'वसुधैव- कुटुंबम्' या वैश्विक विचारधारेची गरज आज समाजाला आहे. आळंदी, देहू, पंढरपूर ही तीर्थक्षेत्रे ज्ञान-विज्ञानाची तीर्थक्षेत्रे आहेत. समता आणि ममता वारकरी संप्रदायाचे 'प्राणाभूत तत्त्व' आहे.

संतवाणी ही विठ्ठलाशी तादाम्य पावते. तुकोबा म्हणतात....

**'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी।**
**कर कटावरी ठेवूनिया तुका**
**म्हणे माझे हेचि सर्वसुख ।**
**पाहिन श्रीमुख आवडीने।।**

हे विठोबाचे सुंदर सोवळे रूप वारकरी संप्रदायाची प्रेरणा आहे. वारकरी संप्रदायाचा आचारधर्म सामान्य माणसांना पेलवणारा आहे. वारकरी संप्रदायाचा मंत्र 'रामकृष्णहरी' हा असून नामस्मरण व सर्वांगीण विकासाची दिशा ही मानवी कल्याणाची असावी हा त्याचा गाभा आहे. सदाचार - नीतीमूल्ये, चारित्र्य संपन्नता, वैराग्यशीलता, भक्तीयोग, ज्ञानयोग व कर्मयोग ही मूल्ये वारकरी संप्रदायातील महत्त्वाची आहेत. कर्मकांडात हरवलेल्या समाजाला जीवनाच्या कल्याणाची एक नूतन दिशा वारकरी संप्रदायाच्या निमित्ताने मिळाली.

वारकरी संत हे सश्रद्ध आहेत; परंतु बुद्धीची कास न सोडणारे आहेत. वारकरी संप्रदायात प्रत्येक आचारसूत्रामागे विज्ञान कार्यरत आहे. आज मानवी मन जिव्हाळा आणि प्रेमाने ओथंबलेले होण्याऐवजी यांत्रिकी झाले आणि परिणामतः 'वापरा आणि फेकून द्या' ही आजची दुर्दैवी नीती समाजात निर्माण झाली. या पृष्ठभूमीवर वारकऱ्यांच्या नामस्मरणाचा महिमा परस्परांमध्ये प्रेमाचे, भक्तीचे, समतेचे अनुबंध तयार करतो. ज्याची आज समाजाला नितांत गरज आहे. मानवी जीवनाचे उन्नयन व्हावे, हाच प्रमुख विचार संतांचा आहे.

'विश्वधर्मीय मानवी संकल्पना' ज्ञानदेवांनी १२ व्या शतकात मांडली. पसायदानातून तर साऱ्या जगाला मानवतेची आर्त साद घातली. ते म्हणतात,

**जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो**
**भूता परस्परे जडो। मैत्र जिवांचे**

ही मानवी सुखाची समतेची प्रगत विचारधारा संतांची आहे. पसायदान हे वारकरी विचारांना धर्म, जात, वंश, राष्ट्र या पलीकडे नेणारे आहे. स्वार्थ, संकुचित वृत्ती यांना तिलांजली देऊन मानवतेचे उन्नयन यातून पुढे आले. जगाच्या दृष्टीकोनातून भौतिक प्रगतीचे शिखर कितीही गाठले गेले तरी 'मावनतेचे उन्नयन' ही आजच्या काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या पृष्ठभूमीवर एका बाजूला पराकोटीची वैज्ञानिक व औद्योगिक प्रगती व त्यातूनच सर्व प्रकारच्या भौतिक सुखांच्या सोई उपलब्धतेची घोडदौड चालू असताना दुसऱ्या बाजूला मात्र काही लोकांचे अज्ञान, अहंभाव, स्वार्थापोटी या ना त्या क्षुल्लक कारणावरून गोंधळ, अराजगता, आतंकवाद, रक्तपात, सामूहिक कत्तली इ. गोष्टींचे थैमान सुरू आहे. अशा या काळात संपूर्ण विश्वातल्या लोकांचे मन जोडून खऱ्या अर्थाने सर्व जग हे गुण्यागोविंदाने नांदले पाहिजे अशा वैश्विक विचारधारणेची गरज आहे. यातूनच समताधिष्ठित समाज निर्मितीचे बीज संत तुकोबांच्या उक्तीनुसार...

**जे जे भेटी भुता। तयासी मानिजे भगवंत।**
**यारे यारे लहान थोर। थाती भलते नारी नर।**
**करावा विचार न लागे। चिंता कोणासी?**

सर्व मानवजातीच्या कल्याणाचा हा सार्थ विचार आहे.

ज्ञानेशाची ओवी आणि तुकोबाची अभंगवाणी लोकमानसात वर्षानुवर्षे नव्हे शतकानुशतके इतकी खोलवर रूजली आहे की, तिची चिकित्सा करणेसुध्दा कठीण व्हावे. संतांची दृष्टी विधायक असते. त्यांचे कार्य समाजबांधणीचे असते, तसेच नवनिर्मितीचेही असते. नवीन विचार देण्याचे कार्य संत करीत असतात.

**भयाचिया पोटी। दुःखाचिया राशी।**
**शरण देवासी । जाता भले?।।**

असे कळकळीने सांगणारे तुकोबाराय समाजाला जन्मोजन्मीच्या अविद्येच्या झोपेतून जागे करण्याचा अथक प्रयत्न करीत होते. समाजातील अनीती, ढोंग, सोवळे- ओवळे, पोकळ पांडित्य, भ्रष्टाचार व स्वैराचार याविरूद्ध त्यांनी कडक शब्दांत प्रहार केले. अंधश्रध्देच्या आहारी गेलेल्या लोकांना विचारांची दिशा देऊन त्यांचे प्रबोधन केले. प्रसंगी सात्विक संतापाने 'नाठाळाचे माथी हाणू काठी', असे उद्गार त्यांनी काढले. सर्वसामान्य लोकांची वैचारिक, नैतिक अधोगती थांबविणे हे त्यांच्या विचारांचे आणि प्रबोधनाचे मुख्य सूत्र होते. विठ्ठल भक्तीच्या उमाळ्यातून बहुजनांच्या कल्याणासाठी आणि अवडंबराचा, बाह्य उपचाराचा प्रतिकार करीत युगालाही

आव्हान देत तुकोबांची अभंगवाणी अवतरली आणि हजारो वर्षांचा निनाद त्यात प्रगटला. साध्याभोळ्या भक्तीभावनेला तत्त्वविचाराचे व नीतीमूल्यांचे अधिष्ठान मिळवून दिले. सर्वाभुती देवत्व पाहण्याचा समतावादी दृष्टीकोन दिला. तुकोबा म्हणतात..

**देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थयात्री।**

ही साधी सरळ देवत्वाची संकल्पना मांडली. 'कर्मश्रेष्ठत्व' हेच जीवनात महत्त्वाचे आहे. कर्मातच देवत्व शोधावे आणि आसूरी गुणांना थारा देऊ नये, त्याचा परित्याग करावा असे तुकोबा परखडपणे गाथेत मांडतात. निकोप भक्तीमय दृष्टी संतांनी मांडल्याने वारकरी पंथातील देवत्वाची भावना स्पष्ट झाली. आणि विठोबा हा सखाप्राण आहे; पण तुमच्या कर्मातच विठ्ठल शोधा, निर्माण करा ही कर्माधिष्ठित भक्ती वारकऱ्यांचे प्रबोधन करणारी ठरली. वारकरी संप्रदायाने मानवजातीचे उत्थान-विकास- प्रगती हे अंतिम उद्दिष्ट केंद्रस्थानी ठेवून सामाजिक शुध्दीकरणाचा पाया घातला.

वारकरी संप्रदायाचे आचारसूत्र तुकोबांनी पुढील अभंगातून मांडले.

**पुण्य परउपकार पाप ते परपीडा।**
**आणिक नाही जोडा दुजा यासी।**
**सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म।**
**आणिक हे वर्मही दुजे।।**

तुकोबांनी पाप- पुण्याची व्याख्या एका वाक्यात करून सत्याधिष्ठित कार्याच्या अनुकरणाचा संदेश दिला. आज आम्ही मात्र पाप - पुण्याच्या फेऱ्यात स्वतःला अडकून घेतले आणि परिणामतः अनेक कर्मकांड, नवस-सायास याच्या पाठीमागे लागल्याचे चित्र समाजात पाहायला मिळते. यातून नैराश्य आणि दुःखाचे भोगच आपल्या नशिबी येत असतात. 'नवसे कन्यापुत्र होती, तरी का करणे लागे पती' तुकोबांनी या अभंगातून वैज्ञानिक दृष्टीकोन मांडला. दगडाच्या देवाचा निषेध करून हरिकथा, सत्संग त्यांनी महत्त्वाचा मानला. सत्संग याचा अर्थ मुळात ज्ञानपरायणता आहे. अध्यापनामुळे ज्ञानात भर पडते हा तुकोबांचा ज्ञानाधिष्ठित दृष्टीकोन आहे.

तुकोबांनी नवसाच्या देवांना नकार दिला असून मनुष्याच्या अंतरंगात वास करणाऱ्या शक्तीला देवत्व प्रदान केले. देव-भक्ताचे ऐक्य दृष्टांताद्वारे अभंगवाणीत आविष्कृत केले. त्यांची ही सर्व धडपड शुध्द बीजाच्या, समतावादी मानव निर्मितीसाठी होती. त्यांचे समाजचिंतन सखोल आणि व्यापक असून लोककल्याणार्थ देह झिजवावा, असा ते आग्रह धरतात.

---



**नाही, पक्षात येणाऱ्यांना आश्वासनं देत राहा, फक्त कुणालाच मुख्यमंत्रिपदाचं आश्वासन देऊ नका म्हणजे झालं. काय?**



## हा यही प्यार है......


एक आहट सी आती है सिने में
दिल के दरवाजे पर कोई
दस्तक दे कर जाता है
सांसे बेचैन सी होती है और
दिल से एक आवाज आता है
क्या यही प्यार है?

दिनरात उसका चेहरा
आंखो पर लहराता है
सिने मे एक अजब सी
कसक जगा जाता है
जब भी सांस भरता हुं सिने मे
दिल मुझे बताता है
हा ...हा यही प्यार है...

रोज होती है बाते उससे
न जाणे कितनी मन ही मनमे
रोज मुझसे मिलती है वो
इन खाबो की मदहोश गलियो मे
आंखे खोलू तो हो जाती है
ओझल पल भर मे

दिल तो चाहता है बांध कर रखु
उसको अपनी धडकन से
पर फिर सोचने लागता हु
क्या उसको भी मुझसे प्यार है?

**-सौ.स्नेहा कडू**
जवळापूर



# शिवसेनेची घसरण कशामुळे?

प्र

बोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचे नाव कोणाला माहीत नाही? हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा परंपरा, अंधश्रद्धा, रूढी यावर सडकून टीका करणारे ते अग्रणी होते. समाजाला कर्मकांडातून बाहेर काढण्याचा त्यांचा प्रयत्न त्याकाळी एक प्रखर विचार होता. धर्माच्या नावाखाली चाललेल्या अनिष्ट बाबींविरुध्द त्यांनी आपली लेखणी चालवली. शोषण, अन्याय, मुस्काटदाबी याविरुध्द आवाज उठवण्याचे बाळकडू त्यांनी त्यांचे सुपुत्र बाळ ठाकरे (बाळासाहेब) यांना दिले. शिवसेनेची स्थापना झाली ती १९ जून १९६६ रोजी सर्जनात प्रबोधनकारांचा सिंहाचा वाटा होता. कारण त्यांच्यात रूजलेला तो विचार त्यांनी बाळसाहेब यांना दिला. त्यांनी आपल्या संघटन, वाणी आणि बेधडक शैलीच्या बळावर त्या रूजवातीचा विस्तार केला आणि शिवसेनेने मुंबईची सीमा ओलांडली. राज्यात आणि केंद्रातील सत्तेत सहभागी झाली. अनेक सांविधानिक पदांचे सन्मान शिवसेनेच्या वाट्याला आले. सर्जन ते संवर्धन या प्रवासाचे कष्टकरी प्रबोधनकार आणि बाळासाहेब ठाकरे हेच होते.

मराठी माणूस हा मुद्दा घेऊन उभी राहिलेली शिवसेना १९८९ च्या सुमारास हिंदुत्वाकडे वळली. रामजन्मभूमी आंदोलन, मंडल आयोग हे मुद्दे त्यावेळी राजकारण आणि समाजकारण ढवळून काढत होते. शिवसेनेने नेहमी लोकांच्या मनातील भावनांना फुंकर घालून वाटचाल केली. त्यांचे ते भावनेचे राजकारण आजतागायत चालू आहे. प्रस्थापित राजकारण सूत्र नाकारण्याचे धाडस शिवसेनेकडे होते. म्हणून शिवसेना जातपातविरहित राजकारण अभिमानाने करू शकली. स्थानीय लोकाधिकार समिती आणि शाखा हा शिवसेनेचा मानबिंदू होता. एक रूपयात झुणका भाकर ते एन्रॉन असा प्रवास केलेली शिवसेना स्थिरावली, शिवसेना रूजली ती शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे. शिवसेना दूरवर आणि समाजात खोलवर नेण्याचे काम शिवसेनाप्रमुखांच्या कडव्या शिवसैनिकांनी केले. भले शिवसेनेकडे विचार, धोरण आणि तत्त्ववाद नव्हता तरी धमक, धडक, धाडस या बळावर शिवसेनेने लोकशाहीतील मतांचे तोरण बांधण्याचे तंत्र अवलंबले होते.

शिवसेनेचे संवर्धन हे सांस्कृतिक नव्हते, तर ते फक्त पसरण्याचे होते. हिंदू धर्माचे आधारस्तंभ झाल्यामुळे शिवसेनेला हिंदुस्थानभर समर्थक मिळाले. तसेच देशद्रोही

मुस्लिमांवर केलेल्या टीकेमुळे ते पाकिस्तानी अतिरेकी आणि दहशतवादी संघटना यांच्या डोळ्यावर आले. मुंबईचे सर्वेसर्वा ही बिरुदावली सेनाप्रमुखांनी मिरवली. पण तोडफोड सेना, खंडणीसेना, सुसंस्कृतपणाचा अभाव, अरेरावी ही सेनेची ओळख बनली. शांततामय निषेध, आंदोलन हा मार्ग शिवसेनेने कधी मानला नाही आणि त्यांना तो कधी मानवला नाही. शिवसेनेचे शक्तिस्थळ हे शिवसेनाप्रमुख होते. त्यांचे वैशिष्ट्य होते ते कुंचला, लेखणी आणि ध्वनिक्षेपक. लोकांची मनातील बात तिखट शब्दात मांडणारे वक्तृत्व, करारी लेखणी आणि मर्मभेदी व्यंग्यचित्र याव्दारे बाळासाहेब यांनी मराठी जनमानसावर अधिराज्य गाजवले. बोल, चित्र आणि शब्द हे प्रभावकारी, परिणामकारक सृजन लीलया करू शकणारे शिवसेनाप्रमुख पक्षसंवर्धन मात्र एका मर्यादेत करू शकले.

मराठी माणूस ते हिंदुत्व असा प्रवास करणारी शिवसेना ही कायम भावनात्मक राजकारण करत राहिली. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा संकेत संपूर्ण १८० कोनात वळवण्याचा पराक्रमही शिवसेनेने केला आहे. शिवसेनेने जातीय भेदाभेद केला नाही हे खरे असले, तरीपण तळागाळातून आलेल्या शिवसैनिकांचा रुबाब आणि ऐट वाढली आणि घराणेशाही वाढली ती कायमचीच. सत्तेचा लाभ ही चटक शिवसेनेने राज्यात १९९५ ते १९९९ या काळात अनुभवली. पण, सन २०१३ साली शिवसेनाप्रमुखांच्या निधनानंतर शिवसेनेने २५ वर्षांपूर्वीची युती तोडली आणि आपला मार्ग चोखाळला. उध्दव ठाकरे यांनी एकाकी लढत देऊन सहानुभूतीचा लाभ घेऊन विधानसभेच्या ६३ जागा जिंकल्या. पण, येथून खरी शिवसेनेच्या तत्त्व आणि मूळ वर्तन यांच्या विसर्जनास सुरुवात झाली.

कारण शिवसेनेने भाजपसोबत सत्ता स्थापन करून आपला सवतासुभा सोडला नाही आणि अखेर शिवसेनेने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजपला आणि मतदारांना धोका दिला आणि जे नापास झाले होते त्यांच्यासह सत्ता स्थापनेचे पाप केले. प्रबोधनकार आणि शिवसेनाप्रमुख यांच्या विचार आणि शिकवणीचा पहिल्यांदा पराभव झाला तो तिथे. त्यानंतर शिवसेना जनतेच्या, मतदारांच्या, देशवासीयांच्या मनातून पडत आणि उतरत गेली ती कायमचीच. विसर्जन आहे ते या अर्थाने. जे अनैसर्गिक, विश्वासघाताचे, देशद्रोहाचे, भष्ट्राचाराचे होते, त्यांना उध्दव आपले मानत होते आणि मुख्यमंत्रिपदाची खुर्ची आणि पुत्राची कारकीर्द राखण्याच्या बदल्यात हिंदुत्वाला तिलांजली देत होते. ते अक्षम्य होते.

मुख्यमंत्री पद आणि सरकार जाणार हे जाणवल्यानंतर मानभावीपणा दाखवणे आणि निष्पाप असल्याचा आव आणणे आणि निरर्थक युक्तिवाद करणे हे फिजूल आणि बेमतलब होते. जनतेपुढे असा वांझोटा भाषणबाजार करण्याआधी उध्दव यांनी त्यांना तसे करण्याचा नैतिक अधिकार आहे का हे पाहायला हवे होते. उध्दव यांना इतकीच चाड असती, तर त्यांनी निवडणुकीआधी काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्याशी मोट बांधून निवडणूक लढवायला हवी होती. पण, त्यांना नरेंद्र मोदींच्या लोकप्रियतेचा लाभ घ्यायचा होता; पण सत्ता स्थापनेत भाजपला लाथाडायचे होते. आज शिवसेना घसरणीकडे मार्गस्थ आहे. त्यात 'राष्ट्रवादीचे वकील' संजय राऊत यांच्या कर्तृत्वशून्य आणि प्रगल्भताहीन बढाई आणि गमजाखोर, किळसवाण्या बोलघेवडेपणाचा मोठा वाटा आहे. शिवसेनेचे वाटोळं कोणी केलं असेल तर ते लोकांमधून निवडून न आलेल्या एका बोरूबहाद्दर टिनपाट बालिश माणसाने. जो साधा शिवसैनिकही नव्हता. त्यांच्या वाचाळपणाला वेसण घातली असती आणि खुशमस्करे यांना दूर ठेवले असते, तर शिवसेनेवर ही वेळ आज आली नसती.पालघर येथे दोन साधू जिवंत मारले जातात. दाऊदचा हस्तक असा शिक्का असलेला एक मंत्री या सरकारचा प्रवक्ता बनतो, हे सर्व हिंदुत्वाला आणि राष्ट्रनिष्ठेला तिलांजली दिल्याचे लक्षण आहे. हनुमान चालीसा आणि मशिदीवरील भोंगे याबाबत शिवसेना केवळ उफराटी नव्हे, तर बोटचेपी भूमिका घेते हे केवळ सत्तेसाठी लाचारीचे प्रदर्शन होते. सरकार अर्णव गोस्वामी, कंगना रानौत आणि नवनीत राणा, केतकी चितळे यांना पकडून तुरुंगात डांबण्यात धन्यता मानत होते आणि इथेच त्यांच्या विसर्जनाची पायवाट सुकर होत होती. अलीकडच्या काही घटना शिवसेनेच्या अस्ताचा आरंभ आहे हा संदेश देत होत्या, जो उध्दव यांना समजत नव्हता. पण एकनाथ शिंदे आणि गट यांनी कोविडकाळ संपण्याची वाट बघून या संभाव्य अस्तातून अंग काढले.

शिवसेना नेमकी कोणाची? एकनाथ शिंदे यांची की उध्दव यांची? हा फैसला निवडणूक आयोगाकडे होणार आहे. पण भावनात्मक डावपेचात न अडकता बहुसंख्य मराठी भाषक लोक हिंदुत्वाची विचारसरणी प्रमाण मानून एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी गेले तर नवल नाही. उध्दव

यांनी आपले वडील आणि आजोबा यांची पुण्याई पणास लावली आणि हिंदुत्वनिष्ठ आणि कडवे हा बाणा धुळीस मिळवला. शिवसेनेच्या अंताचा हा आरंभ आहे काय? एकनाथ शिंदेच्या रूपाने शिवसेनेचा हा पुनर्जन्म आहे काय? या प्रश्नांची उत्तरे काळाच्या उदरात दडलेली आहेत.

**-सुरेश कोडीतकर**

# माय

माय शेलाटी चिलाटी
आन् डोईवर भारा
फाटक्याच लुगड्यात
देह थकलेला सारा
गाडा वाहून-वाहून
तिची किती झाली झीज
संसाराच्या ओढीपायी
खेळे पायामंधी ईज
माय फेकते पाऊल
राजा पर्वताचा हाले
जिंदगीच्या वाटेवर
माय अनवानी चाले
हर पावलानं तिच्या
चढे वाटीलेबी साज
दृढ करारी चालीत
दिसे सम्राज्ञीचा बाज
देह झिजला तरीबी
नाही इभ्रतीले वाक
डोईवर पदराचा
वाटे पाटलाले धाक.

**प्रसेनजित गायकवाड,** नागपूर
मो. ८८०६५६०७४०



# तरी सुध्दा...

विश्वास ठेवशिल
तू स्वतःच्या कर्मावर जेंव्हा
ऐन उमेदित दैवाचा
तडाखा बसेल तेंव्हा
तरी सुध्दा तू तुझ्या
कर्मावर विश्वास ठेवीत जा
तू एखाद्याला जवळ
करशिल प्रेमाने
तोच तुला
दूर लोटतो व्देषाने
तरी सुध्दा तू त्याला
प्रेमाने जवळच करित जा
तू आज जे कामे
करतो चांगली
ती उद्याला
जातील विसरली
तरी सुध्दा तू
चांगलीच कामे करत जा
तुला नवनिर्मिती करायला
लागले वर्षे अनेक
तेच मातिमोल होतील
मिनिटात एका
तरी सुध्दा तू
नवनिर्मिती करतच जा...!!

**-नंदु वि. चक्रनारायण**
सिध्दार्थ नगर,
बोरगांव मंजु, ता.जि. अकोला

# बंधन


मनमौजी होतं आयुष्य
ना कसले बंधन...
मनासारखं जगायचं
आणि वागायचं...
स्वतंत्र पक्षासारख्या
घिरट्या घालायच्या....
कल्पनेच्या दुनियेत रमायचं...
ना कसला लोभ, ना स्वार्थ...
ना फळाची अपेक्षा...
ना प्रतिस्पर्धा, ना हेवेदावे...
अगदी निरागस असतं ना! बालपण...
मनसोक्त विहार करणारी
आता मात्र पिंजऱ्यात
अडकली, गुरफटले...
सात वचनांच्या....बेडीत
कैद केलं गेलंय इथे माझ्या
भावनांना...
माझ्या साऱ्या छंदाना......
मनासारखं जगता येत नाही
शब्दात भावना मांडता येत नाही
हरवलं ते निरागस बालपण...
इथे जबाबदाऱ्या, घर आणि घरातली
माणसं..
इतकंच विस्तीर्ण राहिलय आयुष्य....
विदीर्ण अवस्था झालीय मनाची....
काही बोलण्याची, कुठे जाण्याची
कुणी काही म्हणतील का?
याच प्रश्नाच्या चौकटीत
पार अडकले हो मी...........
या बंधनातून आता
मुक्त व्हावं वाटत........

**प्रा. सौ. श्रद्धा समीर देशपांडे**
अकोला

# कथा पहिल्या पत्रकाराची...

सन १७७२ मध्ये इंग्लंडहून आलेलं एक जहाज कलकत्त्याच्या (कोलकता) बंदराला लागलं. लंडनमधला एक सर्जन व त्याचा सहाय्यक असे दोघं त्यातून उतरले. सर्जनचा सहाय्यक असलेला बावीस वर्षांचा तो आयरिश तरुण पुढच्या काळात 'भारतीय वृत्तपत्रांचा जनक' म्हणून इतिहासात ओळखला जाणार होता. आयर्लंडमध्ये १४० च्या सुमारास जन्मलेल्या या तरुणाला लहानपणापासून छपाईच्या तंत्राची आवड होती. त्यासाठी त्यानं स्कॉटिश प्रिंटर विल्यम फॅडेन यांच्याकडे मोठेपणी प्रिंटिंगचं प्रशिक्षण घेण्यासाठी लंडन गाठलं. काही कारणांमुळे त्याला हे शिक्षण अर्धवट सोडाव लागलं आणि तो वकिलाकडे कारकून म्हणून काम करू लागला. तिथंही काही अडचणी आल्यामुळे कायद्यातील कारकीर्दीवर त्याला पाणी सोडावं लागलं. मग या तरुणानं एका सर्जनच्या हाताखाली त्याचा सहाय्यक म्हणून कामाला सुरुवात केली. त्याच सर्जनबरोबर हा तरुण - जेम्स ऑगस्टस हिकी - भारतात आला. कलकत्त्याला आल्यावर हिकी यानं सर्जन आणि व्यापारी म्हणून कामाला सुरुवात केली. व्यापारातही त्याच्या नशिबानं त्याला साथ दिली नाही. त्याचा माल घेऊन येणारं जहाज उशिरा आल्यानं सर्व माल खराब झाला. त्यामुळे व्यापारासाठी घेतलेलं कर्ज चुकतं करण्यास तो असमर्थ ठरला. कर्जदारांच्या तक्रारीवरून ऑक्टोबर १७७६ मध्ये हिकी याला तुरुंगात जावं लागलं. तुरुंगात असताना त्याला आपल्या मूळच्या छंदाची, म्हणजेच प्रिंटिंग-क्षेत्राची आठवण झाली. त्यानं त्याही परिस्थितीत छापखाना खरेदी करण्यासाठी भांडवल मिळवलं. सन १७७७ च्या दरम्यान त्यानं तुरुंगातूनच मुद्रणव्यवसाय सुरू केला. पुढं १७७८ मध्ये त्याची तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. ईस्ट इंडिया कंपनीसाठी तो छपाई करत असे.

मुद्रणव्यवसायात स्थिरावल्यानंतर हिकी याच्या डोक्यात वृत्तपत्र काढण्याची कल्पना आली. ता २९ जानेवारी १७८० रोजी हिकी यानं संपादित केलेलं पहिलं भारतीय वृत्तपत्र 'हिकीज् बंगाल गॅझेट...' (HICKY`s Bengal Gazette...) हे प्रकाशित झालं.



'बंगाल गॅझेट' हे भारतातीलच नव्हे तर, आशिया खंडातील पहिलं वृत्तपत्र होतं. हिकी हे भारतातील पहिला पत्रकार व वृत्तपत्र-संपादक ठरले. 'बंगाल गॅझेट' हे इंग्लिश भाषेतून प्रसिद्ध होणारं साप्ताहिक वृत्तपत्र आठवड्यातून एकदा - शनिवारी - छापलं जायचं.

एक रुपया हे त्याचं किरकोळ विक्रीमूल्य होतं. दर आठवड्याला 'बंगाल गॅझेट'च्या ४०० प्रती वितरित होत असाव्यात असा अंदाज आहे. हिकी यांच्या आधी १२ वर्षांपूर्वी विल्यम बोल्ट्स नावाच्या डच व्यक्तीनं भारतात वृत्तपत्र छापण्याची कल्पना मांडली होती; पण ही संकल्पना प्रत्यक्षात प्रथम उतरवली ती हिकी यांनीच. त्यांच्या वृत्तपत्राच्या ब्रीदवाक्यावरून ध्वनित होणारा आशय असा होता : 'सर्व पक्षांसाठी खुले; परंतु कुणाचाही प्रभाव नाही.'

'बंगाल गॅझेट' हे व्यंग्यात्मक आणि सडेतोड लेखनशैलीसाठी प्रसिद्ध होतं. ते गरिबांच्या हक्कांची आणि त्यांच्या प्रतिनिधित्वाची मागणी करत होतं...अन्याय्य कर-आकारणीच्या विरोधात हे वृत्तपत्र वाद घालत असे...तसंच ब्रिटिशांच्या युद्धखोर वृत्तीला, वसाहतवादाला, विस्तारवादी व साम्राज्यवादी धोरणाला विरोध करत असे. ब्रिटिश राज्यसत्तेच्या या असुरी इच्छांच्या पूर्तीसाठी काम करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीच्या नेतृत्वाची 'बंगाल गॅझेट'मधून नेहमीच खिल्ली उडवली जाई. हिकी आता केवळ मुद्रक राहिले नव्हते तर, त्यांच्यातील पत्रकार आणि वृत्तपत्र-संपादक जागा झाला होता. 'वृत्तपत्र हा सर्वसामान्य जनतेचा आवाज असतो,' हा संदेश भारतातील या पहिल्याच वृत्तपत्रानं दिला होता हे त्याचं वैशिष्ट्य.

भारतात नियुक्त असणाऱ्या ब्रिटिश सैनिकांमध्ये 'बंगाल गॅझेट' लोकप्रिय ठरलंच होतं; परंतु भारतीयांनाही स्वतःचं वृत्तपत्र काढण्यासाठी ते प्रेरक ठरत होतं. ब्रिटिशांना विरोध करण्याच्या धोरणामुळे हिकी यांचं वृत्तपत्र काही ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत खुपू लागलं. त्यांनी 'बंगाल गॅझेट'ला प्रतिस्पर्धी म्हणून दुसरं वृत्तपत्र काढण्याचा घाट घातला. त्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीतील दोन कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी 'द इंडिया गॅझेट' नावाचं वृत्तपत्र काढलं.

हिकी यामुळे दुखावले गेले. 'ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी सायमन ड्रोझ आणि गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज् यांची पत्नी मारियन हेस्टिंग्ज् यांना लाच देण्यास मी नकार दिल्याबद्दल 'द इंडिया गॅझेट' वृत्तपत्राचं समर्थन कंपनीचे अधिकारी करत आहेत,' असा आरोप हिकी यांनी केला. त्यांच्या आरोपाचा बदला म्हणून टपालाद्वारे वृत्तपत्र वितरित करण्यास वॉरन हेस्टिंग्ज् यांनी हिकी यांना मनाई केली. हिकी आणि हेस्टिंग्ज् यांच्यात आता संघर्ष सुरू झाला. 'हेस्टिंग्ज् आपल्या अभिव्यक्ती- स्वातंत्र्याची गळचेपी करत आहेत...ते भ्रष्टाचारी, जुलमी आहेत,' असे आरोप हिकी आपल्या वृत्तपत्रातून करू लागले.

त्यांची व्यक्तिगत नालस्तीही हिकी यांनी 'बंगाल गॅझेट'मधून केली. याशिवाय, अन्य ब्रिटिश अधिकाऱ्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. एवढंच नव्हे तर, तेव्हाच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती इलायजा इम्पी यांनी लाच घेतल्याचे आणि प्रोटेस्टंट मिशनचे प्रमुख जॉन झकराया किरनॅडर यांनी अनाथ मुलांच्या निधीतून चोरी केल्याचा आरोपही हिकी यांनी 'बंगाल गॅझेट'मधून केला. परिणामी, हिकी यांच्या शत्रूंची संख्य वाढतच गेली.

हेस्टिंग्ज् आणि किरनॅडर यांनी हिकी यांच्यावर मानहानीचा दावा दाखल केला. जून १७८१ मध्ये एकूण चार खटल्यांमध्ये हिकी यांना दोषी ठरवण्यात आलं आणि त्यांना कारावासाची शिक्षा झाली. 'बंगाल गॅझेट' छापलं जाईल अशी व्यवस्था हिकी यांनी तुरुंगात राहूनही केली आणि ते हेस्टिंग्ज् यांच्यावर व इतरांवर आरोप करत राहिले. हेस्टिंग्ज् यांनी त्यांच्याविरुद्ध नवीन खटले दाखल केले आणि अखेर त्यांना सरकारी दडपशाहीनं कायमचं दडपलं.

ता. ३० मार्च १७८२ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानं 'बंगाल गॅझेट'चा छापखाना जप्त करण्यात आला. त्याचा सार्वजनिक लिलाव झाला. 'द इंडिया गॅझेट'नं हा छापखाना विकत घेतला. 'बंगाल गॅझेट' वृत्तपत्राचं प्रकाशन कायमचं बंद झालं. हिकी यांचं हे वृत्तपत्र भारताचे तत्कालीन गव्हर्नर-जनरल वॉरन हेस्टिंग्ज् यांना आवडत नसल तरी हिकी यांनी अनेक भारतीयांना वृत्तपत्रं सुरू करण्यास प्रेरित केलं. हिकी यांचं मुद्रण कार्यालय हे नंतरच्या अनेक संपादकांसाठी प्रेरणास्थान ठरलं. 'बंगाल गॅझेट'नं बंगालमध्ये वृत्तपत्रांच्या एका युगाचा प्रारंभ केला.

सन १७८४ ला नाताळच्या सुमारास हिकी यांची तुरुंगातून सुटका झाली. जेव्हा वॉरन हेस्टिंग्ज् हे महाभियोगाचा सामना करण्यासाठी इंग्लंडला निघणार होते, तेव्हा त्यांनी हिकी यांचं कर्ज माफ केलं. तीन वर्षांच्या तुरुंगवासानंतर हिकी यांची तब्येत बिघडली होती. ते गरिबीत राहत होते. याव्यतिरिक्त हिकी यांच्या नंतरच्या आयुष्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही. भारताच्या या पहिल्या पत्रकारानं व संपादकानं चीनला जाणाऱ्या बोटीत ऑक्टोबर १८०२ मध्ये विपन्नावस्थेत अखेरचा श्वास घेतला.

# प्रेम होईना तुझ्याने!
# समंजस प्रियकराचे मनोगत

**मा**धव ज्युलियन यांनी सुमारे नव्वद वर्षांपूर्वी लिहिलेली कविता म्हणजे प्रियकर प्रेयसीतील हितगूज नसून प्रियकराचे स्वगत आहे. तिच्या नकाराने उत्तेजित होऊन तिची निर्भत्सना न करता समजूतदारपणे तिचा नकार समजून घेणारा दुर्मिळ प्रियकर कवीच्या कल्पनाविश्वात अवतरला.

तिचा नकार असला तरी स्वतःच्या प्रीतीवरील त्याची श्रद्धा अविचल आहे. मनात ठसलेली ती आता केवळ त्याच्या मनातच उरणार असल्याने त्याच्यातच मिळून जाणारी आहे. ती देहाकार नसली तरी स्मृतिशेष उरणार आहे, कळत - नकळत त्याच्याशी एकरूप होणारी आहे.

माधव ज्युलियन (१८९४-१९३९) अर्थात विख्यात कवी माधव त्र्यंबक पटवर्धन यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील आवडस होते. त्यांचा जन्म आजोळी बडोद्यास झाला. कवीचे प्रारंभीचे शिक्षण बडोदा, अहमदाबाद येथे, तर उच्चशिक्षण मुंबई येथे झाले. त्यांनी १९१८ ते १९२५ दरम्यान फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवा दिली. विस्मयकारक गोष्ट म्हणजे प्राध्यापकीसोबत ते शालेय शिक्षक म्हणूनही काम करत. १९२४ ते १९२६ या दरम्यान ते अमळनेरच्या प्रताप शाळेत शिक्षक होते.

१९३६ मध्ये जळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. १९३९ मध्ये त्यांना छंदोरचनासाठी डी लिट प्रदान करण्यात आली. त्यानंतर



नऊच महिन्यांत त्यांचे कर्करोगाने निधन झाले. कवीने स्वतःच्या नावाला ज्युलियन नाव जोडून जे काव्यमय बनविले ते ज्युलियन नाव त्यांनी मारी कॉरेलीच्या 'गॉड्स गुड मॅन' या कादंबरीतील उपनायकाच्या नावावरून घेतले. हा उपनायक काव्यवेडा असून, स्वानंदमग्न नि स्त्रीसहवासाने भारून जाणारा आहे. त्याच्यात एकप्रकारची निरागसता आहे. कवीच्या आत्मप्रतीत नि स्त्रीवश कविमनाला ते कोठेतरी भावले असावे. कवी रविकिरण मंडळाचे ते सदस्य होते. रविकिरण मंडळात राजकवी यशवंत, गिरीशांसारखे कवी होते. तरी काही काळ मंडळात असणाऱ्या आचार्य अत्र्याच्या मते, रविकिरण मंडळात रवी एकटे पटवर्धन होते, तर बाकीची सगळी किरणे होती.

खरे पाहता त्याच काळात पटवर्धनांसोबतच भा. रा. तांबे नि यशवंत अत्यंत लोकप्रिय होते अन् सकस काव्यलेखनातही सरस होते, याची जाणीव माधव ज्युलियनांच्या गुणीच गुणरागीच सरल मनाला होती म्हणून ते स्वतःच्या कविता पुनःपुन्हा परिष्कृत करीत. इतकेच नव्हे, तर भा. रा. तांब्यांच्या सकस, सरस नि सरल प्रतिभेला नमन करीत ते लिहितात -

**तू प्रसाद, तू रस, खरा कवी!**

अशी स्तुतिसुमने उधळीत माधवराव स्वतःविषयी लिहितात

**तुझ्यापुढे का व्हावी अरूचिर**
**रातकिड्यापरि माझी किरकिर**

आपल्या समकालीन कवीला तू प्रसाद, तू रस, खरा कवी म्हणताना स्वतःच्या काव्यप्रतिभेला रातकीड्याची किरकिर म्हणण्याची हिंमत विरळाच कदाचित दाखवील वा न दाखवील. कवीला स्वतःची काव्यप्रतिभा गूढ शक्तीची कृपा वाटते म्हणून नम्रपणाने तो म्हणतो-

**ही गड्या, न माझी मुळी काव्यसंपदा,**
**ही कृपा गूढ शक्तीची,**
**म्हण तीस 'धन्य शारदा!'**

अशा निरलस वृत्तीच्या या कवीने सुमारे साडेचारशे कविता नि विरहतरंग, सुधारक नि नकुलालंकार ही तीन खंड काव्ये, उमर खय्यामच्या रुबायांची चपखल भाषांतरे केलेली आहेत. कवीचा फार्शीचा व्यासंग दांडगा होता.

त्यामुळेच कवीच्या काव्यात अनेक फारशी रुपके, शब्द आढळतात. त्यासोबतच अरेबिक येत असल्याने कवीचा इस्लामचा ही अभ्यास असावा, असे त्याच्या काही कविता वाचताना वाटते. कवीला पुरोगामित्वाची ओढ होती. त्यामुळेच समकालीन केमाल पाशावर काव्य करताना ते आढळतात.

पुढील काळात कवी भाषासुधारक झाल्यावर त्याने त्याच्या जुन्या कवितातील फार्शी, अरेबिक इत्यादी परभाषिक शब्द काढून सर्व कविता सुधारून घेतल्या. तरीही फार्शीत पदोपदी आढळणारी आढ्यताखोर प्रेयसी कवीच्या काव्यातून वावरताना दिसते.

ती नेहमीच प्रियकरापेक्षा उच्च सांपत्तिक नि सामाजिक स्थानावर असते. प्रियकर तिच्यापुढे दासासारखा लीन होतो व असेना हीन मी प्राणी?! न पर्वा, तू महाराणी । सारखे प्रेयसी प्रियकरातील अंतर तो वारंवार दाखवितो. तरीही ती प्रेयसी बेपर्वा, बेफिकीर दिसते. ती त्याला नादाला लावते, खेळवते नि वाऱ्यावर सोडून देते. ती लहरी, चंचल, मनाचा थांग लागू न देणारी नि निष्ठूरसुद्धा आहे. तिच्या अगदी उलट प्रियकर आहे.

माधव ज्युलियनांनी चितारलेली ही प्रेयसी मराठीत त्यांच्या आधी नि नंतरही कुणी चितारली नाही, असा समीक्षकांचा दाखला आहे. कवीची 'प्रेम होईना तुझ्याने' ही उत्कट गझल आज आपण पाहणार आहोत. कवितेतील निष्ठावंत प्रियकर प्रेयसीला सांगतो-

**प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहू दे**
**आचरुं या धर्म तुझा तू नि माझ्यामुदे**

त्याने जिवाभावाने तिच्यावर प्रेम केले, पण ती त्याला प्रतिसाद देत नाही. तेव्हा समजूतदारपणे तो सांगतो, की तुझ्याने प्रेम होत नसेल तर ते राहू दे. तुझ्यावाटचे प्रेम मीच करून घेईल. आपल्या दोहोंचा धर्म अर्थात कर्तव्य मी माझ्यातच पूर्ण करील.

तिने ज्याअर्थी प्रेम नाकारले, त्याअर्थी तिची भूमिका नि कर्तव्य दोन्ही तिथेच सरले. पण प्रियकराच्या मनातील ती त्याच्या मनातच उरली असल्याने दोन्ही भूमिका त्याच्याचकडे आल्यात. तुझ्याकडून प्रेम होत नाही हा काही तुझा दोष नाही. त्यामुळे मनात किंतू परंतु न ठेवता तू सुखी राहा. प्रेम हट्टाने होत नसते तर तशी मनोभावना मनात निर्माण व्हावी लागते, याची जाणीव

**असल्यानेच तो त्याच्या प्रियेला सांगतो-**
**प्रेम द्या अन् प्रेम घ्या काव्यींच हा सौदा पटे!**

'प्रेम द्यावे म्हणजे प्रेम मिळते' हा एकप्रकारचा सौदाच झाला. तो काव्यातच शोभून दिसतो. प्रेमात तर सौदा नि व्यवहार

नसतोच. त्यामुळे तो तिच्याकडे माझ्यावर प्रेम करच, असा हट्ट करताना दिसत नाही. उलट तिच्यात प्रेम निर्माण होत नाही या दैवगतीला किंमत न देता, तो तिची ओढ चित्तात स्वप्नवत जपणार असल्याची ग्वाही देतो. मात्र दैवगतीने नशिबी आलेली अतृप्त प्रीतीची दशा वर्णताना खिन्नतेने हसत तो म्हणतो,

**वारि-भासाची मजा ती वालुकेच्या सागरी**

यातील गहन अर्थ निराश प्रेमीजनांनाच कळू शकतो. त्याला ती विरणारी प्रीती मृगजळासारखीच वाटते. पळावे तिथवर वालुकामय सागरात पाणीच पाणी दिसते. पण प्रत्यक्षात पाणीच नसते. पळण्याने तहान अजूनच वाढणार असते. तसेच दैववशात अव्हेरलेली प्रीती सफलतेची वृथा आस बाळगत झुरते.

पण ती आस वृथाची आहे हे कळल्यावर मनांत रडण्याची इच्छा उरत नाही, तर खिन्नतेने ते स्वतःवरच हसायला लागते. कुठेतरी तटस्थ भाव निर्माण झाला, की मृगजळाला पाणी समजून जे आपण पळालो त्यावर स्वतःलाच हासू येते. तोच भाव प्रियकराच्या मनात निर्माण होतो.

तिच्याकडून प्रेम होत नसल्याने त्याला स्वर्ग अर्थात तिच्यासोबत जगण्याचे सुख अवतरण्याआधीच थांबल्यासारखे वाटते. पण त्याचवेळी भूतलावरील संपदा संपली नाही अर्थात जे आहे त्यातील कणभर सुख उरलेले आहे, ही जाणीवही तो व्यक्तवितो. सामान्यतः जे जवळ असते त्याचे मोल माणसाला नसते नि जे सुटले त्याचे मोल अनमोल वाटत असते. प्रेमात तर ही गोष्ट फारच मोठ्या प्रमाणात दिसून येते. तिथे विवेक जागृत ठेवण्याचे विस्मयचकित करणारे कसब कवीचा प्रियकर करताना दिसतो. त्यामळेच तो तिला सांगतो-

**प्रेम होईना तुझ्याने, राख कां घालूं शिरी?**
**कां स्मशानाची कळा आणूं मनाच्या मंदिरीं?**

कवीचे हे शब्द प्रियकराचे सुजाणत्वच अधोरेखित करीत जाते. प्रेम ही नैसर्गिक भावना. ती जर ज्याच्यावर आपण निरतिशय प्रेम करतो त्या व्यक्तीत निर्माण होत नसेल, तर साधारणत; प्रेमी व्यक्ती भावनावश होऊन स्वतःचे जीवन उदासीनतेत झोकून देत असते.

त्याला स्वतःचे सारे जीवन अर्थहीन, नीरस वाटू लागते. चेहऱ्यावर अवकळा पसरते. तिच्यावाचून जग असून नसल्यासारखे वाटते. पण हा प्रियकर सांगतो, की तुझ्याने प्रेम होईना म्हणून मी डोक्यात राख घालून घेऊ का? माझ्या मनमंदिराला स्मशानाची कळा आणू का?

खरेतर इथे पूर्णविराम हवा होता पण तो प्रश्नार्थक विचारतो. कारण त्याच्या मनातील वादळ त्याला शमवायचे आहे. एक दृष्टीने पाहता प्रेयसीला सांगण्याच्या बहाण्याने तो स्वतः स्वतःलाच समजवत चाललाय. त्याच तालात तो

**प्रेम होईना तुझ्याने, जाऊं दे ते बापडे !**
**मत्स्मृतीला माळ तू घालू नको वाया पुढे !**

अव्हेरलेल्या, नाकारलेल्या आपल्या प्रेमाला तो बापडे म्हणताना स्वतःची निराशाच नकळत व्यक्त करतो. सरते शेवटी त्याला वाटते जरी तिने आपली प्रीती स्वीकारली नसली, तरी ती नाकारल्याची आठवण तिने बाळगणे म्हणजे पुढेमागे कुठेतरी तिलाच अस्वस्थ करणारे आहे.

तिला तेवढाही त्रास पडू नये म्हणून तो तिला विनंती करतो, की ती स्मृतिही तू काढून टाक अर्थात मला विसरून जा. त्याच्या या वक्तव्यात तो स्वतःची नाहीतर तिची काळजी घेताना दिसतो. ही बाब प्रियकराचे निरलस प्रेमच दाखवून जाते. कवीच्या या शेवटच्या कडव्याने काव्याला आगळाच उठाव मिळालेला आहे.

प्रस्तुत कविता वाचताना लक्षात येते, की हे प्रियकर प्रेयसीतील हितगूज नसून प्रियकराचे स्वगत आहे. तिच्या नकाराने उत्तेजित होऊन तिची निर्भत्सना न करता समजूतदारपणे तिचा नकार समजून घेणारा दुर्मिळ प्रियकर कवीच्या कल्पनाविश्वात अवतरला.

मात्र तिचा नकार असला तरी स्वतःच्या प्रीतीवरील त्याची श्रद्धा अविचल आहे. मनात ठसलेली ती आता केवळ त्याच्या मनातच उरणार असल्याने त्याच्यातच मिळून जाणारी आहे. ती देहाकार नसली तरी स्मृतिशेष उरणार आहे. कळत-नकळत त्याच्याशी एकरूप होणारी आहे. त्यामुळेच प्रस्तुत कविता प्रियकराच्या प्रेमाचे आत्मप्रत्यय दाखविणारी ठरते.

सुमारे नव्वद वर्षांपूर्वी लिहिलेली ही कविता वाचताना, एकतर्फी प्रेमातून प्रेयसीची बदनामी वा हत्या करण्यास उदयुक्त होणाऱ्या आजच्या संगणक युगातील प्रियकरांशी तुलना करता, कितीतरी पटीने विकसित मनाचा प्रियकर कवीने चितारून ठेवलाय, याचीच साक्ष देते.

**- डॉ. नीरज देव**

**पहिला दिवा लागेल दारी,**
**सुखाचा किरण येईल घरी,**
**पुर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा,**
**तुम्हा सर्वांना**
**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!**



**प्रशांत साहेबराव भारसाकळ**
जिल्हाध्यक्ष, संभाजी बिग्रेड, अकोला
माजी सभागृह नेता, मनपा, अकोला


निवास : गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला, मो. : 99754 70066

प्रतिष्ठान

**यशदा प्रॉपर्टी डेव्हलपर्स**

● कन्सल्टन्सी ● कॉन्ट्रक्टर
● ब्रोकर ● रिअल ईस्टेट
(सेल पर्चेस, रेंट ॲण्ड डेव्हलपर्स)

छत्रपती संभाजी मार्ग,
जुने आर.टी.ओ.आफिस समोर, अकोला



**दीपावली अभिष्टचिंतन**



शुभेच्छूक

**गोवर्धन शर्मा**
आमदार, अकोला पश्चिम

# अविवाहित तरुणाईचे वास्तव

गेल्या काही वर्षांत अविवाहित राहण्याची इच्छा बाळगून असलेल्या तरुणांची संख्या वाढली. ही बाब समाजासाठी चिंतेची आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव, आर्थिक सरक्षेला प्राधान्य, शरीरसुखाबाबतचा मोकळेपणा, जबाबदारीचे ओझे नको असणे अशी कारणे यामागे आहेत. तथापि, अविवाहितपणा हा भविष्यात गंभीर सामाजिक प्रश्न ठरू शकतो.

काही तरुण किंवा तरुणींना विवाह करण्याची इच्छा नसते; पण वय वाढू लागते, तसतसा एकाकीपणा अधिक जाणवू लागतो. शरीर, मन थकते, मेंदू सक्रिय राहात नाही, तेव्हा अशा मंडळींजवळ आपले म्हणणारे कोणीही नसते. राष्ट्रीय सांख्यिकीच्या एका अहवालात म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत अविवाहित राहण्याची इच्छा बाळगून असलेल्या तरुणांची संख्या वाढली आहे. एका सर्वेक्षणानुसार १८ ते १९ वयोगटातील अविवाहित युवकांचे प्रमाण २०१९ मध्ये वाढत २३ टक्के झाले. २०११ मध्ये हेच प्रमाण १७.२ टक्के होते. अविवाहित युवकांची संख्या आणखी वेगाने वाढणार आहे. समाज हे एखाद्या निर्जीव घटकाचे नाव नाही. समाज हा लोकांच्या समुदायांपासून तयार होतो. व्यक्तिगत निर्णयाचे प्रतिबिंब समाजात उमटते तेव्हा ते निर्णय केवळ समाजावर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम करत नाहीत, तर समाजाची दिशादेखील बदलण्याचे काम करतात.


अविवाहित मुलांचे प्रमाण का वाढत आहे, असे का घडत आहे, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. याचे पहिले कारण म्हणजे, तरुण पिढीने तब्बल दोन दशकांपासून पाश्चिमात्य संस्कृतीलाच आपलेसे केले आहे. 'प्यू रिसर्च'च्या एका अभ्यासानुसार, अमेरिकेत पाच वर्षांत घटस्फोटाचे प्रमाण दुप्पट झाले. निम्म्याहून अधिक अमेरिकी नागरिक हे विवाह संस्काराला महत्त्वाचे मानतात; परंतु संपूर्ण जीवन एकाच व्यक्तिबरोबर व्यतित करणे गरजेचे वाटत नाही. अशीच स्थिती थोडयाफार फरकाने भारतात होत आहे. कारण, भारतातही घटस्फोट वाढले. अशा स्थितीत तरुणांमध्ये अनामिक भीती निर्माण झाली आहे. लग्नाचा शेवट हा घटस्फोटातच होणार असेल तर लग्न कशाला करायचे, असा विचार ते करत आहेत. दुसरे म्हणजे, आजच्या युवकांवरील संस्कारांमध्ये होणारे बदल. त्यामुळे त्यांच्या विचारसरणीत कळत नकळतपणे बदल होत आहेत. यात तरुण पिढीचा कोणताही दोष नाही. पूर्वी कौटुंबिक व्यवस्था ही



संयुक्त होती. कालांतराने ती पालककेंद्रित झाली आणि आता तर पाल्यकेंद्रित झाली आहे. त्याचा उद्देश हा प्रत्येकवेळी मुलांना महत्त्व देणे आणि त्याच्या आशा व आकांक्षा पूर्ण करणे हा राहिला. पाल्यांची इच्छा पूर्ण करताना 'नाही' हा शब्दच त्यांच्या शब्दकोशात राहिला नाही. साहजिकच सामंजस्य, सेवाभाव, त्याग या शब्दांना तिलांजली दिली गेली आणि त्यांचे जीवन केवळ पालककेंद्रितच राहिले.

जेव्हा एखाद्या व्यक्तिमत्त्वात तीन शब्दांचा समावेश नसेल तर तो कोणत्याही स्थितीत कुटुंबाची निर्मिती करू शकत नाही. यानुसार कुटुंब पुढे नेण्यासाठी तीन महत्त्वाच्या गोष्टी असतात. समजूतदारपणा, सेवाभाव आणि त्याग, तरुण पिढीत घटस्फोटाचे प्रमाण वाढण्यामागे या तीन गोष्टींचा अभाव हे प्रमुख कारण आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे दोन-तीन दशकांपूर्वी मुलींचे ध्येय हे विशिष्ट वयात विवाह करणे हे असायचे. कारण, विवाहामुळे जीवनात स्थिरता आणि आर्थिक सुबत्ता येते, असे म्हटले जात होते. पण आता कुटुंब, समाजाचा विचार बदलला आणि मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले; परंतु परिणामस्वरूप मुली विवाहाकडे एक पर्याय म्हणून पाहत आहेत. जीवनाचे ध्येय म्हणून त्याकडे पाहत नाहीत. मुली आता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या. अमेरिकेच्या 'फर्टिलिटी अँड फॅमिली बॅच'च्या २०१८ च्या एका अहवालात म्हटले की, ही मानसिक स्थिती जगात सर्वत्रच पाहावयास मिळत आहे. हे केवळ भारतातच दिसते असे नाही. आता आर्थिक सक्षमतेला प्राधान्य दिले जाऊ लागले आहे. युवकांसाठी विवाह हा दुसरा पर्याय आहे. अनेकदा तर भौतिक साधनांची जमवाजमव करता करता वय निघून जाते आणि नंतर युवकांच्या नजरेतून विवाहाची इच्छाही नाहीशी होते.

आजची पिढी अविवाहित राहण्यामागे सर्वात महत्त्वाचे



कारण म्हणजे सोशल मीडिया. पूर्वी कुटुंबात सुख-दुःखाची देवाण-घेवाण व्हायची. कुटुंबात एकमेकांना वेळ दिला जायचा. कुटुंबावरच त्याचे व्यक्तिमत्त्व अवलंबून असायचे; परंतु आज सोशल मीडियाने अनेक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे एखादा व्यक्ती हा एकटा असूनही त्याला त्याची जाणीव या सोशल मीडियामुळे होत नाही. आर्थिक सुरक्षा आणि महागाई, हे एक कारण सांगितले जाते.

२०२० मध्ये अमेरिकेत झालेल्या एका अभ्यासानुसार, असंख्य तरुणांना वाटते की, लग्न आवश्यक आहे; परंतु त्यापेक्षा अधिक महत्त्व आहे ते आर्थिक सुरक्षेला. काळाच्या ओघात तडजोडीची भूमिका कालबाह्य झाली. त्यामुळे तरुण पिढी कोणताही शब्द देताना विचार करत आहे. ते कोणत्याही प्रकारे भावनिक जबाबदारी पार पाडण्यास तयार नाहीत किंवा त्यापासून चार हात लांब राहात आहेत. त्यांच्या मते, विवाह संस्था म्हणजे एक प्रकारचा गोंधळच आहे. पूर्वी विवाह करण्यामागे शारीरिक सुख मिळवणे हाही एक निसर्गतः स्वाभाविक असणारा विचार होता; परंतु आता शारीरिक संबंधावरून तरुणपिढी मुक्तपणे विचार करू लागली आहे. विवाह न करताही या सर्व गोष्टी मिळू लागल्याने लग्नगाठ बांधायची कशाला, हा विचार होऊ लागला. आणखी एक गोष्ट म्हणजे, विवाह न करण्यामागे विवाह संस्थेकडून होणारा अपेक्षाभंग, बहतांश कुटुबांत सामंजस्याच्या अभावामुळे विवाह संस्था मोडकळीस येत आहे. या विचाराचा परिणाम समाजावर नकारात्मक होत आहे. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ इमाईल दुर्खीम यांनी 'सुसाईड' पुस्तकात म्हटले आहे की, विवाहित पुरुषांच्या तुलनेत अविवाहित तरुण अधिक आत्महत्या करतात. कारण, विवाह हा भावनात्मक सुरक्षा देतो, एकटेपणा दर करतो. विवाह न केल्याचा परिणाम तत्काळ जाणवत नाही; पण तीन दशकांनंतर त्याचे परिणाम दिसू लागतात. अविवाहितपणा हा भविष्यात गंभीर सामाजिक प्रश्न म्हणून निर्माण होऊ शकतो. जसजसे वय वाढत जाते, तसतसा एकाकीपणा वाढत जातो. जेव्हा मन थकते, शरीर साथ देत नाही, कोणाचाही आधार नसतो, मेंदू काम करत नसतो, तेव्हा अविवाहितपणाचे परिणाम सहन करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय हाती राहात नाही.

**-डॉ.ऋतू सारस्वत,**
समाजशास्त्राच्या अभ्यासक

समस्त जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा


# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई

## अकोला जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघ समन्वय समिती

नवनीत स्टोअर्स, हर्ष संकूल, सिव्हील लाईन, अकोला



अध्यक्ष
**नारायण अंधारे**
7387277120




उपाध्यक्ष
**जयकृष्ण वाकोडे**
9011551595



सचिव
**प्रमोद देशमुख**
7709890081



कोषाध्यक्ष
**रघुवीर देशपांडे**
9423072210



सहसचिव
**रामदास वांडे**
8605287664

**कार्यकारिणी सदस्य :**
रामभाऊ बिरकड
9921278988,
हरीष पारवाणी
9370276406,
डॉ.स्मिता कायंदे
9403475094,
चंद्रप्रभा फुलारी
9834426142,
प्रा. विलास राऊत
9172685597,
जनार्दन चतारे
9623285706,
ना.मा. मोहोड
9921396295,
सुखदेव मसने
9922041256,
तुकाराम गोमासे
9545856145,

**पदसिध्द सदस्य**
डॉ. सुहास काटे
9822717199

**निमंत्रीत**
ना.ना.इंगळे
9822717199
अभि. विनायकराव पांडे
9420840259
योगा. भगवंतराव गावंडे
9623221246
प्रा. यादव वक्ते
8668591197
राजुभाऊ कोकाटे
9527803095

**सल्लागार**
जयंतराव जोशी
9822753576
उषाताई बपोरीकर
8999265058
मंगलाताई देशमुख
9421457642
चौथमलजी सारडा
7020772237
तुळशिराम बोबडे
9763495828
ज्ञानचंद वाधवानी
9527865698

**फेस्कॉमचा असे नारा, गाव तिथे संघ करा.**

# पुतळी

आभाळात ढगांनी काहूर माजवले होते. विजा कडाडून चमकत होत्या. वारा आडदांड झाला होता. त्याने तुफानी वादळाचा पवित्रा घेतला होता. चोहोबाजूंनी अंधारून आले होते. काहीच क्षणात सुसाट वारा आणि मेघगर्जनेसह टपोऱ्या थेंबांचा पाऊस रप-रप पडू लागला.

पुतळी आणि तिचा पती नरसिंग शेतात पूर्वपेरणीची कामे करीत होते. टपोऱ्या थेंबांच्या पावसाने दोघांना धुऱ्यावरची छत्री घेण्याचीही उसंत दिली नाही. अकस्मात आलेल्या या लहरी पावसाने त्यांना चांगलेच झोडपले !... राजाने छळले नि पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करणार? ... निमूटपणे सहन करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. दोघेही पावसात भिजून चिंब झाले होते. शेतात दोघेच होते. मोगरा फुलावा तसे फुलून आले होते. शरीरावरील चिंब झालेल्या कापडांमधून पुतळीचे तारुण्य ओसंडून वाहत होते. नरसिंग शहारला होता. मदमस्त झाला होता.

'पाणीम भिंजान तूतो मिस्टर इंडियामाईर श्रीदेवीनाईच दिकारीची.' (पाण्यात भिजून तू तर मिस्टर इंडियामधील श्रीदेवीसारखीच दिसत आहेस.) नरसिंग पटपुटला.

'तमई काई अनिल कपूरेती कमी छेनी ! (तुम्हीही अनिल कपूरपेक्षा कमी नाही.) पुतळीने चेहऱ्यावरची बट बाजूला सारत लाजऱ्या आविर्भावात प्रत्युत्तर दिले.

पुतळी दिसायला सुंदर होती. नाजूक होती. कांद्याची लवलवती पातच जणू ! निमसावळा वर्ण, टपोरे पाणीदार नयनचक्षू, सडपातळ पण पीळदार बांधा, घनदाट मुलायम केस यांमुळे ती अधिकच आकर्षक दिसत होती.

पुतळीच्या लग्नाला तीन वर्षे झाली. पण घरात पाळणा अजून हलला नव्हता. पुतळी अघळपघळ स्वभावाची होती. तिच्या सरळ व स्वच्छ वागण्याने घरात सर्वांचीच मने तिने जिंकली होती. परंतु मूलबाळ नसल्यामुळे ती आयाबायांच्या टीकेचा विषय होत होती.

नरसिंग हा कमी शिकलेला पण माणुसकीच्या दुनियेतील कलदार माणूस ! अत्यंत दिलदार आणि मनमोकळ्या स्वभावाचा. प्रसन्न चेहऱ्याचा आणि समाधानी वृत्तीचा माणूस ! व्यवहारातही रोख अन् नात्यागोत्यातही चोख ! अत्यंत सालस आणि सरळमार्गी माणूस ! सुखादुःखात सदैव तत्पर. एका बोटावरचा थुका दुसऱ्या बोटावर देणारे त्याला आवडत नसत. तो नेक होता आणि नेकीवर त्याचा विश्वास होता. एक प्रामाणिक, इमानदार व कष्टाळू माणूस म्हणूनच नरसिंगची तांड्याला ओळख होती.

पुतळी आणि नरसिंग या दाम्पत्याच्या सुखी संसाराचा कोणालाही हेवा वाटावा असेच त्यांचे जगणे होते. त्यांच्या एकमेकांवरील प्रेमाला कोणाचीही दृष्ट लागावी असेच त्यांचे प्रेम होते. 'घर चंद्रमौळी पण बायकोला अंगभर साडीचोळी'



अशा स्नेहमय सुखी जीवनात एकच उणीव होती आणि ती म्हणजे लग्नाचा पाचवा वाढदिवस साजरा झाला तरी आंगणात सदाफुली अजून फुलली नव्हती. सालंबादाप्रमाणे ती रुसलेलीच होती. मुलाबाळांची किलबिलाट ऐकण्यासाठी घराचे कान आसूसलेले होते.

या दाम्पत्याने होमिओपॅथी, ॲलोपॅथी केली. आयुर्वेदिक दवाखानेही केले. नेमाने औषधं घेतली. पण गुण आला नाही. गावटी जुडीबुट्टीही खाल्ली तरी कूस भरली नाही. ही एकच जिव्हारी लागावी अशी डोंगराएवढी सल घेऊन ते जगत होते.

पुतळीला मनोमन वाटायचं की, माझी कूस भरलेली असती तर माझे घर आनंदाने मोहरले असते. समाजात माझा मानसन्मान वाढला असता. 'वांझोटी'या शब्दाने मला सतत रक्तबंबाळ केले नसते. लग्नकार्यात आनंदाच्या प्रसंगी मला लोकांनी टाळले नसते. असे एक नव्हे? तर अनेक प्रश्न तिला सतावत होते. जणू हजारो पायांचा किडाच तिच्या सुखी संसाराला पोखरून काढत होता. दुरून डोंगर साजरे नि आतून ओसाड अशीच बकाल मनोवस्था तिची झाली होती.

भाऊबंदकीतील लोक नववधू मुलीला 'पुतळीबाईर छेंडी मत पडे देस' (पुतलीबाईची सावली पडू देऊ नकोस) अशी ताकीद द्यायचे. त्यामुळे उपवर मुलीही पुतळीबाईशी अंतर ठेवूनच वागायच्या. तिरस्कृत वांझोटपण कोण ओढवून घेणार! म्हणून सावली पडेल या भीतीने कोणीही पुतळीशी बोलत नव्हत्या. पुतळीसारखं आपल्या जीवनाचं वाळवंट होऊ नये याची खबरदारी घ्यायच्या. पुतळीचे काळीज तीळतीळ तुटायचे. कोणाशी बोलून काही उपयोग नव्हता. मनातली दुःखे कोणाच्या ओंजळीत देणार! 'वांझोटी' या शब्दाला हजारो टोकदार विषारी भाले फुटत होते आणि आरपार काळजात घुसत होते.

नरसिंगला पत्नीचे मन कळत होते. मनातला उफाळ कळत होता. मन कळवळून जायचं पण उपाय नव्हता. पुतळीला या दुःखाच्या दलदलीतून बाहेर काढण्याचे त्याने लाख प्रयत्न केले पण यश आले नाही. तरीही त्याचे प्रयत्न थांबले नव्हते. पुतळीला धीर देत म्हणायचा, *'सामळी काई! तू बालबच्यासारूझूर मत ... तारनाई मनबी मनेकनती दुःख वछं ! पण छातीप भाटा मेलनं म जगरो छू! निसर्गे हुंडियांग केरीच काई चालेनी. तोन बालबच्यामच सुख वाटतो वीयं तो आपण मोठे भियार नानक्या छोरा खोळेम लेला.'* (ऐकतेस का! मुलाबाळासाठी तू व्याकूळ होऊ नकोस... मलाही मनापासून दुःख होते. पण छातीवर दगड ठेवून मी जगत आहे. निसर्गापुढे कोणाचेही काही चालत नाही. तुला मुलाबाळातच सुख वाटत असेल तर आपण मोठ्या भावाचा लहान मुलगा दत्तक घेऊ.)

ती काही न बोलता ऐकून घ्यायची. तिला मुलाबाळांपेक्षाही 'माझी कूस वांझ आहे. मी वांझोटी आहे.' हा तिच्या स्त्रीत्वावरचा शंकेचा डाग तिलो नको होता. हजार इंगळ्या डसाव्या एवढ्या जीवघेण्या वेदना 'वांझोटी' या एका शब्दाने तिला व्हायच्या.

महाराज, भगत, बुवाबाबावर नरसिंगचा विश्वास नव्हता. धागे-दोरे, छुमंतर, देवीदेवतांच्या वाऱ्या या गोष्टींना तो अंधश्रद्धा मानत असे. पण 'अडली गाय नि काटे खाय' अशीच गत होती. जादुटोण्याचे जग हे फसवाफसवीचे जग असते. विशेषतः बायकांची तिथे जास्त फसवणूक होते. बुवाबाबा, मठ म्हणजे हतबल बायकांचे शोषणकेंद्रच! नरसिंग अशा पारदर्शी व रोखटोक विचाराचा होता. *'तम स्वतःच तमार जीवणेम दिवो लगा सकोछो'* (तुम्ही स्वतःच स्वताःचे जीवन प्रकाशमान करू शकता.) या संत सेवालाल महाराजांच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव त्याच्यावर होता. म्हणून नवस- सायास, गंडादोरे या भाकड गोष्टींपासून तो कोसो दूर होता. 'नवसे कन्यापुत्रे होती तो का करणे लागे पती' हा तुकोबाचा विचारही त्याने अंगीकारला होता.

पुतळीची सखी सोनीबाई मात्र पुत्रप्राप्तीचे वेगवेगळे मंत्र सांगून तिचे मन विचलीत करीत होती. *'लारेर आळीमाईर मंगळी माहूरेर सात वारी किदी, नि पथ रकाडी. तो वोर छोरा दी वर्षेर वेगो. चोखलीर छोरी सतरमाळेर महाराजेर पाच वारी किदी, वोन आब दन छ! दुसरेर कसेनं तार मामार छोरी सापळीरछ देख. पाच वर्षेकनती छडछ्टाक र ! सैलानीर पाच वारी किदी, नि सातवे मिनाम आसाती रेगी.'* (मागच्या गल्लीतील मंगलीने माहूरच्या सात वाऱ्या केल्या नि पथ्य पाळले. तिचा मुलगा आता दोन वर्षांचा झाला. चोखलीच्या मुलीने सतरमाळच्या महाराजाच्या पाच वाऱ्या केल्या. तिला दिवस गेलेत. दुसऱ्याचे कशाला! तुझ्या मामाची मुलगी सापळीची! पाच वर्षांपासून तिची कूस वांझ होती. तिने सैलानीच्या पाच वाऱ्या केल्या, नि सातव्या महिन्यात तिची कूस भरली.)

पतीचा विरोध पत्करून पुतळी सोनीबाईसोबत नरसिंगला न विचारताच माहूरला गेली. माहूरच्या देवीचा विडा खाल्ला. सात वाऱ्याही केल्या. माहूरच्या देवीची तिला हजेरी यायला लागली. देवी अंगात आली की, मोकळे केस सोडून ती डोलायला लागायची. हं... हं...असे मोठ्याने देवीचा पुकारा करायची. अंगातील देवी उतरल्यावर पुतळी सर्वसामान्य बाईसारखी होऊन जायची. अशी दोन वर्षे उलटली तरी फलनिष्पत्ती झाली नाही.

देवी अंगात यायला लागल्यापासून पुतळीचं शेतीकडे दुर्लक्ष झालं होतं. नरसिंग मात्र एकटाच मजुरांच्या, रोजनदारांच्या भरवशावर शेती करीत होता. पुतळीलाही पूर्वीसारखी शेतीची कामे कराविशी वाटत; पण तिची मानसिकता दुसरे काही करण्याची परवानगीच तिला देत नव्हती. अहोरात्र ती एकच मनन- चिंतन करायची की, माझी कूस कधी भरेल, हेच तिचे चिंतनविश्व झाले होते. मनाने ती उद्विग्न झाली होती. पुत्रप्राप्तीसाठी ती वाट्टेल ते करायला तयार होती.

आता तर तिने भयंकरच शपथ घेतली होती. कुलदैवत सामतदादाकडे तिने उजवा हातच गहाण ठेवला. 'देवा, जोपर्यंत माझ्या अंगणात मूलबाळ खेळणार नाही, तो पर्यंत मी डाव्या हातानेच कपडे धुणे, स्वयंपाक करणे, अंगणातील सडा- सारवण ही सगळी कामे डाव्या हातानेच करीन.' अशी शपथच तिने घेतली होती. या शपथपूर्तीसाठी तिने भरपूर त्रास सहन केला होता.

नरसिंगला पत्नीची अशी दयनीय अवस्था पाहावली जात नव्हती. मुलाबाळाच्या जंजाळातून तिला बाहेर काढून तिला मानसिक बळही तो द्यायचा. अनेक लोकांना मुले नसतात तरीही ते सुंदर जीवन जगतात. पुतळी काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. तिला स्वतःचे मूल हवे होते. या तिच्या हट्टाने नरसिंग त्रस्त झाला होता.

नरसिंगचा जिवलग मित्र मनोहर होता. दोघांचे चांगलेच जमायचे. मनोहर घरी आल्यावर तासनतास विचारविनीमय, गप्पागोष्टी चालत असत. एके दिवशी फोन करून नरसिंगने घरची व्यथा त्याला सांगितली. 'तुझ्या वहिणीला मूलबाळ पाहिजे. तेही स्वतःचे; दत्तक नव्हे!'

मनोहर नागपूरला सरकारी हॉस्पिटलमध्ये नोकरीला होता. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या बाबी त्याला अंगवळणी पडलेल्या होत्या. त्यांनी नरसिंगला पुत्रप्राप्तीच्या संदर्भात एक चांगला सल्ला दिला. मनोहर म्हणाला, 'तुम्ही दोघे एक दिवस नागपूरला या. वंधत्वनिवारण हॉस्पिटलला आपण जाऊन समस्येचे मूळ शोधून काढू.' नरसिंगला हा विचार पटला. पण पुतळी दवाखान्याला कंटाळून गेली होती. औषधपाणी घेऊन विटली होती. त्यामुळे ती मागेपुढे करीत होती. पण *'मनोहर बाबा केरोछ तो दवाखाने म जावा'* म्हणून ती तयार झाली.

दोघेही नागपूरला पोहचले. मनोहरने त्यांना प्रथमतः घरी नेले आणि संध्याकाळी डॉक्टरकडे गेले. डॉक्टरने दोघांच्या महत्त्वाच्या तपासण्या केल्या आणि रिपोर्ट आल्यानंतर बोलू म्हणून दुसऱ्या दिवशी अकरा वाजता हॉस्पिटलला बोलावले. अशा तपासण्या यापूर्वी कधी केल्या नव्हत्या. त्यामुळे रिपोर्ट काय येतो या विचारात दोघांना रात्री झोपच लागली नाही. कधी दिवस उजाडते आणि कधी अकरा वाजतात असे झाले होते. दुसऱ्या दिवशी अर्ध्या तासापूर्वीच ते हॉस्पिटलला पोहचले. मनोहरही सोबत होता.

दीड-दोन तासांनी डॉक्टरने त्यांना केबिनमध्ये बोलाविले. टेबलावरील रिपोर्ट हातात घेऊन डॉक्टर बोलले, 'तुमच्या दोघांचे वीर्य (स्पम) आपण तपासणीसाठी घेतले होते. त्या तपासणीत अंडाशय निष्क्रीय असल्याचे दिसून आले. त्यामुळेच आजपर्यंत गर्भधारणा झाली नाही.'

पुतळी आणि नरसिंग दोघेही एकमेकांकडे पाहत होते. काय बोलावे काही कळत नव्हते. म्हणून मनोहर मध्येच बोलला, "सर, यावर उपाय काय? अपत्य नसल्यामुळे यांचे जीवन नीरस झाले आहे. यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण होईल असे काही उपाय आहे का सर!

'होय आहे!' नरसिंगच्या स्पममधील शुक्राणू निष्क्रीय झालेले आहेत. त्यामुळे एकमेव उपाय म्हणजे 'टेस्ट ट्यूब बेबी'चाच उरतो. खर्चाची मानसिक तयारी असेल तर करता येईल. दुसरा कोणताही उपाय नाही.'

सर, 'टेस्ट ट्यूब बेबी' विषयी थोडे सविस्तर सांगा, म्हणजे यांना कळेल की हे नेमके काय असते. डॉक्टरकडे नवलाईने दोघेही पाहू लागले. डॉक्टर समजावणीच्या स्वरात सांगू लागले. 'टेस्ट ट्यूब बेबी' म्हणजे पती आणि पत्नी दोघांचे स्पम घेऊन लॅबमध्ये ते फलित करायचे आणि फलित झालेले स्पम स्त्रीच्या गर्भाशयात सोडले की, गर्भधारणेची प्रक्रिया सुरू होते.

पुतळीसाठी हे दिव्यच होते. नरसिंगला हिंदी

सिनेमाच्या माध्यमातून थोडीफार याची कल्पना होती. डॉक्टर पुढे म्हणाले, 'नरसिंगच्या स्पममधील शुक्राणू निष्क्रिय असल्यामुळे डोनेट (दान) केलेल्या स्पमचा वापर करावा लागेल.'

'टेस्ट ट्यूब बेबी'चा हा सल्ला ऐकून दोघांचीही डोकी गर्क झालीत. तरीही पुतळीला फारसे काही समजले नव्हते. हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यानंतर मनोहर 'यावर संध्याकाळी बोलू' म्हणून ड्यूटीवर निघून गेला.

दोघांना एकांत मिळताच पुतळी म्हणाली, 'डॉक्टर साहेबांचे म्हणणे फारसे काही माझ्या लक्षात आले नाही. तुम्ही समजावून सांगा.' नरसिंगची अवस्था द्विधा झाली. भारतीय मानसिकतेत वाढलेले आपण, ही असभ्यता आपणास शोभणार नाही. शिवाय पत्नीला दुसऱ्याचे वीर्य वापरून फलधारणा करण्यास कसे सांगावे काही कळत नव्हते. पुतळी अधीर होऊन समजून घेण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या आग्रहास्तव नरसिंग बोलला, 'माझ्या स्पममधील शुक्राणू निष्क्रीय झालेले आहेत. त्यामुळेच गर्भधारणा झाली नाही. आता मूलबाळ हवे असल्यास लॅबमध्ये दान केलेले स्पम वापरून गर्भधारणा करता येते.'

पुतळी काय समजायचे ते समजली. ती काही वेळ भांबावल्यासारखी झाली. 'म्हणजे दुसऱ्या माणसाचे वीर्य माझ्या गर्भात! आई गं! असे दुसऱ्या माणसाच्या वीर्याने मला मूलबाळ नकोत. हे आपल्या संस्कृतीत बसत नाही नि आपल्याला हे शोभतही नाही. मी आजन्म वांझ राहीनं; पण माझी कूस मलीन होऊ देणार नाही. गरजवंताला अक्कल नसते हे जरी सत्य असले तरी दुसऱ्याच्या वीर्याने मला गर्भवती व्हायचे नाही. वीर्य दान करणारा माणूस कसा होता, काय होता, कोणास ठाऊक! अशा संतानापेक्षा मी निःसंतान बरे!' असे म्हणून पुतळीने या विषयाचा शेवट केला.

पुतळीने घरी आल्यानंतर सोनीबाईला सगळी हकीकत सांगितली. तिचं डोकं तर कमालीचंच होतं. 'शहरातली माणसं नि बाया वंगाळ असतात. त्याईले तसे चालते. पण आपल्याले नाही चालत बाई! लोकं आपल्या तोंडात शेणं घालतील.' तिच्या कुवतीनं ती बोलत होती. 'पुतळी तू उलट्या पावली गावी आलीस हे चांगल केलं बाई'. सोनीबाईला गावभराची खबर असायची. शेतात पिकांपेक्षा तण वेगाने वाढत जाते. नाही नाही म्हणता गावभर बातमी पसरली.

पुतळी अतिशय उदास झाली. कारण होती नव्हती तीही आशा आता वाळून गेली. त्यामुळे ती अधिकच दुःखी झाली होती. तिच्या डोक्यात बऱ्यावाईट विचारांचे नुसते काहूर माजले होते. काय करावे काही सूचत नव्हते. 'वांझोटी' या शब्दाचा अजस्र जबडा तिला गिळंकृत करू पाहत होता. आता कुठलाही मार्ग पत्करायला तिची तयारी झाली होती.

सकाळी चार-साडेचारच्या सुमारास भिकाच्या बंद झोपडीला आग लागली. आजूबाजूचे गुराढोरांचे कोटेही या आगीत भस्मसात झालीत. आग भडकत होती. तांड्यातील लोकांनी आपापल्या घरून पाणी आणून आग विझविण्याचा प्रयत्न केला. तांड्याच्या पोलीस पाटलाने अग्नीशामक (फायर ब्रिगेड) ला फोन करून बोलाविले. गाडी येईपर्यंत बरीच आग शांत झाली होती. उरलीसुरली अग्नीशामक दलांनी विजविली. आग कशी लागली? काही पत्ता लागला नाही.

दुसऱ्या दिवशी पुतळी आणि सोनीबाई गप्पागोष्टी करीत बसल्या होत्या. सोनीबाई म्हणाली, 'पुतळीबाई, आता तुझी कूस नक्कीच उजळणार! कारण महाराजाने सांगितल्याप्रमाणे तू महापूजा केली. अमावस्येच्या भयाण नि काळ्याकुट्ट मध्यरात्री विहिरीवर जाऊन आंघोळ केली आणि त्या ओल्या कपड्यातच आसराईची महापूजा करून त्या पूजेच्या दिव्याने तांड्यातील घर जाळले. त्यामुळे पुढच्या अमावस्येपर्यंत तुला दिवस गेल्याशिवाय राहणार नाही.

तांड्यात अशा अमावस्या-पौर्णिमा कित्येक आल्या नि गेल्याही; पण पुतळीची कूस अजून उजळली नाही.

**-डॉ. रमेश राठोड,**
जवाहर नगर, अकोला.
७५८८५०२५८६





-: आमची सेवा केंद्रे :-

हुशे बंधु

ज्वेलर्स & गोल्ड अॅन्ड जेम्स

महात्मा गांधी मार्ग, अकोला -१

फोन नं. ०७२४-२४२९२७५, २४४५५००

अडत दुकान

कृषी उ.बा.समिती, मुख्य यार्ड, अकोला.

दि ड्रीम मीट्स कॅफे

जवाहर नगर चौक, अकोला.

सर्जिकल & ऑक्सिजन सर्व्हिस

केडीया प्लॉट, मारुती शोरुमच्या बाजुला, अकोला.

ऑप्टीकल्स

ओझोन हॉस्पिटल, अकोला.

प्रा.डॉ. संतोष श्रीकृष्ण हुशे

मो. 9822643984

Gurudev Graphic Akl. 8855889919.

*Happy Diwali*

# SUPREME ENTERPRISES

## (SURGICAL DEALERS)

**We Deal in -** ● JOHNSON & JOHNSON, ● ROMSONS, ● B, BRAUN, ● BSN LTD ● ACUSSURE DIAGNOSTICS, ● VISSCO REHAB ● POTREX LTD ● FLAMINGO REHABILTATION SAMSON SURGICALS ● RAMAN & WELL ETC.

REHABILATION AIDS, RESUSCITATION KITS, SUCTION MACHINES, NEBULISERS, OLUCOMETERS, UROLOGICAL & NEPHROLOGICAL PRODUCTS, DISPOSABLES, INSTRU-MENTS, ORTHOPAEDIC IMPLANTS, ECG ACESSORIES, HOSPITAL FURNITURE ORTHO-PAEDIC IMPLANTS FOR JOINTS, TRAUMA, ORTHO SCOPY SPINE ETC.


**Opp. R. L. T. Science College, Civil Lines, Akola,** Ph. : **2415722 (0)**

ACCOCIATE CONCERN : **SUPREME SURGIMED VENTURES**

**DHANTOLI, NAGPUR ( CELL : 9960986366)**

**AUTHORISED DISTRIBUTORS FOR ORTHOPAEDIC IMPLANTS FOR JOINTS, TRAUMA, ORTHOSCOPY, SPINE, SHOULDER, ETC.**

# आधुनिकतेची कास धरलेलं स्थित्यंतराचं पर्व (१९८१ ते १९९०)



इ सवी सन १९८१ ते १९९० चे दशक अनेक अर्थांनी स्थित्यंतराचे दशक ठरले. 'ऑपरेशन ब्लू स्टार मोहीम', तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या... अशा खळबळजनक घटनांबरोबरच संगणक आणि दूरसंचार क्रांतीची सुरुवात करणारे दशक म्हणूनही त्याची ओळख आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील अनेक वळणे असलेल्या या दशकाचा आढावा.

लॉईसच्या मैदानावर कपिल देवच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने इतिहासात पहिल्यांदाच 'वर्ल्ड कप' जिंकला. इसवीसन १९८३ च्या या विजयाने भारतीयांच्या मानसिकतेवर खोलवर परिणाम केला. जात-धर्म- पंथ-भाषा असे भेदाभेद विसरून भारतीय म्हणून एकत्र येण्याची भावना या विजयाने निर्माण केली. भारतीयांना एकत्र ठेवणाऱ्या या क्रिकेट धर्माचा आजही प्रभाव कायम आहे. त्या आधी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धांचे भव्य व यशस्वी आयोजन झाले. क्रीडा विश्वातील या घडामोडींसोबत सन १९८१ ते १९९० च्या दशकात राजकीय पटलावर अनेक घटना घडल्या. जनता पक्षाचा प्रयोग १९७९ मध्ये फसल्यानंतर देशात पुन्हा एकदा काँग्रेसने पकड घेतली. 'मारुती' मोटारीच्या आगमनाने देशात वाहन उद्योग क्षेत्रात नवी क्रांती आणली. रंगीत टीव्हीच्या पदार्पणाने दृक्श्राव्य मनोरंजनाचा नवा टप्पा सुरू झाला. सोव्हिएत रशियाच्या यानातून अंतराळात भरारी घेऊन राकेश शर्मा या अंतराळवीराने देशाची मान उंचावली.

देश आधुनिक तंत्रज्ञानाच्या पातळीवर झेपावत असताना या दशकाच्या पूर्वार्धात मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रदीर्घ संप अयशस्वी ठरला. या संपाने कामगारविश्वावर नकारात्मक परिणाम झाला. तिकडे पंजाबात 'खलिस्तान चळवळ' तीव्र झाली. त्यावर लगाम घालण्यासाठी केलेल्या 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' नंतर इंदिरा गांधी यांची हत्या झाली व पाठोपाठ शीखांचे भीषण हत्याकांड झाले. या घटनांमुळे देश थबकून गेला. नंतर राजीव गांधी यांनी त्वरेने सूत्रे ताब्यात घेतली आणि परिस्थिती काबूत आणली. पंजाब, आसाम, गुरखालँड, मिझोराम अशा अशांत टापूमध्ये शांतता यावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले. श्रीलंकेतील तमीळ प्रश्नातही त्यांनी पावलं उचलली. परंतु एकीकडे, मुस्लिम महिलांच्या

पोटगी प्रश्नी सनातनी मुस्लिमांच्या मतांचा अनुनय करणं आणि दुसरीकडे, अयोध्येतील वादग्रस्त जागेला लावलेलं कुलूप उघडून कट्टर हिंदुत्ववाद्यांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न यातून विविध आक्रमक घटकांचा जोर वाढला. ज्याचे परिणाम पुढे अनेक वर्षे भोगावे लागले.

**संगणक, दळणवळण क्रांती**

याच काळात राजीव गांधी यांनी आणलेली संगणकक्रांती आणि दळणवळण क्रांती देशाला वेगळी दिशा देऊन गेली. एका बाजूला देश तंत्रज्ञानात प्रगती करीत असताना राजीव गांधी यांच्यावर बोफोर्स तोफांच्या व्यवहारात कथित दलालीचा आरोप झाला. भोपाळमधील गॅसगळती, नर्मदेवरील सरदार सरोवरामुळे होणारे विस्थापन, रूपकुंवर सती प्रकरण, मुंबईतील गिरणी कामगारांचा संप या घटनांनी देशात खळबळ माजवली. राजीव गांधी यांच्यानंतर विश्वनाथप्रताप सिंह पंतप्रधान झाल्यानंतर या खळबळीत आणखी भरच पडली. मंडल आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणींचा निर्णय त्यांनी घेतला आणि त्यातून मंडलवाद सुरू झाला. त्यातून भारतीय राजकारणाला वेगळी कलाटणी मिळाली. हिंसाचाराच्या घटनांनी वेगळे स्वरूप धारण केले असले, तरी त्याच वेळी तंत्रज्ञानाची चाहूल लागल्याने हे दशक स्थित्यंतर आणणारे ठरले.

**मीनाक्षीपुरममधील दलितांचे धर्मांतर**

तमिळनाडूतील मीनाक्षीपुरममधील दलितांचा धर्मातराचा निर्णय खळबळ उडविणारा ठरला. तमिळनाडूतील तिरुनेलवेली जिल्ह्यातील मीनाक्षीपुरम या गावात १९ फेब्रुवारी, १९८१ रोजी सुमारे एक हजार दलितांनी मुस्लिम धर्मात प्रवेश केल्याच्या घटनेने देशात एकच खळबळ उडाली. ईशाद-उल-इस्लाम सभा या संघटनेमार्फत या गावातील सुमारे १८० दलित कुटुंबांनी मुस्लीम धर्मात प्रवेश केल्यामुळे तमिळनाडूसह संपूर्ण देशात सामूहिक धर्मातराच्याबाबत पुन्हा एकदा चर्चा घडली.

२९ सप्टेंबर १९८१ रोजी इंडियन एअरलाइन्सचे श्रीनगरहून दिल्लीला निघालेले विमान खलिस्तानवादी अतिरेक्यांनी अपहृत करून लाहोरला नेले. पाकिस्तानी कमांडोजनी या विमानातील सर्व प्रवाशांची आणि कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका करून त्यांना मायदेशी परत पाठवले.

**नक्षलवादी चळवळी झाल्या सक्रिय**

सन १९७७ मध्ये आणीबाणी संपुष्टात आल्यावर भारतीय कम्युनिस्ट पक्षा(मार्क्सवादी लेनिनवादी)च्या प्रभावाखालील, आंध्र प्रदेशातील लहान लहान नक्षलवादी गट एकत्र येऊन १९८० मध्ये भा.क.प. (मा.ले.)- पीपल्स वॉर पक्षाची स्थापना केली, तर बिहारमध्ये पार्टी युनिटी, माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर आदी गट गठित झाले. असे अनेक गट १९८९-९०च्या दशकात सक्रिय होऊन त्यांनी वेगवेगळ्या भागात आपली प्रभावक्षेत्रे निर्माण केली. सन १९६७-७२च्या काळातील चारू मुजुमदार यांच्यापेक्षा काहीशी वेगळी व्यूहनीती अवलंबून या गटांनी 'मास लाईन'चा स्वीकार केला व जनआंदोलने उभारण्यावर भर दिला. केंद्र सरकारने १९८५ ते ९५ या दरम्यान मोठ्या प्रमाणावर कोंबिंग ऑपरेशन्स हाती घेऊन या चळवळींचा खात्मा करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचा प्रभाव अनेक राज्यांवर दीर्घकाळ राहिला.

**दूरसंचार उपग्रह 'ॲपल' प्रक्षेपित**

पूर्णतः भारतात बनवलेला 'ॲपल' हा भारताचा पहिला दूरसंचार उपग्रह १९ जून, १९८१ रोजी फ्रेंच गियाना येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपित करण्यात आला. फ्रेंच गियाना येथील कुरू अवकाशतळावरून सोडलेला हा उपग्रह एरियन या उपग्रहवाहकाच्या तिसऱ्या उहाणाद्वारे अंतरिक्षातील भूस्थिर अर्थात जिओस्टेशनरी कक्षेत सोडण्यात भारतीय शास्त्रज्ञांना यश आले. ॲपलमुळे अनेक महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या. भारताने शैक्षणिक कारणासाठी 'साईट' हा प्रकल्प हाती घेतला होता.

**गिरणी कामगारांचा ऐतिहासिक संप**

कामगार चळवळीवर प्रदीर्घ परिणाम करणारा मुंबईच्या गिरणी कामगारांचा ऐतिहासिक संप १८ जानेवारी १९८२ रोजी सुरू झाला. कामगारनेते दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या मुंबईच्या अडीच लाख गिरणी कामगारांनी काम बंद केले आणि मुंबईतील सुमारे ६५ कापड गिरण्यांचे काम थांबले. आंदोलनात राजकीय व आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे ठरले. गिरणीमालक व शासनाने या संपाविषयी दीर्घकाळ औदासीन्य दर्शवण्याचे व दखल न घेण्याचे धोरण अवलंबले, विविध डावपेच आखले. परिणामी, कामगारांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रेटलेला हा संप वर्षभरानंतर बारगळत गेला आणि तेव्हापासून मुंबईच्या गिरणगावातील भोंग्याचा पर्यायाने कामगार चळवळीचा आवाज क्षीण झाला. भांडवलदार आणि त्यांच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या सरकारांनी हा आवाज पुन्हा कधीही मोठा होऊ दिला नाही.

### दूरदर्शनचे नवीन युग

१५ ऑगस्ट १९८२ पासून देशात प्रथमच रंगीत स्वरूपात दूरदर्शनवरून कार्यक्रम प्रसारित होण्यास सुरुवात झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे स्वातंत्र्य दिनाचे भाषण हा रंगीत प्रसारणातील पहिला कार्यक्रम ठरला. त्यानंतर रामानंद सागर निर्मित 'रामायण' (१९८७) आणि बी. आर. चोप्रा निर्मित 'महाभारत' (१९८८) या मालिकांनी लोकप्रियतेचा कळस गाठला. महात्मा गांधी यांच्या कारकिर्दीचा वेध घेणारा रिचर्ड ॲटनबरो दिग्दर्शित 'गांधी' हा चित्रपट ३० नोव्हेंबर १९८२ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाने जगभरात लोकप्रियता मिळवली.

राजधानी नवी दिल्लीत १९ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर १९८२ या दरम्यान आशियाई स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सन १९५१ नंतर तब्बल ३१ वर्षांनी भारताला या स्पर्धेचे आयोजन करण्याचा बहुमान मिळाला. या स्पर्धेनंतर भारतीय क्रीडा क्षेत्रात नवीन क्रीडा पर्व सुरू झाले. या स्पर्धेत भारताला १३ सुवर्ण, १९ रौप्य व २५ कांस्य अशी ५७ पदके मिळाली.

### 'इन्सॅट' उपग्रह मालिकेचा प्रारंभ

ऐंशीच्या दशकात तांत्रिकदृष्ट्या दीर्घकाल परिणाम करणारी ऐतिहासिक घटना घडली ती म्हणजे ऑगस्ट १९८३ या महिन्यात भारताच्या दूरसंचार, दूरदर्शन प्रसार, आकाशवाणी प्रसार आणि हवामानाचे अंदाज वर्तवणे या क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या 'इंडियन नॅशनल सॅटेलाइट' अर्थात 'इन्सॅट' मालिकेतील 'इन्सॅट वन बी' या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण झाले. या प्रक्षेपणाने टेली कम्युनिकेशन, डीटीएच सेवा, रेडिओ नेटवर्किंग, हवामानाचा पूर्वअंदाज या क्षेत्रांत क्रांती घडवून आणली.

### 'मारुती'ने उद्योग विश्व बदलले

एखादा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग किती यशस्वीपणे चालू शकतो याचे उत्तम उदाहरण मारुती मोटार उद्योगाने भारतात घालून दिले. मध्यमवर्गीयांना परवडेल अशा छोटेखानी मोटारीची निर्मिती भारतात व्हावी या दृष्टीने मारुती उद्योग लिमिटेड कंपनीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. पण या कंपनीला चालना मिळाली ती १९८३ मध्ये. मारुती उद्योग लिमिटेड व जपानच्या सुझुकी कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने 'मारुती ८००' या छोटेखानी मोटारीचे उत्पादन सुरू करण्यात आले. ता. १४ डिसेंबर १९८३ रोजी ही मोटर भारतीय बाजारात उपलब्ध करण्यात आली आणि या मोटारीने वाहन उद्योग क्षेत्रात क्रांती घडवून आणली.

### ऑपरेशन ब्लू स्टार

पंजाबसह संपूर्ण देशावर दीर्घ परिणाम करणारी अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात राबवण्यात आलेली 'ऑपरेशन ब्लू स्टार मोहीम' या दशकातील महत्त्वाची घटना आहे. जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांच्या नेतृत्वाखाली पंजाबमधील स्वतंत्र खलिस्तानसाठीच्या चळवळीने उग्र रूप धारण केले होते. पंजाबमधील वाढत्या हिंसाचारामुळे देशभरात जनतेचे वातावरण निर्माण झाले होते. अमृतसरमधील शिखांचे पवित्र स्थान असलेल्या सुवर्ण मंदिरात भिंद्रनवाले आणि अन्य खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी आश्रय घेतल्याने त्यांना हुसकावून लावून दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी इंदिरा गांधींच्या केंद्र सरकारने लष्करी कारवाईचा धाडसी निर्णय घेतला व ५ जून १९८४ रोजी 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही मोहीम राबवली. या कारवाईत भिंद्रनवाले यांच्यासह ४९२ दहशतवादी मारले गेले. मात्र, या मोहिमेचे पडसाद पुढे उमटत राहिले. या मोहिमेच्या निषेधार्थ खलिस्तानवादी अतिरेक्यांनी सहा जुलै १९८४ रोजी श्रीनगरकडून दिल्लीला जाणाऱ्या इंडियन एअरलाइन्सच्या विमानाचे अपहरण केले.

### इंदिरा गांधी यांची हत्या

'ऑपरेशन ब्लू स्टार मोहिमे'चा सूड म्हणून खलिस्तानवादी अतिरेक्यांनी कट केला. ३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या दिल्लीतील राहत्या घराच्या प्रांगणात त्यांच्या सुरक्षारक्षकांकरवीच हत्या करण्यात आली. या रक्तरंजित घटनेने संपूर्ण देश हादरला. इंदिरा गांधी यांना जणू त्यांच्या मृत्यूची चाहूल लागली होती. ३० ऑक्टोबरला भुवनेश्वर येथे त्यांनी केलेल्या भाषणात 'मी जिवंत राहीन की नाही याची मला पर्वा नाही. माझ्या मृत्यूनंतरही माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब भारताला संजीवनी देईल, सामर्थ्य देईल', असे म्हटले होते.

### भोपाळ वायुगळती

मध्य प्रदेशमधील भोपाळ शहरात युनियन कार्बाईड या बहुराष्ट्रीय कंपनीच्या रासायनिक कारखान्यात ३ डिसेंबर १९८४ रोजी विषारी वायू गळती होऊन वीस हजार जणांचा जीव गेला, तर लाखोंना कायमचे पूर्ण व अंशतः अपंगत्व आले. या दशकातील जगामधील ही एक भीषण घटना ठरली. या घटनेनंतरही पीडितांचे दुख कमी झाले नाही. त्यांना न्याय मिळण्यासाठी पुढे सुमारे वीस वर्षे वाट पाहावी लागली. काही तासांत हजारो निरपराध नागरिकांचे बळी घेऊन किमान तीन

पिढ्यांचे आयुष्य उध्वस्त करणारी ही घटना आजही अनेक प्रश्न उभे करते. खटल्याचे काम १९८७ मध्ये सुरू झाले. त्यानंतर २३ वर्षांनी म्हणजे ७ जून २०१० रोजी या खटल्याचा निकाल लागला.

**पहिली मेट्रो रेल्वे सुरू**

केंद्र सरकारने कोलकाता शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी १९७२ मध्ये मेट्रो रेल्वेची योजना हाती घेतली होती. या योजनेचा पहिला टप्पा १९८४ मध्ये पूर्ण झाला आणि २४ ऑक्टोबर १९८४ पासून देशातील पहिली भूमिगत मेट्रो कोलकात्यातील एस्प्लॅनेड- भवानीपूर या स्थानकांदरम्यान धावली. १९९५ मध्ये ही योजना पूर्ण होऊन संपूर्ण १६.४५ किलोमीटरचा भूमिगत मार्ग वाहतुकीला खुला झाला. सध्या देशातील विविध शहरांमध्ये मेट्रो प्रकल्प सुरू असून त्याच्या कामाचा व्याप मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे.

**बंगाली स्थलांतरित**

बंगाली स्थलांतरितांच्या मुद्यांवरून पेटलेल्या आसाममध्ये आसाम कराराद्वारे शांती प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुढाकाराने केंद्र सरकार व ऑल आसाम स्टुडंट्स युनियन व आसाम गण संग्राम परिषद या आंदोलक संघटना यांच्यामध्ये १५ ऑगस्ट १९८५ रोजी 'आसाम करार' झाला व समस्येचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

**पक्षांतरबंदी कायदा**

सध्या गाजत असणारा पक्षांतर बंदी कायदा संसदेने १५ फेब्रुवारी १९८५ रोजी संमत केला. त्यानुसार राज्यघटनेत दहाव्या अनुसूचीचा अंतर्भाव करून व इतर आवश्यक बदल करून हा कायदा ९ मार्च १९८५ पासून संसद व राज्यातील विधानसभांसाठी लागू केला. राजकीय पक्षांमध्ये फूट पडून संसदीय सदस्यांनी वैयक्तिक लाभाकरता व पदाकरता एकगठ्ठा पक्षबदल करण्याचे प्रकार वारंवार घडत होते. देशभरात अशा संसदीय राजकारणाची 'आयाराम गायारामचे राजकारण' म्हणून संभावना होत होती. या पार्श्वभूमीवर ५२ व्या घटनादुरुस्तीसाठी कायदा संमत केला. पक्षांतराच्या कारणावरून संसद सदस्य म्हणून अपात्र ठरविण्यासंबंधीच्या तरतुदी नमूद करणाऱ्या दहाव्या अनुसूचीचा घटनेत अंतर्भाव केला गेला.

त्याचप्रमाणे घटनेच्या कलम १०२ मध्ये उपकलम दोन चा अंतर्भाव करून एखादी व्यक्ती संसदेच्या दोन्ही सभागृहांची सदस्य म्हणून राहण्याची राहण्यास दहाव्य अनुसूचीद्वारे अपात्र असेल तर ती अशा सदस्यत्वासाठी अपात्र होईल, अशी तरतद केली गेली. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या सत्ता संघर्षानंतर सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या खंडपीठाच्या निर्णयानंतर या कायद्यात अधिक स्पष्टता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात झालेल्या 'ब्लू स्टार ऑपरेशन'चा सूड घेण्यासाठी १० ऑगस्ट १९८६ रोजी पुण्यात जनरल अरुणकुमार वैद्य यांची गोळ्या घालून अतिरेक्यांनी हत्या केली. त्यांची हत्या करणाऱ्या जिंदा आणि सुखा या दोन अतिरेक्यांना नंतर फाशीची शिक्षा देण्यात आली.

दीर्घकाळच्या असंतोषानंतर १९८६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी मिझो नॅशनल फ्रंटच्या नेत्यांसोबत शांतता करार केला. त्यानुसार शस्त्र समर्पण केल्यानंतर २० फेब्रुवारी १९८७ रोजी केंद्रशासित मिझोरामला स्वतंत्र घटक राज्याचा दर्जा दिला गेला. अरुणाचल प्रदेशला स्वतंत्र घटक राज्य म्हणून घोषित करण्यात आले. ३० मे १९८७ रोजी गोव्याला घटक राज्याचा दर्जा दिला गेला आणि त्यांच्यासोबत संयुक्त केंद्रशासित प्रदेश म्हणून गणला जाणारा दीवदमणचा भाग स्वतंत्रपणे केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित केला गेला.

श्रीलंकेचे सैन्यदल आणि लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम (एलटीटीई) यांच्यामधील संघर्ष तीव्र झाल्यावर श्रीलंकेचे राष्ट्रपती जे. आर. जयवर्धन यांच्या विनंतीवरून भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी शांती सेना पाठवण्याचा निर्णय घेतला. जुलै १९८७ मध्ये श्रीलंकेत भारतीय शांती सेना पोचली. मात्र, या निर्णयाचे परिणाम नंतर अनेककाळ भारताला भोगावे लागले. पुढे राजीव गांधी यांची हत्या याच निर्णयातून झाली.

**पृथ्वी आणि अग्नी क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी**

'डीआरडीओ'ने १९८३ मध्ये पृथ्वी या क्षेपणास्त्राच्या निर्मितीला सुरवात केली होती. त्यानंतर पाच वर्षांनी म्हणजे २५ फेब्रुवारी १९८८ रोजी पृथ्वी क्षेपणास्त्राची पहिली चाचणी आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथे करण्यात आली. त्यापाठोपाठ म्हणजे १९८९ मध्ये अग्नी या क्षेपणास्त्राची चाचणी ओरिसातील चंडीपूर येथे करण्यात आली. या दोन्ही चाचण्या यशस्वी ठरल्या. या दोन्ही चाचण्या भारताच्या आण्विक क्षेपणास्त्र विकासाच्या क्षेत्रातील प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा ठरल्या.

परम महासंगणकाची निर्मिती साध्य करणाऱ्या 'सीडॅक' ची स्थापना मार्च १९८८ मध्ये केंद्र सरकारच्या

दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने केली. सीडॅकने प्रकट संगणकीय तंत्रज्ञानाच्या शिक्षणासाठी पुणे, दिल्ली, हैदराबाद, बेंगळुरू येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन केली. त्याद्वारे कुशल संगणकतज्ज्ञ उपलब्ध होऊ लागले.

**विश्वनाथ प्रताप सिंह पंतप्रधान**

बोफोर्स तोफांच्या गैरव्यवहाराच्या मुद्यावर संपूर्ण देशात काँग्रेस विरोधात वातावरण तयार झाल्यानंतर नोव्हेंबर १९८९ च्या नवव्या लोकसभेसाठी झालेल्या निवडणुकीत विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडीला यश मिळाले. ता. २ डिसेंबर १९८९ रोजी राष्ट्रीय आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेवर आले आणि विश्वनाथप्रताप सिंह देशाचे पंतप्रधान बनले. सिंह यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर ९ डिसेंबर १९८९ रोजी गृहमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या कन्या रूबिना सईद यांचे अपहरण करण्यात आले. त्यांच्या मुक्तीसाठी पाच दहशतवाद्यांची सुटका करण्याची नामुष्की तत्कालीन केंद्र सरकारवर ओढवली.

**'नर्मदा बचाव' आंदोलन :** नर्मदा नदीवरील सरदार सरोवर या मोठ्या धरण प्रकल्पामुळे गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्र या राज्यांमध्ये विस्थापितांचा प्रश्न गंभीर बनला. सन १९८५ पासन सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी पनर्वसन व पर्यायी विकासनीती हे महे हातात घेऊन 'नर्मदा बचाव आंदोलन' सरू केले होते. २८ सप्टेंबर १९८९ रोजी मध्य प्रदेशमधील हरसूद येथे घेतलेल्या विस्थापितांच्या राष्ट्रव्यापी मिळवल्यानंतर व्यापक प्रतिसाद मिळाला व आंदोलन अधिक तीव्र झाले. पुढील दोन दशके हा लढा चालू राहिला.

**मंडल आयोगाच्या शिफारशी लागू**


इतर मागासवर्गीय यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये सत्तावीस टक्के आरक्षण देण्याची शिफारस करणाऱ्या मंडल आयोगाच्या अहवालावरील कार्यवाही तत्कालीन केंद्र सरकारने प्रलंबित ठेवली होती. १९८९ पासून सत्तेवर आलेल्या व्ही. पी. सिंह यांनी ७ ऑगस्ट १९९९ रोजी मंडल आयोगातील शिफारसी लागू करण्याची ऐतिहासिक घोषणा केली आणि या आरक्षण विषयक धोरणाबद्दल देशभर देशभर वादळ निर्माण झाले. उत्तर भारतात त्यावर उग्र व हिंसक प्रतिक्रिया उमटल्या. भारतातील राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा हा निर्णय ठरला. व्ही. पी. सिंह यांच्या जनता दलाचे सरकार ११ महिन्यांतच संसदेतील बहुमताअभावी पडले. त्यानंतर जनता दलाचे चंद्रशेखर यांच्या गटाला काँग्रेसचा पाठिंबा मिळाला आणि पाच नोव्हेंबर १९९० रोजी चंद्रशेखर पंतप्रधान झाले. देवीलाल उपपंतप्रधान बनले. मात्र, हे सरकारही अल्पजीवी ठरले. राजीव गांधी यांनी चार महिन्यांतच चंद्रशेखर सरकारचा पाठिंबा काढून घेतला.

**राजीव गांधी यांच्याकडे देशाची सूत्रे**

ता. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी सकाळी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यावर अचानक एक मोठी पोकळी तयार झाली. मात्र, त्याच दिवशी संध्याकाळी काँग्रेस संसदीय पक्षाने त्यांचे चिरंजीव राजीव गांधी यांची नेतेपदी निवड केली आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे १ नोव्हेंबर १९८४ रोजी राजीव गांधी यांना हंगामी पंतप्रधान म्हणून शपथ देण्यात आली. त्यानंतर आठव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. इंदिरा गांधी यांच्या निधनामुळे या निवडणुकीत काँग्रेसला सहानुभूतीच्या लाटेचा फायदा झाला. संपूर्ण देशभरातून काँग्रेसला पाठिंबा मिळाला आणि ३१ डिसेंबर १९८४ रोजी राजीव गांधी यांनी पुन्हा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. राजीव गांधी यांनी शपथ घेतल्यावर त्यांच्यासमोर अनेक आव्हाने होती. तेव्हा त्यांचे वय फक्त चाळीस वर्षे होते. ते देशाचे सर्वांत तरूण पंतप्रधान होते. राजीव गांधी यांनी पक्षात आणि पक्षाबाहेर मोठे बदल घडवून आणले. महत्त्वाचे निर्णय घेतले आणि इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या अस्थिरतेवर बऱ्याच अंशी मात केली. देशाचे आधुनिकीकरण करून संपूर्ण देशाला वेगळी दिशा देण्याचे काम केले. सॅम पित्रोदा यांच्या नेतृत्वाखाली भारतातील संगणक युगाला त्यांनी चालना दिली. दूरसंचार क्षेत्रात अनेक नवे बदल घडवले. उपग्रह तंत्रज्ञान विकसित केले. यासोबतच पंचायत राज कायद्यात सुधारणा करून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासही चालना दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या. राजीव गांधी यांनीच पक्षांतराला आळा घालण्यासाठी पक्षांतरबंदी कायदा केला.

**- संभाजी पाटील**

# कर्तव्यपथावरील प्रधान सेवक !



डॉ

बाबासाहेब आंबेडकरांचे जागतिक दर्जाचे स्मारक मुबईतील इंदू मिलच्या जागेवर उभारले जात आहे. केंद्र सरकारने या स्मारकासाठी १६०० कोटी रुपयांची जमीन विनामूल्य दिली आहे. या जागतिक दर्जाच्या स्मारकाचा भूमिपूजन समारंभ मुंबईत पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते मुंबईतील बी.के.सी ग्राऊंडवर संपन्न झाला. यावेळी मोदीजींनी केलेल्या भाषणात देशातील दलित, आदिवासी व ओबीसी समाजामुळे मी या देशाचा पंतप्रधान आहे, असे म्हटले होते. परिणामाची पर्वा न करता असे धाडसी विधान प्रामाणिकपणे केवळ नरेंद्र मोदीच करू शकतात. तसेच समाजातल्या मागास वर्गात, गरीब माता-पित्याच्या पोटी जन्माला आलेला माझ्यासारखा माणूस केवळ डॉ. बाबासाहेबांच्यामुळेच या देशाचा पंतप्रधान बनू शकला, अशी कृतज्ञता मोदीजी अनेकदा जाहीरपणे व्यक्त करतात. हे शब्द समाजातील दलित, शोषित, पीडित व आदिवासी यांच्या प्रती असलेली त्यांची आस्था, तळमळ, बांधिलकी सिद्ध करतात.

पंडित दीनदयाळजींचा अंत्योदयाचा, मा.गांधीजींचा रामराज्याचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक व आर्थिक समतेचा विचार या विचारमूल्यांवरच मोदी यांची जीवन परिक्रमा सुरू आहे. कोणी काहीही म्हणोत त्याची पर्वा न करता 'चरैवेती'चा संदेश साऱ्या जगाला देत अटल आणि अढळ असा त्यांचा प्रवास सुरू आहे.

अनेक वर्षे संपूर्ण देशाचा प्रवास करून, अनेक घटना अनुभवून आणि अनेक अपमान सहन करून त्यांची वैचारिक बैठक भक्कम झाली आहे. या वैचारिक बैठकीमुळेच त्यांच्या अंगी योग्यांची योग्यता, संतांची सहनशीलता आणि राष्ट्रभक्तांची राष्ट्रीयता पुरेपूर भिनली आहे. म्हणूनच आपल्याला अत्यंत निःस्पृही, निस्वार्थी, द्रष्टा आणि खंबीर पंतप्रधान मा.नरेंद्र मोदीजींच्या रूपाने लाभला आहे.

नुकताच भारताने आपल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. गेल्या ७५ वर्षांतील विकासाचा मागोवा घेताना आपल्याला काय दिसते? मा.नरेंद्र मोदी पंतप्रधान होईपर्यंत देशातील स्थिती काय होती ? देशातील अठरा हजार गावात वीज नव्हती, १३० कोटी लोकसंख्येपैकी १०० कोटी लोकांना बँक माहीत नव्हती. ७० कोटी लोकांकडे शौचालये नव्हती. स्वातंत्र्यानंतरही ६७ वर्षे आपल्या देशातल्या अर्ध्यापेक्षा अधिक आया बहिणींना आपला नैसर्गिक विधी उघड्यावर पार पाडावा लागत होता. ६७ हजार गावांना रस्ताच नव्हता आणि एक लाखापेक्षा अधिक गावांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नव्हते. सरकार कोणाचे का असेना ज्यांचे सरकार होते त्यांनी नेमका कोणता विकास केला, हा प्रश्न आज प्रत्येक भारतीयांच्या मनात पडतो आहे. म्हणूनच देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदींना देशातील सर्वाधिक लोकांनी पसंती दिली आहे. आणि ते जगातील सर्वात लोकप्रिय नेते ठरले आहेत.

**प्रेरणादायी जीवन :** एका अत्यंत गरीब मागासवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या नरेंद्र भाईंना सर्व सामान्यांच्या व्यथा, वेदना, सामाजिक दुःख व परिस्थितीची पुरेपूर जाणीव

असल्याने व्यक्तिगत विचार न करता त्यांनी देशासाठी जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. ज्या विचारधारेत 'वसुधैव कुटुंबकम्' हा मूलमंत्र आहे, त्या विचारधारेची कास धरूनच आपल्याला गरीब, शोषित, पीडित व शेवटच्या माणसासाठी काम करता येईल अशी धारणा झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या राष्ट्रवादी विचाराच्या स्वयंसेवी संस्थेस आपले आयुष्य देण्याचे ठरवून प्रवासाला सुरुवात केली. त्याच प्रवासाने त्यांना २०१४ साली देशाच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहोचविले.

देशाचे पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले होते, 'मी देशाचा पंतप्रधान नाही प्रधानसेवक आहे'. त्यांच्या या शब्दांमुळे आज देशातील अनेक लोक स्वतःला सेवक समजून देशासाठी काम करीत आहेत, मोदीजींचे आदर्शवत जीवन आज अनेकांना प्रेरणादायी ठरले आहे. मोदी नावाचे गारूड साऱ्या जगभर गुंजारव करत आहे. कारण त्यांनी आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण देशासाठी अर्पिला आहे. आजही रोज अठरा-अठरा तास देशासाठी ते काम करतात. सहकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना काम करायला लावतात.

**योग्य दिशा- सुस्पष्ट नीती :**

राष्ट्रसमृद्धीचा विचार यापूर्वी अनेकांनी मांडला; परंतु राष्ट्रसमृद्धीसाठी योग्य दिशा व मार्ग अवलंबिल्यामुळे राष्ट्राची गेल्या आठ वर्षांत जी प्रगती झाली ती त्यापूर्वी सत्तर वर्षांत होऊ शकली नाही. योग्य दिशा आणि सुस्पष्ट नीती अंगीकारल्यामुळे सत्तर वर्षांत जे झाले नाही ते आठ वर्षांत मोदीजींनी करून दाखविले.

आपण जेव्हा जेव्हा विकासावर बोलतो तेव्हा सार्वजनिक, भौतिक सोयी - सुविधांवर आपला भर असतो; परंतु नरेंद्रभाईंनी भौतिक सोयी-सुविधांचा विचार तर केलाच; परंतु भौतिक सुविधांसोबत सामाजिक विकासासाठी व्यक्तिगत विकासावरही भर दिला. व्यक्तिगत विकासासाठी मोदी सरकारने सुकन्या समृद्धी, मातृत्व वंदना, मिशन इंद्रधनुष्य, उज्वला, शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, गोकूळ मिशन, सौर ऊर्जा, स्फूर्ती, मत्स्य संपदा, किसान क्रेडिट कार्ड, स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया, दीनदयाळ उपाध्याय कौशल्य विकास योजना, स्वनिधी, ई-स्किल इंडिया, स्वयंप्रभा, मेक इन इंडिया, जनधन, सुरक्षा विमा, अटल पेन्शन, जीवन ज्योती विमा, पंतप्रधान आवास, शौचालय बांधणी, ई-श्रमकार्ड, श्रमेय जयते, आयुष्यमान भारत, टीबी मिशन, सौभाग्य, उजाला, अन्न सुरक्षा, स्वामित्व, ग्राम ज्योती, जनऔषधी, श्रमयोगी, मुद्रा, कौशल्य विकास, दक्ष योजना यांसारख्या व्यक्तिगत लाभांच्या योजनांमुळे सर्व समाजांतील अनेक गरीब, गरजूंना आर्थिक फायदा झाला व त्यांची आर्थिक उन्नतीही झाली.

**सामाजिक लोकशाहीचे प्रणेते :**

नरेंद्रभाई डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पाईक असल्याने त्यांनी राजकीय लोकशाही प्रगल्भ करत असतानाच सामाजिक लोकशाही प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला. भारतीय घटना हाच माझा धर्मग्रंथ आहे असे सांगून त्यांनी घटनेबद्दल आदर तर व्यक्त केलाच; परंतु माझे राज्य हे घटनेचे असेल, असे ठासून सांगितले. बाबासाहेबांचे व्हिजन हेच आमचे मिशन आहे, हे वारंवार नुसते सांगितलेच नाही तर बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित सामाजिक लोकशाही भक्कम केली.

या देशात सर्व समान आहेत, सर्वांना सारखाच कायदा आहे आणि सर्वांना सारख्याच सोयी - सुविधा असायला हव्यात. यासाठी घटनेतील ३७० कलम हटविले. महिलांच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारी तीन तलाक पद्धत बंद केली. सामाजिक समानतेबरोबर आर्थिक समानता आणण्यासाठी महिलांच्या आर्थिक उन्नतीच्या अनेक योजना आखून त्यांची अंमलबजावणी केली. सामाजिक समतेचे प्रणेते डॉ.बाबासाहेबांच्या आयुष्याशी संबंधित पाच ठिकाणे जन्मगाव महू, लंडनमधील त्यांचे घर, जिथे बाबासाहेबांनी दिक्षा घेतली ती दिक्षाभूमी, महापरिनिर्वाण स्थळ दिल्ली व चैत्यभूमी-दादर ही पंचतीर्थ म्हणून घोषित करून त्यांच्या विकासासाठी शेकडो कोटींची तरतूद केली. या देशातील व्यक्ती केंद्रबिंदू मानून त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी केली. देशाचा केवळ आर्थिक विकासच केला नाही तर, देशाची प्रतिमा बदलण्याचे व जगात भारताला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम पंतप्रधान म्हणून मा. नरेंद्र मोदी यांनी केले आहे. मोदीजींच्या कार्यकर्तृत्वामुळे देशाचे चरित्र आणि चारित्र्य उजळले आहे. म्हणून देश म्हणतो आहे, 'मोदी है तो मुमकीन है.'

**- गणेश हाके**

(लेखक मनोगत पाक्षिकाचे संपादक आहेत.)

# ‘मोळी’



आकाश आज खूप आनंदात होता.चित्रकला स्पर्धेचा निकाल लागला होता.त्याला जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक मिळाले होते.सोमवारी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आकाशचा सत्कार करणार होते.गुरूजी त्याला सत्कारासाठी सोबत नेणार होते.आज सकाळ सत्रात शाळा होती. त्याला दुपारी बाबांसोबत रानात जायला मिळणार होते. शाळेतून घरी जाताना झपझप पावले टाकत होता. पावलांनाही घराची ओढ लागली होती. मनाने तो केव्हाचाच घरी पोचला होता. शाळेतून येताना आईने दुकानातून सौदा आणायला सांगितला होता हे तो विसरला. घराच्या जवळ आल्यावर त्याच्या हे लक्षात आले. तो परत फिरला. दुकानाकडे निघाला. दुकानात पोचला. दुकानदार ऐटीत बसून होता. दप्तरातील मराठीच्या पुस्तकातून किराण्याची यादीची चिठ्ठी काढून दुकानदाराकडे दिली. तोच दुकानदार भडकला आणि मोठमोठ्याने हाणून पाडून बोलू लागला.

‘पैशे आनले काय बे संगं का चिठ्ठीच घिऊन आला सौद्याची...?’

‘माले आईबाबा पैशे आल्यावर उधारीचे पैशे देतीन म्हनत तुमाले...’ आकाश म्हणाला.

‘आईबाबा देतीन म्हने पैशे. झाळाले लागते काय बे पैशे. फुकट्या लेकाचा. उधारी फेळली नाई अन् चालले चिठ्ठ्या घिऊन सौद्याले. जाय सांग तुया बापाले. पयली उधारी फेळ म्हना अन् मंगच सौदा ने म्हना. तुमच्यासारखे खटले चालवले तं आमी कसं जगावं बे. हे घे तुयी चिठ्ठी. जाय घरी.’

उधारी न चुकवल्याने आता उधार किराणा मिळणार नाही अशी ताकीद दुकानदाराने दिली म्हणून तो जड पावलांनी रिकाम्या हाताने घराकडे निघाला.

घरी आई मनकर्णा अन् बाबा सुखदेव त्याची वाट पाहत होते. बाबाची सायकल दारात उभी होती. सायकलला एक पिशवी लटकून होती. पिशवीत कुऱ्हसहाड, विळा होता. तो घरी पोचला. आईबाबांनी काही न विचारताच त्याने दुकानदाराने किराणा देण्यास नकार दिल्याचे सांगितले. ऐकल्यावर आईबाबांना त्यात काही नवल वाटले नाही. बाबा त्याला समजावत म्हणाले-

‘जाऊ दे, चाल तू आज चालतं ना माह्यासंग जंगलात. ते सायकलची थैली आण इकडे काढून. घडोशीच्या खाली ‘खरप’ हाय तो आण इकडे. कुऱ्हाड घासतो जराशी. तू काईतरी खाऊन घे. दे वं याले खाले. खिचळी नाई खाल्ली का रे शाळेत? काईतरी खाऊन घे. अवघा दिवस जाते जंगलात. टाईम काई समजत नाई. भरभर निंगून जाते. हिंडता हिंडता पुरं जंगल तुळवा लागते. जीव थकून जाते. सारं आंग घामाझोकील व्हते. पान्याची वाटरबॅग घेजो संगं. पानी नाई जंगलात मेळशिंगाच्या माथ्याशिवाय कुठीच. मानसंई

कमीच रायतात जंगलात. कोनाचा चाय येत नाई. लाकळं एका जागी थोळीच सापळतात? चाल उरक लवकर."

आकाशने एकेक काम करत शाळेत खिचडी खाल्ल्याचे सांगितले. आईने बेसन-भाकर पालवात बांधली. वायरच्या थैलीत टाकली. थैली सायकलला लावली. प्लास्टिकच्या बाटलीत प्यायचे पाणी भरून बाटली थैलीत टाकली. तशी मनकर्णा बोलली.

'यादीनं जिवून घेजा. लेकरू संग हाय तुमच्या. लय कातोळा नोका करू. जसे भेटतीन तसे लाकडं जमा करा. लय मोठ्ठा भारा बांधाच्या फंदात पळू नोका. चुंभय करजा शेल्याची. जेवळं सापळीन तेवळंच आना. लय हाव करू नोका. आबीतच पायजा. जास्त झाळी- झुळपात घुसू नोका. लय अयचन हाय जंगलात कुठी कुठी. जंगलात लय नाले ओलांडू नोका. जनावरं सुटेल हायेत म्हणे सारे. लेकराकडं ध्यान ठेवजा.. झाकट पळयाच्या अगुदर गावखरी येजा. अंधार झाला की काई दिसत नाई रस्त्यानं. गावात लय दुकानं हिंडत बसू नोका. एकच भाव धरून ठीऊ नोका. भावात काई कमीरमी करून दिऊन टाकजा मोई. दोन पयशे कमी का जास्त. कुंजी झुगला बुढीपाशी ठेवजा. झुगलामाय घरीच हाय पान लागल्यापासून. तब्येत ज्यमली पन वावरातलं काम नाई घेतलं हाती उजूक. मी चालली बंडू देशमुखाच्या वावरात रोजानं. कसेही शे-दोनशे येतेत तं कामी पळतेत. बाबू तू बाबाच्या संगसंगच रायजो. येतो मी.'

आईने शेताचा रस्ता धरला. बाबाने गंजलेले लहान कुलूप साखईले लावले. किल्ली झुगला आजीजवळ ठेवली. सायकल काढली. हातातील पिशवी सायकलला लावली. आकाश सायकलवर मागे बसला. दोघेही जंगलाच्या दिशेने निघाले. हळूहळू रस्ता सरला अन् जंगल सुरू झाले. जंगलात वाळलेले झाड शोधूनही सापडत नव्हते. जवळपास इंधन - काडी सापडत नाही म्हणून जंगलात दूर जाणे आवश्यक होते म्हणून दोघेही जंगलात बरेच आतमध्ये शिरले. आसपास कोणतेही गाव दिसत नव्हते. दोघांशिवाय जंगलात दुसरे कुणी असल्याचा मागमूसही नव्हता. अवतीभवती घनदाट जंगल होते. वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या आकाराची, वेगवेगळ्या रंगाची, वेगवेगळ्या जातीची अगणित हिरवीगार झाडे जंगलाचे सौंदर्य वाढवत होती. अधूनमधून एखाद्या ओढ्याच्या पाण्यातून चालतांना आकाशला खूप आंनद होत होता. जंगल बघून त्याचे मन तृप्त झाले होते. वाळलेले एकही झाड दिसत नसल्याने बाबांनी नाईलाजाने एका झाडाखाली सायकल उभी केली. औजारांची पिशवी हातात घेतली. भाकरीची पिशवी आकाशजवळ दिली. लाकडांची, लहान सहान काड्याकुड्यांची शोधाशोध सुरू झाली. झाडाच्या गळून पडलेल्या फांद्या दोघेही जमा करत होते. फांद्या व्यवस्थित छाटून लाकडे दोरीवर रचून लाकडाची करकचून मोळी बांधली. कुऱ्हाडसह इतर साहित्य पिशवीत टाकून पिशवी मोळीच्या मध्यभागी ठेवून बांधली. हिरवी झाडे तोडायची नाहीत हे कटाक्षाने बाबांनी पाळले होते. बाबांनी शेल्याची चुंबळ करून मोळी डोक्यावर घेतली. सूर्य पश्चिमेकडे कलत होता. अंधार पडायच्या आधी जंगलातून निघून रस्त्यावर लागायचे होते. आकाश सायकल लोटत होता. दोघेही जंगलाबाहेर निघाले. अंधार पडायच्या आधी दोघेही गावात पोचले.

घरी न जाता बाबांनी मोळी अमजदचाचाच्या हॉटेलपुढे टाकली. अमजदचे हॉटेल चांगले चालत होते. जंगलातून मोळी डोक्यावर आणल्याने बाबांची मान अकडल्यासारखी झाली. बाबांचे अंग घामाने पूर्ण भिजून गेले. काही बोलायच्या आत अमजदचाचाने मोळी घेण्यास नकार दिला.

'नही होनारे. सुख्या. नही होना. उठा जल्दी तेरी मोली. फोकट की लकळी उठा के लाता ओर घर का माल समजके बेचता. बडा आया बेपारी. उठा. नही होना.'

'अमजदभाऊ, घिऊन घ्या ना. दोन पैशे कमी द्या ब्वॉ. घ्या.खाली टाकली आता उचल्याले नाई पुरत. घ्या. द्याना तुमच्या मनानं काय द्याचं ते द्या.'

'एकबार सिधा बोला तेकू सूने नही आता क्यारे बावले. चल उठा तेरी लकडीयाँ नही तो फेंक उठाके यहाँसे...'

'घ्या ना अमजदभाऊ आजच्या दिवस सकाय दुसऱ्याले इकतो. सौदा आना लागते मले...'

बाबांनी अमजदचाचाला मोळी घेण्याची विनंती केली पण काही फायदा झाला नाही. घोटभर पाणी पित बाबांनी मोळी उचलली. रस्त्याच्या कडेला असलेल्या मंजीत ढाब्यापर्यंत उचलून आणली. ढाब्याच्या मालकाने मोळीच्या भावासाठी घासाघीस करून एकशे वीस रूपयांची मोळी घेतली. एकशे वीस रूपये घेऊन दोघेही दुकानात गेले अन् किराणा घेऊन घरी आले. औजारांची पिशवी घरात ठेवली. जंगलात सोबत दिलेली शिदोरी पिशवीत तशीच पाहून आई दोघांनाही रागावली.

आईने स्वयंपाक केला होता. दोघेही हातपाय धुऊन जेवायला बसले. जेवणात शिरा बघून बाबांनी सहज विचारले. 'आज काई कोनता सन नाई. बीन नाई. मंग कसं काय ज्याले गोळधोळ रांधलं. शिरा केला. कोनी पाव्हने येऊन रायले का? काय झालं काई समज्याले च्यानस नाई. सांगा तरी काई मले. समजू द्या काय झालं?'

मनकर्णाने पदराने ओली पापणी पुसत उत्तर दिले. 'काई कोनी रिकामं नाई आपल्या घरी यायले. यीऊन जाऊन माह्या भावाशिवाय कोन झिजोते उंबरा आपला. आज तो बी नाई यिऊन रायला. करा वाटलं केला शिरा. जाऊ द्या. खा गुपचूप...'

'अरे पन काई मेळ नाई लागून रायला ना सांगतं खरी काय झालंतं बिचारे...'

'सांगूनच टाकतो. अवं. मंगानी घरातून भाहीर निंगाली तं कयंबेशोरवाले आपल्या आकुशाचे निकामे मास्तर भेटले वावरात जाताखेपी. चितरंगकलेच्या परीक्षेत जिल्ल्यातून पयला नंबर आला म्हनेत आपल्या लेकराचा. सातशे - आठशे चितरंगातून नंबर काळला आपल्या आकुशानं. कलेक्टर बक्षीस देणार हायत लेकराले सोम्मारी. म्हणूनसन्या कनकीचा गुई टाकून शिरा केला. पोराचं कौतिक कराले याच्यापरीस दुसरं काय करनार आपून. लोकं आळमाप खर्च करतेत लेकरासाठी. आपली आयपत नाई खर्च कराची.. आपल्या दोघाले जा लागीन कारेकरमाले. मायबापाले शाल - नारय देनार हायत म्हणेत. कई काळलं. कई रंगोलं आमालेतं मालुम नाई. कायचं चितरंग काढलं व्हतं बाबू तुह्या आमाले सांग तरी बापा.'

त्यावर आकाश उत्तरला, 'डोक्यावर लाकडाची मोळी घिऊन चालणाऱ्या बाबाचं चित्र काढलं. सायकल काढली. मी व्हतो चित्रात. जंगल व्हतं. नदी व्हती. झाळं व्हती. पाखरं व्हती. अभाय व्हतं.'

आईबाबांनी आकाशचे उत्तर ऐकले. भारावून गेले. आनंदाने घर भरून गेले. दोघांनी आकाशला पोटाशी धरले. दोघांचेही मन कौतुकाने भरून आले. दोघांच्याही डोळ्यात आनंदाश्रू तरळले. घराच्या आड्याकडे बघत दोघांनीही आसवे सावरली.

**—अमोल गोंडचवर**
केशव नगर, अकोला, मो. ८२७५३११९९६

# विखारी विचार

माणसे आता तरी होऊ दे जरा विचारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
कोण खातो काय अन नेसतो काय आहे
कोण कोणा भजतो अन मानतो कोणास आहे?
भाव द्वेषाचाच आहे प्रेम गेले रे कुठारी?
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
आंधळी ही भक्ती नि अक्कल गहाण आहे
हित स्वत:चे ना कळेना उरले ना भान आहे
बंधुभावास चूड लावून माजे दुही विखारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
बाप दाखवला तरीही श्राद्ध घालती करंटे
सत्य कितीही पटवून सांगा त्यांची मती खुंटलेली
धर्माचा अर्थ खरा विसरोनी आणली शिसारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
सत्याला ठरवुनी असत्य प्रकाशाला काळोख
बंधुता उरली कुठे ना धरती एकमेकावरी डूख
धर्म ही अफू अशी जी मानवा बनवी विकारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
समतेचा ध्वज अन् झेंडा विवेकाचा फडकवू
विज्ञान - तंत्रज्ञान आणि न्याय समतेचा पेरू
मनुवाद रोग आहे त्याचे होऊ न शिकारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
गरीब होई गरीब अन् श्रीमंत अधिक धनवान
काम नाही हाताला वर अत्याचार अवमान
देश विकुनी टाकला नागरीका बनवे भिकारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
लोकशाही आपली ही ठेवू राखू अबाधित
संविधानामुळेच माणुसकीची आहे सदैव जीत
धर्मांध मनुवादाची षड्यंत्र करू उध्वस्त सारी
माणसे अशी का होऊ लागली विषारी?
एकीने लढू नेकीने घडू नको दुहिला थारा रे
हा देश आहे सर्वांचा ह्या देशाचे आहेत सारे
प्रेम जिव्हाळा नांदो येथे प्रगती घेवो भरारी
माणसे आता तरी होऊ दे जरा विचारी

**-डॉ.प्रतिभा जाधव, नाशिक**
मो.९६५७१३१७१९

# मनातील संभ्रमी कोलाहल..

एखाद्या निवांत क्षणी, नकळतच मनात एखादा विचार सहजच तरळून जातो. थोडा आगळा- वेगळा.याआधी मनात आलाही असेल, पण आपण फारसं लक्ष न दिलेला. पण यावेळी तो आपल्याला आवडून जातो. आपण त्यावर काळजीने लक्ष देतो. तसं तर, आपलं सर्वांचं मन एक अलीबाबाची गुहाच आहे, हजारो जादुई विचार लपवून ठेवणारी ! पण, एक मात्र खरं, माणसाच्या मनात विचारच येत नसतील तर कृतीसाठी चालना कशी मिळेल? जगणं अधीकाधीक चांगलं व सकारात्मक कसं करता येईल? यात सकारात्मक व सुयोग्य विचार निवडून कार्यप्रवण होणं महत्वाचं आहे. विचारांना कृतीचं नेमकं अधिष्ठान लाभलं की, जीवनाच्या दिशेची आगेकूच, अधिक परिणामकारक होते. पण असं सहज घडत नाही, त्यातल्या त्यात, या टोकदार वर्तमान असणाऱ्या काळात, तर संवेदनशील मनाची जोखीम अधीकच वाढलेली... मघाचा प्रश्न नि मनात डोकावलेला विचार हाच आहे की, 'संवेदनशील असणं, जगणं का नासवत जातं?'

सभोवार, समाजात, देशात आजूबाजूला ज्या घटना घडतात, त्या संवेदनशील मनाला अतिशय उदविग्ण व परास्त करणाऱ्या असतात. अशा घटनांच्या विचाराने, माणूस असण्याची बाब अतिशय शरमेची, लाजीरवाणी वाटू लागते. मग काहीच न करता येण्याचं दुःख मनाचा कडेलोट करतं. कधीकधी या कृतीशून्य, संरक्षीत मनाचा कडकडून धिक्कारही करावासा वाटतो. पण, हे शहाणीवीतले सोपस्कारी संस्कार करून घेण्यापेक्षा, थोडं - थोडकं का होईना, कृतीप्रवण होणं महत्वाचंच; हाच यावरचा खात्रीशीर उपाय म्हटला पाहिजे !

आपापल्यापरिने सभोवाराच्या दुरूस्तीसाठी सजग जागल्याची भूमिका कधीना कधी प्रत्येकालाच घ्यायची आहे.

तसा कुठलाच काळाचा तुकडा देदीप्यमान असा ठेवला गेला का? मुळात नाही, हेच उत्तर येतं! माणसाला जगण्यासाठी लागणाऱ्या साध्या अन् सोप्या गोष्टी किती कठीण करून ठेवण्यात आल्यात. तसं तर, प्रत्येकाच्या वाट्याला यायला हवं होतं हक्काच्या शिक्षणाचं शहाणपण, आरोग्यपूर्ण तन आणि सुपोषीत मन, पावलं मावतील एवढं अंगण नि उन, वारा, पाऊस ह्यापासून वाचवणारं, स्वतःचं इवलंस घर! हातांसाठी काम नि केलेल्या कामाचे योग्य दाम! अन् हो, कुठलंही कंपुशाही लेबल न लावता, थोडं माणूस म्हणून जगणं अधीक बेहतर करू दिल्या गेलं असतं तर, हा मिळालेला प्रत्येकाचाच जन्म किती सार्थकी लागला असता? पण, असं का घडत नाही वा घडू दिल्या जात नाही? आपापल्या ईश्वराच्या दारात स्वतःसाठी, सुख, संपन्नता नि न्याय मागणारे, दुसऱ्यासाठी कठोर न्यायाधीश होऊन, अमानवीय फैसले कसे सुनावत राहतात? माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारल्या जाण्याचं दुःख, मरण मागत जगण्याचंच हिरवं दुःख आहे; हे तथाकथीत उन्नत माणसांच्या लक्षात केव्हा येणार?

सुड उगवणे, शत्रू होणे, खुन्नस ठेवणे त्याचप्रमाणे व्देषमुलक वर्तनात सातत्य ठेवणे; हे अलिकडच्या माणसाचं कौशल्य होऊन, अभिमानाने मिरवण्यासारखं कॉलीफिकेशन झालं आहे! ह्यात अधीकाधीक कोण पुढे जातो याची अहममीका लागल्यासारखा हा गोठण काळ! जुन्या, जाणत्या, संस्कारी व माणूस म्हणून वागणाऱ्या माणसांना, साधा ब्र ही उच्चारण्याचा अवकाश की, संपन्न व डिग्रीधारी माणसांचे तांडे चारी दिशांनी चाल करून आलेच समजा! अशावेळी, ती व्यक्ती अभिमन्यूचं काळोखवेडं दुःख पांघरुण बसते, वा त्याने तसंच बसावं त्यासाठीच, हा घातकी हल्ला असतो. विजयाचे विषारी फुत्कार सोडणारे आनंदून पांगतात, पून्हा माणूस म्हणून उभा राहणाऱ्याच्या विरोधात, एक सावज म्हणून! बहुतेक शिकार नि शिकारी हा खेळ माणसानं मोठ्या आवडीने निवडला असावा, अगदी आदीम काळापासून! माणसाच्या मनातील धुर्त नि हिंस्त्र जनावर येऊ पाहतं वेळी-अवेळी बाहेर!



काहींच्या इमारतींची मुजोर उंची, झोपडयांची निर्मळ मनं बिनघोर कलुषित करू पाहत आहेत. सोन्या - चांदीच्या ताटातलं सुग्रास जेवण, मखमली शैय्या, कुबेराच्याही जगण्याला लाजवणारा थाट आणि अमानुषतेचा काळीजव्यापी घुत्कार, फार काळ टिकण्यासारखा नसतो. तसाही काळ मोठा कठोर नि तितकाच दयाळूही असतो. वेळ बदलायला फारसा वेळ लागत नाही. अन्नाच्या दोन शितांसाठी कोमजणारं बालपण, जगण्याची भिक मागत राहणारे दुर्देवी जीव नि सततच्या अन्यायाचा अजगरी विळखा पडलेले शोषीत, कुठल्याच भूमीला सूपीकपणाचा फार काळ माज करु देत नाही !आमचंच जगणं तेवढं महत्वाचं, इतरांचं मातीमोल, ही तदद्न सोज्वळ मखलाशी, त्या सर्वव्यापी निसर्गानं कुठल्याही काळात नि परीस्थितीत अजून तरी मान्य केली नाही! बरं, हे सर्व बदलता येण्यासारखं नाही का? निश्चीतच आहे! या संभ्रमीत काळाच्या कोलाहलात, भेसूर अग्नीतांडवात, त्या कथेतल्या चिमणीची, दोन थेंब पाणी असणारी न्यायी चोच आपलीच असली तर!

**- रवींद्र जवादे**

शब्दश्री,भट्टड ले-आऊट,

समतानगर, मूर्तिजापूर, जि.अकोला

मो. ९४२०७०८०२६

# भाकर

## निरंतर....

खरे खोटे काही । कळे ना कुणाला ।
विवेकाचा बाणा । रिकामाच.......।।

रिकामाच पेला । अर्धा भरलेला ।
तसाच राहिला । दृष्टिकोण.......।।

दृष्टिकोण सदा । सत्याचा असावा ।
खोट्याचा नसावा । आव आता.....।।

आता तरी वाटे । होशील तु जागा ।
धरूनिया धागा । विवेकाचा......।।

विवेकाचा जो तो । मिरवितो तोरा ।
भरूनिया झोरा । पुढे पुढे.......।।

पुढे पुढे करी । ढोंगी त्याचे कर्म ।
स्वार्थाचेच मर्म । सांभाळितो....।।

सांभाळितो किती । प्रत्येक पाऊल ।
फसवी चाहूल । मागेपुढे ।।

मागे पुढे नाही । कोणीच कोणाचे ।
सत्य जिवनाचे । कलीयुगी ।।

कलीयुगी नाही । कोणी समाधानी ।
दुःखाची विराणी । चिरंतन ।।

चिरंतन किबु । ठेव उपकार ।
जीवन उधार । निरंतर ।।

**- किशोर बुजाडे.(किबु)**
खामगांव, जि.बुलढाणा
मो.८४५९९६५३०५

असा घुसला घुसला
कसा पायामंधी काटा
'भूक' सलते ऊरात
हाले छाताड्याचा साटा...

जीव गलबले असा
भोंड आली डोया म्होर
तुह्या दाट्यात व आला
दे भाकर कोरभर...

नाही मांगत तुले व
सोन नान चांदी हिरे
तुह्या बायन्यात त्याचा
जीव चरचर चीरे..

शीय पात दे ऊरल
बरं! निव्वद चालनं
खात नाही तुह्या देव
आईक पोटाच बोलनं...

डोयामंधी त्याच्या आस
आला फोळनीचा वास
जीभ पानावली तोंडी
आता मीळन दो घास...

तिचा नकार मानीचा
जीव कालवून गेला
असे दवडी तुकळा
तीन बायना व केला...

नाही खानार भाकर
आता सोळन मी जीव
नाही निव्वदही देल्ला
शोधा मानसात देव...

आता सांगे फुलदास
बांधा भाकर शिदोरी
भूक मारून पोटात
ठेवा मरनाची ऊधारी



नको करू ना व अशे
चिल्यापिल्यायचे हाल
चंद्र हासूनच गेला
राती अभायात काल..

नाही दवळीत काही
नाही गाडग्यात पीठ
कोण्या सटवीची लागे
माह्या पोटाले व दिठ..

नाही ऊंबरा पाह्यला
जवारीन चार दिस
नाही भाजली भाकर
लागे तव्यालेच पीस..

रळे घरात ऊजीळ
हासे दारात अंधार
पाह्ये डोये वटारून
माह्यं तुटलेल दार..

दुख आली नाही गेली
माती सुखात कालोली
वार भूकेचे पोलादी
झेलते भाकर भली..

**-सु.पुं.अढाऊकर,** अकोला
मो. ९७६९२०२५९७

# आग्रह

वादळी पावसाने हजेरी लावली की,
माय आपल्या मनाशीच तिच्या
ओसाड जमिनीची अन्
भुकेल्या संसाराची कहाणी सांगायची.....
तेव्हा माझा बाप,
फार मोठ्या आशेने आमच्या
पाठीपोटावरून हाथ फिरऊन,
मायच सांत्वन करत म्हणायचा...
'बस बाबुचं शिक्षण झालं म्हंजे
तो नवक्री करेन मग
होइनच आपलं सरकं'
आणि चक्क तसं झाल सुद्धा....
नंतर तू चांगली सुशिक्षीत म्हणून
तुझ्याशी लग्न केल... परंतु....
तू आज चक्क संगणकीय
युगाचा आव आणत म्हणतेस
की, माझी फिगर, फिटनेस बिघडेल
म्हणून
'मी आई होवू शकत नाही....
अगं
आई झाल्याशिवाय
ममता कशी कळेल...
आणि जिथे ममताच नाही
तिथे समता बंधूत्वाचं
काय...?
तेव्हा....... माझ्या आग्रहाचा
वेगळा अर्थ लाऊ नको....
खरं म्हंजे.....
मला इथे लोकशाही जिवंत
ठेवायची आहे....
मला इथे लोकशाही
जिवंत ठेवायची आहे.

**-सिद्धार्थ तायडे**
चिखलगांवकर

# चल माणूस होऊ...

चल माणूस होऊ,
नातं माणुसकीचं जरा समजून घेऊ....
वृक्ष-वेली नि तृण-फूला परी
जगून पाहू...,
निर्झरासम जीवनाचं मंजूळ गीतगाऊ...
सरीतेपरी निस्वार्थ वाहू,
वाहता वाहता माणुसकीचा
अथांग सागर होऊ..
चल माणूस होऊ,
नातं माणुसकीचं जरा समजून घेऊ...
राव नको, रंक नको
नको होऊ रे तू संत...
माणूस होऊन माणुसकीचा
झरा मनी वाहू दे रे निरंतर..
चल माणूस होऊ...
भेदभाव नि विषमता
आता आपण विसरून जाऊ...
तथागतांची समता जनामनात
पेरित जाऊ...
चल माणूस होऊ...
नातं माणुसकीचं जरा समजून घेऊ...
नातं रक्ताच नि धर्म जातीचं
पण, प्रेम आपुलकीचं नातं
जरा जोपासून पाहू...,
आनंदन घेऊ, आनंद देऊ...,
चल माणूस होऊ....
नातं माणुसकीचं जरा समजुन घेऊ...
चल माणूस होऊ...
चल माणूस होऊ...

**-गौतमकुमार निकम**
मो.९८२२०६७०५५



# मनोरमा

बोलणारे साव झाले
झेलणारे घाव झाले

कूटनीती भाबडड्यांना
गाडणारे भाव झाले

सोसताती रोष भाळी
पोटभरण्या काव झाले

रंगवेडा कारभारी
नामधारी गाव झाले

लूटभारी मातलेली
हाल करण्या ठाव झाले

शोषितांचा काळ भावी
राजगादी राव झाले

पाडलेली रोजगारी
बंडखोरी नाव झाले

टांगलेले फास लोका
मानवांचे डाव झाले

**-अनिता देशमुख सरदार**
नांदुरा (बुलढाणा)
ह.मू.कल्याण
९३७२३ १९६२२

# लोकशाही

तुझे संकट सदाही,
मीच आलो घेत छातीवर!
तरी केलास,
पहिला वार मित्रा तूच पाठीवर!

पुरोगामीपणाचे केवढे
आश्चर्य आहे हे....
मला नाही पटत म्हणतो,
तरी येतोस जातीवर!

उद्या हातून लेकाच्या
तुझे मोडेल कंबरडे,
उगारत हात असतो
जर तुझ्या तू जन्मदात्रीवर!

पदाच्या लालसेपोटी
बदलता नाव बापाचे,
अरे! मी थुंकतो तुमच्या
निरर्थक जिंदगानीवर

दिवस भरतील खोट्याचे
विजय होईल सत्त्याचा,
मला भक्कम असा
विश्वास आहे लोकशाहीवर!

**रमेश बुरबुरे**
घाटंजी, (यवतमाळ),
मो. ९७६७७०५१७०

# माणुस दूर पळतो....

विरहात वेदनेच्या,
हा जीव होरपळतो।
प्रेमभाव मनीचा या,
सांगा कुणास कळतो?।।१।।

शेतात नाही काही,
ओसाड रान सारे।
तरी पाय माझा,
तिकडेच का तो वळतो?।।२।।

गेली निघून जेव्हा,
सोडूनी हात माझा।
तेव्हापासून डोळा,
हा सारखाच गळतो।।३।।

देहात प्राण नाही,
उरलाच वाटे आता।
असंख्य आजारांचा,
मज भास रोज छळतो।।३।।

केले जवळ ज्यांना,
तेही ना सोबतीला।
संकटात माणसांच्या,
माणुस  दूर पळतो।।४।।

काळ आले कितीही,
वेळ आलीच नाही।
तेव्हाच माणसाचा,
मृत्यु येथेच टळतो।।५।।

व्हावे दिव्यापरी त्या,
जो जगी प्रकाश देतो।
त्याग भावनेने,
तोही मात्र जळतो।।६।।


**दिनेश मोहरील,** अकोला
मो. ८८८८०४५१९६)



# नवंक्षितीज

स्त्री तुझं जीवन
म्हणजे तारेवरची कसरत
दुःखही भोगलेस तू अविरत
चुल पेटवून मुल
सांभाळसं तू
घराच्या बाहेरी पाऊल
काही टाकलं नाहीस तू
तुच बनलीस सावित्री
अन् झलकारी राणी
डोळ्यात येते पाणी
तुझी ऐकुण कर्मकहानी
या युगात सुद्धा तुला
माणूस पेटवत आहे
पाहून हे दृश्य घराघरात
सावित्री रडत आहे
मला माहित आहे
तुलाही मन आहे
रूढी परंपरेचं
थोडंकाही बंधन आहे
पण, या बंधनातून तुला
आता मुक्त व्हायचं आहे
कारण, आताच तर तुला
एक नवक्षितीजं गाठायचं आहे

**- राजू लक्ष्मण चिमणकर**
अकोला, मो. ९०११०३००९३



# भ्रम

फूल माझ्या कुंतली का माळले नाही
स्वप्न माझे हे कुणी का भारले नाही

हारला तू कैकदा रे पैज माझ्याशी
एकदाही मी तुझ्याशी हारले नाही

दाविले नाही कुणाला घाव देवा मी
का तरी तू जीवनाला तारले नाही

आणले प्रेमात तू तोडून ताऱ्यांना
पाहिजे होते मला जे आणले नाही

मी कशी सोडून येऊ बालपण माझे
एवढेही मी कुणावर भाळले नाही

मांडली थट्टा कुणी माझ्या नशीबाची
मी मनाला तर कुठेही जाळले नाही

मारतो आहे मला का तू शिकाऱ्या रे,
मी घरी काहीच तर सांगीतले नाही

**- निर्मला सोनी**
चांदूर रेल्वे, जि.अमरावती
मो. ९७६५००१२६६

# ज्ञान

क्रांतीची मशाल
चला घेऊ हाती।
ज्ञानाच्या पेटवू
लक्ष लक्ष ज्योती।।


चला तेवत ठेवू
ज्ञानाचे दिवे।
अविरत गाठू
क्षितिज नवे।।

ज्ञानाचा सागर
प्राशन करू सारे।
विज्ञानाची कास
धरू चला रे।।

ज्ञान समृद्ध होऊन
गगन भरारी घेऊ।
परिवर्तनाची नांदी
सारे मिळून देऊ।।

**- वैशाली राजीव खंडारे**
वाशिम, ८८५५८६२७५२





# माणसाचा भाव राजा

अंत आहे जीवनाला ठाव राजा
मग कशाची माणसाला हाव राजा.

राग नाही कोणताही आत जर मग
का उगाची चेहऱ्यावर ताव राजा

भाव दिसते वरवरी ते नम्रतेचे
आत भारी मी पणाचा आव राजा.

ओळखावे काय त्याचे बारकावे
कोणता पोटात त्याच्या डाव राजा.

रोज होते कायदयाची पायमल्ली
मी तरी का न्याय मग मागाव राजा.

मोह पैशाचा नसे सत्तेस जेव्हा
बघ तुझ्या अंतर्गुणाला वाव राजा.

एकमेका हात द्यावा सभ्यतेने
हा असावा माणसाचा भाव राजा

**-विशाल कन्हेरकर**
मु.पो.निंभा.ता.भातकुली.
जि.अमरावती
मो.९१७२२९८८३९.

# जरा समजून घ्या राजकारण

देश पेटला, माणूस पेटला
पेटलं सारं राजकारण
कोण लावते आग गड्या
अन् पाय, कोण पेटवते सरण




अरे भोंगे वाजले, पोंगे वाजले
हनुमान चालीसानं रान गाजले
मंदिर, मज्जीद, कुराण, पुराण
धर्मा-धर्मात स्तोम माजले
आता फक्त कोसावर येऊन ठेपलं मरण
कोण लावते आग गड्या
अन् पाय, कोण पेटवते सरण

आज विदयार्थ्यांलाच ताट मानेने जगायची लाज वाटते
वांझ डिगऱ्या शोभेचा एक साज वाटते
बेरोजगार म्हणून त्याच्यावर वरचेवर वार होतात
एक एक शब्द काळजात आरपार जातात
शिक्षण घेऊन बेरोजगाराचे वाढले म्हणे कुरण
कोण लावते आग गड्या
अन् पाय, कोण पेटवते सरण

अन्याय, अत्याचार, खून, बलात्कार
अरे कोणकोणत्या मुद्यायावर बोट ठेऊ
एक एक घोटाळा बाहेर काढून
कुणाकुणाच्या नरड्याचा घोट घेऊ
आता तर भरचौकातचं केले जाते वस्त्रहरण
कोण लावते आग गड्या
अन् पाय, कोण पेटवते सरण

अरे आंदोलन करू करू तिकडे शेतकरी मरतो
शेतमालच्या भावासाठी रात्रंदिवस झुरतो
दुष्काळाच्या नावानं तुम्ही शेतकऱ्याचाच पैसा खाता
वरतून स्टेजवर तुमच्या मोठमोठ्या बाता
कधी समजेल हरामखोरानो तुकारामाची ती गाथा
आज तुमच्याचं मुळे शेतकऱ्यांना राहावे लागते तारण
कोण लागते आग गड्या
अन् पाय कोण पेटवते सरण

राम रहिमच्या नावानं तुम्ही धर्म पेटवला
माणूस माणूस अलग करून पूर्वीपासून बाटवला
गरीबाच्या सरनावर तुम्ही शेकत गेले हात
समोर करून त्याला त्याचाच केला घात
आता फक्त देशात चाल्लं रंगाचच राजकारण
त्यात कोण लावते आग गड्या
अन् पाय कोण पेटवते सरण

**- विशाल मोहोड**
तळवेल, अमरावती
९०११५७८७७१

# गझल...

डबक्यात साचलेला
आतील मळ बघूया...
ये एकदा मनाचा,
खोदून तळ बघूया...

होऊच दे लढाई,
ही आरपार आता...
ते काढतील कोठे?
कोठून पळ बघूया...

आयुष्य जगत आलो,
सारे असेच हिरवे...
मी लागलो ढळाया,
ही पानगळ बघूया ...

जन्मात मी कुणाला,
लागेल ना गळाला...
टाकून कोण आहे,
पाण्यात गळ बघूया...

भेटो तिथेच शांती,
अंतीम जीवनाला
थांबेल का मनाची
मग वावटळ बघूया

जन्मात मी कुणाला,
लागेल ना गळाला...
टाकून कोण आहे,
पाण्यात गळ बघूया..

**- मंगेश गजभिये**
८३१७२ ८९४२३

# मिळत नाही

कितीही धन असू द्या
हो तरीही पत मिळत नाही
वशील्याने तिकिट मिळते
परंतु मत मिळत नाही

कुणाला चालण्या सुंदर
दिलेली वाट असते पण
नशीबाने मनाजोगी
तशी संगत मिळत नाही

उराच्या आत दुःखाला
जपावे लागते वेड्या
सुखाची त्याविना कोणा
कधी बरकत मिळत नाही

धनीकांचे चढत जाती
इथे इमल्यावरी इमले
गरीबाला परी डोई
जरासे छत मिळत नाही

मिळे या जीवनाकडुनि
लढाया युद्ध अन् शस्त्रे
स्वतःला वाचवाया
पण उरी चिलखत मिळत नाही

उराच्या आत ईश्वर अन्
असावा लागतो अल्ला
रूबाई आणि भजनांनी
कुणा जन्नत मिळत नाही

**-हेमलता शरद पाटील**
९, सोहंम्, डोंगरगाव रोड,
तुलसी नगर, शहादा, जि.
नंदूरबार, ८६६९१ १५८८२



# दान

काय झाले सांग माझ्या प्रेमवेड्या पाखराला?
वेढले रे काळजीने आज माझ्या काळजाला.

काल अपुली भेट झाली दुःख मज सोडून गेले,
ढग गुलाबी भावनांचे चिंब मज भिजवून गेले;
का अचानक दंश केले क्रूर विरहाने मनाला?

वादळाला शांत करणारं तुझं ते बोलणं गं,
जीवनाला तृप्त करणारं तुझं ते हासणं गं;
रंगवू आता कसा मी गोड स्वप्नं या क्षणाला?

एक पक्षी ओळखीचा आजही खिडकीत आला,
एकही दाणा न खाता आसमंती तो उडाला;
आज श्वासांचा थवाही जीवघेणा धूर झाला.

घाव झाले हे गुलाबी बघ मलाही अन् तुलाही,
दान विरहाचे मिळाले बघ तुलाही अन् मलाही;
जीवघेण्या आठवांचा वादळी पाऊस आला.

**-मिलिंद देविदास हिवराळे**
सादिक नगर, मु.पो.ता. बार्शिटाकळी,
जि. अकोला - ४४४४०१ (म. रा.)
मो. ७५०७०९४८८२

# खोके आणि डोक्यांच्या झुंजी लावल्याने विकासाऐवजी अधोगतीच..!

**बो**ले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले असे आमच्या महाराष्ट्राच्या संस्कृतीतील संतवचन आहे. परंतू अशी वंदनीय पाऊले आज दुर्मिळ होत चालली, हे मानवी जीवन मुल्यांच्या नैतिक शास्त्राला बसणारे चिंतनीय हादरे आहेत. मानवी समाजाचे जीवन समृध्द करण्यासाठी निरोगी समाजव्यवस्थेला सामाजिक राजकीय क्षेत्रातील कर्मयोगाची संजीवनी सलभ रितीने प्राप्त होत राहणे क्रमप्राप्त असते. मानवी शरीरातील रक्ताभिसरण यंत्रणेप्रमाणेच तिचेही चलन-वलन सुव्यवस्थित राहण्यासाठी आणि या सर्व व्यवस्थेला नियंत्रित ठेवण्यासाठी संविधानासोबतच भारतीय संस्कृतीतून वर्षानुवर्षापासून सिध्द होत गेलेले नीतिशास्त्राचे अधिष्ठातनही तेवढेच महत्वाचे आहे. त्याचा अंगीकार करून वाणी आणि कृतीव्दारे सुनिश्चित पध्दतीने कर्म वाटचाल करण्यासोबतच वाणीचाही धनी जो ठरतो....त्याला वंदनीय...बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले म्हटलेले आहे.अशी व्यक्तिमत्वे आज देशातील कोणत्याही क्षेत्रात दिसत नाहीत. दिसली तर ती फक्त अपवादात्मकच.....! ही एक शोकांतिका आहे...!

आजच्या बदललेल्या परिस्थितीत हे आदर्शवादी संकेत चपखलपणे लागू होत नसले तरी दगडापेक्षा विट मऊ या न्यायाने राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील जबाबदार सामाजिक व राजकीय नेते आणि प्रशासनातील लोकसेवकांनी समाजस्वास्थ्य संकटात येईल असे करू नये. हिन मनोवृत्तीची परिसिमा गाठून नीतिशास्त्राची अवहेलना होऊ नये, असे समाजालाही वाटत असते.ज्या समाजाने आपल्यावर विश्वास व्यक्त केला. त्या भावनांचा घात होईल अशी पशुतुल्य वाटचाल म्हणजे ती मानवतेच्या मंदिराला क्षतिग्रस्त करणारी अमानविय अधर्मी अपप्रवृत्ती ठरते.

आमचे पंतप्रधान नरेन्द्र मोदीजींनी त्यांच्या गांधीनगरातच मार्गदर्शन करतांना एक महत्वपूर्ण आवाहन केले आहे.ते म्हणतात निवडणूक केंद्रीत विचारांनी शहरांचे भले होणार नाही. म्हणून लोकप्रतिनिधींनी फक्त मर्यादित विचारांनी कार्यरत राहू नये. परंतु आधी केले मग सांगीतले असे जर घडत गेले तर निश्चितच अशा आवाहनातील शब्दांचा प्रभाव खालच्या पातळीवरील नेत्यांवर होईल. मग जिल्हा, राज्य आणि देशाला विधायक मार्गाने विकासाच्या दिशेने जाण्यासाठी प्रबळ गती प्राप्त होऊ शकेल. परंतु स्वतः मोदी आणि शहा ही जोडी आणि त्यांचे सरकारातील प्रतिनिधी कसे वागत आहेत हे दृश्य स्वरूपात आहे. त्यांच्या अराजक वटवृक्षांच्या राज्यात राज्यातील फांद्या विरोधी पक्षांचे गळे कापून स्वतःचं चांगभलं कसं करून घेत आहेत, याबाबत अंतरात्म्याला साक्षी ठेऊन जर विचार केला तर त्यांचं अंतर्मन अशी चमत्कारीक आवाहने करण्याचं धाडस त्यांना कदापिही करू देणार नाही. जनतेचे जीवनमान क्लेशदायक करून देशातील लाभाची पंचपक्वान्ने भांडवलदारांच्या घशात घातली जात आहेत. त्यासाठी कारवायांच्या शस्त्रांनी विरोधकांना संपवित निरंकुश साम्राज्याचे अनभिषिक्त राजे होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या सत्ताधाऱ्यांची वाटचाल किती योग्य आणि कशी अयोग्य हे देशातील जनता बिचारी नुसती पाहत आहे. काही काळ सहन करण्यावाचून पर्याय नाही. म्हणून या विनाशी वाटचालीला शुभेच्छा नव्हे, तर गच्छंती करण्यासाठी पाण्यात देव घालून आक्रोशात दिवस घालवित आहेत.

याबाबत आता न्यायालये सुध्दा संधी मिळेल तिथे बोलण्याची तयारी करीत आहेत. परंतु दडपगीरीच्या शिकारी होणारांचे प्रमाण वाढत असून ही गोष्ट लोकशाही संपवून

समाज आणि देशाच्या अधोगतीला निमंत्रण देणारी ठरत आहे. त्यामुळेच पूर्वी धमक्या ह्या फक्त गँगस्टरांकडूनच यायच्या. परंतु आता ईडी- सीबीआयचा वापर होतो आहे. असा इशारा मुंबई सत्र न्यायालयाने या यंत्रणांच्या गैरवापराविरोधात दाखल झालेल्या प्रकरणात दिला आहे. म्हणजे हे या परिस्थितीवर न्यायालयाकडूनही होत असलेले एकप्रकारचे शिक्कामोर्तबच आहे. याचे मुख्य सुत्रसंचालक कोण आहेत हे सुध्दा देशातील जनतेपासून आता लपून राहिलेलं नाही.

माणसा माणसा कधी होशील रे माणूस तू? हा प्रश्न विचारता विचारताच न्यायालयांच्या तारीख पे तारीख प्रमाणेच अनेक दिवस आणि वर्षांमागून वर्ष जात आहेत. परंतु कर्म, विचार आणि भावनांचा दर्जा घसरून, कर्तव्य विसरून वाट चुकलेली माणसे योग्य ध्येय पथावर येण्याचे क्षण दिसत नाहीत. येणाऱ्या बसगाडीची वाट पाहण्याप्रमाणेच सुखाच्या दिवसांच्या प्रतिक्षेतच दररोजचा सूर्य उगवतो आणि कधी मावळतो हे कळत नाही. समाज आणि समाजातील माणसांच्या जीवनमानाचा स्तर उंचावून देशाला प्रगतीची दिशा मिळण्यासाठी लोकांनी लोकशाहीत निवडलेली राजकीय व्यवस्था हा प्रगतीचा मुख्य आधार असतो. परंतु सामाजिक कर्तव्याशी प्रतारणा करून आत्मकेन्द्रीपणा, वैयक्तिक स्वार्थ आणि अघोरी महत्वाकांक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या. त्यामुळे जनहिताची पर्वा न करता स्वतःची सत्ता आणि आर्थिक वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी समाजाला वेदनामय जीवनाचे उपहार दिले जात आहेत. धर्म, जात, पातीच्या संघर्षात आपसात झुंजी लावून त्या गदारोळात सरकारे पाडणे आणि नीतिमुल्ल्ये, कायद्यांची मोडतोड करून असंविधानिक पध्दतीने, दंडेलीने सत्तेचे नवे नवे गड काबिज केले जात आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाने कोंबड्यांच्या झुंजींना खेळ म्हणून अधिकृत मान्यता देण्यासाठीची याचिका फेटाळली. परंतु महाराष्ट्र आणि देशात राज्याराज्यातील राजकीय नेत्यांमध्ये प्राणपणाने लावल्या जाणाऱ्या झुंजी मात्र सामान्य जनतेचे बळी जाईपर्यंत एखाद्या अघोरी खेळाप्रमाणे खेळल्या जात आहेत. आजकाल देशातले काही निर्लज्ज राजकारणी सकाळी काय, दुपारी काय आणि सायंकाळी आणखी काय बोलणार याबाबत कोणतीही विश्वसनियता राहिलेली नाही. त्यामुळे त्यांची वचने आणि आवाहने ही वारंवार येणाऱ्या कोल्ह्याच्या त्या आगमनासारखीच लोकांना वाटतात. लोकांच्या डोळ्यात धुळ फेकण्यासाठी सोयीप्रमाणे कधी धर्माचे उन्माद, कधी संतवचनांचे पोवाडे गाईले जात आहेत. कधी शांतीदुत महात्मा गांधींचे तर महाराष्ट्रात आल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्या जाते. परंतु त्यांच्या विचार, कृती आणि समाजधर्माच्या तत्वांशी केल्या जाणाऱ्या प्रतारणेचे जराही वैषम्य वाटत नाही. मर्यादापुरूषोत्तम श्रीरामांच्या नावाचा सत्तेसाठी जयघोष ही तर पितामह अडवाणींनी भाजपला मिळवून दिलेली फार मौलिक उपलब्धीची लॉटरी ठरलेली आहे. त्या मर्यादापुरूषोत्तमांचाही सोयीप्रमाणे वापर करण्यात राजनिष्ठा, शिष्टाचार, प्रजाकर्तव्यांच्या सर्व मर्यादा पार झालेल्या आहेत. अशा या घसरलेल्या पातळीवरील क्षुद्र मनोवृत्तीच्या राज्यकर्त्यांचा या देशातील जनतेला आता चांगलाच परिचय झालेला आहे.

खोके आणि समाजविनाशी बेअक्कल डोके कामाला लावत देशातील एक एका राज्यात अतिक्रमण करीत लोकशाही मुल्ये आणि संविधानाला हादरे देत सत्ता बळकावत राहणे, सामान्य जनतेचे जीवन कष्टमय करून भांडवलदारांना गब्बर बनवित त्या आर्थिक कवचकुंडलांनी पक्षिय ताकद वाढवित राहणे, एवढे एकच लक्ष घेऊन देशातील भाजपच्या सत्ताधाऱ्यांची हुकूमशाही निर्मितीच्या दिशेने सुरू असलेली विनाशी वाटचाल आहे. ती अनैतिक मनोवृत्तीची तारक आणि नैतिक बळावर चालणाऱ्या मानवी समाजस्वास्थ्याला प्रचंड प्रमाणात मारक ठरत आहे. याचा विचार आता जनतेने गांभिऱ्यानेच केला पाहिजे. फक्त खोके आणि डोक्यांच्या झुंजी लावत सत्तेचे खेळ खेळत राहिल्याने लोकशाही संपून विकासाऐवजी अधोगतीच ठरलेली आहे. आपल्या जीवनमानाचा खेळखंडोबा करणारांना वठणीवर आणायचे असेल तर विधायक संघटनशक्तीच्या निर्णायक शक्तीचा आविष्कार आता देशात घडला पाहिजे...!

**- संजय देशमुख**
संपादक, विश्वप्रभात, अकोला
मो. :८७८८६ ०२६३३



# म्हातारपण

शरीर खंगत चाललयं आता
काहीच खर नाय
म्हातारपण आल आता
काहीच सुचत नाय
डोयाच्या गारगोट्या
होत चालल्या आता
चष्म्यातून पाहणे
जमत नाही आता
खोकल्याची उबक
सूचू देत नाही
घडी घडी येत राहते
बसू देत नाही
पोट टेकलं पाठीले
चक्कर येत रायते
खायावर विच्छा नाही
भूक तशीच रायते
हिडीस मिडीस करतात सारे
इट आला मले
घरातच राहावसं
वाटत नाही मले
मुंगी वाणी चाल माही
मले आता भारी
रस्त्याने चालतांना
काठी हातात धरी
आता काही बरं नाही
मरण जवळ करा
देवा मले लवकर उचला
पोटशीधरा

**- रामकृष्ण आसरे**
मुर्तिजापूर, ९७६३२ २२५८७



# तुम्हीच सांगा पोरांनो

लहानपणी कधी कौतुकाने
तर कधी जबरदस्तीने
हात धरून शाळेपर्यंत
पोहचवणारा बाप
आता शाळेकडे फिरकत नाही
घाबरतो शाळेकडे जायला
शिकविले त्याने क, ख, ग, घ
जगाच्या व्यवहारापुरते
त्याच त्यानं बघावं आता
असं वाटतं त्याला,
स्वतःच्या हिम्मतीवर,
स्वतःच्या बळावर
तुमच्या फीचे मोठ, मोठे डोंगर
नाही पार करता येत त्याला
कुठलं ऊसन अवसान आणावं त्यानं,
कुठवर जीव मुठीत धरून,
कुठलं बळ पायात आणून
उभं राहावं त्यानं
तुम्हीच सांगा पोरांनों
त्यातही पंख फुटल्यावर
दूर उठून जाऊन तुम्ही
त्याचं घरटच मोडून टाकता
कसं जगावं त्यानं
तुम्हीच सांगा पोरांनों

**-डॉ.लता थोरात**
रामनगर, अकोला
मो. : ९५१८५६५९०२

# समांतर

लोकशाहीचे खरे वाहक तुम्ही आम्ही
कागदावर राहिलो मालक तुम्ही आम्ही

खाजगीकरणामुळे जाणीव होते ही
वाटतो सरकारला ग्राहक तुम्ही आम्ही

सर्वजण लिहतात येथे कागदावरती
काळजावरचे बनू लेखक तुम्ही आम्ही

या व्यवस्थेशी झगडणे संपले नाही
या व्यवस्थेतील आंदोलक तुम्ही आम्ही

वाजवू टाळ्या, पुढेही वाजवत राहू
शेवटी आहोत ना प्रेक्षक तुम्ही आम्ही

वाद करणारे हळू होतात बाजूला
राहतो फोडायला मस्तक तुम्ही आम्ही

स्वप्न अन् वास्तव समांतर एकमेकांना...
त्यात फिरणारे जणू दोलक तुम्ही आम्ही


**- निलेश कवडे**
अकोला




**देशाला मजबूत विरोधी पक्षाची खूप गरज आहे. जर विरोधी पक्ष नसतील, तर आपण प्रश्न कुणाला विचारणार?**


शुभदीपावली
आप सभी शुभचिंतक एवं ग्राहक बंधु को
दिपावली
की हार्दिक शुभकामनाऐं...
शुभेच्छुक
हरीशभाई आलिमचंदानी
भाजपा पार्षद प्रभाग क्र.12 ब महानगर पालिका, अकोला
सचिव एंव विदर्भ विभाग प्रमुख भाजपा महाराष्ट्र प्रदेश व्यापारी आघाडी
स्वराज
SINCE 1974
अकोला जिल्ह्याचे अधिकृत विक्रेता
श्री साई ट्रॅक्टर्स
डेल्टा टी.व्हि.एस. शोरुमच्या बाजुला, शंकर हॉस्पीटल जवळ, नेहरु पार्क चौक, मुर्तिजापुर रोड,
अकोला, मोबा. 7447427061, 0724 - 2420696
Luxurious A/C Room
Exclusive Bar Room
Multicusine DLX. Family Restaurant
15000 Sq. Feet. Lawn for Marriage & Parties
3000 Sq. Feet. A/C Party Hall
All Arrangements Under One Roof For Party & Functions
HOTEL GREENLAND COTTAGES
VIDYA NAGAR, AKOLA, Cell : 98231 90101,
98231 75999, www.greenlandcottages.com
HOTEL GREENLAND COTTAGES
Comfort Rooms
Vidya Ratan Complex,
Sindhi Camp, Main Road, AKOLA
Mob. : 74474 47340, 98231 90101,
98231 7599
टिव्हीएस के विश्वस्तरीय 2 व्हीलर गाडीयो की श्रेष्ठ श्रृंखला
Jupiter
Sport
अधिकृत मेन डीलर
TVS
DELTA TVS
AKOLA - Nehru Park Square,
Murtizapur Road, AKOLA
Ph : 0724 - 2437018, 2436261
Cell : 9850355275
KHAMGAON - Beside Zhun Zhunwala
Petrol Pump, Front of BSNL Quarters,
Nandura Road, KHAMGAON
Cell : 74474 37400
Mobile Magic
Shop No. 38, Kawach Arcade
Opp Muncipal Corporation, M. G. Road
AKOLA, Tel. : 0724-2435111, Mob. : 9225702301
E-mail - mobilemagic.akola@gmail.com
Shop No. 5, Shri Darryav Heights, Gandhi Chowk, AKOLA 444 001
Tel. : 0724-2435222, Mob. : 9225702301
E-mail - mobilemagic.akola@gmail.com
SHREE SAI DISTRIBUTION HUB (I) Pvt. Ltd.
SAMSUNG MOBILES RDS (AKOLA DIST.)
Beside Delta TVS Showroom, Near Sankar Hospital, Nehru Park Square, Murtizapur Road, AKOLA 444 001
Ph : 0724 - 2403090, Mob. : 92846 61770, Email : akola.ssd@gmail.com

# अनाथाश्रम की वृद्धाश्रम



पेढ्यांचा बॉक्स उघडत रोहन घरात शिरला अन् आजीला म्हणाला, ‘आजी हात पुढे कर बघू’

‘का रे काय झालं?‘

‘अगं तू आधी हात तर पुढे कर मग सांगतो’.

तिचा थरथरता पण कामाने राकट झालेला हात बघून रोहनला खूप भरून आलं. काय नाही केलं या हातानं आपल्यासाठी, किती कष्ट सोसलेत. आजी असून माय झाली, हिने आपल्याला वाढवलं नसत तर आपली ओळख केवळ एक अनाथ म्हणूनच झाली असती आई- बाप असूनही अनाथासारखा वाढला असतो मी कुणास ठाऊक जीवंत ही असतो की नाही.

‘हात बघतं बसणार आहेस होय, सांग की काय झालं?’ तिच्या हातावर पेढा ठेवत रोहन बोलला,‘नोकरी मिळालीय’

‘काय?’

‘हो’

क्षणभर आजीला आकाश ठेंगण झाल्यासारखं वाटलं, तिच्या त्या थकलेल्या सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर समाधान झळकल. त्याच्या संगोपनात नंदादीपसारखे अखंड जळणारे तिचे डोळे भरून आले .सगळं हसत सोसणाऱ्या तिच्या डोळ्यातून अश्रू झरायला लागले, पण आज ते अश्रू दुःखाचे नव्हते तर आनंदाचे होते का कुणास ठाऊक पण आज आजीचे अश्रू पाहून त्याला समाधान वाटत होतं कारण या पूर्वी कित्येक रात्री, कित्येक दिवस त्याने आपल्या आजीला दुःखाने रडताना बघितलं होतं.

अवघ्या पाच वर्षांचा होता रोहन जेव्हा त्याचा बाप दारूच्या आहारी गेला. दारू पिला की त्याला कशाचाच भान नसायचं. किती वेळ त्याने रोहनला बदडून काढलं होत. त्यात एका बाईची ही भर पडली. म्हणतात न बाई आणि बाटली आयुष्यच वाटोळं करते अगदी तसंच झालं. पाच वर्षांचा रोहन अन् आपल्या सात महिन्याच्या गर्भार बायकोला सोडून त्याने दुसरा संसार थाटला. आता घरात फक्त त्याची गर्भार आई, तो आणि त्याची आजी असे तिघेच उरले. त्याची आजी अंगणवाडीत कामाला जायची त्यामुळे पोटाचा प्रश्न तात्पुरता सुटत होता.

कसे बसे दिवस जात होते. दोन महिन्यानंतर चौथी पाहुनी घरात आली. रोहनला एक छोटी बहीण आली तिच्या हसण्या रडण्यात वेळ जाऊ लागला. दीड महिना झाला असेल एक दिवस मालती ने म्हणजे रोहनच्या आईने छोट्या ‘सुमी’ला पाळण्यात टाकलं अन् सासूला म्हणाली, ‘सुमिकडे बघालं जरा, मी आईकडे चाललीय त्यांचा निरोप आलाय, येईल लवकर परत’

‘अगं पण रोहनच समजू शकते मी तो थोडा मोठा आहे, पण सुमी अवघ्या दीड महिन्यांचीच आहे आईविना पोर रडली तर मी कशी सांभाळणार?‘

'राहील ती पण, त्याच्यासारखी.' म्हातारीच्या बोलण्यावर तिने तेवढ्याच निर्विकारपणे उत्तर दिलं आणि तरातरा निघून गेली. म्हातारी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे नुसती बघत राहिली.

दोन दिवस झाले तरी मालतीचा पत्ता नव्हता, सुमीचं रडणं पाहून म्हातारीचा जीव कासावीस होतं होता. शेवटी तिने दोनी लेकरांना घेऊन सुनेच माहेर गाठलं.

'अगं लवकर येते सांगून दोन दिवस झाले तरी तुझा पत्ता नाही, सुमीने रडून रडून नुसता घोर लावलाय बघ जीवाला, चल बघू घरी.'

'मी नाही येणार घरी परतं,कधीच नाही मी इथेच राहणार कायमची.'

'काय बोलतेयस तू?'

'बरोबर तेच बोलतेय'

'अगं पण पोरांचं काय?'

'रोहनचं सोड पण सुमीच काय? दुधखुळी आहे ग ती असं तिच बालपण नको हिरावून घेऊ'

'आईविना पोर कशी राहणार ती.'

'ते मला माहित नाही ते तुमच्या पोराला जाऊन विचारा, मला असं गर्भार सोडून जातांना त्याला काहीच वाटलं नाही तर मग मी का विचार करू यांचा तुमी बघा काय करायचं त्यांचं.'

'एखाद्या मंदिरासमोर नेऊन सोडा नाही तर नेऊन टाका एखाद्या अनाथ आश्रमात.'

'असं बोलतांना तुला काहीच कसं वाटतं नाही ग, काळीज आहे की नाही तुला? जीव कसा तुटत नाही ग तुझा या दुधापित्या लेकराला सोडून जातांना.'

'तुमचा एवढा जीव झुरतोय तर सांभाळा ना मग तुम्हीच, नाहीतर द्या रस्त्यावर सोडून.'

'तुझ्या जिभेला काही हाड आहे की नाही, तुझा पान्हा आटला असलं पण त्यांची आजी अजून जिवंत आहे माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी त्यांना पोरक होऊ देणार नाही.'

म्हातारीला कळून चुकलं हिच्या नादी लागून काही फायदा नाही. इथे एक क्षण ही थांबाव असं तिला वाटलं नाही. तिने रोहनचा हात धरला अन् जवळजवळ खेचतंच त्याला रस्त्यावर घेऊन आली. छोट्या सुमीला छातीशी कवटाळून तिने बसस्टँडचा रस्ता धरला.

हळूहळू अंधार पसरायला लागला होता. तीच मन मात्र विचार करत होत... बाहेरचा अंधार तर काही वेळात दूर होईल पण या चिमूकल्यांच्या आयुष्यात जो अंधार पसरलाय त्याच काय? त्यांच्या आयुष्यातला अंधार दूर करायला आता आपल्यालाच सूर्य व्हावं लागणार. नातवंडांसाठी तिचा जीव झुरत होता त्यांना रस्त्यावर सोडणं तर दूर अनाथ आश्रमात सोडण्याची कल्पनाही तिला करवत नव्हती. रोहनला काही समजण्या पलीकडे होतं, त्याचं समजून घेण्याचं वयही नव्हतं त्याच्या भाबड्या मनात खूप प्रश्न उठले होते. शेवटी न राहवून एक प्रश्न त्याने आजीला विचारलाच.

'आजी अनाथ आश्रम म्हणजे काय गं?' त्याचा तो भाबडा प्रश्न ऐकूण आजीच्या डोळ्यात टचकन पाणी तरळलं, काय उत्तर देणार होती ती त्याला?

'काही नाही रे बाळ, मी जिवंत असेपर्यन्त तुला त्या शब्दाचा अर्थ समजून घ्यायची गरज नाही' पण तिच्या त्या उत्तराने रोहनच समाधान झालं नाही, कधी तरी त्या शब्दाचा अर्थ समजून घ्यायचा एवढंच त्याने मनाशी ठरवून टाकलं.

ती घरी पोहचली तेव्हा रात्र झाली होती आता ते तिघेच असणार होते एकमेकांसाठी....

अख्खी रात्र म्हातारीने उद्याच्या विचारात जागून काढली. काय करणार होती ती? कुठे ठेवणार होती हा चिमुकला जीव ती अंगणवाडीतुन येईपर्यंत?

सकाळी तिने रोहनला तयारी करून शाळेत पाठवलं, पटापट स्वयंपाक अन् घरातील कामे आटोपली, सुमीची आंघोळ घातली तिला दूध पाजून पाळण्यात घातली तिच्यासाठी दुधाची बाटली भरून ठेवली, शाळा संपल्यावर रोहन घरी आला त्याच ताट तिने वाढून ठेवलं अन् त्याला ती जुजबी सूचना देऊ लागली.

'जेवून घे, मी अंगणवाडीत जातेय सुमी झोपलीय ती रडली तर तिला दूध दे, बाटली भरून ठेवलीय जास्तच रडली तर शेजारच्या काकीला आवाज दे, लक्ष ठेव तिच्यावर.'

'करशील न बाळ एवढं'

'हो'

अन् ती निघून गेली. पण तिचं लक्ष कशातच लागत नव्हते त्या दोन चिमुकल्या जीवात तिचं मन गुंतल होत,कधी एकदाच घरी जातेय अस तिला झालं होतं. तिने दिलेल्या सूचनांच रोहनने पूर्ण पालन केले होत. हळूहळू त्यांना आता या गोष्टींची सवय व्हायला लागली होती.

कधी कधी रोहनला आईची खूप आठवण यायची, तो आजीला सांगायचा तर आजीचे डोळे भरून यायचे मग ती त्याला रात्रभर कुशीत घेऊन झोपायची. तिच्याजवळ आईचा पान्हा नव्हता पण आईपेक्षाही प्रेमळ काळीज होत.

वाढत्या वयाबरोबर रोहनला तिच्या कष्टांची जाणीव होत होती. रोहनही आता तिला कामात मदत करू लागला, छोटी छोटी कामे करू लागला. वाढत्या वयाबरोबर त्यांच्या गरजा ही वाढत होत्या त्यामुळे म्हातारी आता मिळेल ते काम करत होती पण त्यांना कोण्याचं गोष्टीची उणीव तिने कधी भासू दिली नाही.

वर्षामागून वर्ष सरले सुमीही आता सासरी निघून गेली पण म्हातारी आता थकून गेली होती, तिच्या शरीरात त्राण उरला नव्हता. तिची स्वतःची कामही तिला आता जमत नव्हती पण आपल्या म्हाताऱ्या आजीला रोहन एखाद्या लहान बाळासारखं जपत होता. तिच औषध, जेवण सगळं वेळेवर करायचा तो. त्याची सेवा पाहून म्हातारीचा उर भरून यायचा.

त्याच वागणं पाहून लोक त्याला चिडवायचे, 'किती दिवस



दिपावलीनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!



डॉ.डि.एम.भांडे

माजी कॅबिनेट मंत्री,

महाराष्ट्र राज्य

असे पोरीसारखे काम करणार आहेस, किती दिवस वागवणार आहेस थेरडीला, तिचा मुलगा तर सोडून गेला तू कशाला मागे लावून घेतोस, नेऊन सोड की एखाद्या वृध्दाश्रमात.' त्यांच्या बोलण्यावर तो नुसती हसायचा कारण अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमाचा अर्थ आता त्याला चांगलाच कळत होता.

आपल्या आजीने जीव लावून आपल्याला लहानच मोठं केलं होतं याची जाणीव त्याला होती तिने जर आपल्याला आईच्या म्हणण्यानुसार रस्त्यावर नाही तर अनाथाश्रमात सोडलं असतं तर? आज आपण कुठे असतो याची त्याला कल्पना करवत नव्हती. मग आज तो आजीला वृद्धाश्रमाचा रस्ता कसा दाखवणार होता. आता कुठं तिचे कष्टाचे दिवस संपले होते.

खरं तर अनाथआश्रम आणि वृद्धाश्रम खूप छोटे शब्द आहेत पण विचार केला तर त्याचा अर्थ मनाला घायाळ करणारा आहे. हे तुम्हाला जाणून घ्यायचं असेल तर सहज कधीतरी एखाद्या अनाथाश्रमात किंवा वृद्धाश्रमात जा तेव्हा तुम्हाला जाणीव होईल त्यांच्या दुःखाची. त्या लहान - लहान मुलांच्या डोळ्यात दिसेल तुम्हाला आईवडीलांची आस. त्यांची तळमळ त्यांना भेटल्याशिवाय कळणार नाही. त्या निराधार आजी - आजोबांच्या डोळ्यात दिसेल त्यांचं मुलांबद्दलच नातवंडंबद्दलच प्रेम, तेही नाही जमलं तर प्रामाणिकपणे कधी एकांतात एक क्षण डोळे मीटा आणि कल्पना करा आपण निराधार, अनाथ असल्याची. डोळ्यात पाणी येईल हो न? कारण अनाथ असल्याची कोणी कल्पनाच करू शकत नाही तर जे भोगतायत त्यांचं काय? काय दोष असतो त्यांचा? कधी विचार केलाय?

**- सौ. अर्पिता आशिष शिंदे**

अंजनगांव (सुर्जी), जि. अमरावती

# साहित्यातील साहित्य बाह्यता

**विनय मिरासे 'अशांत'**
मो. : ९४२०३६८२७२

**सा**हित्यिक हे समाजाचे घटक असल्यामुळे समाजाचे गुण - अवगुण त्यांच्या लेखनात उतरणारच, अशी भलावण केली जाते. ती चुकीची वा अनाठाई आहे, असं मला म्हणायचं नाही. पण माझा प्रश्न आहे तो असा की, साहित्यिक समाजासाठी की समाज साहित्यिकांसाठी? समाजाचं वास्तव, विकृत व विसंगत रूप दाखवणं हा साहित्यिकांचा गुन्हा नाही, पण विकृती सोबतच संस्कृती म्हणजे सत्कृती दाखविण्याचंही काम साहित्यिकांनी करावं असं मला वाटतं. समाजाने न अनुभवलेला, न पाहिलेला अज्ञात हिस्सा कुण्या एखाद्या साहित्यिकाने आपल्या कथा, कविता, कादंबऱ्या, नाटक व गझलांतून दाखविला असेल तर ते निश्चितच कौतुकास्पद! पण समाज असा असावा हेही साहित्यिकाला दाखविता यायला हवं! समाज पुरुष बहकला असेल, तो चुकीच्या मार्गावर चालला असेल तर त्याला योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारी आपली नाही का? त्यामुळे केशवसुतांचा नवा 'शिपाई' आपण व्हावं, अशी अपेक्षा करणं गैर होणार नाही. केशवसुतांचा 'नवा शिपाई' म्हणतो, 'कोण मला वठणीवर आणू शकतो तो मी पाहे'. साहित्यिकांनी सुद्धा आपले हेच ब्रीद बाळगावे. समाजाने साहित्यिकांना नव्हे तर साहित्यिकांनी समाजाला वठणीवर आणावे. कारण साहित्यिक, कलावंत, विचारवंत हे मानवी समाजाचे सांस्कृतिक रक्षक असतात. शास्त्रज्ञ समाजाला भौतिक सुखे व समाधान देतात. तर साहित्यिक, कलावंत व विचारवंत हे समाजाला आत्मिक व आंतरिक सुख, समाधान व दिशा देतात. त्यामुळे साहित्यिकांनी आपले लेखन हे दिशादर्शक असेल याची दक्षता घ्यायला हवी. गझलकार संदीप वाकोडे, नितीन देशमुख, मसूद पटेल, किरण मडावी, सतीष मालपे, रमेश बुरबुरे व अन्य काही गझलकारांच्या गझला याचा भक्कम पुरावा आहे. मनाला उभारी देणारं व जीवनाला सावरणारं साहित्य हेच खरं साहित्य असतं. त्यासाठी साहित्यिकाला समाजाच्या चार पावलं पुढं चालावं लागतं. ते तसं चालणं हेच त्यांच्यातल्या श्रेष्ठ साहित्यिकांचं लक्षण असतं. 'जोडीदारीण' या शीर्षकाची माझी एक कथा आहे. लग्नाच्या बाजारात स्त्रीची होणारी विटंबना व तिचं अवमूल्यन मी त्या कथेत दाखविलं आहे. ते वास्तव आहे. पण माझ्या त्या कथेची नायिका आपल्याला पाहायला आलेल्या पोरांना प्रश्न विचारते, त्यांची झडती घेते आणि स्त्रिलाही तिच्यासाठी योग्य जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे, हे सिद्ध करते. अनेक मुलं आणि समाज तिला शिष्ट, अगाऊ आणि अति शहाणी म्हणून हिणवतात. पण एक शिक्षित तरूण तिला आपली योग्य जोडीदारीण म्हणून निवडतो. यात मी समाज, म्हणजे तरुण कसा असावा असं नाही का दाखविलं? पण म्हणजे समाजाला थोडीफार दिशा दिली, हे खरं ना?

सवंगता, तकलादूपणा, उथळपणा आणि मूल्यहीनता हे असे शब्द आहेत जे खरं म्हणजे कुणालाच वा कशालाच लावल्या जाऊ नयेत. पण साहित्याला म्हणजे तथाकथित लेखनाला ते कधीकधी नाईलाजाने लावावे लागतात. या सवंगतेची हजारो उदाहरणे देता येतील. विशेषतः कवितेच्या बाबतीत हे फार मोठ्या प्रमाणात घडतं. पण मी त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. मात्र हा भाग टाळताही येत नाही. प्रसिद्धीचा हव्यास, चमकण्याची हौस, बडेजाव मिरवण्याचा स्वभाव, मोठं बनण्याचा आणि तसं दाखविण्याचा उतावीळपणा व रात्रीतून 'स्टार' होण्याची चुकीची अभिलाषा या बाबी या सवंगपणाच्या मुळाशी असतात. हे सर्व टाळलं तर, लेखनातला वा अभिव्यक्तीतला उथळपणा, पांचटपणा,

सवंगपणा व तकलादूपणा टाळता येऊ शकतो. अनुभूती अस्सल असेल आणि तंत्राचे ज्ञान आणि भान असेल तर आपली निर्मिती ही हृदयाचा ठाव घेणारी व दिशा दर्शविणारी ठरते. याची मराठी साहित्यातील हजारो उदाहरणे देता येतील. एकच कादंबरी शंभर वेळा लिहिणारे ना. सी. फडके आज किती वाचल्या जात असतील? मात्र 'धग', 'बारोमास', 'हल्या हल्या', 'माणूस', 'पाचोळा' या साहित्यकृती आजही लाखोंच्या मनाचा ठाव घेतात हे सत्य नाकारून कसं चालेल! रवींद्र जवादे, किशोर बळी, किरण डोंगरदिवे, मीनल येवले, पुनीत मानकर हे युवा साहित्यिक आणि थोडे आधीच्या पिढीतील डॉ.सतीश तराळ, डॉ. शोभा रोकडे, रमझान मुल्ला, प्रशांत असनारे, नरेंद्र इंगळे, गणेश भाकरे, किशोर कवठे हे जनमनाच्या गळ्यातले ताईत होतात ते का? अलिकडील श्री पुष्पराज गावंडे, इरफान शेख, श्री सु.पु. अढाऊकर, श्री मोहन काळे यांचं लेखन बघा! यात अनेक नावे सुटली आहेत, याची मला जाणीव आहे. पण स्थळा अभावी ते संभव आहे. तेव्हा मुद्दा आहे तो अस्सलतेचा! ती यावी, असावी, हा आग्रह करणे अनाठाई नसावे.

साहित्य म्हणजे काय हे निश्चित झाल्यानंतर - साहित्यिकाची भूमिका ही ओघानेच सिद्ध होते. समाजमनाला योग्य वळण देण्याचे महनीय कार्य साहित्यिकांनी करायचे असते. आपण साहित्याचा पूर्वेतिहास पाहिला तर त्या त्या काळात, समाजजीवनात नव्या संकल्पना, नव्या व योग्य जीवनपद्धती रुजविण्याचे काम साहित्यिकांनी केलं आहे. खरं साहित्य व खरा साहित्यिक हा व्यवस्थेला जाब विचारत असतो. व्यवस्था परिवर्तन हाच या साहित्याचा आणि साहित्यिकांचा ध्यास असतो. समाजाच्या, लोकजीवनाच्या सुरात सूर मिळविणे, त्यांच्या हो ला हो लावणे हे खऱ्या साहित्याचं वा साहित्यिकाचं ब्रीद नसतं. ती त्यांची भूमिकाही नसते. मानवतेच्या प्रस्थापनेसाठी प्रवाहाला विरोध करणे हीच साहित्यिकांची भूमिका असायला हवी. प्रवाहपतित साहित्य हे काळजाला कधीच भीडत नसते. अमानवतेला विरोध करून मानवतेचं संवर्धन करणे हीच प्रत्येक लेखनकृतीची भूमिका असायला हवी. कारण त्याशिवाय ते साहित्य पथदर्शक व प्रभावी होऊ शकत नाही. 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' नावाची कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची एक दीर्घ कविता आहे. ती कविता व त्यांचे एकूणच साहित्य हे अशा प्रकारच्या निखळ मानवतावादी, लढाऊ भूमिकेला प्रकट करणारे साहित्य आहे.

मला लिहिता यावं, मी लेखक व्हावं, साहित्यिक म्हणून मला नाव कमावता यावं यासाठी मी मागणी तसा पुरवठा या न्यायाने लेखन करीत असेल तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. साहित्यिकांनी परिवर्तन करता यावे म्हणून लेखन करावे. लेखन करता यावे म्हणून स्वतःमध्ये परिवर्तन करू नये. लेखन हे साहित्यिकाचे पोट भरण्याचे व उपजिविकेचे साधन असू नये. कारण कलेला वा साहित्याला पोटाशी जोडले की कला व साहित्य मग विकाऊ होतं. आणि विकाऊ कलेत व निर्मितीत टिकाऊ असं काहीच नसतं. मराठी साहित्यातल्या एका मातब्बर लेखकांनी केवळ पोट भरण्यासाठी आपली लेखणी काहीकाळ राबविली. त्या काळातल्या त्यांच्या त्या तशा प्रकारच्या बाजारू लेखनाचे त्यांना पैसे मिळाले. पण ते त्यांचे लेखन काळाच्या ओघात अजरामर झाले नाही. समाजजीवनावर वा समाजमनावर त्या लेखनाने आपली छाप पाडली नाही. बाजारात सोन्यापेक्षा वांगी जास्त प्रमाणात खपतात म्हणून सोन्याची प्रतिष्ठा त्या वांग्यांना येत नसते.

तेव्हा लेखकांनी परिवर्तनासाठी लिहावे. लिहिता यावे यासाठी वा आपले लिहिलेले लोकप्रिय व्हावे यासाठी स्वतः मध्ये परिवर्तन घडून आणू नये. स्वतःची विक्री करून घेऊ नये. यालाच लेखन स्वातंत्र्य म्हणता येईल. हे लेखन स्वातंत्र्य हा अभिव्यक्तिस्वातंर्त्याचाच एक भाग असतो. लेखकांनी आपले अभिव्यक्ती स्वातंर्त्य अबाधित ठेवावे व जपावे.

काही लोकांना प्रत्येक प्रांतात आपले स्वतःचे वेगळे वा विशिष्ट अस्तित्व सिद्ध करण्याची हौस असते. त्यातूनच लेखन संप्रदाय आणि त्यातून मग लेखनाचे गट निर्माण होतात. काही विशिष्ट मानवहितैषी मतप्रवाह व त्यामुळे निर्माण झालेले साहित्य समूह एक वेळ समजून घेता येईल. ते तसे असणे यात वावगे काहीच नसते. मात्र उगीच आपल्या बडेजावासाठी स्वतःचे विशिष्ट गट, तट वा मठ स्थापने मुळीच योग्य नसते. मराठी साहित्यात असे प्रकार थोड्याफार प्रमाणात झाले आहे. केशवसुत, मर्ढेकर, बालकवी, भा. रा. तांबे, कवी अनिल, आनंद यादव, सुरेश भट वा अन्य हे याला पूर्णपणे सन्माननीय अपवाद. मात्र अमूक एका साहित्य प्रकारातील हा आमच्या अमूकाचा गट वा हा आमच्या टमुकाचा गट हे पूर्णपणे अयोग्य! यामुळे साहित्याचं

खळखळून वाहणारं स्वच्छ, जीवनदायी पाणी उगीच गढूळ होतं, सडतं व कुजतं. तेव्हा अशा अकारण गटा-तटांपासून वा स्वनामधन्य मंबाजींपासून नव्याने लिहिणाऱ्या अस्सल प्रतिभावंतांनी सावध राहावे. खरंतर सृजन हा ज्यांचा श्वास असतो त्यांना अशा संकुचित, साहित्य बाह्य प्रकारांचा लवकरच वास येतो. आणि असे प्रतिभावंत या प्रकारांपासून आपसूकच अलिप्त राहतात. पण हे असे प्रकार वा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी, त्यातील खेचाखेचीचे राजकारण हे साहित्याच्या निकोप प्रकृतीला मारक असते. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची सर्वानुमते सामोपचाराने निवड ही या दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे. तेव्हा राजकारणातली सडकी गटारं साहित्यात येऊ नये, असे वाटते. हे वाटणं चुकीचं नसावं !

मित्रानों ! साहित्यनिर्मिती हे एक व्रत आहे. सृजनाच्या या सुवर्ण उत्सवाला अर्थलाभाचे वा पद, प्रतिष्ठेचे काळे डाग पडायला नकोत. पण ते पडतात. अन् इतर क्षेत्रांसारखं साहित्य क्षेत्रही काळवंडतं, हे वास्तव आहे. निमंत्रणांतील आप-परभाव, पुरस्कारांतील पक्षपात, अभ्यासक्रमात साहित्य समावेशातील घोडेबाजार, या आणि अशा अन्य काही बाबी म्हणजे साहित्याच्या निसर्गदत्त पावित्र्याला लागलेले कलंकच ! त्या सर्वांची चिकित्सकपणे जाहीर चर्चा करणे मला अभिप्रेत नाही. परंतु मानवी स्वभावातील स्वार्थलोलुपतेमुळे आणि संकुचित पक्षवादी, जातीवादी अन् लोभवादी प्रवृत्तींमुळे हे सारे अनिष्ट प्रकार वाढलेत हे नक्की. प्रतिभावंतांना पुरस्कार, गुणवंतांचा गौरव आणि प्रागतिक लेखन करणाऱ्यांचा अभ्यासक्रमात समावेश ही पथ्ये पाळली तर ह्या साहित्यबाह्य अनिष्ट बाबींना पायबंद होऊ शकतो. 'साहित्याच्या विचारपीठावर राजकारणी का', अशा बाबींवर चर्चा करून वेळ घालविणाऱ्यांना 'साहित्य क्षेत्रातले राजकारण' दिसत नसावे का ? तथाकथित चार अक्षरं खरडणाऱ्या, स्वनामधन्य लेखकरावांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याने खऱ्या प्रतिभावंतांवर अन्याय होतो हे दिसत नसावं काय ? अर्थात अपवाद वगळून ! तद्दन साधारण लेखनाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव केल्याने - पिढी कुपोषित होते - त्यापेक्षाही योग्य प्रतिभावंतांचे सृजनाचे पंख छाटले जातात, हे कळत नसावे काय ? स्वतःच स्वतःला आरत्या ओवाळून घेण्याच्या अश्लाघ्य प्रवृत्तीमुळे महाकवी सुधाकर गायधनींसारखा वा डॉ. देवेंद्र पुनसेंसारखा जगप्रसिद्ध प्रतिभावंत दुर्लक्षिल्या जातोय हे लक्षात येत नसावे काय ? तेव्हा हे सारे थांबावं आणि साहित्य क्षेत्र स्वच्छ व्हावं असं वाटतं. समाजाला माणुसकी, नीतिमत्ता व सदाचार शिकविणाऱ्या आणि दाखविणाऱ्या साहित्य श्रेष्ठींनी तरी अनीती, दुराचार वा राजकीय कुटिलता यासारख्या अधोगतीस नेणाऱ्या वाईट बाबींचे बळी ठरू नये, असे वाटते. असे वाटणे, हे गैर असेल तर मी त्याबद्दल सर्वांची क्षमा मागतो.

मित्रांनो ! एकूण साहित्य क्षेत्र हे निखळ, निर्मळ व निकोप व्हावं ही माझी धारणा आहे. समाजातील दुष्प्रवृत्त लोकांना साहित्यिकांचा, कलावंतांचा व विचारवंतांचा धाक वाटायला हवा. ही मंडळी राजकारण्यांच्या पायाखालची पायपुसणी होऊ नये, असं वाटतं. त्यासाठी उत्तम साहित्य आणि उत्तम साहित्यिकांची मांदियाळी जमविणाऱ्या साहित्य संस्था पुढे यायला हव्यात. त्यांनी नव्यातील कसदारांना प्रेरणा द्यावी, जुन्यातील अस्सलांचा आदर करावा आणि साहित्याचं एक भक्कम प्रेरणादायी विचारपीठ मजबूत करावं. नव्यांचा सन्मान म्हणून, उगीच कागदं काळे करणाऱ्या अनुकरण बहाद्दरांना मोठे सन्मान देऊन त्यांनी त्या पिचक्या फुग्यांत हवा भरू नये. आपल्या जातीचा, आपल्या सोयीचा म्हणून अयोग्यांचा गुणगौरव करण्याचं षड्यंत्र बंद करून समाजाला ठळक काही देणाऱ्यांचा त्यांनी सन्मान करावा असं वाटतं.


दिपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शेतकरी बांधवांचे विश्वसनीय कृषी प्रतिष्ठान

अभिजित ॲग्रो एजन्सीज्

ISO 9001-2008 प्रमाणित कृषी प्रतिष्ठान

नामावंत कंपनीचे दर्जेदार बियाणे, कीटकनाशके, सेंद्रिय खते, विद्राव्य खते, योग्य कृषीविषयक सल्ला

माणिक टॉकिजजवळ,
टिळक रोड, अकोला 44 001
E-mail : abhijeetagrokarale@gmail.com

# इयत्ता १ ते ५ वर्गशिक्षणातील अध्ययन पद्धती

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षक हा समाज परिवर्तक आहे. शिक्षक हा समाजिक अभियंता आहे. व्यक्तिच्या आयुष्याला, विचाराला आणि कृतीला आकार देण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. कोणत्याही राष्ट्राची राष्ट्रिय गुणवत्ता त्या राष्ट्रातील शिक्षकांच्या गुणवत्तेपेक्षा जास्त असू शकत नाही. शिक्षक हा आदर्शाचा अर्क, पावित्र्याचे प्रेरक रूप, अविरत प्रसन्नतेचे वरदान, स्वयंप्रकाशित हिऱ्याचे प्रेरक रूप, भारताच्या भविष्याची शान आहे. शिक्षक हा नॉलेज पॉवर हाऊसचा सीईओ आहे. ज्ञानाचा भांडवलदार, ज्ञानाचे वादळ, प्रकाशाचे बेट, देशाचा भाग्य विधाता, सृजनशील विचारवंत, नवविचारांचा प्रवर्तक, शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, शिक्षणतज्ञ, संत व कवी आहे.

शिक्षणाची ध्येये थोर शिक्षणतज्ञांनी नमुद केलेली आहेत. 'माणूस घडविणे'- स्वामी विवेकानंद, 'सुसंस्कृत नागरिक घडविणे - डॉ. राधाकृष्णन, 'भाव, भाषा, व जीवन यांचा मेळ - 'रविंद्रनाथ टागोर, मन, मनगट व बुद्धी यांचा अविष्कार'- महात्मा गांधी.

राष्ट्रिय प्रगती आणि उत्कर्ष हे मुलांना दिलेल्या शिक्षणावर अवलंबुन आहे. शिक्षण मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. शिक्षणाने माणसांचा सर्वांगीण विकास होतो. व्यक्ती विकास हाच समाजविकास आणि समाज विकास म्हणजेच राष्ट्रविकास होय. भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाली. स्वातंत्र्यावेळी असलेली विद्यार्थी, शिक्षक व शाळा संख्या यांचा विचार केल्यास आज प्रचंड मोठी क्रांती झाल्याचे दिसते. साक्षरतेच्या प्रमाणातही अभिमानास्पद वाढ झाली. परंतु आज शिक्षण क्षेत्रातील व्यवस्था व अव्यवस्था पाहिल्यास खुपच बदलास वाव आहे, असे चित्र दिसत आहे.

असर पाहणी (ASSAR), राज्य संपादक सव्हे (SI AS),राष्ट्रिय संपादणुक पाहणी (NAS) यामधुन धक्कादायक व चिंतनीय चित्र समोर आले आहे. भाषा व गणित या विषयाची प्राथमिक स्तरावरील गुणवत्ता खूपच खालावलेली आहे. माध्यमिक स्तरावरही भाषा विषय सोडून फारसे वेगळे चित्र नाही. या पुरोगामी महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुणवत्तेला लागलेली घसरण आम्हाला भूषणावह नाही.

मुलांची परिक्षेसाठी तयारी करून घेतली जाते. शिक्षण परिक्षांची तयारी हे मनातून मानले जाते.

| | | |
|---|---|---|
| अध्ययन अध्यापन | - | परिक्षेसाठी |
| परीक्षा | - | गुणांसाठी |
| गुण | - | पुढील प्रवेशासाठी |
| तो प्रवेश | - | लाभदायक अभ्यासक्रमासाठी |
| तो अभ्यासक्रम | - | नोकरी, व्यवस्थापनासाठी |
| ती नोकरी, व्यवसाय | - | द्रव्यार्जनासाठी |
| ते द्रव्य | - | वस्तूलाभासाठी |
| त्या वस्तू | - | मनाच्या समाधानासाठी |

ही अपेक्षांची मालिका असते. या शृंखलेतून मुक्त व्हावे व खरे समाधान माणसाला मिळावे. माणसाने त्याचा विचार करावा. हा आग्रह धरला जात नाही शिक्षणामुळे मुलांच्या जिवनातील स्फूर्ती, सर्जनशीलता, विचारशक्ती, भावनिक उभारी, उपक्रमशीलता, निर्णयक्षमता, संप्रेषणक्षमता वाढायला हवी.

स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात इंग्रजी शिक्षणातून कारवून बनतील असेच शिक्षण दिले गेले. रविंद्रनाथ टागोरांची शांतिनिकेतन व महात्मा गांधीजीची मुलोद्योगी / वर्धाशिक्षण योजना विविध कारणांनी अयशयस्वी ठरल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात वर्तनवादाने त्यांची जागा घेतली. शास्त्रज्ञांनी / शिक्षण तज्ज्ञांनी उंदीर, मांजर, कुत्रा व वानरांवर प्रयोग केले.

आलेले निष्कर्ष मानवी वर्तनाला लावले त्यावर आधारीत शिक्षण प्रक्रिया राबवली गेली. गेल्या १५ ते २० वर्षांत मेंदू संशोधन झाले. मेंदू स्कॅन होऊ लागला. मेंदूमधील विविध बाबींची / केंद्राचा शोध लागला. त्यानुसार अध्यापन शास्त्र व आकलनशास्त्र विकसित होत आहे.

NCF - २००५, SCF -२०१२ व पुर्नरचित अभ्यासकम २०१२ नुसार 'ज्ञानरचनावाद' हा नविन विचार स्विकारला गेला. त्याचप्रमाणे अध्यापणाऐवजी एक नवीन अध्ययन पद्धती स्विकारली गेलेली आहे. डॉ. एडगर डेल यांच्या मतानुसार ज्ञानग्रहणाचे डोळा ८३ टक्के, कान - ११ टक्के, त्वचा ३.५टक्के, नाक १.५टक्के, व जीभ १टक्के असे आहे. कृतीद्वारे पाच ज्ञानेंद्रिये कार्यान्वित होतात, त्यामुळे १०० टक्के ज्ञान ग्रहण होते. या शोधांमुळे कृतीला प्राधान्य, मॉस्लेची गरजाधिष्ठित श्रेणी, मेंदू शिक्षण, अध्यायनशास्त्र व आकलनशास्त्राने गती घेतली आहे. मुलं म्हणजे कोरी पाटी, रोपटे, मातीचा गोळा, रिकामे भांडे या सर्व जुन्या धारणा शिक्षणशास्त्राने फेटाळलेल्या आहेत.

मी ऐकतो आणि विसरतो. I hear and I forget.
मी पाहतो आणि लक्षात ठेवतो.
I see and I remember
मी करतो आणि मला समजते.
I do and I understand.

या तत्वाचा स्विकार करून ऐकणे, पाहणे याऐवजी कृतीवर भर देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण खात्याच्या मार्गदर्शनातून प्रारंभीक स्तरावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राची घोडदौड चालू आहे. २२ जुन २०१५ व १६ सप्टेंबर २०१६ च्या प्रगत या शासन निर्णयामुळे महाराष्ट्रातील शिक्षण आज वेगाने बदलत आहे.

**-निलेश रमेश पिंपळकर**
मोठी उमरी, अकोला,
९६०४१ २८००२

# पावसा...

अरे किती थैमान घालशील
आमचा घास हा अडवशील
जेव्हा तुझी खरी गरज होती
तेव्हा मात्र तू गायब होशील...

तुझा खेळ हा कळत नाही
सारखा तू बरसत असतो
सर्व कामे बघ ठप्प होतात
जगण्याला या ब्रेक लागतो...

पिकांचे किती नुकसान झाले
शेतकरी हे हवालदिल झाले
कुणाकडे व्यक्त करावे दुःख
काहींचे मार्गही तूच बंद केले...

आम्हाला हवाहवासा वाटतोस
मात्र आता जादा कोसळतोस
चार महिन्यांचा निवास तुझा
तू आता कधीही रे भिजवतोस ...

लाईट नाही,मग वादळ ते येते
कसे सावरावे,तेव्हा कळत नाही
दिशा भरकटते,काहीतरी हरवते
कुठे मग काही सापडत नाही...

बस झालं आता किती येशील
पुढील वर्षांसाठी बाकी ठेवशील
असा कोसळून तू येऊ नकोस
कोरोनाचा संसर्ग वाढवू नकोस...

**-आशिष निनगुरकर**
अंधेरी (पूर्व),मुंबई
मोबाईल- ९०२२८ ७९९०४



# वस्तुस्थिती

भेटला नशीबी,
बेवडा नवरा ।
पायात भवरा
जीवनात।।
अर्धीच भाकर,
नको ती साखर।
तुही रे उधार
अन्नदात्या।।
साप गेल्यावर,
मारशी फटके।
करीशी टोटके
उगीचच।।
जीवन संगीत
सारंच भंगलं।
आयुष्य टांगलं
अधांतरी।।
देस-परदेस
आलास फिरून।
आसवं गाळून
'परदेशी'।।
जीवन गणित
कोडेच कठीण
संकट नवीन
भोवताली।।

**- अशोक आगरकर**
**'परदेशी'**
मो.७२६२९ ७२७६०

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई

(महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत)

डिप्लोमा इन नॅचरोपॅथी अ‍ॅन्ड योगीक सायन्स (DNYS)

डिप्लोमा इन पंचकर्म थेरपी

डिप्लोमा इन अ‍ॅक्युपंक्चर सायन्स (D.Accu. S.)

कालावधी : २ वर्ष | पात्रता : १० वी पास | फी : रू. २५,०००/- (प्रती अभ्यासक्रम) | माध्यम : मराठी/इंग्रजी

डिप्लोमा इन फिजीओथेरपी (D.PTH)

डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्नोलॉजी (DMLT)

डिप्लोमा इन डायटेशियन अ‍ॅन्ड न्युट्रीशन्स सायन्स (DDNS)

कालावधी : २ वर्ष | पात्रता : १० वी पास | फी : रू. २०,०००/- (प्रती अभ्यासक्रम) | माध्यम : मराठी/इंग्रजी

अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा इन इलेक्ट्रो-होमिओपॅथी

कालावधी : १ वर्ष | पात्रता : बी.ए.एम.एस./बी.एच.एम.एस./बी.यु.एम.एस./व्होकेशनल बोर्डाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेले

योगा अ‍ॅन्ड नॅचरोपॅथी

रेडीओलॉजी टेक्नीशियन

ऑपरेशन थिएटर टेक्नीशियन

पॅथोलॉजी टेक्नीशियन

पंचगव्य व सेंद्रीय शेती

योगा टिचर

डायलेसीस टेक्नीशियन

ऑप्थॅलमिक टेक्नीशियन

कालावधी : १ वर्ष | पात्रता : १० वी पास | फी : रू. १०,०००/- (प्रती अभ्यासक्रम) | माध्यम : मराठी/इंग्रजी

अ‍ॅक्युप्रेशर अ‍ॅन्ड मसाज

कालावधी : ६ महिने | पात्रता : ८ वी पास | फी : रू. ५०००/- | माध्यम : मराठी/इंग्रजी

आय.सी.यु. टेक्नीशीयन

कालावधी : ६ महिने | पात्रता : १० वी पास | फी : रू. ५०००/- | माध्यम : मराठी/इंग्रजी

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई

(महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत)

**D.M.L.T.** डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्नोलॉजी

कालावधी : २ वर्ष | पात्रता : १० वी पास | माध्यम : मराठी/हिंदी/इंग्रजी

टिप : प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला तसेच अकोला शहरातील प्रख्यात एम.डी. (पॅथोलॉजी) डॉक्टरांच्या लॅब.मध्ये प्रशिक्षणाची सुविधा देण्यात येईल.

# डॉक्टर होण्याची सुवर्णसंधी

महाराष्ट्र शासनमान्य पॅरामेडिकल कोर्स | रेग्युलर व पोस्टल कोर्स

# योगा अ‍ॅन्ड नॅचरोपॅथी

• प्रवेश पात्रता : १० वी उत्तीर्ण • कालावधी : १ वर्ष • माध्यम : इंग्रजी, मराठी, हिंदी

भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या जी.आर. नुसार नॅचरोपॅथीचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना स्वतंत्र व्यवसाय करता येईल व आपल्या नावासमोर 'डॉक्टर' शब्दाचा उपयोग करता येईल.

**'योगा अ‍ॅण्ड नॅचरोपॅथी' हा अभ्यासक्रम पुर्ण केलेले विद्यार्थी -**

(१) 'आहारतज्ञ' (डायटीशीयन) तसेच 'सौंदर्यतज्ञ' (ब्युटी थेरपीस्ट) म्हणून स्वतंत्र व्यवसाय सुरु करु शकतात. (२) स्वतंत्रपणे योग व निसर्गोपचाराचे वर्ग सुरु करु शकतात, 'फिटनेस सेंटर' सुरु करु शकतात. (३) भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात 'योग शिक्षणाचा' समावेश केला आहे. त्यामुळे विविध शाळा व महाविद्यालयात 'योग शिक्षक' म्हणून नोकरी मिळू शकते. (४) विविध खाजगी व शासकीय संस्थात 'योग तज्ञ' म्हणून नियुक्ती होऊ शकते.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या कायद्यानुसार शासकीय व खाजगी रुग्णालयात तज्ञ कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त अभ्यासक्रम पुर्ण केलेल्यांना याठिकाणी नोकरीची हमखास शक्यता आहे.

# महात्मा फुले पॅरामेडिकल कॉलेज, अकोला

सिद्धीविनायक हॉस्पीटलच्या बाजुला, हॉटेल रणजीतच्या मागे, नवीन बसस्टँड जवळ, अकोला

मो. : 09422155168 / 09370063910 / 9422163910 / 9371163910

# साहित्यातील अवलिया : संदीप देशमुख



अकोल्याच्या साहित्य क्षेत्रामध्ये साहित्यिक संदीप देशमुख यांचे नाव परिचित नाही असा साहित्यिक कलावंत शोधूनही सापडणार नाही. साहित्य, कला, क्रीडा संस्कृती, संपादक यासारख्या कित्येक व्यासंगी भूमिका संदीप देशमुख यांनी निभावल्या आहेत. अगदी बालपणापासूनच साहित्याची आवड असलेल्या संदीप देशमुख यांनी अनेक क्षेत्रांमध्ये मोलाचे काम करण्याचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे. नवोदित साहित्यिक दर्जेदार साहित्य निर्माण करत नाहीत, त्यांच्या साहित्यात पाहिजेत असा दम नाही अशी ओरड अलीकडच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात होत असली तरी साहित्यिक संदीप देशमुख यांनी ही प्रचलित पद्धत मोडून टाकण्याचे काम केले.

यामध्ये नवोदित साहित्यिक संदीप देशमुख यांनी आधुनिक पद्धतीने, कसदार शैली, लिखाणाचे सातत्य, मांडण्याची पद्धती कायम वेगळ्या धाटणीची राहिली आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण संस्कृती, शेतकरी, कष्टकरी, कामगार रेखाटण्याचे काम केले. केवळ कल्पनेवर भर न देता वास्तवतेचे भान राखून समाजात घडत असलेल्या घटना, संस्कृतीत होणारे बदल, आचार विचार, पद्धती, राहणीमान आपल्या वेगळ्या शैलीत मांडले आहेत. त्यांची साहित्य शैली वाखाणण्याजोगी असून अनेक क्षेत्रातील प्रतिभावंत कलावंत व साहित्यिकांना त्यांनी मानाचे विचारपीठ उपलब्ध करून दिले आहे. विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा युवा भूषण पुरस्कार देऊन ते दरवर्षी सन्मानित करत असतात. अगदी सर्वसामान्यांचं जीवन जगत असताना साहित्यातील अनेक नामवंत साहित्यिक या नावाने ओळखतात. त्यांनी आजवर अनेक राज्य वा अखिल भारतीय स्तरावरील साहित्य संमेलनाला हजेरी लावून दर्जेदार कवितांचे सादरीकरण वाहवा मिळविली आहे. आजही त्यांच्या घरी पुरस्कार, सन्मान चिन्ह ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नसलेला हा प्रतिभावंत साहित्यिक जगण्याची धडपड आपल्या लेखणीतून मांडत असतो.

**संस्थेचे कार्य**

अकोटसारख्या ग्रामीण भागातून सामाजिक सेवेचा वसा आणि ध्यास घेतलेल्या संदीप देशमख यांनी तरूणाई फाउंडेशनची स्थापना २०१६ साली केली. आज ही संस्था अकोल्यात नावारूपाला आली आहे. रोजगार, आरोग्य, शिक्षण, सांस्कृतीक, सामाजिक आणि साहित्यिक अशा विविध क्षेत्रात संस्थेचे कार्य सुरू अविरत सुरू असते.

मागील ८ वर्षांपासून संस्थेचे संस्थापक संदीप देशमुख हे तरूण पिढीच्या कल्याणासाठी त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी निरंतर प्रयत्नरत असतात. यासाठी त्यांनी राज्यस्तरीय युवाभूषण पुरस्काराची मुहूर्तमेढ रोवली.

सध्या हा पुरस्कार सध्या संस्थेची ओळख बनला आहे. तरुणाई फाउंडेशन ही सामाजिक चळवळीला गतिमान करणारी संस्था असून संस्थेच्या माध्यमातून आजवर अनेक उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण भागत संस्थेच्यावतीने मनोरंजनासाठी संस्थापक कविसंमेलन, युवा महोत्सव, युवा नेतृत्व स्पर्धा, सामान्य ज्ञान परीक्षा इत्यादीचे नेहमीच आयोजन केले जाते.



सोबतच संस्थेने वृक्षारोपण आणि वृक्ष संगोपन ही चळवळही हाती घेतली आहे. याशिवाय संस्थेकडून तरुणांसाठी शिबिरांचे आयोजन करून रोजगार उपलब्धतेसाठी मार्गदर्शन केले जाते.ग्रामीण भागात आरोग्य शिबिर घेऊन गरजूंना शासकीय मदती पोहोचवली जाते.

तरुणाई फाऊंडेशनकडून प्रथमच २०१९ मध्ये जिल्हा साहित्य मराठी संमेलन श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भरवण्यात आले. जिल्ह्यातील सर्व साहित्य रसिकांची उपस्थिती या संमेलनाला लाभली. संमेलनातील विविध सत्रे ज्ञानवर्धक होती. नवलेखक व कवींना संस्थेकडून कायम प्रोत्साहन दिले जाते. आतापर्यंत संस्थेकडून आयोजित साहित्यिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांच्या मेजवानीचा आस्वाद अकोलेकरांनी घेतला आहे. संस्थेने आतापर्यंत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून युवा साहित्यिकांसोबत पत्रकारांना सुद्धा त्यांच्या कार्यासाठी गौरवान्वित केले आहे. यावेळी या कार्यक्रमाला प्रसिद्ध अभिनेत्री किशोरी शहाणे यांनी उपस्थिती लाभली होती, हे विशेष.

- **शिवाजी भोसले,** अकोला
(पत्रकार, दै.अजिंक्य भारत)

## गुण गातो आवडीने

गुणग्राहक होऊनी
गुण गातो आवडीने
श्रद्धा सुमनें गुंफतो
भावभक्तिच्या गोडीने

पुढे पाऊल पडता
पथ प्रकाशाचा होई
चित्ता मिळतसे शांती
उजळती दिशा दाही

कार्यप्रवण होण्यास
गुण देती बळ अंगी
मन मयूर हर्षूनी
नाचे कवितेच्या रंगी

ज्याचा घेतलासे गुण
तोच शोभलासे गुरू
मार्ग दाविला तयाने
तोचि आम्ही अंगीकारू

घेती आस्वाद रसिक
प्रेमादरे सवडीने
नम्र होऊनी थोरांचे
गुण गातो आवडीने

**- नारायण अंधारे**
शिर्ला अंधारे, ता.पातूर,
जि.अकोला

# सावध ऐका पुढल्या हाका!
# लव्ह जिहाद



अ

'लव्ह जिहाद' आपल्या समाजाने प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनेपायी लपवून ठेवलेली समस्या आता भीषण स्वरूप धारण करून समाजासमोर उभी ठाकली आहे. 'लव्ह जिहाद' म्हणजे काय? तो घडतो कसा, त्यावरील उपाय काय, उपाय करू पाहणाऱ्या पालकांना काय समस्या भेडसावतात हे जाणून घ्यायलाच हवे.

'लव्ह जिहाद' हा मुस्लीम लोकसंख्या वाढविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या असंख्य मार्गांपैकी एक मार्ग. अन्य धर्मातील जननक्षम मुलींना, विवाहित महिलांना आधी प्रेमाच्या जाळ्यात अडकवायचे, विवाह करून अथवा न करता आपल्या घरी न्यायचे आणि त्यांच्या शरीराचा वापर करून मुस्लीम मुले जन्माला घालायची. एक स्त्री पूर्णपणे फसली, तिचे स्त्रित्व वापरून झाले, तिचे परतीचे मार्ग बंद झाले की, नवीन सावजाचा शोध सुरू करायचा. भारताच्या प्रत्येक शहरात आणि गावात हे प्रकार घडवून आणण्यासाठी विविध संस्था स्थापन करायच्या, तरुणांना प्रशिक्षण द्यायचे, त्यांची आर्थिक व्यवस्था उभी करायची, दरवर्षी हजारो मुलींना फसवून आणायचे, अशा प्रकारच्या विवाहांना पाठिंबा देणारी, प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी माणसे अन्यधर्मीय समाजात पोसायची, असे हे 'लव्ह जिहाद'चे खरे स्वरूप आहे.

हे वाचायला जितके सरळ आहे, तितकेच ज्यांच्या जीवनात हे घडते, अशा मुलींच्या आणि कुटुंबांसाठी भयानक आहे. आईवडिलांनी प्रेमाने वाढविलेली, आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असलेली, निर्णय स्वातंत्र्य असलेली मुलगी जीवनात चांगल्या जोडीदाराची निवड करेल, अशी अपेक्षा आईवडील करीत असतात. पण, अचानक त्यांना समजते की, आपल्या मुलीने आपल्याला न सांगता तिच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या किंवा सलूनमध्ये काम करणाऱ्या किंवा टायर पंक्चर काढणाया मुस्लीम मुलाशी लग्न करायचे ठरवले आहे. लग्न रजिस्टर करण्यासाठी नोंदणी कार्यालयात जी नोटीस लावली जाते, त्यामधून ही माहिती त्यांना कळते आणि एक धक्का बसून पालक जागे होतात. लहानपणापासून हिंदू संस्कारांत वाढलेली, उच्चशिक्षण घेणारी किंवा चांगली नोकरी करणारी आपली इतकी हुशार मुलगी असा मूर्ख निर्णय घेईल, यावर आधी त्यांचा विश्वासच बसत नाही. परंतु, विवाहनोंदणीची नोटीस तर खरी असते, त्यामुळे वस्तुस्थितीचा स्वीकार करावाच लागतो. मुलीची चूक झाली असेल, समजावून सांगितल्यावर तिला कळेल आणि ती निर्णय बदलेल, अशी पालकांची अपेक्षा असते. त्याप्रमाणे ते प्रयत्नदेखील सुरू करतात आणि लवकरच त्यांच्या लक्षात येते की, हा आजार खूप जुना आहे. मुलगी प्रेमसंबंधात इतकी पुढे गेली आहे की, आता तिचा आपल्यापेक्षा अधिक विश्वास त्या ढोंगी प्रियकरावर आहे. नको त्या अवस्थेतील

अनेक पुरावे त्याच्याकडे आहेत. कदाचित, ती गर्भवती झालेली आहे, त्यामुळे माघार घेणे तिला शक्य नाही. आपल्याला विश्वास ठेवायला कठीण जाते. परंतु, अनेक प्रकरणांमध्ये मुलींच्या अंगावर जादूटोणा, संमोहन यांचीही लक्षणे आढळतात. पालकांची धडपड सुरू होते. बदनामीच्या भीतीने काही जण गुपचूप प्रयत्न करतात. बदनामी झाली तरी चालेल; पण मुलगी वाचविणे महत्त्वाचे आहे, हे समजून काही पालक नातेवाईक आणि सामाजिक संस्थांची मदत घेतात. चर्चा, समुपदेशन, पुस्तकवाचन, जादूटोणा, देवदेवस्की, धाक दाखविणे, मारहाण असे त्यावेळी सुचतील ते बरे-वाईट उपाय केले जातात. अनेक पालक या मार्गांनी आपल्या मुलीला वाचवितात. अशा मुलींच्या जीवनात आलेले हे एक दुर्दैवी वळण टळते आणि त्या पुन्हा त्यांच्या शिक्षणाच्या, नोकरीच्या, योग्य विवाहाच्या मार्गाला लागतात. पण, सर्वच मुली अशा सुदैवी नसतात. प्रेमाच्या धुंदीत त्या फसतच जातात, लग्न करून किंवा न करता, मुलाच्या मोहल्ल्यात राहायला जातात. 'लव्ह जिहाद'मध्ये अडकलेली एखादी सामान्य घरातील मुलगी असो किंवा एखादी प्रथितयश अभिनेत्री असो, लगेचच घडणारी एक गोष्ट असते ती म्हणजे मातृत्व. आपण समाजात पाहतो की, आपल्या कुटुंबातील मुले-मुली विवाहानंतर अपत्य जन्मापूर्वी जोडीदाराला समजून घेण्यासाठी भरपूर वेळ घेतात. परंतु, 'लव्ह जिहाद'मधून झालेल्या विवाहानंतर मात्र मुलगी लगेचच गर्भवती होते. कारण, मूलीला गर्भवती करणे, हा तिचे परतीचे मार्ग बंद करण्याचा उपाय असतो. आपले जीवन कसे सूरू आहे, याचा विचार मनात येण्यापूर्वीच ती दोन-तीन मुलांची आई झालेली असते आणि पुढचा विचार करण्याची तिची क्षमता नष्ट झालेली असते. जन्माला घातलेल्या मुलांना वाढवून 'लव्ह जिहाद'साठी नवी पिढी तयार करणे आणि नव्या हिंदू मुलींना फसविणे इतकेच तिच्या हातात उरते. 'लव्ह जिहाद'मधून झालेल्या विवाहात असे काय आहे की, आपण त्याला गुन्हा म्हणतो? प्रेमविवाह, स्त्री-पुरुष समानता, जोडीदाराच्या निवडीचे स्वातंत्र्य म्हणून अशा विवाहांना पाठिंबा द्यायला काय हरकत आहे? आपले अनेक ढोंगी पुरोगामी हिंदू असा पाठिंबा देताना दिसतात. मग काही राज्ये 'लव्ह जिहादविरूद्ध कायदा का करत आहेत? मुळात 'लव्ह जिहाद' म्हणजे प्रेमविवाह नाही. ही मुलींची प्रेमाच्या ढोंगामधून फसवणूक आहे. या फसवणुकीची पद्धत समजून घेतली तर आपल्याला हे समजून येईल. गुन्हेगार आधी आपले खरे नाव लपवून हिंदू नाव धारण करतो, खोटी फेसबुक, ट्विटर अकाऊंट्स तयार करतो. मोबाईल रिचार्ज करण्याची दुकाने, गाड्या दुरूस्तीची ठिकाणे जिथे मुली येतात, अशा ठिकाणी सापळा लावतो आणि फसायला योग्य मुलगी शोधतो. तिला वेळोवेळी मदत करत, तिचा विश्वास संपादन करतो. जी मुलगी थोडी कमकुवत दिसेल, तिला पुढाकार घेऊन लैंगिक सुखाचा अनुभव देतो. विशिष्ट वयात अशा' मित्राची गरज असते, ती पूर्ण करतो. विविध मार्गांनी तिला विवाहासाठी तयार करतो. अनेक घटनांत फक्त अविवाहित मुलीच नाही, तर विवाहित महिलादेखील अशा जाळ्यात फसतात. मुलगी पूर्णपणे जाळ्यात फसली, आता ती परत जाणार नाही, याची खात्री पटल्यावरच आपण मुस्लीम असल्याचे उघड करतो. अनेक मुलींना मूल जन्माला आल्यावरच आपला नवरा मुस्लीम असल्याचे कळते. मग तिला धर्मपरिवर्तन करण्यासाठी जबरदस्ती सुरू होते. अपवादात्मक परिस्थितीत मुलगी त्याला सोडून निघून येते. बहुतांश वेळी स्वतःच्या नशिबाला आणि चुकीला दोष देत ती जीवन जगत राहते. इस्लामचा नाइलाजाने स्वीकार करते. इस्लामचा अभ्यास करून, तत्त्वज्ञान समजून घेऊन त्यामधील स्त्रियांचे दुय्यम स्थान समजून उमजून, 'तिहेरी तलाक' आणि 'हलाला' म्हणजे काय, याचा अभ्यास करून केलेले हे डोळस धर्मांतर नसते. असे धर्मांतर म्हणजे फसवणूक असल्याने 'लव्ह जिहाद' हा गुन्हा आहे. दरवर्षी भारतात हजारो हिंदू, जैन, शीख, बौद्ध, इसाई मुली या गुन्ह्याला बळी पडतात. हिंदूंची कोणतीही जात असे म्हणू शकत नाही की, आमच्या जातीत अशी फसलेली कुटुंबे नाहीत. हा सर्वदूर असणारा प्रश्न आहे. परंतु, या गुन्ह्याचे स्वरूप हजारो स्त्रियांची फसवणूक इतकेच मर्यादित नाही. त्यापेक्षा भयानक कारस्थानाचे ते केवळ एक अंग आहे. 'लव्ह जिहाद' हा महिलांवर होणारा अत्याचार म्हणून त्याचा प्रतिकार केला पाहिजेच; पण त्यासोबत भारताच्या इस्लामीकरणाचा एक प्रयत्न म्हणून देखील त्याकडे पाहायला हवे. केवळ कायदा करून हा प्रश्न सुटेल का? तर मुळीच नाही. मग कसा सुटेल? मग कायदा करून उपयोग तरी काय? कायद्याचा मर्यादित उपयोग नक्की होईल. आज अशा कोणत्याही प्रसंगात मुलीचे पालक जेव्हा पोलिसांकडे जातात, तेव्हा यामध्ये कोणताही गुन्हाच झालेला नाही, असे पोलिसांचे मत असते. मुलगी सज्ञान असेल आणि ती

आपण होऊन लग्न करीत असेल, लग्नासाठी धर्मांतर करीत असेल किंवा लग्नानंतर धर्मांतर करीत असेल, तर तो गुन्हाच नसतो. धर्मांतर करताना नव्या धर्मात मुलीसमोर काय भवितव्य वाढून ठेवलेले आहे, याची तिला मुळीच कल्पना नसते. परंतु, कायद्याला याबद्दल काही देणे-घेणे नसते. नव्या कायद्यामुळे यात थोडा बदल होईल. मुलीने नव्या धर्माची माहिती घेतली आहे का, हे पाहता येईल. पोलिसांची इच्छा असल्यास त्यांना हस्तक्षेप करता येईल. परंतु, ही समस्या सोडविण्याचे काम समाजालाच करावे लागेल. यावर असलेला पहिला उपाय म्हणजे, आपल्या धर्माचे आणि अन्य धर्माचे स्वरूप आपल्या घरातील सर्वांना अगदी लहानपणापासून ते वृद्धावस्थेपर्यंत सांगत राहणे. आपला धर्म कसा श्रेष्ठ आहे, हे आपल्या मुलांना शिकविणे हे आपले कर्तव्य नाही का?

दुसरा उपाय म्हणजे, आपल्या मुलांना हिंदू धर्माच्या उपासनेचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करायला शिकविणे. माणसाला जशी भौतिक प्रगतीची गरज आहे, तशीच आध्यात्मिक प्रगतीचीही आहे. आपण स्वतः नियमाने उपासना करीत असताना, आपल्या घरातील मुलांना मात्र आपण ती सवय लावत नाही. हा त्यांच्यावर अन्याय नाही का? मोठे होत असताना त्यांची हिंदू धर्मावर निष्ठा उत्पन्न झाली नसेल, त्यांना आपल्या धर्माबद्दल काही माहिती नसेल, तर आपण जबाबदार नाही का? पुढचा उपाय आहे आपली सामाजिक सवय बदलण्याचा! 'मी बरा आणि माझे काम बरे, मी कोणाच्या अध्यात मध्यात नसतो,' असे ज्या समाजातील लोक वागत असतील, त्याला देवदेखील साहाय्य करू शकत नाही. 'लव्ह जिहाद' हा आपल्या समाजावर होत असलेला संघटित हल्ला आहे, त्यामुळे त्याचा प्रतिकारदेखील संघटितपणेच करावा लागेल. आपल्या नातेवाईकांची, शेजाऱ्यांची, परिचितांची मुलगी, सून यामध्ये फसताना दिसली, तर तिथे नाक खुपसावे लागेल. प्रसंगी पालक नाराज झाले तरी त्यांना संकटाची जाणीव करून द्यावीच लागेल. आजचा काळ संघटित शक्तीचा आहे. संकटग्रस्त कुटुंबाला सामाजिक आधार देणे, हा या संकटावरचा सर्वात महत्त्वाचा उपाय आहे. संपूर्ण समाजाला या धोक्याची नीट जाणीव करून देणे आणि मुली फसण्यापूर्वीच त्यांना सावध करणे, हे अतिशय महत्त्वाचे आहे. तोच हमखास यशस्वी होणारा उपाय आहे. फसलेल्या मुलीला सोडवून आणणे हे अतिशय आवश्यक; पण अत्यंत अवघड काम आहे. कायद्याचा वापर, आंदोलने, समुपदेशन, औषधी उपचार अशा अनेक उपायांचा वापर यामध्ये करावा लागतो. अतिशय चिकाटी वापरून हे उपाय करावे लागतात. साम, दाम, दंड, भेद अशा सर्व गोष्टींचा वापर 'लव्ह जिहाद' करणारे गुन्हेगार करीत असतात. त्यावर उपाय शोधू पाहणाऱ्या समाजालादेखील केवळ शासनावर, भगवंतावर आणि नशिबावर अवलंबून न राहता, मानवी प्रयत्नातील सर्व उपाय वापरावे लागतील. आपल्याच समाजातील असणारे; परंतु आपली दिशाभूल करणारे असंख्य लोक अशा संकटात आपल्या मार्गात आडवे येतात. त्यांना कौशल्याने दूर ठेवणे हा या उपायांचाच भाग आहे. मुलीला फसवले गेल्यावर कितीही काळ गेला तरी ती परत येण्याची अजूनही शक्यता आहे, असे गृहित धरून तिच्याशी संपर्क ठेवणे अतिशय महत्त्वाचे असते. परधर्मातील गुलामीचा तिला कधी उबग येईल आणि सुखी जीवनात परत येण्याची आशा तिच्या मनात कधी उत्पन्न होईल, हे सांगता येणार नाही. त्यावेळी तिला संधी मिळणे आणि पालकांनी तिच्या संपर्कात असणे, हे यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. जगातील अनेक संस्क,ती इस्लामी जिहादसमोर हतबल ठरल्या आहेत. हिंदू समाज आणि भारत देश या संकटाशी महम्मद कासिमच्या स्वारीपासून आजपर्यंत मागील सुमारे ११०० वर्षे लढत आहे. या संकटाचा पराभव करण्याचे सामर्थ्य जर जगातील कोणत्या समाजात असेल, तर ते भारतीय समाजात आहे. गरज आहे ती आपण जागे होऊन, सावध होऊन ते सामर्थ्य वापरण्याची! 'लव्ह जिहाद'चे संकट, त्यावरील उपाय याबद्दल या छोट्या लेखात मांडलेले विचार आपल्याला उपयुक्त होतील, अशी आशा करतो.

दिपावलीनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!



संजय एम. देशमुख, संस्थापक- राष्ट्रीय अध्यक्ष

# लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ

## अखिल भारतीय स्तरावरील समाजाभिमुख पत्रकार संघटना

नोंदणी क्र. महा. ६४ /२०२१, एफ -२०५६७

केन्द्रीय कार्यालय - विश्वप्रभात कार्यालय सहयोग प्रिन्टर्स,
चव्हाण कॉम्प्लेक्स तापडीया नगर, अकोला मो. ९८८१३०४५४६/८७८८६०२६३३
ईमेल : lokpatrakarmahasangh@gmail.com

---

*दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!*

।। न: निश्चितर्थाद्विरमन्ती धीरा:।।

## दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला.

***संचालित संस्था***

- सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.
- श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.
- श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला.
- श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालय, अकोला.
- श्री कि.न.गो. कला व वाणिज्य महाविद्यालय, कारंजा (लाड).
- ना. मा. चौधरी विद्यालय, अकोला.
- जानकीबाई चौधरी डिजीटल इंग्लिश स्कुल, अकोला.
- बी.जी.ई.एस. सायन्स ॲकॅडमी, अकोला.

*- शुभेच्छुक -*

**ॲड. मोतीसिंह मोहता**
अध्यक्ष

**पवन माहेश्वरी**
मानद सचिव

**विजयकुमार तोष्णीवाल**
वरिष्ठ उपाध्यक्ष

**डॉ. रविन्द्र जैन**
कनिष्ठ उपाध्यक्ष

**इंजि. अभिजीत परांजपे**
सहसचिव

**.......कार्यकारिणी सदस्य.......**

ॲड. प्रमोद अग्रवाल
आर्कि. अतुल बंग
अभय बिजवे
दिपक चांडक
रमेशचंद्र चांडक
करण चिमा

सी.ए. विक्रम गोलेच्छा
ॲड. अजयकुमार गुप्ता
डॉ. अजय कांत
डॉ. किरण लड्ढा
डॉ. सतीष राठी
अमीत सुरेका

---

## शुभदीपावली

**विविध प्रकारची कर्जे**
**किफायतशीर व्याजदरात...**

- चार चाकी वाहन कर्ज
- हाऊसिंग लोन
- टर्म लोन SSI UNIT
- डॉक्टर्स लोन

**अवघा 8.00 %* व्याजदर**

- गोल्ड लोन
- प्रोफेशनल लोन
- वेअर हाऊस रसीद तारण कर्ज
- NSC / LIC Policy तारण कर्ज
- सौर उर्जा कर्ज

**8.50 %* व्याजदरात उपलब्ध**

- शैक्षणिक कर्ज अवघ्या 7.50% व्याजदरात
- नजरगहाण कर्ज 9.50% व्याजदरात

Credit Rating System अंतर्गत प्रचलीत व्याजदरात 1% पर्यन्तची सुट

सेवेसाठी आमच्या ३७ शाखा • अकोला जनता बँक सर्वांची बँक

कृपया अधिक माहिती साठी आमच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

* अटी व शर्ती लागु

**दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि; अकोला**
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

मुख्य कार्यालय : 'जनवैभव,' जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४००१ (महाराष्ट्र)
Website : wwwakolajanatabank.com E-mail : customercare@akolajanatabank.com

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग)

(जि.प./न.पा./म.न.पा.) संघटना (रजि.नं.डिएनई ९५८/२०१८/श्र.सं.मुंबई)

संस्थापक : मा.आ.संजयजी केळकर

● मार्गदर्शक : मा.आ.डॉ.रणजितजी पाटील ● राज्याध्यक्ष : मा.राजेश सुर्वे

## जिल्हा शाखा - अकोला



सौ.वंदनाताई बोर्डे
रा.महिला आ.प्रमुख



श्री विजय पाटील वाकोडे
राज्य सहकार्यवाह



सचिन काठोळे
कार्यवाह



प्रकाश चतरकर
अध्यक्ष

संपर्क प्रमुख : रामभाऊ मालोकार, अरूण वाघमारे ◦ ज्येष्ठ मार्गदर्शक :
मुरलीधर कुलट, कमलसिंग राठोड, दयाराम बंड
ज्येष्ठ सल्लागार : विश्वास पोहरे, रामदास भोपत, संतोषराव इंगळे

श्री गजानन काळे (विभागीय कार्याध्यक्ष) , श्री संतोष झामरे (विभागीय कोषाध्यक्ष)
श्री किशोर चतरकर (विभागीय संघटन मंत्री) , श्री. मो.वसिमोद्दिन (विभागीय उपाध्यक्ष)
श्री दत्तात्रय सोनोने (विभागीय सहकार्यवाह) , सौ.ऋतूजा खेतकर (विभागीय महिला आ.प्रमुख)

(संघटन मंत्री)
सुनिल माणिकराव
(कोषाध्यक्ष)
नितीन बंडावार

कार्याध्यक्ष
श्याम कुलट
संतोष वाघमारे
देवेंद्र वाकचवरे

उपाध्यक्ष
चंद्रशेखर पेठे, राजेश मसने
ग.सु. ठाकरे, समाधान उमप
रामदास वाघ


सहकार्यवाहक
विजय धनाडे, सुरेश परमाळे
एहसान पठान, दिनेश भटकर
अजय पाटील

सहसंघटन मंत्री - संतोष रा. इंगळे, अनिल भाकरे, कार्यालय मंत्री - प्रशांत पुराणिक, रविंद्र अवारे
प्रसिध्दी प्रमुख - रविंद्र जाधव, बिपीन कुरई, महिला आघाडी - अंजली सं. मानकर, सुनीता कोथळकर, सुरेखा जोशी, संगीता म्हैसने, सरिता सोळंके, ज्ञानेश्वरी दाळू
कार्यकारीणी सदस्य तथा तालुका समन्वयक - अकोला - नरेंद्र इंगळे, अकोट - रघुनाथ चव्हाण, बाळापूर - मोहसिन खान, बार्शिटाकळी - गजानन गोतरकर, पातूर - मनोज राठोड, मुर्तिजापूर - अनंत मिसाळ तेल्हारा - दिगंबर खडसे

तालुकाध्यक्ष - श्री विजय वाकोडे (अकोला), श्री विष्णू झामरे (अकोट)
श्री गजानन शेवलकर (पातूर), श्री धमेंद्रसिंह चव्हाण (मुर्तिजापूर), श्री मनोज वाडकर (बाळापूर)
श्री शिवशंकर अस्वार (बार्शिटाकळी), श्री सुभाष ढोकणे (तेल्हारा)
तालुका कार्यवाह - श्री सतिष खंडारे (अकोला), श्री अश्विन हिंगणकर (अकोट), श्री अरूण भराडी (पातूर), श्री रूपेश सूर्यवंशी (मुर्तिजापूर), श्री निलेश शेगोकार (बाळापूर), श्री अमोल सराफ (बार्शिटाकळी)

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

|| श्री गजानन महाराज प्रसन्न ||



# बोराखडे हॉस्पिटल

## डॉ. सौरभ सुभाषराव बोराखडे

M.B.B.S. M.D. Medicine (Mumbai)
Fellow In Diabetology (Mumbai)

**कन्सल्टिंग फिजिशियन**

**हृदयरोग, मधुमेह व किडनी विकास तज्ज्ञ**

**हॉस्पिटल :** गजानन महाराज मंदिरा शेजारी, डाबकी रोड, जुने शहर, अकोला
**वेळ :** दुपारी २ ते रात्री ९

**क्लिनिक :** रूंगटा पेट्रोल पंप मागे, नवीन बस स्टॅण्ड बाजूला, अकोला
**वेळ :** सकाळी १० ते २
मो. : ८२७५४१२३७०

### निदान व उपचार

- हृदयरोग व उच्च रक्तदाब
- मधूमेह
- थायरॉईड ग्रंथीचा आजार
- फुफ्फुसाचा आजार
- न्यूमोनिया, दमा, टी. बी.
- मेंदूरोग (अर्धांगवायू, फीट येणे)
- मेंदूज्वर, टायफॉईड, मलेरिया, डेंगू
- कॉलरा, क्षयरोग, इत्यादी
- किडनीचा विकार
- श्वसन विकार
- पोटाचे विकार
- आतड्याचे विकार
- सांधिवात
- सांधेदुखी

### उपलब्ध सुविधा

- कृत्रिम ऑक्सिजन सुविधा (Artificial Oxygen Facility)
- ग्लुकोमिटर (Glucometer)
- ई. सी. जी. (E.C.G.)
- स्पेशल रूम व जनरल वार्ड (Special Room & General Ward)
- सिरीज पंप, नेब्युलायझेशन (Syringe Pump & Nebulization)
- पल्स ऑक्सिमीटर (Pulse oxymeter)
- सक्शन मशीन (Suction Machine)

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**